# परशुराम-चरित्र



म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ७३८

REFBK-0005586

—श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

# परशुराम-चरित्र

व

# पंचमानव हिंदुसमाज

७०१८

चरित्र ९३१
१८।५३८

श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

५५८५

सोल एजंट:
यशवंत गोपाळ जोशी,
७२३ सदाशिव, पुणें.

REFBK-0005586

किंमत १। रुपया

प्रकाशक
वि. ग. ताम्हणकर,
१२ बुधवार, पुणें.

( सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन )

मुद्रक
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस, ५१३ शनवार,
पुणें, २.

परशुराम-चरित्र व पंचमानव हिंदुसमाज

हें पुस्तक

नरसिंह चिंतामण केळकर

यांस अर्पण करतों.

आषाढ वद्य नवमी,
शाके १८५९

— श्रीपाद महादेव माटे

# प्रास्ताविक

आठ-दहा वर्षांपूर्वी मीं 'परशुराम' व 'महादेव' या विषयांवर पुणें येथील वसंत-व्याख्यान-मालेंत व्याख्यानें केलीं. तेव्हांपासून मीं परशुरामचरित्र लिहावें असा आग्रह माझे स्नेही रा. ताम्हनकर यांनीं चालविलेला होता. मी होकार देऊन ५–६ वर्षांपूर्वीं लिहूं लागलों व चरित्राचीं पहिलीं ४८ पानें प्रत्यक्ष छापून झालीं. तेव्हांपासून तें काम जें मागें पडलें तें थेट परवांपर्यंत ! माझ्याच म्हणण्यावरून त्यांनीं पुस्तकाची जाहिरात सुद्धां दिली; पण कांहीं केल्या चरित्र लिहावयास होईच ना. केव्हां हवीं आहेत तीं पुस्तकें वाचावयास मिळत नाहींत म्हणून, केव्हां वेळ नाहीं म्हणून, केव्हां व्याख्यान जुनें झालें म्हणून, पण या किंवा त्या कारणास्तव काम होईना. तथापि थोड्या दिवसांपूर्वीं असें वाटूं लागलें कीं, एकदां ज्याची घोषणा करून बसलों तें काम करून टाकणें हें अत्यावश्यक आहे. लिहावयाच्या पुस्तकाची नामावळि मनापुढें आहेच; पण त्यांना प्रत्यक्ष हात घालण्यापूर्वीं मागचें खरकटें एकदां काढावें हें आपलें वचन धड ठेवण्याच्या दृष्टीनें अगत्याचें वाटूं लागलें व त्याप्रमाणें आतां तें चरित्र लिहून प्रसिद्ध होत आहे. रा. ताम्हनकरांचा ससेमिरा मात्र जर का माझ्यामागें नसता तर हें लिहून होत नव्हतें. पण शाळेच्या वाटेवरच त्यांचें पुस्तकांचें दुकान असल्यामुळें मला जातां येतां ते मधून मधून टोकीत असत. त्यांनीं ढोसावयाचें सोडलें नाहीं आणि मींही हो म्हणावयाचें सोडलें नाहीं; पण आनंदाची गोष्ट ही कीं ते कधीं रागावले नाहींत आणि माझा धीमेपणा कधीं सुटला नाहीं. त्यांना हें मात्र खचित माहीत होतें कीं, रिकामा असा मी केव्हांच नव्हतों. १९३० सालापासून म्हणजे अस्पृश्यतानिवारणाच्या कामांतील रोजच्या अंगमेहनतींतून मी मोकळा होत चाललों तेव्हांपासून ग्रंथरचनेंत गुंतलों नाहीं असा एकही महिना मीं दवडलेला नाहीं. तरी पण श्री. ताम्हनकरांना व अप्रत्यक्ष रीत्या वाचकांना दिलेलें वचन तसेंच लोंबत राहिलें होतें हें खरेंच होतें! त्यामुळें मलाही अस्वस्थता वाटे. या प्रकरणीं एक लहानसा चुटका मनोरंजक वाटेल म्हणून देतों.

श्री. ताम्हनकर यांनीं " प्रसिद्ध होणार " या मथळ्याखालीं परशुराम-चरित्र, लेखक अमुकतमुक, अशा जाहिराती पुस्तकांवर दिलेल्या होत्या. त्याच वर्षी मुंबई-च्या ब्राह्मणसभेंत गणपति-उत्सवांत माझें व्याख्यान झालें. व्याख्यान उभें राहण्या-पूर्वी पद्धतीप्रमाणें माझ्यासंबंधींचें प्रास्ताविक निवेदन करण्याचें काम सुविद्य, तरतरीत, आणि सफाईनें बोलणाऱ्या एका चलाख गृहस्थांकडे आलें. माझ्या गुणांसंबंधीं यथोचित म्हणजे प्रसंगोचित उल्लेख केल्यानंतर त्यांनीं श्रोत्यांस सांगितलें, " आजचे वक्ते हे मोठे लेखक आहेत हें आपणांस माहीत आहे. त्यांनीं नुकतेंच लिहिलेलें परशरामचरित्र आपण सर्वांनीं वाचलेंच असेल " ! अर्थात् जें पुस्तक मीं कधीं लिहिलें नव्हतें व म्हणून जें प्रसिद्धही झालें नव्हतें तें श्रोत्यांनीं कोठून वाचलेलें असणार ? पण 'प्रसिद्ध होणार' या जाहिरातीचें 'प्रसिद्ध झालें' असें मनांत परिवर्तन होऊन वक्त्यांनीं माझी माहिती कथन केली व श्रोत्यांनींही मजकडे आदरानें पाहिलें. मी मात्र मनांत हसत होतों. जाहि-रातीनें ही फसगत झाली आहे हें मीं ताडलें. व्याख्यान संपल्यावर हे गृहस्थ कोण म्हणून चवकशी केली. तेव्हां कळलें कीं हे सॉलिसिटर बाळ गंगाधर खेर हे होत ! मुंबई इलाख्याच्या भावी प्रधानमंत्र्यांची तेव्हां माझ्या हातून जाहिरातीमुळें फसगत झाली याचें मला आज वाईट वाटतें व आनंद होतो कीं, " परशुराचरित्र यांनीं लिहिलें आहे " या त्यांनीं आगाऊ दिलेल्या शकुनवंतीचा अर्थ मला आज खरा करतां आला आहे !

परशुरामचरित्र असें जरी म्हटलें तरी पुस्तकाचें सबंध नांव 'परशुराम-चरित्र व पंचमानव हिंदुसमाज' असें आहे. परशुरामाच्या चरित्राचा अभ्यास केल्यानंतर मीं महादेवाचा अभ्यास केला. तेव्हां हिंदुसमाजाच्या बांधणीची एक विशेष प्रकारची कल्पना मला आली. ती पुस्तकरूपानें संग्राह्य आहे असें वाटूं लागलें व म्हणून तिच्या अंगांतून बाहेर पडणाऱ्या शलाकांसह तिचा प्रपंच मीं पुढील थोड्याशा पानांत केलेला आहे. महाभारत, रामायण, हरिवंश यांतून जें परशुरामचरित्र अवचयपद्धतीनें घेतां येण्यासारखें होतें तें घेऊन तें आरंभीं दिलें आहे. मग पुराणांच्या खरेखोटेपणाची चिकित्सा करून जर पुराणवाङ्मय नीट अभ्यासावयाचें असेल तर तेव्हांच्या वाङ्मय-संकेतांचा अभ्यास करावयास हवा असें दाखविलें आहे. नंतर संकेत म्हणजे काय याचें सोदाहरण विवेचन करून परशुरामाच्या चिरंजीवीपणाचा अर्थ

अशा एका संकेतानें स्पष्ट केला आहे. यानंतर परशुरामाचा काळ सात-साडे-सात सहस्र वर्षे जुना असावा असें सिद्ध करून इतक्या प्राचीनकाळीं उत्तरेकडून हिंदुस्थानांत आलेल्या ब्राह्मण, क्षत्रिय या स्वतंत्र जमाती असाव्या असें अनुमान केलें आहे. नंतर जमातबुद्धींत दिसून येणाऱ्या अपहरणबुद्धीचा उल्लेख करून परशुरामाच्या क्षत्रिय-वधाचें कारण केवळ धेनुहरण हें नसून स्त्रीहरण हेंही असावें असें म्हटलें आहे व याला वैदिक वाङ्मयाचा आधार दिला आहे. कालांतरानें हें पालटत जाऊन हिंदु समाजाच्या वर्णमूल संस्थापनेस आरंभ झाला असल्याचें सांगितलें आहे. यावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्या मनोमिलाफाचें विवेचन करून पंचमानव-विचार पुढें मांडिला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादींच्या मूळपुरुषांची चिकित्सा करून खरी लोकसत्ता कशी प्रस्थापित झाली हें दाखविलें आहे. यानंतर चवथे मानव म्हणजे बलिराण्याची प्रजा हें दाखवून महादेवाचे उपासक व लिंगपूजक म्हणजे हिंदु समाजाचे पांचवे मानव होत असें प्रतिपादलें आहे. लिंगपूजेचा सविस्तर व्यापार वर्णून महादेव व लिंग-पूजा हीं अविभाज्य आहेत असें सिद्ध केलें आहे. अत्रस्थांस आपल्या समाजांत घेण्यासाठीं त्यांच्या संस्था आर्यांनीं स्वीकृत केल्या व अशा रीतीनें पंच-मानव हिंदुसमाज सिद्ध झाला असें ठरविलें आहे. उपसंहारांत आपल्या धर्माचें सामाजिक रूप स्पष्ट करून शेवटीं सद्यःकाळाला युक्त असें परशुराम-चरित्रावरून काय घेतां येण्यासारखें आहे याचें विवेचन केलें आहे.

क्षत्रियकृत स्त्रीअपहरणाची कल्पना पंडित शामशास्त्र्यांच्या एका निबंधावरून माझ्या मनांत प्रथम आली. पण हें भांडण कसलें होतें याविषयीं मात्र त्यांच्या लिहिण्याशीं माझा मतभेद आहे. लिंगपूजेविषयींची माहिती मीं इंग्रजी धर्मकोशावरून घेतलेली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशीं ऋग्वेद व अथर्ववेद यांतील ऋचांच्या अर्थांची चिकित्सा करणें मला फारच लाभदायक झालें. श्री. लक्ष्मणशास्त्री यांचा मी फार आभारी आहें. पुस्तकांत केलेलीं अनुमानें चुकीचीं आहेत असें ठरलें तर तें माझें अपश्रेय आहे व तीं युक्त ठरलीं तर तें माझें श्रेय आहे.

पुणें शहर,<br>
आषाढ वद्य ९, १८५९.

श्रीपाद महादेव माटे

# अनुक्रमणिका

पृष्ठ

**प्रकरण पहिलें**

परशुरामचरित्र ... ... १

**प्रकरण दुसरें**

संकेतबोध ... ... २४

खऱ्याखोट्याची निवड ... ... २५

अद्भुताचा उपयोग कां केला ? ... ... २७

यामुळें पुराणें अश्रद्धेय बनलीं ... ... ३०

भोळेपणाच्या जोडीस विसरलेले संकेत ... ... ३२

पत्रव्यवहारसंकेत ... ... ३४

कादंबरीसंकेत ... ... ३६

समाधिसंकेत ... ... ३८

नामकरणसंकेत ... ... ४०

महाभारत-विषयक संकेत ... ... ४२

परशुराम-विषयक संकेत ... ... ४६

हें कां झालें ? ... ... ४९

हें तरी खरें कशावरून ? ... ... ५१

**प्रकरण तिसरें**

परशुरामाचा काल ... ... ५६

वसाहतकाल ... ... ५६

नर्मदेच्याखालीं क्षत्रियवध नाहीं ... ... ५८

समुद्राची जबानी ... ... ५८

उरफाटा प्रवास ... ... ५९

ऋग्वेदांतील प्रमाण ... ... ६१

परशुप्रमाण ... ... ६२

| | पृष्ठ |
|---|---|
| सामाजिक प्रमाण ... ... | ६३ |
| राजवाड्यांचें अनुमान ... ... | ६५ |
| चित्पावनस्थापनेचा काळ ... ... | ६७ |
| पर्शुरामाचा वंशवेल ... ... | ६९ |
| अवतार-अनुक्रमांत परशुरामाची जागा ... ... | ७० |
| वसाहती मूळ परशुरामानें केल्या नाहींत ... ... | ७४ |

**प्रकरण चवथें**

| | |
|---|---|
| **परशुरामाचें अवतारकृत्य व त्याच्या पीठिकेचें रूपांतर** ... ... | ७७ |
| भ्रमंती ... ... | ७७ |
| वर्णकल्पना ... ... | ८० |
| परशुरामकृत्याची बीजभूमि ... ... | ८१ |
| अपहरणबुद्धि ... ... | ८३ |
| धेनुहरण हें अपुरें कारण ... ... | ८४ |
| अवतारकृत्याचा बोज ... ... | ८५ |
| वैदिक आधार ... ... | ८६ |
| सूक्तें केव्हां रचिलीं ? ... ... | १०० |
| भारतांत उल्लेख कां नाहीं ? ... ... | १०१ |
| इतिहास व इशारत ... ... | १०२ |
| पोषक अनुमान ... ... | १०४ |
| हिंदुसमाज केव्हां सुरू झाला ... ... | १०५ |
| परशुराम मर्त्य होता ... ... | १०८ |
| अमरत्वाचें विवेचन ... ... | ११० |
| मनोमिलाफ ... ... | ११२ |
| परशुरामाची अवहेलना ... ... | ११४ |
| क्षत्रियवैराचे दुष्परिणाम ... ... | ११५ |
| आर्यधर्मप्रसाराचें काम ... ... | ११७ |

| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| पीठिकांतर | ... | ... | ११९ |
| वैरें विसरणें | ... | ... | १२० |
| **प्रकरण पांचवें** | | | |
| उरलेले मुद्दे | ... | ... | १२३ |
| महेंद्रपर्वत म्हणजे कोणता पर्वत | ... | ... | १२३ |
| वर्णच्युति परशुरामामुळें नव्हे. | ... | ... | १२५ |
| आणखी एक चुकीचें मत | ... | ... | १२८ |
| काश्यप गोत्राचा खुलासा | ... | ... | १२९ |
| **प्रकरण सहावें** | | | |
| पंच-मानवविचार | ... | ... | १३० |
| स्वतंत्र मानवपण | ... | ... | १३० |
| बलवत्तर प्रमाण | ... | ... | १३१ |
| जातींची वर्णमूलता | ... | ... | १३३ |
| क्षत्रियांचा मूळपुरुष | ... | ... | १३५ |
| संकरो नरकायैव | ... | ... | १३७ |
| पतकरलेला न्याय | ... | ... | १३८ |
| लोकसत्तेची खरी योजना | ... | ... | १४० |
| लोकसत्ता म्हणजे शासनाभाव | ... | ... | १४१ |
| त्रिवर्णमिलाफाची किमया | ... | ... | १४४ |
| पाताळांतील बळी | ... | ... | १४५ |
| बळीराणा | ... | ... | १४६ |
| लिंगपूजा | ... | ... | १४९ |
| मानवी मनाचें एकपण | ... | ... | १५० |
| लिंगपूजेचा भूतकालीन प्रसार | ... | ... | १५१ |
| लिंग व महादेव | ... | ... | १५३ |
| ख्रिस्तमतप्रचारकांची कुचंबणा | ... | ... | १५५ |
| परकल्पनांचें स्वीकरण | ... | ... | १५६ |

| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| शिवाचा धिक्कार करून चाललें नसतें. | ... | ... | १५७ |
| आर्येतरांत संस्कृति-प्रसार | ... | ... | १६० |
| सभ्यांचें उदाहरण | ... | ... | १६१ |
| एक उदाहरण | ... | ... | १६२ |
| स्वीकरणांतील संथपणा | ... | ... | १६४ |
| आर्यांची शरणागति | ... | ... | १६७ |
| जबरीचें साधन | ... | ... | १६७ |
| एकधर्मता एकी करते | ... | ... | १६९ |
| अवतारीकृत्यांचा अर्थ | ... | ... | १७० |
| परशुरामकथेचा तंतु | ... | ... | १७१ |
| **प्रकरण सातवें** | | | |
| उपसंहार | ... | ... | १७३ |
| मानव्याची शक्तिगर्भता | ... | ... | १७३ |
| सणांची ऐतिहासिकता | ... | ... | १७४ |
| शास्त्रपूत स्वीकार | ... | ... | १७५ |
| भांडणाची मुळें तींच असणार. | ... | ... | १७६ |
| समंजसपणा | ... | ... | १७९ |
| धनसंचार ही खरी घोषणा | ... | ... | १८० |
| बुद्धाची चूक पुन्हा होऊं नये. | ... | ... | १८१ |
| सनातनी सुधारकपणा | ... | ... | १८३ |

# माझें प्रकाशन—

१ वळवांचे पाऊस ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
*२ पुनर्भेट भाग २ रा ( कथासंग्रह ) किंमत १ रुपया.
*३ पुनर्भेट भाग ३ रा ( कथासंग्रह ) किंमत १। रुपया.
४ कणसाचे दाणे ( कथासंग्रह ) किंमत १ रुपया.
*५ दुर्दैवी मोहरे ( ऐतिहासिक चरित्रें ) किंमत १ रुपया.
६ पैसाच पैसा ( सचित्र नाटक ) किंमत १ रुपया.
७ जीवन-पथ ( कथासंग्रह ) किंमत १ रुपया.
८ आवडत्या गोष्टी ( ६१ लेखकांचा कथासंग्रह ) किंमत ३ रुपये.
*९ चित्तरंजन किं. १। रुपया.
१० फुलबाग ( कविता ) किंमत १ रुपया.
११ वायफळांचा मळा किंमत २॥ रुपये.
१२ वाहते वारे ( कथासंग्रह ) किंमत १२ आणे.
१३ गारांचा वर्षाव ( कथासंग्रह ) किंमत १। रुपया.
१४ सोनेरी नागीण ( कादंबरी ) किंमत १ रुपया.
१५ हायस्कूल विद्यार्थी ( कादंबरी ) किंमत ८ आणे.
१६ शि. म. परांजपे चरित्र व आठवणी किंमत १ रुपया.
१७ रशियांतील राज्यक्रांति ( पां. वा. गाडगीळ ) किंमत २॥ रुपये
१८ गुलाबाच्या पाकळ्या ( ले. द. र. कवठेकर ) किं. १। रुपया.
१९ रेशमी चिमटे ( ले. वा. वि. जोशी ) किंमत १। रुपया
२० प्रो. शहाणे ( ले. माधवराव जोशी ) किंमत १२ आणे.
२१ बाबू कुँवरसिंह ( ले. ग. सि. जोशी, बी. ए. ) किं. १२ आणे.
२२ उपहासिनी (विडंबन गीतांचा प्रातिनिधिक संग्रह) किं. १॥ रुपया.
२३ होमकुंड ( ले. य. गो. जोशी ) किंमत २ रुपये.
२४ अलका ( कादंबरी ) रा. न. कीर्तने, किंमत २। रुपये.
२५ साहित्यसंग्रह ( शि. म. परांजपे ) किंमत ३ रुपये.
२६ उत्तर ध्रुव ( ल. मुलांकरितां ) किंमत ४ आणे.

प्रकाशक—**यशवंत गोपाळ जोशी**, ७२२ सदाशिव, पुणें २.

---

*मुंबई इलाखा शाळाखात्यांत लायब्ऱ्यांकरितां व बक्षिसांकरितां मंजूर.

८७१६

प्रकरण पहिलें.

# परशुरामाचें चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

परशुराम अथवा भार्गवराम हा महापुरुष भृगुकुळांतील जमदग्नीचा मुलगा. जमदग्नीचा बाप ऋचीक यानें विश्वामित्राची बहीण जी सत्यवती तिच्याशीं विवाह केलेला होता. म्हणजे परशुरामाचा आजा ब्राह्मण होता व आजी क्षत्रिय होती. जमदग्नीनें रेणुका नांवाच्या क्षत्रिय-कन्येशीं विवाह केलेला होता. कोणाच्या मतें ही प्रसेनजित राजाची मुलगी व कोणाच्या मतें इक्ष्वाकुवंशांतील रेणु राजाची मुलगी. कोणतेंही खरें असलें तरी ती क्षत्रिय-कन्या होती हें खरेंच आहे. म्हणजे परशुरामाचा बाप ब्राह्मण व आई क्षत्रिय होती. अर्थात् या वेळीं मुलाला पितृसावर्ण्य मिळत असे असें दिसतें. परशुरामाला आणखी चार भाऊ होते. त्यांचीं नांवें रुण्मवत, सुषेण, वसु, विश्वावसु अशीं होतीं. परशुराम हा सर्वांत लहान. पण त्याच्याच हस्तें कांहीं अघटित घडून आलें.

परशुराम हा फार बुद्धिमान निघाला. त्यानें सर्व विद्यांचें अध्ययन केलें. पण त्यांतल्या त्यांत त्याची धनुर्विद्येवर फार भक्ति जडली. तो अग्नीप्रमाणें तेजस्वी पण आपल्या पित्याप्रमाणेंच मोठा कोपिष्ट होता. शस्त्रविद्येचें नेहमींचें अध्ययन पूर्ण झाल्यावर तो गंधमादन पर्वतावर गेला व तेथें शंकराची आराधना करून त्यानें अनेक प्रकारचीं अस्त्रें प्राप्त करून घेतलीं व शिवाय अत्यंत प्रखर असा परशुही मागून घेतला. हा परशु प्रज्वलित अग्नीप्रमाणें लखलखीत दिसे व त्याची धार कधीं कुंठित होत नसे. या परशूच्या

बळावरच तो एवढ्या प्रसिद्धीस आला. परशुरामाला ही क्षात्रविद्या कशी काय येत आहे हें महादेवानें पारखूनही पाहिलें. त्या झालेल्या झटापटींत या परशूचा वार त्याच्या मस्तकावर लागला, व म्हणून पुढें शंकराला खंडपरशु असेंही नांव मिळालें. मात्र आपला शिष्य उत्तम तयार झाला आहे अशी महादेवाची खात्री होऊन चुकली.

एकदां असें झालें कीं, परशुरामाची आई रेणुका ही नदीवर स्नानास गेली होती; त्या वेळीं वर्तिकावत देशाचा राजा चित्ररथ हा त्याच नदीवर जलक्रीडेस आला होता. त्याचें वैभव व त्याची रूपसंपदा पाहून रेणुकेचें मन थोडेंसें बावरलें. ती लगोलग परत आली. पण तिच्याकडे पाहतांच जमदग्नि ऋषीला संशय आला व हिला नष्ट करून टाकलें पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. इतक्यांत कंदमुळें, फळें आणावयास अरण्यांत गेलेलीं मुलें हळूहळू परत येऊं लागलीं. तीं आलीं तसतसें जमदग्नीनें त्यांना सांगितलें कीं, या तुमच्या पापिणी मातेचा वध करा. ही बापाची विचित्र आज्ञा ऐकून रुण्मवत, सुषेण, वसु व विश्वावसु हे घाबरूनच गेले व केवळ स्तंभित होऊन बसले. त्यांच्या हातून हें कर्म घडेना. शेवटीं परशुराम घरीं आला. जमदग्नीनें त्यालाही तीच आज्ञा केली. पित्याची आज्ञा ऐकली पाहिजे म्हणून परशुरामानें आपल्या आईचा वध केला. त्याचें आज्ञाधारकत्व पाहून जमदग्नि फार संतुष्ट झाला व "वर माग" म्हणून म्हणाला. परशुरामाला मातृहत्येचें दुःख अनिवार झालेलें होतें. तो तत्क्षणीं म्हणाला, "माझी आई रेणुका हिला पुन्हा सजीव करा." पुत्राची ही विनंति जमदग्नीनें मान्य केली व रेणुका सजीव होऊन पूर्वीप्रमाणें कालक्रमणा करूं लागली.

इकडे नर्मदा नदीच्या उत्तर तीरावर आणखी एक महाविख्यात पुरुष जन्माला आला होता. त्याचें नांव कार्तवीर्य. त्याच्या देशाचें नांव हेहय म्हणून त्यास हैहय असें म्हणत. तसेंच त्याला सहस्रार्जुन असेंही नांव होतें. हा महापराक्रमी राजा दिग्विजय करण्याच्या ईर्षेनें सर्व प्रदेशभर संचार करूं लागला. या त्याच्या संचारांत त्यानें एकदां समुद्रावरच चाल केली व माझ्या तोलाचा योद्धा कोण आहे तो बोल असें त्यास गर्जून विचारलें. समुद्रानें गयावया करून सांगितलें कीं, बाबा ! मी तो नव्हे, पण तुझी युद्धाची वखवख नाहींशी करणारा योद्धा लवकरच भेटेल व त्याचें नांव भार्गव किंवा परशुराम असें असेल. सहस्रार्जुनानें अनेक प्रदेश उजाड व बेचिराख करून टाकलें. या त्याच्या जाळपोळींत ब्रह्मनिष्ठ वसिष्ठ ऋषींचा आश्रमही सांपडला. आपला सर्व आश्रम दग्ध झालेला पाहून त्या शांत मनाच्या ऋषीलाही राग आला व तो त्वेषानें म्हणाला, “ ज्या अर्थी कसलेंही कारण नसतां केवळ मला ताप व्हावा म्हणून तूं माझें हें सुंदर वन जाळून टाकलें आहेस त्या अर्थी परशुराम हा तुझ्या सहस्रबाहूंचें वन तोडून टाकील.” वास्तविक सहस्रार्जुनाच्या हें ध्यानांत यावयास हवें होतें. पण त्यानें वसिष्ठाच्या शापवाणीकडे दुर्लक्ष केलें.

सहस्रार्जुनाप्रमाणें त्याचीं मुलेंही फार उर्मट आणि क्रूर निघालीं. त्यांनींही बापाचाच कित्ता उचलला आणि जिकडे तिकडे दंगाधोपा सुरू केला. या त्यांच्या जुलूमजबरदस्तीच्या फेरफटक्यांत ते जमदग्नीच्या आश्रमांत आले व त्याची कामधेनु त्यांनीं हरण करून नेली. कोठें कोठें असेंही म्हटलेलें आहे कीं, खुद्द कार्तवीर्यानेंच हें अपकृत्य केलें. वनांत गेलेला परशुराम घरीं आल्या-

वर जमदग्नीनें सहस्रार्जुनाचें हें पाप त्यास निवेदन केलें. तें ऐकतांच त्याला पराकाष्ठेचा संताप आला आणि बापाच्या असहायस्थितीचा असा फायदा घेणाराला शासन करण्यास तो घराबाहेर पडला. त्यानें सहस्रार्जुनाशीं रणांगणावर गांठ घातली व धेनुहरणामुळें चिडून गेलेल्या परशुरामानें आपल्या प्रखर परशूनें सहस्रार्जुनाचा पराभव केला आणि त्याच्या तावडींतून त्यानें आपली कामधेनु परत आणिली. परशुरामाच्या या कृत्यानें मूळचें भांडण अधिकच भडकलें. आपल्या प्रतापी पित्याचा झालेला पराभव अर्जुनाच्या मुलांना स्वस्थ बसूं देईना. संधी साधून म्हणजे परशुराम घरीं नाहीं हें पाहून या मुलांनीं जमदग्नीच्या आश्रमावर चाल केली व त्या वृद्धाचा तेथल्या तेथें वध केला. घरीं येतांच परशुरामानें हा झालेला भयानक व दुःखद प्रकार पाहिला आणि संतापाच्या कढांत त्यानें प्रतिज्ञा केली कीं, "ज्या क्षत्रियांनीं हीं अपकृत्यें चालविलीं आहेत त्यांचा समूळ नाश करीन." परशुरामाचा संताप इतका भडकण्यास पित्याचा नाहक वध हें तर कारण झालेंच होतें पण वधाच्या आधीं त्यांनीं त्याला एकवीस वेळां शस्त्रांनीं जखमी केलें होतें. आपल्या प्रतापी मुलास रेणुकेनें सर्व हकीकत सांगितली तेव्हां त्याच्या मनांत मोठीच कालवाकालव झाली. आणि क्षत्रियनाशाची घोर प्रतिज्ञा पार पाडण्याचा त्यानें निश्चय केला. त्याची ही प्रतिज्ञा ऐकून रेणुकेस समाधान झालें, पण दुःखातिशयानें तिचें प्राणोत्क्रमण झालें. याप्रमाणें परशुराम अगदीं पोरका झाला. एका परशूशिवाय आतां त्याला कोणी त्राता राहिला नाहीं.

चित्तांत सूड व हातांत परशु घेऊन परशुराम आश्रमांतून बाहेर

पडला तो थेट कार्तवीर्याच्या प्रदेशांतच शिरला. परशुराम येत आहे हें ऐकतांच त्यानें आपलें मोठें सैन्य त्याजवर धाडलें. परशुरामानें हां हां म्हणतां या सैन्याची धूळधाण उडविली. सैन्याचा पराभव होतांच कार्तवीर्य हा स्वतःच परशुरामावर चाल करून आला. परशुरामास तेंच हवें होतें. आतां दोन महाप्रबळ अशा वीरांची गांठ पडली होती, त्यामुळें युद्धाला चांगलेंच तोंड लागलें. कार्तवीर्याच्या फौजा बाजूस राहून त्याचें व परशुरामाचें द्वंद्वयुद्ध सुरू झालें. अंगच्या शौर्यांत चित्ताचा दाह मिसळलेला असल्यामुळें परशुरामानें दीर्घकाळपर्यंत खडा सामना केला. शेवटीं कार्तवीर्य फिका पडूं लागला. परशुरामानें आपल्या कुऱ्हाडीनें त्याचे हजार बाहू खडाखड तोडून टाकले व तो महान् प्रतापी योद्धा कार्तवीर्य गतप्राण होऊन पृथ्वीवर पडला. बापाची ही दशा झालेली पाहतांच त्याच्या पुत्रांनीं परशुरामावर हत्यार उचललें. हें द्वंद्व नव्हे हें ओळखून परशुरामानें रथावर आरोहण केलें आणि श्रीशंकरापासून प्राप्त करून घेतलेल्या धनुर्विद्येचा प्रभाव तो शत्रूस दाखवूं लागला. अनेकांना एकटा भारी ठरणारा हा योद्धा त्यांचा निःपात करीत चालला आणि शेवटीं एवढा मोठा सेनासंभार पण परशुरामानें त्याची दाणादाण केली व एकही योद्धा जीव बचावून समरांतून सुटला नाहीं. याप्रमाणें वसिष्ठाची शापवाणी परशुरामानें खरी करून दाखविली.

वसिष्ठाची शापवाणी खरी ठरली तरी स्वतःची प्रतिज्ञा मात्र परशुरामास अजून पुरी करतां आली नव्हती. झालेली क्षत्रियहत्या योग्य त्या दोषी क्षत्रियांचीच झालेली आहे ती पुरेशी झालेली आहे हें पाहून मनःशांतीसाठीं तो अरण्यांत निघून गेला. पुढें हजार वर्षांनीं त्याला पुन्हा एकदां क्षत्रियांनीं डिवचलें. विश्वामित्राचा पौत्र त्याला लावून

बोलला कीं, ययातिनगरामध्यें जमा झालेले क्षत्रिय हे क्षत्रिय नव्हत कीं काय ? परशुरामाच्या नुसत्या तोंडाच्या वाफा आहेत. त्याची प्रतिज्ञा केवळ वायफळ आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, क्षत्रियांना हा भ्यालेला आहे व म्हणून तपश्चर्येचें मिष करून हा अरण्यांत जाऊन बसला आहे. अर्थात् शांत झालेल्या परशुरामाला हें नवें व अकारण आव्हानच होतें. परशुरामानें तें खुशीनें पत्करलें, व पुन्हा रण-धुमाळी माजली. पूर्वीं त्याचें रणक्षेत्र नर्मदातीरावर व हैहय कुळा-पुरतेंच होतें. आतां तो तेथून हिमालयाच्या पायथ्यापर्यंत हिंडूं लागला व जेथें जेथें क्षत्रिय भेटतील तेथें तेथें त्यानें दारुण युद्धें मांडिलीं. क्षत्रियांनींही पुन्हा पुन्हा उचल केली. दर वेळीं परशु-राम अनावर व्हावा व क्षत्रियांची कत्तल व्हावी आणि पुन्हा क्षत्रियांनीं नवें बळ घेऊन त्याच्याशीं संगर मांडावें, असें एकवीस वेळां झालें. मग मात्र उभयपक्षीं अगदीं हद्द झाली. क्षत्रियही कोठें डोकें वर करीनात व परशुरामही मानूं लागला कीं, क्षत्रिय-नाशाची आपली प्रतिज्ञा खरोखरच पूर्ण झाली. या नव्या हत्या-कांडांत अंग, कलिंग, मालव, विदेह, काश्मीर, दरद, कुंती, शिबी इत्यादि राजकुळांचा त्यानें संहार केला व उरले सुरले क्षत्रिय नामांतर व स्थलांतर करून अदृश्य झाले. भावी काळांत प्रसिद्धीस आलेल्या कुरुक्षेत्रावर सुद्धां क्षत्रियसमूहाशीं त्यानें महाभयंकर सामना केला व अशी आख्यायिका आहे कीं, सध्यांचा रामडोह म्हणून जो तेथें आहे तो क्षत्रियांच्या रक्तानें भरून गेला होता. या गडबडींत परशुरामाला गणपतीवरही परशु उचलावा लागला. झालेल्या झगड्यांत गणपतीचा एकच दांत शिल्लक राहिला व म्हणून गणपतीस एकदंत असें नवें नांव प्राप्त झालें. याप्रमाणें क्षत्रिय कुळाची वाताहत झाली व परशुरामाची प्रतिज्ञापूर्ति झाली.

यानंतर परशुरामानें पुन्हा याच कामासाठीं हत्यार उचललें नाहीं; व शस्त्र खालीं ठेवतांना तो म्हणाला, कीं ब्रह्मविद् ब्राह्मणांना कधीं आपत्काळ प्राप्त झाला तरच मी शस्त्र धारण करीन; नाहीं तर करणार नाहीं. या प्रसंगीं पितृतर्पण करतांना त्याचा पितामह ऋचीक यानें त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें व क्षत्रियसंहारापासून आतां परावृत्त हो असें त्यास आग्रहपूर्वक सांगितलें.

यानंतर परशुरामानें सर्व पृथ्वी हस्तगत केली. पण त्याला स्वतःला राज्य करावयाचेंच नव्हतें. कारण तो केवळ एका आकस्मिक उद्रेकामुळें या क्षत्रिय-नाशाच्या उद्योगास लागला होता. तो मूळचा तापसी होता. प्रतिज्ञापूर्तीनंतर त्यानें महाप्रचंड यज्ञ केला. या यज्ञांतील वेदी सगळीच्या सगळी सुवर्णाची असून ती दहा वाव लांब व नऊ वाव उंच होती. यज्ञाच्या शेवटीं दान करावयास हवें तेंही परशुरामानें आपल्या कृत्याला साजेसेंच केलें. कश्यपमुनि हा त्या काळाचा सर्वश्रेष्ठ मुनि होता व परशुरामाच्या मुंजीच्या वेळीं त्यानेंच परशुरामाला ब्राह्मणदीक्षा दिलेली होती. या महायज्ञाच्या वेळींही मुख्य अध्वर्युपण कश्यपाकडेच होतें. दान देण्याच्या प्रसंगीं हस्तगत केलेल्या सर्व समुद्रवलयांकित पृथ्वीचें उदक परशुरामानें कश्यपाच्या हातावर सोडलें व वर सुवर्णपुष्प म्हणून ती लखलखीत सोन्याची तयार केलेली भव्य वेदीही त्यासच देऊन टाकली. याप्रमाणें सर्वसंगपरित्याग करून परशुराम हा महेंद्रपर्वतावर आश्रम स्थापन करून रहावयास गेला.

इकडे कश्यपमुनींनीं त्या सुवर्णवेदीचीं खांडें करून यज्ञार्थ जमलेल्या सर्व ऋत्विजांना तीं वाटून दिलीं. या ब्राह्मणकुलांना खांडवायन ब्राह्मण हें नांव पडलें. सोनें ब्राह्मणांनीं घेतलें पण परशुरामानें दान केलेल्या या पृथ्वीचें काय करावयाचें याची विवंचना कश्यप-

मुनीस पडली. क्षत्रिय नाहींसे झाल्यामुळें तिचें रक्षण होईना. दुष्ट लोकांची पीडा तिला होऊं लागली व सर्वत्र विपर्यास झाला. धर्मानुरोधानें तिचें नियमन होईना म्हणून संत्रस्त होऊन ती रसातळामध्यें प्रविष्ट होऊं लागली. हें पाहतांच कश्यपमुनींनीं आपल्या ऊरूंत म्हणजे मांड्यांत तिला दाबून धरलें. ते तिला बुडूं देईनात. पृथ्वीला 'उर्वी' हें नांव पडण्याचें कारण हेंच होय. पृथ्वी म्हणाली तूं मला त्राताही देत नाहींस व बुडूंही देत नाहींस याला काय म्हणावें ? कश्यप म्हणाले, मी तुला त्राता कोठून आणूं ? परशुरामाच्या हत्यापर्वांत तुझे त्राते नाहींसे झाले आहेत. पृथ्वीनें सांगितलें तूं निराश होऊं नको. क्षत्रियकुळें समूळ नष्ट झालेलीं नाहींत. परशुरामानें जरी हजारों राजांचा नाश केलेला आहे, तरी त्यांतील कित्येकांची प्रजा नामांतर व स्थलांतर करून अवशिष्ट राहिली आहे. कित्येकांनीं हलके धंदे सुरू केले आहेत व कोणी समुद्रांत, तर कोणी डोंगरांत, हलक्या लोकांच्या सहवासांत रहात आहेत, त्यांना घेऊन ये. त्यांचीं वसतिस्थानें विचारतां पृथ्वी म्हणाली हैहय ह्या कुळांतील कांहीं क्षत्रियश्रेष्ठ स्त्रीसमुदायामध्यें गुप्त रीतीनें रहात आहेत, त्यांना घेऊन ये. पौरववंशांतील विदूरथपुत्र ऋक्षमान् पर्वतावर अस्वलांनीं रक्षण करून वाढविलेला आहे. अत्यंत सामर्थ्यसंपन्न यज्ञशील पराशरमुनींनीं दयायुक्त होऊन चौदा राजांचा एक वंशज रक्षण करून ठेविला आहे. तो द्विज असतांही शूद्रांचीं सर्व कर्में आचरितो व म्हणून त्याला सर्वकर्मा असें नांव पडलें आहे. त्याला परत आणिलेंस तर तो माझें रक्षण करील. तसेंच शिबीचा गोपति या नांवाचा महातेजस्वी पुत्र वनामध्यें गाईंनीं रक्षण करून वाढविलेला आहे त्यासही घेऊन ये. प्रतर्दन राजाचा महाबलाढ्य पुत्र गोठाणामध्यें गोवत्सांच्या संगतींत

रहात आहे त्याला घेऊन ये. दधिवाहनाचा पौत्र गंगातीरावर गौतम-मुनींनीं गुप्तपणें पाळलेला आहे तोही माझें रक्षण करील. अत्यंत ऐश्वर्यामुळें शोभणारा जो बृहद्रथ त्याचें गृध्रकूटावर गोलांगुलांनीं म्हणजे वानरांनीं रक्षण केलें आहे तोही माझें रक्षण करील. मरुताच्या कुळामध्यें उत्पन्न झालेले क्षत्रियपुत्र समुद्रानें रक्षण करून ठेविलेले आहेत. हे क्षत्रिय असल्याबद्दल त्या त्या ठिकाणीं प्रसिद्ध असून कोणी शिल्पकाराचा, कोणी सुवर्णकाराचा आश्रय घेऊन राहिलेले आहेत. त्यांनीं जर माझें रक्षण केलें तर मी स्थिर राहीन. जे पूर्वीं होऊन गेले त्या क्षत्रियांकडून रक्षण व्हावें अशी माझी इच्छा नाहीं. जे विद्यमान आहेत, तेच माझे रक्षणकर्ते असावे अशी माझी इच्छा आहे. तर या सर्वांना तूं घेऊन ये. पृथ्वीच्या आज्ञेप्रमाणें कश्यपमुनींनीं सर्व क्षत्रियकुमारांना त्या त्या ठिकाणांहून आणिलें व त्यांना सिंहासनस्थ करून यांना राज्याभिषेक केले. परशुरामापासून या क्षत्रियांना इजा पोंचूं नये म्हणून कश्यपानें त्यास खसखशीत बजावलें कीं, तूं दान दिल्यामुळें ही पृथ्वी माझी झालेली आहे आणि म्हणूनच येथें राहण्याचा सुद्धां तुला आतां अधिकार नाहीं. आणि म्हणूनच परशुराम महेंद्रपर्वतावर राहूं लागला.

पुढें एकदां दाशरथी रामाची कीर्ति ऐकून याचा काय पराक्रम आहे तो पहावा, या हेतूनें परशुराम फिरत फिरत अयोध्येस आला. हें वर्तमान ऐकून दशरथानें आपल्या वडील मुलाला त्याज-कडे धाडिलें. त्याचा तो धीट स्वभाव पाहून परशुरामानें आपलें धनुष्य त्याच्यापुढें केलें व म्हणाला या धनुष्याची दोरी एवढी कानापर्यंत ओढ. रामानें लीलेनें तें धनुष्य हातांत घेतलें व कांहीं आयास न पडतां त्यानें दोरी तर कर्णान्त ओढलीच पण तिचा

टणत्कारही करून दाखविला व पुढें परशुरामास विचारलें कीं, आतां काय करूं ? रामाचें बल पुरतें ध्यानांत न आलेला भार्गव एक बाण काढून त्यास म्हणाला, एवढा बाण कानापर्यंत ओढून दाखीव. आपली परीक्षा पाहूं इच्छिणाऱ्या या भार्गवावर रामचंद्र अत्यंत क्रुद्ध झाला; व त्यानें तो बाण कानापर्यंत ओढून दाखविला. त्या वेळीं त्याचें मुख क्षात्रतेजानें इतकें झळकूं लागलें कीं, आदित्य, रुद्र, अग्नि, धनुर्वेद, विद्युत् हीं सर्व तेथें एकवटलीं आहेत कीं काय, असें परशुरामास वाटूं लागलें. मग रामानें तो बाण सोडतांच उल्का, वर्षा, वायु, भूकंप इत्यादीसारख्या आवाजांनीं दशदिशा भरून गेल्या. या बाणानें परशुरामाचें तेजही हरण करून नेलें. दाशरथी रामाचें हें तेजस्वी क्षत्रियत्व मान्य करून परशुराम स्वस्थळीं निघून गेला. रामानें परशुरामाचा पराभव केल्याची कथा अशीच आहे.

महादेव ज्याप्रमाणें आपली अस्त्रविद्या शिकवीत राहिला होता, त्याप्रमाणें परशुरामही यापुढें क्षत्रियवधाची कल्पनाही मनांत न आणतां शांत राहून आपली अस्त्रविद्या सर्वांस शिकवीत काल-क्रमण करूं लागला. परशुराम हा आपल्याजवळ जें जें धन असेल तें तें लोकांस देऊन टाकतो हें ऐकून महातपस्वी जो द्रोण तो आपल्या सर्व शिष्यांसमवेत महेंद्रपर्वतावर गेला. आपलें कुल इत्यादि त्यास सांगून द्रोणानें धनाची याचना केली. परशुराम म्हणाला, मजजवळ कांहीं नाहीं. माझें सर्व धन मीं मागेंच कश्यपाला देऊन टाकलें आहे. भूमीही माझी नाहीं; तीही मीं कश्यपालाच देऊन टाकली आहे. तर आतां मी तुला काय देऊं ? माझें शरीर व मजजवळ असलेलीं उंची शस्त्रास्त्रें हींच काय तीं माझीं म्हणतां येण्यासारखीं आहेत. त्यांतलें तुला काय हवें तें सांग. द्रोणानें

उत्तर केलें, बाण सोडण्याचे व सोडलेले परत घेण्याचे जे गुप्तमंत्र आपणापाशीं आहेत ते सर्व आपण मला द्यावे. परशुराम हा फार दातृत्वशूर होता. त्यानें आपली सर्व धनुर्विद्या द्रोणाला सांगितली. भारतांतील महान् योद्धा जो भीष्म तोही परशुरामापाशीं क्षात्र-कौशल्य पढलाच होता. भारतांतील तिसरा वीर जो कर्ण, तोही परशुरामाचा शिष्य झाला, कदाचित् परशुरामाला बरें वाटावें म्हणून त्यानें आपण ब्राह्मण आहों असा बहाणा केला. पण मांडीला भुंगा कडकडून चावला तरी त्यानें यत्किंचितही हालचाल केली नाहीं हें पाहून परशुरामानें त्याचें कपट ओळखलें व हा क्षत्रियच असला पाहिजे असें मनाशीं ठरविलें. मग कर्णाला खरें काय तें सांग म्हटल्यावर, त्यानें आपलें सर्व वृत्त सांगितलें. कोपिष्ट परशु-रामानें ही त्याची प्रतारणा-बुद्धि पाहून त्यास शाप दिला कीं, तुला अगदीं ऐन प्रसंगीं माझे मंत्र स्मरणार नाहींत. यामुळें परशुरामानें जरी त्याला सर्व अस्त्रविद्या पढविली होती तरी अर्जुना-शीं शेवटचें युद्ध करतांना कर्णाची बुद्धि गांगरली व त्याचे मंत्र त्याला आठवेनात.

दरम्यानच्या काळांत परशुरामाचें महत्त्व निरनिराळ्या तऱ्हांनीं वाढूं लागलें होतें. एकाद्या निर्लोभ, निरागस, आणि प्रेमळ वृद्धाला जी पदवी समाजांत प्राप्त होते तीच त्याला प्राप्त झाली होती. याचें द्योतक म्हणजे अंबेची कथा होय. ही कथा मोठी चमत्कारिक आहे. पितृभक्ति म्हणून भीष्मानें आपला गादीवरचा हक्क सोडला होता. वास्तविक सत्यवतीशीं झालेल्या कराराप्रमाणें तिचा मुलगा चित्रांगदच गादीवर बसला; पण तो लवकरच वारला. यावर भीष्मानें आपला धाकटा भाऊ विचित्रवीर्य यास गादीवर बसविलें. पुढें या विचित्रवीर्याचें लग्न करण्याचें

भीष्माच्या मनांत घोळूं लागलें. याच वेळीं काशीराजानें आपल्या तीन मुली ज्या अंबा, अंबिका व अंबालिका त्यांचें स्वयंवर आरंभिलें. मुली कशा काय आहेत हें पहावें म्हणून भीष्म स्वयंवर-स्थानीं गेला. तीनही मुली उत्तम सुस्वरूप आहेत हें पाहून आपल्या भावासाठीं तिघींसही घेऊन जाण्याचें त्यानें ठरविलें व समारंभाच्या दंगलींत अनुकूल वेळ पाहून त्या तीनही मुलींस त्यानें अचानक उचलून रथांत घातलें व घोडे पिटाळले. काशीराजानें पाठलाग केला पण कोणाचें कांहीं न चालून भीष्म मुलींसह आपल्या राजधानींत येऊन दाखल झाला. तेथें पोंचल्यावर भीष्माचा हेतु मुलींना स्पष्ट झाला. तेव्हां वडील मुलगी अंबा ही त्वेषानें भीष्मास म्हणाली, "मला तुम्हीं उगाच आणलें. मी विचित्रवीर्यास वरणार नाहीं. कारण माझें मन आधींच शाल्व राजावर बसलें आहे." भीष्मानें चारजणांचा सल्ला घेतला व लव्याजम्यासह तिची शाल्वाकडे रवानगी करून दिली; कारण जी मुलगी उघड उघड आपलें मन दुसऱ्यावर बसलें आहे असें सांगते तिज-वर लग्नाची जबरदस्ती करावी हें त्यास बरें वाटेना. अंबा शाल्वा-कडे गेली व आपलें वृत्त सांगून माझा स्वीकार करावा असें ती त्यास म्हणाली. शाल्वानें भलतेंच उत्तर केलें. तो म्हणाला, तुझें जर माझ्यावर येवढें प्रेम तर तूं त्या दांडग्या भीष्माबरोबर गेलीस कशी ? त्यानें जबरदस्ती केली म्हणशील तर हिसकाहिसक करावयास पाहिजे होतीस. तुला दुसऱ्याचा स्पर्श झाला आहे म्हणून तूं मला नकोस. हें ऐकून अंबा बावरून गेली. भीष्माच्या दांडगाईमुळें आपला हा शाल्वसंबंध मोडला याची तिला भारीच चीड आली व तिनें भीष्मावर सूड घेण्याचा निश्चय केला. भीष्माचें, शाल्वाचें व स्वतःच्या पित्याचें म्हणजे काशीराजाचें

कोणाचेंच घर नको म्हणून रानांत जाऊन ती ऋषिमंडळांत विरागी होऊन बसली. पण तिचा भीष्मावरचा राग मात्र अनावरच राहिला होता. वास्तविक भीष्मानेंच तिला उचलिलें असल्यानें त्यानेंच तिचें पाणिग्रहण आतां करावयास हवें होतें. पण भीष्म ब्रह्मचारीच राहणार होता. तेव्हां कोणाकडून तरी भीष्मास दोन गोष्टी सांगवाव्या आणि तुझ्यामुळें एका मुलीच्या जन्माचें मातेरें होत आहे तर तूंच तिचा अंगीकार कर असें म्हणवावें म्हणून ती तेथील ऋषींना विचारूं लागली. शेवटीं होत्रवाहनानें सांगितलें कीं, भीष्म हा परशुरामाचा शिष्य आहे; तेव्हां त्यानें जर सांगितलें तर भीष्म ऐकेल. दरम्यान आपल्या भ्रमंतींत परशुराम तेथें प्राप्त झाल्यामुळें अंबेचें प्रकरण जास्तच जोरानें सुरू झालें. तिचें सर्व म्हणणें ऐकून घेतल्यावर परशुरामानें तिचें सांत्वन केलें व तुझें इष्ट मी घडवून आणतों असें आश्वासन त्यानें तिला दिलें. परशुरामाला विश्वास वाटत होता कीं, आपण सांगूं त्याप्रमाणें भीष्म करील. म्हणून तिला घेऊन तो भीष्माकडे गेला. झालेली सर्व हकीकत त्यास सांगून परशुरामानें आग्रह केला कीं, तूं अंबेशीं लग्न करावेंस. त्यानें नकार दिला व आमरण ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा आपण कशी केली आहे हेंही उलगडून सांगितलें. पण परशुराम ऐकेना. त्याचें म्हणणें कीं, तुझ्या अंगलगटीमुळें या मुलीवर ही आपत्ति ओढवलेली आहे. तुझी चूक आहे तर तूं ती दुरुस्त करावीस. भीष्माला हें मानवेना. शेवटीं शब्दानें शब्द वाढतां वाढतां भांडण उभें राहिलें. परशुरामही तामसीच होता. प्रकरण हातघाईवर येऊन परशुरामानें भीष्माला युद्धाला पाचारण केलें. गुरूशीं युद्ध करणें भीष्माला नको होतें, पण तें टळेना. शेवटीं तेवीस दिवस युद्ध झालें. चढउतार पुष्कळ झाले; शेवटीं भीष्म आपल्याहून श्रेष्ठ

आहे हें परशुरामानें मान्य केलें व आतां माझा नाइलाज आहे असें म्हणून त्यानें अंबेस वाटेस लावलें.

दरम्यानच्या काळांत सध्यांच्या ओरिसा प्रांतांत जेथें महेंद्र-पर्वत आहे तेथून परशुरामानें आपला मुक्काम सह्याद्रीच्या पश्चिमेस नेला असावा असें दिसतें. कारण श्रीकृष्ण व बळराम यांची व त्याची भेट त्या प्रदेशांत झाल्याचें वर्णन हरिवंशांत दिलें आहे तें असें:—

जरासंधाची स्वारी मथुरेवर होणार हें निश्चित कळल्यावर आपल्या नगराचें रक्षण कसें करावें हा श्रीकृष्णाला मोठा विचार पडला. जरासंध कांहीं सामान्य असामी नव्हती; आणि मथुरा-नगरी तर आधींच खिळखिळी होऊन गेलेली होती. जरासंधाच्या तडाक्यापुढें तिचें कांहीं चालेल असें दिसेना. वास्तविक जरा-संधाला मथुरा नगरी बुडवावयाची होती असें नव्हे, तर बलराम व श्रीकृष्ण यांचा नाश करावयाचा होता. आपण मथुरेंत राहिलों तर आपल्या नाशासाठीं जरासंध मथुरेवर चालून येणार व त्या नगरीचा नाश होणार यापेक्षां आपण उभयतां भावांनीं दुसरीकडे पळून जावें असा विचार कायम करून श्रीकृष्ण व बलराम दाक्षिणा-पथाकडे निघाले.

" इच्छेस येतील तीं रूपें घेऊन दक्षिण दिशेच्या अनुरोधानें मार्गक्रमण करीत असतां शेंकडों राष्ट्रें त्यांस वाटेंत लागलीं. दक्षिणापथाकडे सह्याद्रीच्या रमणीय पठारावरून जात असतां त्यांस अत्यंत आनंद वाटला. शेवटीं ते वीर सरळ मार्गाला लागले. पुढें थोड्याच अवधींत ते सह्याद्रीच्या सान्निध्यानें शोभिवंत दिसणाऱ्या व यदुवंशीयांनीं अलंकृत केलेल्या करवीर नगरापाशीं येऊन पोंचले. तेथें गेल्यानंतर वेणा नदीच्या तीरावर एक फार विस्तार-

लेला जुनाट व मोठा वटवृक्ष त्यांचे दृष्टीस पडला. त्या वृक्षाच्या खालीं मंदराचलावर सूर्य ज्याप्रमाणें दैदीप्यमान दिसतो त्याप्रमाणें तेजःपुंज दिसणारा, अपरिश्रांत व अव्यय भार्गवराम बसला होता, त्याचेंही त्यांस दर्शन झालें. त्या जटिल ऋषीचें तपोबल कडकडीत असून त्यानें खांद्यावर परशु व अंगावर वल्कलें धारण केलीं होतीं. तो गौरवर्ण असून अग्निशिखेसारखी त्याची आकृति होती. तो तेजानें प्रतिसूर्यासारखा असून त्यानें आपल्या अवतारकालीं सर्व पृथ्वी निःक्षत्रिय केली होती. त्याच्या अप्रतिम गांभीर्यामुळें हा देहधारी सागरच आहे कीं काय, असें वाटे. त्याचा त्रेताग्नि-विस्तार समारोपामुळें कमी पडला होता तरी यथाकालीं अग्नि प्रदीप्त करून तो हवन करीत असे. त्रिकाल जलस्नानानें त्याचें शरीर आर्द्र दिसत असून तो आद्य देवगुरूप्रमाणें तेजस्वी दिसत होता. रामकृष्ण तेथें आले त्या समयीं दुधाची केवळ अरणी म्हणजे उत्पत्तिस्थानच अशा आपल्या सवत्स व पांढऱ्या शुभ्र, होमार्थ दूध काढावयाच्या कामधेनूला महेंद्रगिरीकडे तो घेऊन जात होता. त्याचें दर्शन घेऊन स्थानस्थित अग्नीप्रमाणें दिसणारे उभयतां पराक्रमी वसुदेवपुत्र त्याच्या पायांपाशीं बसले. नंतर वक्तृश्रेष्ठ व व्यवहारचतुर कृष्णानें परशुरामास नमस्कार करून आपली सर्व हकीकत निवेदन केली व जरासंधाशीं गांठ घालावी तर मथुरा नगरीचा नाश होतो म्हणून हें देशान्तर आम्हीं केलें आहे असेंही त्यास सांगितलें. तथापि देशान्तर केलें तरी जरासंधाचा ससेमिरा चुकत नव्हता. कारण तो सारखा पाठीवर येतच होता. म्हणून आतां कोठें जावें याची कांहीं मसलत आम्हांस द्यावी अशीही विनंति त्यानें परशुरामास केली.

परशुरामानें सर्व परिस्थितीचा विचार करून रामकृष्णांनीं

गोमंतक पर्वतावर जावें असें मनाशीं ठरविलें व तिकडचा मार्ग कसकसा आहे याचें सुंदर वर्णन त्यानें तपशीलवार केलें. तो म्हणाला:—" गोविंदा, पुरातन कालीं तुझ्याच पूर्वजांनीं हें करवीर-पुर व त्या भोंवतालचें राष्ट्र बसविलें. महाविख्यात वासुदेव-पुत्रा– कृष्णा, या पुरीचा शृगाल नामक राजा आहे. तो नेहमीं फार रागांत असतो. त्याला दुसऱ्या वीरांचा उत्कर्ष सहन होत नाहीं. हे गोविंदा, तुझ्या कुलांत उत्पन्न झालेल्या व या नगरीचें राज्य करणाऱ्या तुझ्या सर्व दायादांना त्या राजानें द्वेषामुळें मारून टाकिलें. तो अत्यंत गर्विष्ठ, मत्सरी व संयमरहित असून राज्याच्या व ऐश्वर्याच्या धुंदीनें फार चढून गेला आहे. प्रत्यक्ष पोटच्या पोरांशींही तो नैष्ठुर्यानें वागतो. म्हणून नरोत्तमा, तुम्ही या दुष्ट राजाच्या अंमलांतील भयंकर करवीर नगरांत राहावें हें संमत नाहीं. आतां कोणत्या ठिकाणीं राहून तुम्ही उभयतां शत्रुत्रासकांनीं बलानें उन्मत्त झालेल्या जरासंधाशीं युद्ध करावें तें मी तुम्हांला सांगतों. आत्तांच्या आत्तां आपल्या बाहु-बलानें ही पुण्यकारक वेणा नदी तरून जाऊन या देशाच्या सीमेवरील दुर्गमगिरीवर आपण निवासाकरितां जाऊं. त्या रमणयि पर्वताचें यज्ञगिरी असें नांव असून तो **सह्याद्रीचीच** एक दूरवर गेलेली शाखा आहे. तो मांसभक्षक व घोर कर्में करणारे चोर यांचें निवासस्थान असून त्यावर नाना प्रकारच्या वृक्षवेली उगवतात. त्या पर्वतावरील तरु पुष्पित झालेले आहेत. त्यामुळें तो चित्रविचित्र दिसतो. त्या पर्वतावर आजची रात्र काढून नंतर दुसरे दिवशीं आपण खट्वांग नामक नदी ओलांडून पुढें जाऊं. ती नदी मोठ्या पर्वतापासून खालीं पडत असून निकषग्रावांनीं अलंकृत झालेली आहे व तिचा धबधबाही गंगे-

सारखा आहे. त्या नदीच्या प्रपातापाशीं तपोवन असल्यामुळें त्या तपोवनाला अलंकारभूत असलेला तो धबधबा पाहून नंतर आपण थोडी विश्रांति घेतल्यावर पुढल्या पर्वतावर आरोहण करूं. तेथें त्या पर्वतावर तपश्चर्या करीत बसलेल्या, मानार्ह असूनही मानाची इच्छा न करणाऱ्या तपोधन विप्रांचें दर्शन केल्यावर पुढें जातां जातां शेवटीं आपल्याला रमणीय व अत्युत्तम असें क्रौंचपूर लागेल. कृष्णा, त्या नगरचा महाकपि नामक विख्यात राजा तुझ्याच कुलांतील असून सदा धर्मरत असतो. त्याची प्रजा वनचर लोकांची आहे. परंतु त्या राजालाही न भेटतां आपण पुढेंच जाऊं. सूर्यास्त होईपर्यंत आनडुह नामक तीर्थापर्यंत मजल गांठून नंतर तेथेंच आपण सर्व मिळून विश्रांति घेऊं. तेथून मार्गस्थ झाल्यावर आपण सह्याद्रीच्या दरींतील प्रख्यात गोमंत नामक गिरीवर गमन करूं. त्या पर्वताला अनेक शिखरें असून त्यांतीलच एक फार उंच व पक्ष्यांना देखील दुर्लंघ्य असें आहे. त्या शिखराभोंवतीं नक्षत्रांचें वेष्टण असून त्या ठिकाणींच देव विश्रांति घेतात. तें शिखर म्हणजे स्वर्गाच्या सोपानासारखें असून गगनाद्रीप्रमाणें उंच आहे. तो गोमंत गिरि प्रति मेरूच आहे. त्यावर विमानें उतरतात.

या सर्वोत्कृष्ट महाशृंगावर तुम्ही उभयतां तेजस्वी व देवरूपी भ्राते सुखानें संचार करा. म्हणजे त्या नगाग्रावरून नक्षत्रराज चंद्र, अपार द्वीपांना भूषविणारा व ऊर्मिमंत समुद्र, आणि सूर्य यांचें उदयास्ताचे वेळीं तुम्हांला दर्शन होईल. गोमंत पर्वताच्या शिखरावर वनचरांसारखे संचार करून तुम्ही दुर्गयुद्धाच्या पद्धतीनें जरासंधाला जिंकाल. शैलाचा आश्रय करून तुम्ही निकरानें युद्ध

करीत आहां असें दृष्टीस पडतांच जरासंधाचे हातपाय गळतील. शैलयुद्ध करण्याचे कामीं त्याचा निरुपाय होईल. तुम्ही निकरानें युद्ध करूं लागतांच तुम्हांला थोड्याच अवकाशांत आयुधें प्राप्त होतील. हें मला अंतर्दृष्टीनें आतांच प्रत्यक्ष दिसत आहे. तर आतां या होमधेनूचें गोड दूध प्राशन करून वाट चालूं लागावें हें बरें."

"परशुरामाच्या आज्ञेप्रमाणें त्या धेनूचें दुग्ध प्राशन केल्यानें ते यदुपुंगव सामर्थ्य व दर्प यांनीं युक्त झाले. नंतर ते वक्तृश्रेष्ठ दोघे यादव भार्गवरामासहवर्तमान गोमंत पर्वताचें दर्शन घेण्याकरितां जामदग्नीनें पूर्वीं वर्णिलेल्या मार्गानें तेथून निघाले. त्यांची गति मत्त हत्तीसारखी होती. देवामुळें स्वर्ग ज्याप्रमाणें शोभिवंत दिसतो त्याप्रमाणें तीन अग्नीसारखे असलेल्या त्या तिघांच्या संचारानें तो मार्ग अत्यंत शोभिवंत दिसूं लागला. मानवी गतीनें चालतां चालतां अखेर देव जसे मंदराचलापाशीं जाऊन पोंचतात, तसे ते सायंकाळीं गोमंत पर्वतासमीप येऊन पोंचले. त्या पर्वतावर नानाप्रकारचे वृक्ष असून लतावेलींनीं तो सुंदर व चित्रविचित्र दिसत होता. अनेक अगुरु वृक्षांनीं त्याचा पृष्ठभाग झांकून गेला असून मनोहर मयूरांच्या संचारानें तो नानावर्णांनीं युक्त झालासा दिसत होता. भ्रमरांच्या समुदायांनीं तो व्यापला होता. त्यावरील वृक्ष दगडींच्या अडचणींत उगवले होते. मेघ दृष्टीस पडतांच त्यावरील मयूरांनीं मत्त होऊन टाहो फोडण्यास सुरुवात केली होती, त्या कारणानें तो दुमदुमून गेला होता. त्याचीं शिखरें आकाशाला जाऊन भिडलीं असून वृक्ष इतके उंच होते कीं, त्यांचे शेंडे मेघमंडलाला चिकटले होते. मदोन्मत्त हत्तींनीं आपले अणकुचीदार दांत दगडांवर घांसल्याकारणानें त्यांचे ओरखाडे तेथील

शिलांवर दृग्गोचर होत होते. पक्षिसमूहाच्या किलबिलाटानें तो प्रतिनादित झाला होता. त्यांतही आणखी दरींतून खालीं पडणाऱ्या जलप्रवाहाचे ध्वनि उमटत होते. गवत व वृक्षपल्लव यांच्यायोगानें त्याचा पृष्ठभाग अगदीं झांकून गेला होता. त्यांतच नीलमण्यांच्या राशी असल्यानें तो आकाशाप्रमाणें बहुवर्ण झाला होता. त्या पर्वताचे अंगभर धातूंचे रस जिकडे तिकडे माखलेले होते. अनेक शिखरें व वरून वाहणारे झरे यांनीं तो भूषित झाला होता. देवांच्या मनोहर समुदायाच्या संचारानें तो भरून गेला होता. मैनाकाप्रमाणें तो इच्छेस येईल तिकडे गमन करण्यास समर्थ असून त्याच्याचसारखा उंच होता. त्याचीं शिखरें विशाल असून पायथ्याच्या चारी बाजूंनीं जलौघांचा वेढा पडला होता. काननें, दऱ्या व शिखरें यांनीं तो युक्त असून श्वेतवर्ण मेघपटलांनीं त्याला फार शोभा आली होती. पानस, आम्रातक, आम्र, वेत्र, कांचन व चंदन इत्यादि वृक्षांनीं तो व्यापलेला असून त्यावर तमाल व एला या वृक्षांचीं व मिऱ्याच्या वेलींचीं बनें लागून गेलीं होतीं. पिंपळीच्या वेलींमुळें तो मलिन दिसत होता व इंगुदि वृक्षांमुळें त्याला वैचित्र्य आलें होतें. जिकडे तिकडे राळेचे वृक्ष (देवदार) लागून गेले होते. उंच उंच सुरूच्या वनांनीं व नाना प्रकारच्या चित्र वनांनीं त्या पर्वताचा पृष्ठभाग झांकून टाकला होता. सर्जे, निंब, अर्जुन, पाटलीचीं बेटें, हिंताल, तमाल, व पुन्नाग इत्यादि विविध वृक्षांनीं त्याला मोठी शोभा आणिली होती. जलौघांत जलज कमलें व भूमिभागावर स्थलज कमलें दाट उगवलीं होतीं. वृक्षांचे असंख्य समुदाय हेंच त्या पर्वताचें भूषण होतें. जंबू, जंबूल, कद्रु, कंदल, चंपक, अशोक, बकुल, बिल्व व तिंदुक इत्यादि सुंदर सुंदर वृक्षांचें त्या पर्वतावर

वैपुल्य असून कुंज व नागपुष्प यांनीं तो सर्व बाजूंनीं फार शोभिवंत दिसत होता. हत्ती व हरिण यांचे त्यावर मोठाले कळप असून त्यांमुळें त्या पर्वताच्या सौंदर्यांत अधिकच भर पडलेली होती. सिद्ध, चारण, राक्षस, गंधर्व, व गुह्यक यांनीं त्या पक्षियुक्त पर्वताच्या गुहा व्यापून टाकल्या होत्या. तेथील शिलातलावर प्रायः विद्याधरांचे थवे बसलेले असत. सिंह व व्याघ्र यांच्या आरोळ्यांनीं नेहमीं पर्वत दुमदुमून जाई. त्यावरून एकसारख्या जलधारा वाहत असल्यानें चंद्राप्रमाणें तो फार शोभिवंत दिसे. देव व गंधर्व हे त्या पर्वताचें नेहमीं वर्णन करीत. त्यावर सुंदर अप्सरा देखील राहिल्या होत्या. दिव्य वनस्पतींचीं लहान मोठीं फुलें त्यावर गळून पडलीं होतीं. या पर्वताला इंद्राच्या वज्राचा प्रहार कसा तो माहीत नव्हता. वणवा किंवा झंझावात यांपासूनही त्याला भय नव्हतें. प्रपातापासून निघालेल्या नद्यांची शोभा अपूर्व होती. वनश्रीला खुलावट आणणारीं, आननाच्या आकाराचीं काननें, जल व शेवाल, यांच्या योगानें त्या पर्वताचीं शिखरें सौंदर्यानें ओथंबलेलीं दिसत होती. पुष्कळ सुंदर ठिकाणीं हरिण स्थित झाले होते. तरुण स्त्रियांनीं परिवेष्टित असल्यानें पति जसा सुंदर दिसतो त्याप्रमाणें सुंदर दऱ्या, गुहा व ज्यांतील भूमि वृक्षाच्छादित झाली आहे अशा पुष्पयुक्त वनराजी यांच्या योगानें तो पर्वत शोभिवंत दिसत होता. कांहीं ठिकाणीं तो स्त्रीसहित असलेल्या पुरुषाप्रमाणें सुंदर दिसत होता. त्याच्या शिखरांवर औषधी चमकत होत्या. कित्येक वानप्रस्थाश्रमी लोक तेथें येऊन राहिले होते. सारांश, तो सुवर्णाच्या कृत्रिम काननाप्रमाणें रमणीय दिसत होता. त्याचा पायथा विशाल असून शिखर उंच

होतें, त्यामुळें पृथ्वी व अंतरिक्ष या दोहोंमध्यें बुडी मारून तो पर्वत बसला आहे कीं काय, असें वाटे."

असो; अशा त्या रमणीय व पर्वतांतील अग्रगण्य गोमांतकापाशीं येऊन पोंचल्यानंतर त्या देवतुल्य तिघांस तें स्थान वास्तव्य करण्यास फार पसंत वाटलें. गरुडासारखे ते पराक्रमी असल्यामुळें पक्षी ज्याप्रमाणें आकाशांत उड्डाण करतात त्याप्रमाणें, पर्वताला स्पर्श न करितां, वेगानें त्यांनीं त्या गिरिश्रेष्ठावर आरोहण केलें. देवाप्रमाणें पर्वताच्या उत्तर शिखरावर चढून गेल्यावर त्या ठिकाणीं त्यांनीं मनानें निर्माण करावें इतक्या थोड्या अवधींत एक गृह तयार केलें.

मग रामकृष्ण त्या ठिकाणीं सुखानें स्थित झाले आहेत असें पाहून महामति जामदग्न्य परशुरामानें योग्य व स्पष्ट भाषण करण्याचा उपक्रम केला. तो म्हणाला, " बा, सर्वशक्तिमान् कृष्णा, **मी आतां शूर्पारक नगराला जातों**. संग्रामामध्यें देव जरी लढावयास आले तरी तुमचा पराजय केव्हांही व्हावयाचा नाहीं. गोविंदा, तुम्ही माझ्यामागून आलां, त्यामुळें माझ्या मनाला जो संतोष झाला आहे त्या योगानें या माझे जुनाट शरिराला देखील फायदा झाला आहे. ज्या ठिकाणीं तुम्हांला आयुधप्राप्ति होईल असा परलोकांत ठरलेला देवांचा संकेत आहे, तेंच हें ठिकाण मीं तुम्हांस दाखवून दिलें आहे." याप्रमाणें रामकृष्णांना दुर्गयुद्धास अत्यन्त अनुकूल असें स्थळ प्रत्यक्ष दाखवून परशुराम आपल्या धेनूसह आपल्या शूर्पारक नगरीकडे परतला.

या प्रसंगीं परशुरामाची मनोभूमि लक्षांत घेतली तर ती केवळ परार्थे जिवंत राहिलेल्या तपस्व्यास शोभेशीच होती. यानंतर त्याच्यासंबंधींचे दोनच उल्लेख शिल्लक रहातात. धर्म-

राजा आपल्या बांधवांसह यात्रेस निघाला असतां गंगेच्या कांठानें पूर्वेकडे बराच गेल्यावर दक्षिणाभिमुख झाला व त्यानें सहस्र नद्यांत स्नानें केलीं. तेथून उजवीकडे वळून तो महानदीवर आला व तिच्या कांठानें वर सरून परशुरामाचें दर्शन घडावें म्हणून महेंद्रपर्वतावर गेला. तेथें ठरलेल्या दिवशीं परशुराम अचानक आला व त्यामुळें या पांडवभ्रात्यांची व त्याची गांठ पडली. यानंतर ज्या वेळीं कौरवपांडवांचें युद्ध व्हावयाचें त्या वेळीं ज्या मोठमोठ्या महंतांनीं हें महायुद्ध टळावें म्हणून शिष्टाई केली त्यांत परशुरामही होता. दुर्योधनाला त्यानें हरतऱ्हेनें सामाचा उपदेश केला. एकाहून एक प्रबळ लोक जगतांत असतात तर तूं गर्वानें वागूं नको असा आग्रह नरऋषींची गोष्ट सांगून त्यानें केला. नरऋषि हा रानांतला तापसी, त्याचा आपण चोळा-मोळा करून टाकूं असा दंभोद्भव राजाला भ्रम होता; पण त्या ऋषीनें राजाचें सामर्थ्य हां हां म्हणतां भग्न केलें. पांडव जरी कमी दिसत असले तरी तें नरऋषींप्रमाणें खरे प्रबळ आहेत. तर तूं या मार्गापासून परावृत्त हो, असा हिताचा विचार त्यानें दुर्योधनास सांगितला पण त्यानें तो अवमानिला हें पुढें स्पष्टच झालें.

परशुरामानें वसविलेलें शूर्पारकनगर सध्यांच्या नगरविस्ताराच्या दृष्टीनें लहानच होतें. तें ५०० धनुष्यें लांब असून ५०० बाण रुंद होतें. एक धनुष्य म्हणजे चार हात व एक बाण म्हणजे दोन हात. याचा अर्थ असा कीं, तें २००० हात म्हणजे ३००० फूट लांब होतें व १००० हात १५०० फूट रुंद होतें. म्हणजे सरासरी मानानें अर्ध्या मैलाहून थोडें जास्त इतकें लांब होतें व एकतृतीयांश मैलाहूनही पुष्कळच कमी रुंद होतें.

परशुरामाचें स्वरूप उग्र होतें. तो भयंकर दिसे. डोक्यावर

जटाभार, खांद्यावर परशु, अंगावर वल्कलें, वर्ण गोरा व तेजःपुंज, शरिराची आकृति अग्नीच्या ज्वाळेसारखी, देह अगदीं अव्यय, गांभीर्यानें सागरासारखा, तेजोमंडलांतून ज्याची शरीररेखा लवकर निराळी दिसत नाहीं असा, सदा ताजातवाना, त्रिकाळस्नानानें ज्याचें शरीर आर्द्र रहात आहे असा हा ऋषि त्रिपुरासुराला मारणाऱ्या शंकराप्रमाणें रुद्रस्वरूप दिसे. भीष्मानें जेव्हां रथावर बसून युद्ध करा अशी विनंति केली तेव्हां परशुरामानें आपल्या रणवैभवाचें वर्णन केलें कीं, पृथ्वी हाच माझा रथ आहे, चतुर्वेद हेच माझे घोडे आहेत, वायु माझा सारथी आहे, व सावित्री, गायत्री व सरस्वती हींच माझीं कवचें आहेत.

संकलित करून देतां येण्यासारखें असें येवढेंच परशुरामचरित्र आहे.

## प्रकरण दुसरें

# संकेत-बोध

हिंदु लोकांच्या दशावतारांपैकीं सहावा अवतार श्रीपरशुराम हा होय. खुद्द परशुरामाचें असें स्वतंत्र चरित्र नाहीं. दशरथाचा पुत्र राम, आणि श्रीकृष्ण यांच्या अवतारकृत्यांविषयींच्या हकीकती इतिहास-पुराणें रचणारांनीं विस्तृत अशा दिल्या आहेत. पण नरसिंह, वामन, व परशुराम यांपैकीं नरसिंह व वामन या दोघांची एकएकच कथा पुराणांत दिलेली असते. परशुरामाचेंसुद्धां स्वतंत्र पुराण नाहींच. पण त्याच्याविषयींच्या कथा मात्र रामकृष्णांपेक्षां कमी पण नरसिंह व वामन यांच्यांपेक्षां जास्त अशा रामायण-महाभारतादिकांत दिल्या आहेत. या सर्वांच्या चरित्रविषयक माहितीचें वैपुल्य कालानुक्रमें वृद्धिंगत झालेलें दिसतें. नरसिंहाची कथा म्हणजे प्रल्हादभक्तीचें एक लहानसें आख्यान आणि वामनाची कथा म्हणजे बळीपाशीं त्यानें मागितलेल्या त्रिपाद भूमीची हकीकत, इतकाच प्रकार आहे. त्यापेक्षां जास्त हकीकत परशुरामासंबंधीं दिलेली असते. दाशरथी रामाचें संपूर्ण चरित्र सुसंगत, प्रकरणवार व अव्वलअखेर असें आपणापाशीं आहे. तसेंच श्रीकृष्णाचें चरित्र तर अत्यंत सविस्तरपणें सर्व महाभारतभर पसरलेलें आहे. पण परशुरामाचें चरित्र त्रुटित व विखुरलेलें असें सांपडतें. त्याचें सुसंबद्ध असें एक स्वतंत्र पुराण असतें तर बरें

झालें असतें. पण नसलें तरी, भिन्नभिन्न पुराणग्रंथांतून त्याच्याविषयीं जें कांहीं लिहिलें आहे तें एकत्र करून पाहिलें म्हणजे परशुरामाविषयीं कांहीं सुसंबद्ध अशी कल्पना आपणास करतां येते. रामायण व महाभारत या ग्रंथांत, पण त्यांतल्या त्यांत महाभारतांत, त्याच्याविषयींचे जे अनेक उल्लेख आहेत ते जमा केले पाहिजेत; राम, कृष्ण व पांडव यांच्या कथानकसूत्राशीं परशुरामाचा संबंध सुरू होण्याच्या आधीं त्याच्या ज्या इतर हकीकती रामायण, महाभारतांत आल्या आहेत त्या घेऊन मग रामादिकांच्या चरित्राशीं त्याचे जे संबंध आले आहेत तेही घेतले पाहिजेत; त्याप्रमाणेंच नवीन शोधकांनीं आर्यांच्या व अतिभारतीय हालचालींच्या केलेल्या शोधांत परशुरामाविषयीं जर कोठें कांहीं सांपडलें तर तें घेतलें पाहिजे; तसेंच अखिल भारतभर ज्या सहस्रावधि जाति पसरलेल्या आहेत, त्यांच्या कुळकथांत परशुरामाचा जो संबंध आला आहे तोही समाविष्ट केला पाहिजे. शिवाय कोठें कोठें प्रादेशिक वर्णनांत त्याच्या नांवाशीं संलग्न अशा कांहीं हकीकती असल्या तर अर्थातच त्याही पाहिल्या पाहिजेत. आधुनिक चिकित्सक बुद्धीनें परशुराम-कथेचे कोणी कांहीं नवे अर्थ बनविले असले तर तेही विचारांत घेतले पाहिजेत; व ही सर्व सामग्री एकजीव करून परशुरामाच्या चरित्राकडे पाहिलें पाहिजे.

## खऱ्याखोट्याची निवड—

मुख्यतः पुराणग्रंथांवर विश्वसून हें काम करावयाचें असल्यामुळें खऱ्याखोट्याची निवड कशी करावयाची हा प्रश्न मनांत उभा रहातो. पुराण कोठें संपतें व इतिहास कोठें लागतो हें सांगणें फार कठीण आहे. लिखाण अलीकडचें असून त्यांतील नांवें ओळखी-

ओळखीचीं वाटत असलीं तर सामान्य वाचक त्या लिखाणाला इतिहास समजतो. तसेंच त्या पुस्तकावरच 'इतिहास' असें लिहिलेलें असलें, म्हणजे तर हें पुस्तक इतिहासाचें आहे असें मानण्यावांचून त्याला गत्यंतरच नसतें. शिवाय आणखी एक गोष्ट हवी असते ती ही कीं, त्या पुस्तकांत अतिमानुषीय चमत्कार नसले पाहिजेत. एवढ्या सामग्रीवर एकाद्या पुस्तकाला इतिहास हें अभिधान देण्यास कोणी कचरत नाहीं. उलट पक्षीं सांगूनसवरून आमचें पुराण आहे असें कर्त्यानेंच म्हटलें असलें म्हणजे 'तुझें खोटें असलें पाहिजे' असें सामान्य वाचक आपल्या मनाशीं सहजच पुटपुटतो. पुराणग्रंथांतून अतिमानुषीय चमत्कारांचीं वर्णनें पुष्कळ सांपडतात. त्यामुळें माणसास साहजिकच असें वाटतें कीं, पुराण म्हणजे अवाच्यासवा अतिशयोक्तीनें भरलेल्या अशा कथांचीं पुस्तकें होत. पण इतिहास व पुराण यांसंबंधींचे हे दोन्ही समज चुकीचे आहेत. हे समज होणें शक्य असलें तरी पुराणांत इतिहास नसतोच नसतो, व इतिहासांत पुराण नसतेंच नसतें, येथपर्यंत आपण त्या समजाची व्याप्ति होऊं देणें मात्र बरोबर नाहीं. अतिमानुषीय स्वरूपाचीं जीं वर्णनें पुराणग्रंथांत दिलेलीं असतात तीं वगळलीं तर कथा-नायकांना मानुषीय चरित्र उरतच नाहीं असें असतें तर गोष्ट निराळी. पण तसें होत नाहीं. अतिमानुषीय असा भाग वास्तविक पाहतां फार थोडा असतो. मुख्य चरित्र सर्वथा मानुषीयच असतें. हें मानुषीय अतिमानुषीयाशीं संलग्न झालें म्हणून अविश्वास्य बनलें असें मानणें बरोबर होईल. अतिमानुषीयाची भेसळ जर त्यांत झाली नसती तर तें लिहिणें इतिहास म्हणून, निदान इतिहासवजा म्हणून तरी लोकांनीं मानलें असतें. आतां खुद्द इतिहासाचेंच घ्या. शिवाजीच्या चरित्राला आपण इतिहास असें म्हणतों. त्या चरित्रांत

चमत्काराचा कांहीं भाग लोकांनीं घातलेला आहेच. तो आपण विवेकबुद्धीनें वगळतां व उरलेला जो मध्यस्तंभवर्ती प्रमुख भाग तो इतिहास म्हणून आपण समजतों. अवताराचें भाकित, देवीनें तलवार देणें, महाराजांच्या अंगांत येणें इत्यादि गोष्टी यांच्या चरित्रांत सांगितलेल्या आहेत; म्हणून तें सबंध चरित्रच खोटें असा अभिप्राय कोणी देत नाहीं. कोणी म्हणेल नुसतें अतिमानुषीय वर्णन नसलें म्हणजे एकादें लिखाण इतिहास मानावयाचें असा याचा अर्थ होईल; आणि मग सर्व नाटकें, कादंबऱ्या, इत्यादि चटसारे वाङ्मयप्रकार आपण इतिहासरूपच मानावयास लागूं; परंतु याही बोलण्यांत तात्पर्य नाहीं. केवळ अतिमानुषीय वर्णनें नसलीं म्हणजे त्या लिखाणास इतिहास समजावें असें विधान ह्या ठिकाणीं कर्तव्य नाहीं; तर इतिहासांत अतिमानुषीय असें कांहीं नसतें अथवा नसावें असें विधान मात्र खचित कर्तव्य आहे. इतर अनेक विशेषांमुळें इतिहास हा इतिहास ठरतो; केवळ अतिमानुषीय मजकुराच्या अभावानें त्याला इतिहासत्व येतें असें नव्हे.

## अद्‌भुताचा उपयोग कां केला ?—

पण आपली खरी अडचण पुराण म्हणजे काय व इतिहास म्हणजे काय हें ठरवितां येत नाहीं ही नव्हे; निरपेक्षपणें पुराणाची पुराणापुरती आणि इतिहासाची इतिहासापुरती व्याख्या ठरवितां येत नाहीं असेंही नव्हे; तर **आपलीं** पुराणें व **आपला** इतिहास यांच्या सीमा सुनिश्चित करतां येत नाहींत ही खरी अडचण होय. वास्तविक पाहतां रामायण-महाभारतांतील कथांना आपलें पूर्वींच्या वाङ्मयांतील नांव इतिहास असेंच आहे. परंतु आधुनिक कालांतील इतिहासाशीं सापेक्षता बाळगून आपण या इतिहास-कथांना

सुद्धां पुराणेंच म्हणत असतों. पुराण हें नांव या कथांना मिळाल्यामुळें इतिहास वाचतांना वाचक जी चिकित्सा-बुद्धि मनांत बाळगतो ती या ग्रंथांच्या वाचनाच्या वेळीं मनांत बाळगण्यास तरी तो धजावत नाहीं. वास्तविक पाहतां, पूर्वींचे इतिहास लिहिणारांच्या मनांत भावी वाचकानें चिकित्साबुद्धि बाळगूं नये अशी अपेक्षा निःसंशय नसावी; परंतु मूळ इतिहासरूप वस्तूला जों जों अवतारकृत्यांचें आणि परमेश्वरी इच्छेच्या विलासाचें स्वरूप प्राप्त झालें, जों जों मानवी जीवितापासून ही वस्तु आदरबुद्धीनेंच का होईना दूरची असें कल्पिण्यांत येऊं लागलें, जों जों आपल्याला साध्य नसलेलें कांहीं तरी अद्भुत असें हें चरित्र आहे, असा समज दृढतर होत होत चालला, तों तों मूळ इतिहासवस्तूंत काल्पनिक अद्भुताची भर घालण्याचा मोह अधिक अधिक होऊं लागला असावा. ऐतिहासिक महापुरुषांच्या सामान्य कृत्यांनासुद्धां कांहीं लोकविलक्षण अथवा अलौकिक असें रूप देण्याचे यत्न चालू झाले व ज्या ऐतिहासिक प्रसंगांची मीमांसा पूर्ण माहितीच्या अभावीं सोपपत्तिक बनवितां येईना, तिचा निर्वाह पदरच्या अद्भुताचा प्रयोग करून करण्यांत येऊं लागला. राम किंवा कृष्ण यांनीं जीं कांहीं कृत्यें केलीं तीं आपल्या आवांक्यांतील नव्हत, तशीं कृत्यें आपणांस करतां येण्यासारखीं नाहींत, ही मनोमय साक्ष लेखकांना व वाचकांना जेव्हां पटली, तेव्हां म्हणजे त्या पिढीला अथवा त्या युगांत मानवी पराक्रमाचा भर अगदींच ओसरला असला पाहिजे असें वाटतें. लंकेवर स्वारी करून आपल्या स्त्रीचें हरण करणारास धुळीस मिळविणें हें अचाट कृत्य ज्या काळीं झालें त्याच्यानंतर अशाच कृत्यांची म्हणजे एतत्सम अचाट कृत्यांची परंपरा जर सारखी लागली असती, तर राम-

चंद्राच्या या कृत्यास एवढा गौरव प्राप्त झाला नसता. हें अचाट कृत्य अनपेक्षित असेंच घडून आलें; यामुळें रामचंद्राच्या थोरवीबद्दलचा आदर माणसांच्या मनांत घनदाट भरावा हें साहजिकच होतें. पण अशा प्रकारचें कृत्य आतां होणें नाहीं, रामचंद्र परमेश्वरी विभूति म्हणूनच त्याच्या हातून हें घडलें हा दुर्बल विचार माणसांना आपली पराक्रमहीनता शतकानुशतकें पटल्यानंतरच प्राप्त झाला असें वाटतें. वास्तविक पाहतां प्रभु रामचंद्रानें जें कृत्य केलें त्याहून जास्त पराक्रमाचीं कृत्यें घडलीं नाहींत असें इतिहासाच्या वाचकांस केव्हांही म्हणतां येणार नाहीं. किंबहुना रामचंद्राच्या कृत्यांत जो एक हेतूचा उदात्तपणा भरला आहे तोच उदात्तपणा मनानें स्वीकारून रामचंद्रा-नंतर इतर कोणी तशाच प्रकारचीं कृत्यें केलीं नाहींत असेंही इति-हास वाचणारांस म्हणतां येणार नाहीं. अगदीं मूळची इतिहास-रूप कथा अद्भुतरसशून्य व वास्तवाचें यथातथ्य वर्णन करणारी अशीच असली पाहिजे. म्हणून तर आपल्या पूर्वजांनीं इतिहास म्हणजे " असें असें झालें " असें अन्वर्थक नांव या कथांना दिलेलें होतें. पण वर उल्लेखिल्याप्रमाणें, पराक्रम, तेज, औदार्य, उदात्तपणा यांचा भर कालगतीनें समाजांत कमी झाल्यामुळें कीं काय, माणसाला सर्वथा शक्य अशा प्रकारच्या वरील कृत्यांना अवतार-कृत्याचा म्हणजे माणसाला अशक्य पण दैवी लीलेला मात्र शक्य अशा अर्थाचा गौरव प्राप्त झाला; आणि त्या त्या इतिहास-पुरुषांच्या कृत्यांतील जे भाग **मानवी उपपत्तीस बधेनात** ते अद्भुताच्या हवालीं करण्यांत आले. पण यामुळें असें झालें कीं, मूळची इतिहास-वस्तु मानवी जीवितापासून फार अलग झाली व तिच्या वाचनाच्या कामीं माणसानें आपली चिकित्साबुद्धि चालवूं नये असा संभावित संकेत रूढ झाला. याचा अर्थ असा कीं, मूळ इतिहास-कथन

संकल्पिलें असतां पुढें पुढें त्याचें सध्यांच्या अर्थाचें पुराण होऊन बसलें. ह्यामुळें वर जें म्हटलें आहे, कीं आपलीं पुराणें कोणतीं व आपला इतिहास कोणता हें ठरविणें अवघड बनलें आहे.

## यामुळें पुराणें अश्रद्धेय बनलीं—

आधुनिक कल्पनेप्रमाणें जें कांहीं इतिहास या नांवांत मोडतें त्यांत सुद्धां अद्भुताचा प्रवेश करण्याची भोळी बुद्धि माणसांनीं अवलंबिलेली दिसतेच. एकाद्या शूर पुरुषाचें किंवा बुद्धिमंताचें कांहीं कृत्य असामान्य असें दिसलें, तर त्याची उपपत्ति कांहीं मानवी विचाराच्या मीमांसेनें न लावतां एकदम परमेश्वरी कृपेचें हें फल आहे असें म्हणून प्रत्यक्ष इतिहासालासुद्धां पुराणाचा भोळेपणा प्राप्त करून देण्याचें काम माणसांनीं अनेकदां केलेलें दिसतें. शंकराचार्यांना विद्या कशी प्राप्त झाली, भास्कराचार्यांना ज्ञान कसें स्फुरलें, कालिदासाला रसवंतीनें कसें वरिलें, शिवाजीला लौकिक व्यवहार कसे उमजले, या सर्वांची कांहीं सकारण अशी उपपत्ति न बसवितां एकदम परमेश्वरी कृपेचा आश्रय माणसांनीं धरिला व जेथें समजावयास हवें व समजण्यासारखें आहे तेथें पुराणवाङ्मयांतील भोळेपणा शिरकविण्यांत आला. ज्या वेळेस एकादी प्रचंड गोष्ट घडून येते, त्या वेळच्या आधींची मानवी जीविताची बांधणी कसकशी होत आली होती, समाजांतील भिन्न भिन्न वासना कशा जोरावत होत्या, किंवा क्षीण होत होत्या, धर्म, राजकरण, परचक्र, उदीम, विद्या, शास्त्रें, कला इत्यादि व्यवसायांत गुंतलेल्या बुद्धिमंतांचे किंवा या या सर्व गोष्टींचे ज्यांच्यावर संस्कार होत होते अशा बुद्धिहीन सांसारिकांचे राग, लोभ कसकसे प्रदीप्त होत होते, किंवा खिजविले जात होते आणि म्हणून त्यांचे जे परस्परांवर व्यापार होत त्यांनीं मानवी

जीविताची घडण कसकशी बदलत चालली होती, आणि अशा ह्या सर्व कारणांचा एक रासायनिक परिपाक म्हणून एकादी ऐतिहासिक गोष्ट कशी घडली, याचे शोधक बुद्धीनें व कालप्रवाहांतील चमत्कार न्याहाळून, जें कांहीं मर्म ठरवावयास हवें तें न ठरवितां या सर्व गुंतागुंतीचा हवाला परमेश्वरी इच्छेवर देऊन, स्वतः चिकित्सेच्या दगदगींतून मोकळें होण्याची प्रवृत्ति आपल्या आधुनिक इतिहासांत सुद्धां चांगलीच बलवत्तर दिसते. अद्भुताचा, परमेश्वरी कृपेचा, गुरुमाउलीच्या वात्सल्याचा प्रसाद हें नांव विशिष्ट प्रसंगांना दिलें नाहीं तर आपण जणों काय परमेश्वराचे द्रोही बनूं आणि सर्वशक्तिमान् परमेश्वर वरून पाहत असतां त्याचें देणें त्याला न देतां कर्तबगारीचे गौरव क्षुद्र मानवाला अर्पण करण्याचें धाष्टर्य आपल्या हातून होईल कीं काय अशी भीतीच जणों काय आपणांस वाटत असावी असें वाटतें. अर्थात् धादांत इतिहासांत जर हा भोळेपणा तर कित्येक हजार वर्षांपूर्वीं ज्या गोष्टी घडल्या त्यांचीं वर्णनें देतांना किंवा त्यांची उपपत्ति लावतांना आपल्या बुद्धीनें किती भोळेपणा पत्करिला असेल याची सहज कल्पना होते. पण भोळेपणाचें मिश्रण इतिहासांत केलें येथेंच ही आपत्ति थांबलेली नाहीं; तर त्याच्या वाचनांत चिकित्साबुद्धि बाळगितां उपयोगाची नाहीं असेंही परंपरेनें ठरवून दिलें. म्हणजे असें कीं, जें जें लिहिलेलें असेल तें तें डोळे मिटून ग्रहण कर व खरें मान असा आग्रह उत्पन्न झाला. पण यामुळें भलतेंच नुकसान होण्याचा संभव मात्र उत्पन्न झाला. द्रोणांतून मुलें उत्पन्न होणें, जटांतून दैत्य उसळून येणें, सागरावरून वानरांनीं उड्या मारणें, अशासारख्या अद्भुतांच्या प्रकर्षावर विश्वास बसणें सर्वथा अशक्यच होय; पण त्यामुळें ज्या शुद्ध मानवी व्यवहारांना इतिहास असेंच पूर्वीचें नांव होतें, व ज्यांच्यावर हे असले अद्भुताचे

लेप चढले होते तेही आविश्वास बनून राहिले व त्यामुळें पुराण-ग्रंथांची अवहेलना होऊं लागून त्यांत जें कांहीं शुद्ध व सत्यस्वरूप असें इतिहासकथन आहे त्याकडेही दुर्लक्ष होत चाललें.

**भोळेपणाच्या जोडीस विसरलेले संकेत—**

आतां मूळ वाङ्मयांत ज्याला इतिहास असें स्पष्ट नांव दिलें आहे त्यांत हें जें कांहीं अद्‌भुताचें मिश्रण झालें आहे तें दूर करणें फारसें कठीण नाहीं. अद्‌भुत भेटलें कीं, अमुक गोष्ट कशी घडली हें सांगतां येईना म्हणून लेखकानें असें लिहिलें आहे असें आपण समजावें असें वाटतें. कदाचित् हें अद्‌भुत वगळलें असतां जी अडचण आपल्याला प्राप्त होणार तीच मूळ लेखकाला सुद्धां उद्भ-वलेली असावी. फरक इतकाच कीं, कार्यकारणभावाच्या ज्ञानाच्या अभावीं आपण गप्प बसणार व हें कसें हें ध्यानांत येत नाहीं असें म्हणणार; व तो मूळ लेखक मात्र याच आपत्तींत सांपडला असतां अद्‌-भुताच्या आश्रयानें अडचणींतून पार पडणार. असो, वर लिहिल्या-प्रमाणें हा अद्‌भुताचा संस्कार सहज खरडून टाकतां येण्यासारखा आहे; पण देवतारूपाप्रत पोंहोचविलेल्या सामर्थ्यसंपन्न मानवांना गौरविण्यासाठीं जर का पुढील लेखकांनीं मूळ इतिहासकथेंत आपल्या कल्पितांची भर घातलेली असली तर मात्र इतिहास कोणता आणि पुराण कोणतें याची निवड करण्याचा प्रश्न चांगलाच बिकट बनेल; पण ही कल्पितांची भर झालेली असणें हटकून शक्य आहे.

इतिहासाचें इतिहासत्व विसरून तें देवभक्तीचें व महिमा गाण्याचें एक ठिकाण आहे असें जेव्हां माणसांनीं उत्तरोत्तर ठर-विलें असेल तेव्हां जों जों लेखकभक्त जास्त कल्पनाबाज तों तों

कल्पितांची मिसळ मूळ इतिहासांत जास्त जास्त होत गेलेली असणार. इतिहासकाराचा कटाक्ष, वास्तवाशीं जितका संबंध ठेवतां येईल तितका ठेवावा, असा असतो; परंतु महिमा वाढविणाराचा प्रयत्न कल्पिताच्या मिश्रणानें यशस्वी होणार असल्यामुळें तो सत्यापासून आपण किती दूर चाललों आहों त्याची मुळींच फिकीर करीत नाहीं. दोघेही आपआपल्यापरीनें योग्य तेंच आचरीत असतात. इतिहास लिहिणारानें वास्तवास चिकटून राहण्याचा यत्न करावा हें स्वाभाविकच आहे; परंतु महिमा गाणारा सुद्धां स्वतःच्या हेतूशीं विसंवादी असें कांहींच करीत नाहीं. त्यानें अशा तऱ्हेनें असंबद्धपणानें महिमा गाण्यास प्रवृत्त व्हावें कीं नाहीं, या मुद्द्यावर वाद होऊं शकेल; पण तो एकदां गावयाचा म्हटल्यानंतर, ज्यानें तेंच आपलें काम बनविलें तो वाटेल तें म्हणत सुटणार हें ओघानेंच येतें. धादांत लबाडी करण्यास लोभानें, मोहानें, किंवा आपला बडेजाव वाढावा म्हणून कोणी प्रवृत्त होणार नाहीं असें नाहीं; परंतु श्रेष्ठ ग्रंथांचें महत्त्व प्राप्त झालेल्या ग्रंथांत भेसळ करणारा लुच्चेगिरीपेक्षां भोळेपणानेंच जास्त प्रवृत्त झालेला असतो असें म्हणणें अधिक सुयुक्त आहे. इतिहासांत उत्तरोत्तर तफावत कां पडत जाते आणि म्हणून इतिहास कोणता आणि पुराण कोणतें हें ठरविणें कसें अडचणीचें होतें याचें हें एक विवेचन झालें व एवढ्यावरून अद्भुताच्या किंवा कल्पिताच्या मिश्रणांतून मूळ ऐतिहासिक सत्य सोडवून घेणें कठीण असलें तरी जरूर आहे हेंही ध्यानांत येईल. या भेसळीमुळें मुळांतच कांहीं सत्य नाहीं असें म्हणणें फारच मोठें साहस होय. आपल्या पुराणग्रंथांतून इतिहासाचे कणचसे काय, परंतु सुसंबद्ध अशा इतिहासकथांचे थरच्या थर हातास लाग-

तात. खुद्द वेदराशी, संस्कृत व्याकरण इत्यादि, बालाग्राइतकाही फरक होऊं न देतां, जपून ठेवण्याचा जो आटोकाट प्रयत्न प्राचीन अभ्यासकांनीं केला, तोच जर इतिहास-संरक्षणाच्या कामींही झाला असता तर ' पुराणें ' म्हटलें कीं, शेंकडों गोष्टी बाद टाकावयास हव्या ही जी प्रवृत्ति उत्पन्न होते, ती कधींही झाली नसती. परंतु पुराणांतील इतिहास निवडून काढण्याच्या कामीं अतिशयोक्ति व अद्‌भुत यांची भेसळ ही एकच अडचण आहे असें नाहीं. पुष्कळदां लोकसमजुती, वाङ्मयप्रकार, आचारकाण्ड इत्यादींत ठराविक संकेत कोणते होते हेंही ध्यानांत नाहीं व त्यामुळें या संकेतांच्या प्रस्तरणां-तून ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोंचणें दुर्घट बनतें.

ह्या ठिकाणीं संकेत म्हणजे काय याचें विवेचन करणें जरूर आहे. हे संकेत जर नीट कळले नाहींत तर प्राचीन वाङ्मयांत सत्यापलाप, असंबद्धता, पुनरुक्ति, परस्परविरोध, घुसडाघुसडी अशासारखे अनेक प्रकार पदोपदीं दिसतील व त्यामुळें प्राचीन वाङ्मय म्हणजे असंबद्धतेचा एक प्रचंड ढिगारा अशी आपली समजूत होईल. वर दिलेले प्रकार स्वतंत्र—म्हणजे संकेतोद्भव नस-लेले असे—या ग्रंथांत नसतीलच असें म्हणावयाचें नाहीं; सर्व प्रकारच्या लिहिण्यांत सदा सर्वकाळीं हे दोष असावयाचेच. परंतु दिसावयास या दोषांचें रूप असावयाचें पण त्यांचा उद्भव मात्र सर्वमान्य अशा वाङ्मयसंकेतांतून झालेला असावयाचा असा प्रकार आपल्या प्राचीन वाङ्मयांत पुष्कळच आहे. म्हणून ही संकेत-कल्पना विशद करून पाहवयास हवी. आधुनिक वाङ्मयांतील कांहीं उदाहरणें प्रथम घेतलीं असतां या विषयाचा खुलासा होईल.

**पत्रव्यवहार-संकेत—**

जुनीं ऐतिहासिक पत्रें वाचलीं असतां असें दिसून येतें कीं, पत्र

लिहावयाची पद्धत म्हणजे— विशेषत: तें उत्तरादाखल असल्यास आपल्याला आलेल्या पत्रांतील मजकुराचा सारांश प्रथम द्यावयाचा व मग पुढें त्यास अनुलक्षून यथाक्रम उत्तर लिहावयाचें. या पद्धती-मुळें असें उत्तरवजा लिहिलेलें एकच पत्र जरी सांपडलें तरी मूळ मजकूर कोणता व त्यावर उत्तर कोणतें याचा बोध एकदमच होत असे. मूळ पत्र समोर नसलें तरी वाचकाचें चालण्यासारखें असे. आतां प्रथम सारांश देण्याची ही पद्धति कां चालू झाली असेल त्याचीं कारणें विविध असूं शकतील. मूळचें पत्र गहाळ होण्याचा संभव असला तरी त्याची बाधा या पद्धतीनें कमी होईल हें उघड आहे; तसेंच उत्तरीय मजकूर व उत्तर हीं एकेच जागीं सांपडल्यामुळें वाचकांची सोय होत असेल हेंही संभवतें; किंवा ज्यानें मूळ पत्र धाडलें त्याला पुन्हा एकदां बांधून घेण्याची प्रवृत्ति ही कदाचित् या पद्धतींत प्रतिबिंबित होत असेल; पण आपला खरा मुद्दा पुढेंच आहे. ही पद्धति पूर्वी सर्वमान्य व शिष्टसंप्र-दायाची म्हणूनच मानली जात असे. पण अलीकडे पत्रव्यवहाराची पद्धति पाहिली तर हा साम्प्रदाय बुडाला आहे हें स्पष्ट दिसतें. मूळ पत्र लिहिणाराच्या मजकुराचा सारांश आपण देत बसत नाहीं. त्याच्या कोणत्या मजकुराला आपलें हें उत्तर आहे हें तो ओळ-खील व उत्तरादाखलचा मजकूर स्वत:च्या मूळच्या मजकुराशीं जमवून घेईल अशा अपेक्षेनेंच आपण पत्रव्यवहार करतों.

ज्या कारणांनीं मूळ संप्रदाय पडला तीं कारणें नाहींशी झालीं म्हणून संप्रदाय बदलला हें स्पष्ट आहे; मग तीं कारणें कोणतीही असोत. आतां पूर्वीच्या या संप्रदायांत मुरलेला एखादा तेव्हांचा माणूस जर ह्या आधुनिक पद्धति पाहील व संप्रदाय बदलण्याच्या कारणाची मीमांसा स्वत:च्या मनाशीं न करतां बोलेल तर तो

आधुनिक पत्रलेखकांना दूषणच देईल व म्हणेल कीं, “ हे काय गबाळ लोक आहेत पहा ! हे उत्तरें लिहितात पण हीं उत्तरें कशाला लिहितात हें मात्र त्यांच्या पत्रांत कधींही सांपडावयाचें नाहीं ! ही काय पत्रलेखनांतील मजबुदी झाली ? ” पण या दूषकाला आपण थांबवून धरून असें सांगूं कीं, “ बाबा हा दोष नाहीं; गबाळपणा किंवा गाफीलपणाही नाहीं. संकेत बदलला आहे इतकेंच; ज्यास आम्ही उत्तरें लिहितों त्यांना व आम्हांला अशा उभयतांना ही गोष्ट मान्य आहे, कीं सारांश दिला नाहीं तरी उत्तराचा मजकूर बरोबर समजतो. याचा अर्थ संकेत बदललेला आहे असा आहे. म्हणून पत्रव्यवहाराच्या या नव्या पद्धतींत दोषास्पदता नाहीं.”

## कादंबरी-संकेत—

आपल्या वाङ्मयांत ऐतिहासिक कादंबऱ्या व ऐतिहासिक नाटकें अशी एक वाङ्मयाची शाखा आहे; व पुष्कळ लोक असें म्हणतांना आढळतात कीं, मुलांना व सामान्य जनसमाजाला इतिहासाचें ज्ञान करून देण्यास हा वाङ्मयप्रकार म्हणजे फार नामी साधन आहे. इतकेंचसें काय, पण खुद्द कादंबरीकारांचा व नाटककारांचाही तोच समज असतो. आतां जे लोक हें ललित वाङ्मय चिकित्सेनें वाचतात त्यांना हें माहीत आहे कीं, ऐतिहासिक कादंबरी किंवा नाटक म्हटलें, तरी त्यांत कल्पिताची भर पुष्कळच असते. इतकेंच काय तर खास ऐतिहासिक प्रसंगांना थापटून थोपटून निराळी रूपें देणें, ऐतिहासिक प्रसंगांचा अनुक्रम बदलणें, ऐतिहासिक पुरुषांचीं स्वभावचित्रें निराळींच काढणें असे अनेक प्रकार कादंबरीकार व नाटककार करीत असतात. इतिहास ग्रंथांत अविश्वास्य स्वरूपांत नांदत असलेली एकादी भुमका आपल्या

कथानकाचें मुख्य सूत्र बनवून हे लेखक लोक राईचा पर्वत करून दाखवितात. हें जें इतिहासासंबंधानें झालेलें आहे तें पुराणासंबंधीं सुद्धां झालेलें आहे. कालिदासानें महाभारतांतील मूळ शकुंतला-ख्यानांत केलेल्या फरकांविषयीं टीकाकारांनीं केलेले वादविवाद वाङ्मयांत प्रसिद्धच आहेत. तिकडे शेक्सपिअर यानें इतिहासाचे बाबतींत असेंच केलेलें आहे. त्याच्या ऐतिहासिक नाटकांतील प्रसंग व पात्रें इतिहासांतील मूळ प्रसंगांशीं व पात्रांशीं ऐतिहासिक सत्य म्हणून जुळत नाहींत, हें इंग्रजी वाङ्मयाच्या वाचकांना माहीत आहे. फार काय सांगावें, आज झालेला भूकंप आणखी दहा वर्षांनीं उत्पन्न झालेल्या राजाच्या जीवितांतील एकाद्या उत्पाताची खुलावट करण्यासाठीं जर पुढें नेणें योग्य आहे असें त्यास वाटलें तर तो तसें बेलाशक करतो. आठवा हेन्री इत्यादि कांहीं नाटकें तर केवळ तत्कालीन राजकीय व धार्मिक मतसंप्रदायाची खुष-मस्करी करण्याकरितां त्यानें तशीं तशीं लिहिलीं आहेत असें बर्ट्रन्ड रसेल ह्यानें स्पष्ट म्हटलें आहे. हरिभाऊ आपटे यांची ‘ गड आला पण सिंह गेला ’ ही कादंबरी जेव्हां करमणूक पत्रांत आली, तेव्हां तिला दिलेल्या “ ऐतिहासिक ” या विशेषणाच्या कशा चिंध्या झाल्या हें तेव्हांच्या वाचकांस माहीत आहे. सांगण्याचा मतलब असा कीं, ऐतिहासिक असें नांव जरी या वाङ्मय-प्रकाराला दिलें असलें, तरी त्यांत इतिहासाशीं बेइमानपणा केलेला सर्वत्र आढळतो. आतां एकादा ऐतिहासिक सत्याचा अभिमानी जर कोणी असें म्हणेल कीं, “ हें कसलें ऐतिहासिक नाटक ? ही कसली ऐतिहासिक कादंबरी ? इतिहासाला गुंगारा देऊन वाटेल तिकडे पळतां, वाटेल तें लिहितां आणि वर आमचें वाङ्मय ऐतिहासिक आहे अशी फुशारकी मारतां ! तुम्ही लबाड आहां

व धडधडीत खोटें बोलणारे आहां," तर त्यांचें हें सगळें बोलणें मिथ्या आहे असें कोणासच म्हणतां येणार नाहीं; पण तें सुयुक्त नाहीं, असें मात्र वाङ्मयाचे वाचक खास म्हणतील; आणि याचें कारण स्पष्ट आहे. ऐतिहासिक म्हटलें तरी त्या विशेषणाच्या अर्थाची व्याप्ति या वाङ्मयप्रकारांत कोठपर्यंत व कितपत मानावयाची हें वाङ्मय-प्रगतीच्या इतिहासांत ठरत गेलें आहे. लेखक व वाचक या उभयतांनाही या गोष्टीची मनोमय साक्ष असते; म्हणून वाङ्मयाचा वाचक वरील ऐतिहासिक सत्याच्या अभिमान्याला पाठिंबा देणार नाहीं. कारण ऐतिहासिक सत्याची इतपत अवहेलना झाली तरी चालते, हा संकेत उत्पन्न झालेला आहे हें वरील अभिमानी गृहस्थ लक्षांत घेत नाहीं इतकेंच काय तें. संकेत बदलला त्यामुळें लेखकाच्या पदरीं असत्य लिहिण्याचा दोष येत नाहीं हें त्यानें लक्षांत घ्यावयास हवें. हें जर त्यानें केलें नाहीं, तर या लोकांना दूषण देत बसणें एवढेंच अवास्तव काम तो करील.

**समाधी–संकेत—**

प्राचीन काळीं होऊन गेलेल्या प्रसिद्ध पुरुषांच्या समाधींचें महत्त्व फार मोठें आहे हें प्रसिद्धच आहे. चरित्रलेखनास व इतिहासास त्यांची आवश्यकता मोठीच आहे. अर्थात् कोणा माणसाची समाधी कोठें आहे ह्या प्रश्नाची चिकित्सा शोधक मंडळांत पुष्कळ चालते व क्वचित् प्रसंगीं असें दिसून येतें कीं, एकाच संताच्या किंवा कवीच्या अनेक समाधी आहेत आणि मग त्यांच्या खरेखोटेपणाविषयीं चिकित्सा चालू होते. अर्थात् मेलेला माणूस कोठें तरी एके ठिकाणींच पुरलेला असावयाचा किंवा त्याचें दहन झालेलें असावयाचें. या कारणामुळें बाकीच्या समाधीवर,

कोणीं तरी लटक्याच बांधलेल्या समाधी, असा आरोप येतो आणि ज्यांनीं कोणीं त्या बांधल्या असतील त्यांच्या पदरीं खोटेपणा बांधतात. वास्तविक पहातां हें कांहींच व्हावयास नको आहे. पण ही असत्याचा आरोप करण्याची बुद्धि **संकेत** माहीत नसल्यामुळें दूषकांच्या मनांत उत्पन्न होते. आपली पूर्वींची अशी चाल होती कीं, पूजेसाठीं म्हणून आपल्याला प्रिय असलेल्या विभूतीची समाधी बांधून तीवर पादुका स्थापावयाच्या व त्यांची पूजाअर्चा करावयाची. या समाधीच्या पोटांत, ज्याच्या नांवानें ती ओळखली जाते त्याच्या अस्थि असाव्याच लागतात असें मुळींच नाहीं. राम, कृष्ण यांच्या जशा मूर्ति करावयाच्या तशा पूज्य माणसाच्या समाधी बांधावयाच्या इतकेंच काय तें. अशी ही जुनी चाल असल्यामुळें एकाच माणसाच्या अनेक समाधी सहज संभवतात. याला लबाडी करावी लागते असें मुळींच नाहीं. पण हा मान्य संकेत माहीत नसल्यामुळें दूषक असत्याचा आरोप करण्यास प्रवृत्त होतो इतकेंच. सातारा जिल्ह्याच्या ईशान्य कोपऱ्यांत शंभुमहादेवाचें ठिकाण आहे. या महादेवाच्या देवळापासून कांहीं थोड्याशा अंतरावर शिवाजी, संभाजी इत्यादिकांच्या समाधी आहेत, व त्यांची पूजाअर्चाही होत असते. वास्तविक पाहतां यांपैकीं कोणीही त्या ठिकाणीं वारलेला किंवा दग्ध झालेला नाहीं; किंवा त्यांच्या अस्थि तेथें पुरावयास नेल्या होत्या असाही इतिहास कोठें नाहीं. मग या समाधी तेथें कोठून आल्या ? याचें उत्तर हेंच कीं, वर सांगितलेली जी चाल त्या चालीमुळें त्या तेथें आल्या व हा संकेत सर्वमान्य असल्यानें खोट्याच समाधी बांधण्याचा दोष त्या बांधणारांना कोणीं दिला नाहीं. पण ज्याला हा संकेत माहीत नाहीं तो दोषारोप करण्यास खास प्रवृत्त होईल. वरील उदाहरणावरून हें ध्यानांत येण्यासारखें आहे कीं,

सत्यापलाप—घुसडाघुसडी इत्यादि आरोप करण्यास प्रवृत्त होण्याच्या आधीं या संकेतपद्धतीविषयीं आपण फार जागरूक असलें पाहिजे.

**नामकरण-संकेत—**

एका नामकरण संकेताचा या ठिकाणीं उल्लेख करावासा वाटतो. भूपृष्ठावर ज्या एकाद्या ठिकाणीं माणसांनीं आपला संसार उत्तम तऱ्हेनें थाटला असेल, त्या ठिकाणचीं पर्वत-शिखरें, दऱ्याखोरीं त्या ठिकाणच्या नद्या, शहरें व खेडीं यांना कोणत्या तरी आकारामुळें, प्रसंगामुळें, प्रयत्नविशेषामुळें, कांहीं नांवें प्रथम मिळतात. या प्रदेशांत चांगली सुबत्ता होते, धनधान्याची समृद्धि होते, व प्रजाही फैलावत जाते व मग या वाढत्या प्रजेची कांहीं तरी व्यवस्था करावी लागते किंवा होते. त्यांच्यांतील साहसी लोक स्थलांतर करतात, नवे मुलूख काबीज करतात व नवी वस्ती करूं लागतात. हे लोक कांहीं त्या ठिकाणीं हौसेनें जात नाहींत, त्यांना मूळच्या घरींच राहावयाचें असतें, पण तेथें समावेश होत नाहीं म्हणून त्यांना देशांतर करावें लागतें. पण जातांना जुन्या आठवणीही ते बरोबरच नेतात. या नवीन स्थळाचा नवेपणा लवकरच बुजावा, आपण जुन्याच कोशांत रहात आहों असें बुद्धीस वाटावें व अशा रीतीनें देशांतराचा मनस्ताप निवावा म्हणून ते आपल्या नव्या शहरांना व खेड्यांना आपल्या मूळच्या शहरांचीं व खेड्यांचीं नांवें देतात; तेथील डोंगरांना, खोऱ्यांना, व नद्यांनाही मातृभूमींतील त्या त्या स्थलविशेषाचींच नांवें देतात व अशा रीतीनें आपल्या जुन्या वस्तीचा परिवेष भोंवतालीं उत्पन्न करून देशत्यागाचें मनाचें दुःख हलकें करतात. आतां या पद्धतींत गैर असें कांहींच नाहीं. उलटपक्षीं माणसाच्या मनाची परिणति कशी होत चाललेली असते हें यावरून उत्कृष्ट

दिसून येतें. यांत कांहीं खोटें माजविण्याचा किंवा मूळाची नक्कल करून मूळ कोणतें व नक्कल कोणती असा भ्रम उत्पन्न करण्याचा बुद्धिपुरःसर यत्न असतो असें मुळींच नाहीं. जे इंग्रज लोक अमेरिकेंत गेले त्यांनीं तेथील स्थलविशेषांस आपल्या मातृभूमींतील नांवांनीं गौरविलें; जे आर्य लोक आर्यावर्तांतील आठवणी घेऊन ग्रीस देशांत गेले, त्यांनीं आर्यावर्तांतील नांवें तेथील स्थलविशेषांस दिलीं व उत्तर हिंदुस्थानांतून फार प्राचीन काळीं जे कोणी दक्षिणेकडे आले त्यांनीं तिकडील नांवें इकडच्या पर्वतांना व जलौघांना दिलीं. सातारा जिल्ह्यांतील वाई क्षेत्राचें नांव विराटनगरी, शेजारच्या किल्ल्याचें नांव वैराटगड, पलीकडील गडाचें नांव पांडवगांव, जवळील ओढ्याचें नांव कीचक ओढा, असा प्रकार आहे. आतां वास्तविक पाहतां शोधकांनीं हें ठरविलें आहे कीं, विराटाचा संबंध आपल्या वाई देशाशीं कांहीं नाहीं. दुर्योधनानें ज्या गाई पळविल्या त्या त्यानें खंडाळ्याच्या घाटाकडे कधींही हाकीत नेल्या नाहींत, आणि जो ओढा कीचक-ओढा या नांवानें प्रसिद्ध आहे, त्यांत कीचकाचें प्रेत भीमानें कधींही टाकलें नाहीं. पण सामान्य लोक या सर्व गोष्टी त्या त्या ठिकाणींच झाल्या आहेत असें मानत आले आहेत; इतकेंच नव्हे, तर त्या तशा झाल्या नाहींत असें जर कोणी म्हणेल तर त्यांचा स्थानिक अभिमान दुखविल्याचें पातक त्याला लागतें. आतां या ठिकाणीं लोकांचा असा कायमचा समज व्हावा हें अत्यंत विपरीत आहे. पण ह्याला मूळ नामकरण करणारांचा तरी काय इलाज ? अशीं नांवें देण्यांत कांहींच गैर नाहीं असें त्यांस वाटत होतें. हा संकेत विसरेल व माणसें तीं तीं नांवें ऐतिहासिक सत्य म्हणून परमार्थतः मानतील असें त्यांस केव्हांही वाटलें नाहीं. बरें, हा संकेत माहीत नसल्यामुळें लोक लटकाच अभिमान मनाशीं बाळगून आहेत ! संकेताचें

ज्ञान नसल्यामुळें कसें नुकसान होतें हें यावरून दिसतें. वास्तविक पाहतां ज्या अशोकवनांत रावणानें सीतेस ठेविलें होतें तें लंकेंतच होतें किंवा राज्याभिषेकानंतर रामानें सीतेचा जो त्याग केला त्या वेळीं लक्ष्मणानें तिला ज्या वनांत सोडलें त्याचेंही नांव अशोक-वनच असेल तर तें कोठें तरी गंगेच्याच कांठीं होतें हें पुराणावरून दिसतें. आतां इकडे बोरघाटाखालीं सह्याद्रींत जांभुळपाड्यापासून पश्चिमेस कांहीं अंतरावर असलेल्या एका अत्यंत रमणीय वनास कोणी हौशी माणसानें अशोकवन असें नांव दिलें. इतकें होतांच तेथें रामाच्या नांवाचें कुंड, सीतेच्या नांवाचें कुंड, हेही प्रकार झाले व कालेंकरून भोंवतालच्या लोकांनीं सीतामाई वनवासांत ह्याच ठिकाणीं राहिली असें मानावयास आरंभ केला. आतां त्यांना हें भ्रमरूप ज्ञान झालें याबद्दल मूळच्या हौशी रसिकाला दोष देतां येईल काय ? मुळींच नाहीं. नामकरणानंतरच्या कांहीं पुढील कालांत अशा प्रकारचीं नांवें देण्याची वहिवाट आहे हा संकेत विसरला इतकेंच काय तें.

**महाभारतविषयक संकेत—**

ग्रंथांचेंसुद्धां असेंच आहे. महाभारताचे अभ्यासक लोक आपणांस असें सांगतात कीं, मूळ ग्रंथ महाभारत नसून केवळ 'भारत' व त्याच्या आधीं 'जय' या नांवानेंच मोडत असे. पुढें कित्येक वर्षांनीं त्याच्यावर पहिलें संस्करण झालें; व त्याच्याही पुढें कांहीं शतकांनीं त्याचें आणखी एक संस्करण झालें व अशा रीतीनें सुमारें बावीसशें-तेवीसशें वर्षांपूर्वीं प्रस्तुतचा महाभारत ग्रंथ सिद्ध झाला. संस्करण झालें याचा अर्थ त्यांत भर घालण्यांत आली; जे मूळांत नव्हतें तें त्यांत दाखल करण्यांत आलें. असें दोनदां झाल; पण दुसऱ्या संस्कारणानंतर मात्र त्याच्या स्वरूपांत कसलाही

फरक झालेला नाहीं. दोन संस्करणें होणें व त्यानंतर मात्र हा ग्रंथ जसाच्या तसा तेवीस शतकेंपर्यंत राहणें या दोनही गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. संस्करण झालें किंवा भर पडली असें म्हटलें म्हणजे महाभारताच्या प्रस्तुतच्या स्वरूपासंबंधानें कांहींशी अवहेलनाबुद्धि आपल्या मनांत उत्पन्न होते. मूळ ग्रंथांत ढवळा-ढवळ झाली, कांहीं मजकूर घुसडण्यांत आला, प्रस्तुतचें रूप हें कांहीं त्याचें मूळचें रूप नव्हे म्हणजे ग्रंथ तितकासा कांहीं मान्य स्वरूपाचा नव्हे, अशासारख्या कांहीं बारीक बारीक अव-हेलनेच्या कल्पना आपल्या मनांत उत्पन्न होतात व ही भर घाल-णाऱ्यासंबंधानें आपल्याला थोडासा रागही येतो. पण आपल्या मनांत अवहेलनाबुद्धि उत्पन्न होण्याचें किंवा आपल्याला राग येण्याचें कांहींच कारण नाहीं. कदाचित् या काळीं मान्य अस-लेल्या अशा एका वाङ्मयसंकेताची आपल्याला माहिती नसेल इतकेंच. संकेताची माहिती नसल्यामुळें सत्यापालाप इत्यादिकांचे आरोप करण्यास आपण कसे प्रवृत्त होतों हें आपण आतांपर्यंत पाहिलेलेंच आहे. इतरांच्या, विशेषतः पूर्वींच्या लोकांच्या शहाण-पणाविषयीं, दानतीविषयीं, आणि वैचारिक सचोटीविषयीं शंका घेण्यास आपण असावें त्यापेक्षां जरा जास्त तत्पर असतों असें वाटतें.

जयांत किंवा भारतांत ज्या लोकांनीं भर घातली ते जर कोणी असंस्कृत लोक असते, विचाराचा सूक्ष्मपणा, तर्काचा काटेकोरपणा शब्द–अर्थ इत्यादिकांविषयींची कसोशी हीं ज्या समाजांत उत्पन्नच झालेली नाहींत त्या समाजांतील जर हे लोक असते किंवा लबाडी करण्याचा यांचा हेतु असता तर कदाचित् दूषकांच्या आक्षेपांत थोडेंबहुत तात्पर्य सांपडलें असतें. पण आपणांस हें माहीत आहे कीं, ज्यांनीं ही भर घातली त्यांच्याही आधीं कित्येक शतकां-

पासून ग्रंथाच्या मूळ संहितेंत बालग्रही फरक न होऊं देण्याचा अभूतपूर्व व तदुत्तरकालांतही पुन्हा कोठेंही न झालेला असा शिकस्तीचा प्रयत्न आपल्या वैदिक वाङ्मयाच्या संबंधानें झालेला होता. कित्येक हजार वर्षांवर हा प्रयत्न पसरलेला आहे. आणि वेदराशी जसाचा तसा राहिला आहे. मूळ संहिता जपण्यासाठीं ही खटपट करणें योग्यच आहे, अशी जाणीव ज्यांच्या अंगवळणी पडली, ते लोक अत्यंत श्रेष्ठ ग्रंथांत नवा मजकूर घुसडण्याचा बालिश प्रयत्न करतील हें खरें वाटत नाहीं. म्हणजे, त्यांनीं नवा मजकूर घातला नाहीं असें येथें म्हणावयाचें नाहीं, तर त्यांनीं हें जें काम केलें तें संकेतबुद्धीमुळें दोषास्पद नव्हतें असें प्रतिपादावयाचें आहे. शिवाय आपण कोणत्या ग्रंथांत भर घालतों याचीही जाणीव त्यांना निःसंशय असली पाहिजे. उगाच कांहीं तरी सटरफटर ग्रंथास आपण हात लावीत नसून समाजांत मान्य झालेल्या ग्रंथास लावीत आहों हें त्यांस माहीत असलें पाहिजे. मग हें सगळें जर खरें तर त्यांनीं ही भर कां घातली ? या प्रश्नाचें उत्तर देतांना प्रस्तुतचें प्रतिपाद्य म्हणजे जी संकेतकल्पना तिचाच आश्रय करणें जरूर आहे.

ज्या काळीं छापण्याची कला तर नव्हतीच, पण लेखनकलेचाही उपयोग बेताचाच होई, त्या काळीं माहिती व ज्ञान हीं स्थिर करण्याचा उपाय म्हणजे ती स्मृतिबद्ध करणें एवढाच होता. बापानें मुलास, मुलानें आपल्या मुलास याप्रमाणें घराण्यांत व गुरुनें शिष्यास व शिष्यानें प्रशिष्यास याप्रमाणें विद्यापीठांत, सांगूनच लोक ही माहिती व हीं ज्ञानें मानवी जीविताच्या प्रवाहाबरोबर वहातीं ठेवीत असत. पण कोणा अधिकारी पुरुषाच्या मनांत असें येणें स्वाभाविक होते कीं, लोकांच्या मुखीं अस-

लेल्या कथांतील मुख्य मुख्य तरी लिहून ठेवाव्या; हें जें पहिलें लिखाण झालें तेंच महाभारताचें मूळ रूप असलें पाहिजे. मुख्य कथा जरी याप्रमाणें कागदावर कायम झाली तरी इतर शेंकडों कथोपकथा तोंडींच चालू राहिल्या असतील. त्यांतील मुख्य मुख्य कथा समाजास मान्य असलेल्या अशा अधिकारी पुरुषानें मूळ ग्रंथांत दाखल केल्या, याचेंच नांव पहिलें संस्करण. नंतर पुन: कांहीं वर्षांनीं उरलेल्या कथा सुद्धां दुसऱ्या अधिकारी पुरुषानें या ग्रंथांत लिहून ठेवल्या याचेंच नांव दुसरें संस्करण. त्यांच्या या प्रयत्नाला कोणी हरकत घेतल्याची, किंवा नांवें ठेवल्याची कोठेंही नोंद नाहीं व एकदां समाजांत चालू असलेल्या कथांचा संग्रह पूर्ण झाल्यानंतर त्यांत कोणी भरही घातलेली नाहीं. या ऐतिहासिक कथा होत्या व समाजांत त्या चालू होत्या. संस्करणें करणारांनीं त्या आद्य इतिहासग्रंथांत कायम केल्या. इतकेंच काय तें. मग त्यांनीं हें केलें तें चांगलें कीं वाईट? त्याला काय घुसडणें म्हणावयाचें? आपला जो सध्यांचा ज्ञानकोश आहे यांत कांहीं वर्षांनीं जर कोणी भर घातली तर तें त्याचें करणें आक्षेपार्ह ठरेल काय? अर्थातच नाहीं; हीच दृष्टि महाभारतांतील भरीला आपण लाविली पाहिजे. कारण तत्कालीन वाङ्मयसंकेतही त्याच तऱ्हेचा असला पाहिजे. नाहीं तर एवढ्या इतिहासग्रंथांत आपलीं कल्पितें घुसडणारांची चांगलीच संभावना झाली असती.

हें लिहिणें महाभारतांतील कथारूप वाङ्मयासंबंधानें आहे; इतर मजकुराविषयीं नाहीं हें ध्यानांत हवें. वरील लिहिण्यावरून दिसून येईल कीं, आतांच प्रतिपादलेला वाङ्मयसंकेत जर लक्षांत घेतला तर महाभारतांत व त्याजवर संस्करणें करणारांच्या प्रयत्नांत दोषास्पदता अशी कांहींच नाहीं. हें ऐतिहासिक कथा संबंधानें झालें. त्या ग्रंथां-

तील अद्भुतासंबंधाचा विवेक मागेंच आला आहे. हा वाङ्मयसंकेत समजावून घेण्याचा प्रयत्न करणें म्हणजे पूर्वींचें वाङ्मय न्याय्य व बरोबरच आहे असा आग्रह धरणें आहे असें नव्हे, तर त्या वाङ्मयासंबंधानें आपला समज जास्त प्रगल्भ करून घेण्याचा हा प्रयत्न आहे. अशाच प्रकारचे कांहीं कांहीं संकेत आपलें जुनें वाङ्मय वाचतांना आपण समजावून घेतले तरच ग्रंथांत वरकरणी दिसणारी असंबद्धता, परस्परविरोध इत्यादिकांचा परिहार करतां येणें संभाव्य दिसतें; नाहीं तर ग्रंथांचा बोध होणें हें पहिल्या इतकेंच दुर्घट राहून ग्रंथ रचणारांना केवळ दूषणें देण्याचीं कामगिरी मात्र आपल्या हातून होत रहावयाची. आतां दुसऱ्या एका संकेताविषयींचा उल्लेख येथें ओघानें येतो.

## परशुरामविषयक संकेत—

कांहीं कांहीं पुराणप्रसिद्ध व्यक्ति भिन्न भिन्न युगांत आढळतात. हनुमान् हा रामावतारांत भेटतो व कृष्णवतारांतही भेटतो; तसेंच परशुराम हा त्याच्या स्वतःच्या अवतारांत, रामावतारांत, व कृष्णावतारांतही भेटतो. आणखीही एक बाब ध्यानांत ठेवण्यासारखी आहे असें वाटतें. ती ही कीं, तोच तोच हनुमान् किंवा परशुराम निरनिराळ्या अवतारांत आढळतो. मग या आकलनांत न येण्यासारख्या गोष्टींचें वर्णन कसें करावयाचें, अथवा आश्चर्य वाटण्यासारखी ही गोष्ट कशी नमूद करावयाची, हा मोठा मनोरंजक प्रश्न आहे. तसेच पुराणांत कित्येक ठिकाणीं असें झालेलें दिसतें कीं, कांहीं मोठाल्या व्यक्ति, कीं ज्यांचा संबंध मुख्य कथेशीं फारच निकटचा व महत्त्वाचा असा असतो, त्यांचा अनेकदां नामनिर्देश झाल्यानंतर पुढें शेवटीं त्यांचें काय झालें हें कोठेंच कळत नाहीं.

त्यांचें चरित्र पाहून त्यांचें पुढें काय झालें असावें ही जिज्ञासा मात्र मनांत प्रबल बनते. परंतु पुराणग्रंथानें तिचें समाधान होत नाहीं. अशा माणसांचें वर्णन कसें करावयाचें हाही वाङ्मयांतील एक मोठा गमतीचा प्रश्न आहे. मला वाटतें कीं, आपण जर पूर्वीच्या एका वाङ्मयसंकेताचा बरोबर अर्थ बसविला तर हा प्रश्न एकदम सुटेल. " अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषण: । कृप: परशुरामश्च सप्तैते चिरजीविन: ॥ " या श्लोकांत सांगितलेल्या सात जणांना चिरंजीव हें नांव पुराणकारांनीं दिलेलें आहे. आपण चिरंजीव ह्या शब्दाचा अर्थ अनंत काल जिवंत राहणारा म्हणजे कधींच न मरणारा असा धरतों व मग आपल्याशींच पुटपुटतों कीं, जर हे मनुष्यप्राणी होते व हे जन्मास आले होते, तर त्यांना मृत्यु नाहीं हें कसें संभवतें ? पुराणकारांचें हें बोलणें सर्वथा अश्रद्धेय आहे असें आपण ठरवितों. पण याही प्रकरणांत वरील संकेतकल्पनाच आपल्या उपयोगाची ठरेल. चिरंजीव हा शब्द त्यांनीं घातला हें खरें, पण तो आपण समजतों याच अर्थानें घेतला पाहिजे अशी सक्ती कां ? श्लोक करणारांनीं या सात जणांना जर एकाच सूत्रांत ओवलें आहे तर त्यांच्यांत **साधर्म्य** काय आहे हें आपण पाहिलें पाहिजे व त्या साधर्म्याला अनुलक्षून चिरंजीव हें नांव दिलें आहे कीं काय हें पाहिलें पाहिजे. तपासून पाहतां असें दिसतें कीं, हे सातही लोक फार मोठे; ते निरनिराळ्या अवतारकालांत भेटतात; तसेंच इतिहासपुराणांत त्यांच्या कर्तबगारीचा उल्लेख पुष्कळदां झालेला; पण त्यांचा अंत शेवटीं कसा झाला हें मात्र सांगितलेलें नाहीं; असा प्रकार या सर्वांच्या बाबतींत झालेला दिसतो. अश्वत्थाम्याचा पराक्रम भारतीय युद्धांत फार थोर म्हणून वर्णिलेला आहे. तेव्हां अशा पुरुषाचा अंत कसा

झाला हें माहीत व्हावें अशी इच्छा महाभारताच्या वाचकांना होणें स्वाभाविक आहे. परंतु श्रीकृष्णाच्या शापाशिवाय दुसरें कोणतेंही युक्तिसिद्ध समाधान वाचकाला लाभत नाहीं. प्रत्यक्ष श्रीकृष्ण व बलराम, तसेंच पांच पांडव व द्रौपदी, कुंती, सगळे कौरव, भीष्म, कर्ण, द्रोण या सगळ्यांचा शेवट कसा झाला याची माहिती वाचावयास सांपडते. पण कौरवांच्या सेनापतिपदावर आरूढ होण्याचा मान ज्या दोन पुरुषांस मिळाला त्यांचें पुढें काय झालें हें कोठेंच सांपडत नाहीं. हे दोघे पुरुष म्हणजे अश्वत्थामा व कृपाचार्य हे होत व म्हणूनच त्यांचीं नांवें या चिरंजीवांच्या यादींत आलीं असावीं. तसेंच बलीचें. तो दोन अवतारांत आढळतो हें एक व दुसरें म्हणजे त्याला एकदां पाताळांत दडपल्यानंतर त्याचें पुढें काय झालें हें पुराणकारांनीं कोठेंच सांगितलें नाहीं. बरें, बली म्हणजे कांहीं सामान्य असामी नव्हे; सबंध वामन-अवतार तिच्यासाठीं खर्ची पडला आहे. तशीच कांहींशी गोष्ट बिभीषणाची झाली आहे. रावणाला मारून रामचंद्रानें बिभीषणाला राज्याभिषेक केला; पण रामाला विजय मिळवून देण्याच्या कामीं एवढी करामत करणाऱ्या या दैत्याचें पुढें काय झालें हें मुळींच कळत नाहीं. व्यास हे दर ठिकाणीं दत्त म्हणून उभे आहेतच; पण त्यांचें तरी पुढें काय झालें? हनुमानाचेंही तसेंच आहे. एक तर तो दोन अवतारांत येतो आणि त्याचा शेवट काय हें पुराणांत कोठेंच नाहीं. खुद्द परशुरामाचें तर सांगावयासच नको. तो स्वतः अवतार व पुढें आणखी दोन अवतारांत तो जागोजाग भेटतोच, व शेवटीं त्याचें काय झालें याचा ठावठिकाण कांहींच नाहीं. अर्थात् अशा मोठाल्या व्यक्ति तशाच लोंबत राहिलेल्या पाहून कोणा चौकसबुद्धीच्या माणसानें या त्यांच्या साधर्म्यामुळें

त्यांस एका सूत्रांत गोविलें व " यांचें पुढें काय झालें हें कळत नाहीं " या अर्थाचें म्हणून 'चिरंजीव' हें विशेषण त्यांना लाविलें. हा वाङ्मय संकेत असावा असें दिसतें व तो युक्तिसिद्ध आहे. तो पत्करला म्हणजे यांना मरण नाहीं हें कसें संभवतें, पुराणिकांनीं ही कांहीं तरी एक थाप मारली असावी असें म्हणण्याची आपल्या मनांतील ऊर्मि एकदम शमते. संकेतशोधन म्हणजे काय याचा हा सविस्तर ऊहापोह केलेला आहे. याच्या बळावर इतिहास कोणता व पुराण कोणतें याचा छडा लावण्याचें काम, कांहींसें सोपें बनेल असें वाटतें. वर म्हटलेंच आहे कीं, अतिशयोक्ति, कल्पितें, अद्भुतें इत्यादि वगळावयास हवीं म्हणजे इतिहास हा पुराणांतून थोडा मोकळा होत जाईल. त्याप्रमाणेंच वाङ्मय-संकेत शोधून पाहिले तर याच कामीं आणखी थोडीशी मदत होण्याचा पूर्ण संभव आहे.

## हें कां झालें ?—

पुराणें रचणारांच्या अलंकारिक वर्णनांतून आपल्याला मूळ ऐतिहासिक कथारूप अर्थ काढावे लागतात हें स्पष्ट आहे. पण येथें अशी एक शंका येतें कीं, मूळ ऐतिहासिक गोष्टच जशीच्या तशी पुराणकारांनीं कां सांगितली नाहीं ? त्यांना अलंकाराची जरूरी कां वाटली ? का, तो अलंकार आहे असें आपण समजतों, व पुराणकर्ते स्वतः मात्र त्या गोष्टी परमार्थतःच खऱ्या मानीत होते ? झालें तसें सांगून ठेवलें व तें वर्णन मानवी व्यवहारांस शोभेल असेंच असलें तर माणसांचा त्याच्यावर विश्वास बसणार नाहीं असें त्यांना वाटलें असावें काय ? आणि त्याच गोष्टी

अफाट, अतिशयोक्तीनें सांगितल्या तरच श्रद्धेय बनतील अशी त्यांची अटकळ झाली असावी काय? भावी वाचकांच्या विचारशक्तीविषयीं व चिकित्साबुद्धीविषयीं त्यांनीं एवढें हलकें मत बनविण्याचें साहस कां करावें? कदाचित् त्या त्या बाबी ग्रंथांत दाखल करण्याच्या वेळीं अशा अतिशयोक्तीच्या रूपानेंच त्यांच्या हातीं आल्या असाव्या काय! जर आल्या असल्या तर या अतिशयोक्तींचे लपेटे काढून टाकून शुद्ध ऐतिहासिक सत्याचा पिंड कोणता तो पाहून तो ग्रंथांत दाखल करण्याची बुद्धि त्यांना कां झाली नाहीं? त्या त्या ग्रंथांतील त्यांचें इतर लिहिणें पाहिलें तर त्यांच्या बुद्धिमत्त्वाची साक्ष उत्तम पटते. अशा बुद्धिमानांनीं सामान्य बुद्धीस सुद्धां कधींही न पटण्यासारख्या गोष्टी आपल्या ग्रंथांत बिनटीक, व वाचक जणूं कांहीं आपल्या लिहिण्यावर सहज विश्वास ठेवील अशा भाबडेपणानें कां सांगाव्या? एकंदरीनें पाहतां हा विचार मनांत पुन्हा पुन्हा उद्भवतो कीं, पुराणांत जो इतिहास आहे तो ज्या काळीं घडला त्या काळापासून तो ज्या काळीं तो लिहून ठेवण्यांत आला त्या काळापर्यंत पुष्कळच शतकांचा अवधि लोटला असला पाहिजे. ग्रंथलेखनाच्या कालीं माणसांची चिकित्साबुद्धि जागृत असली, तरी दरम्यानच्या काळांत हातीं आलेल्या हकीकतींचें इतिहासरूप जाऊन त्यांत असें कांहीं दैवीरूप प्राप्त झालें असावें कीं, त्यांची चिकित्सा करीत बसणें म्हणजे अत्यंत निंद्य काम आहे अशी त्यांची कल्पना झालेली असावी. परशुरामानें सह्याद्रीच्या पश्चिमेकडील सबंध पट्टी, गोवें, मलबार, म्हणजे थेट कन्याकुमारीपर्यंत सबंध प्रदेश वसविला व त्याच्या आधीं तो त्यानें वसाहतयोग्य केला हें पुराणांतील कथांवरून व ज्या टापूंतील भिन्न भिन्न जातींच्या जन्मकथा उपलब्ध आहेत त्यांवरून आपल्या

५५८८ ग्रं. क्र.

मनांत चांगलें ठसतें. आतां परशुरामानें जरी ही गोष्ट केली, तर ती तशीच लिहून ठेवणें हेंच बरोबर व श्रेयस्करही झालें असतें. बरोबर अशासाठीं कीं, वर्णन व मूळ घडलेली गोष्ट यांच्यांत ताळमेळ राहिला असता, व श्रेयस्कर अशासाठीं कीं, मनुष्यप्राणी जो त्याच्या सामर्थ्याची व कर्तबगारीची कल्पना सर्वसाधारणपणें उंच बनून मानव्याची उत्तरोत्तर प्रगतिच होत गेली असती. पण पुराणें लिहिणारानें आपल्या मजकुराचें मानवीरूप टाकून दिलें आणि म्हटलें कीं, परशुरामानें बाण मारून कित्येक मैलपर्यंत समुद्र मागें हटविला ! आतां बाण मारल्यानें पराकाष्ठा माणसें मरतील किंवा कदाचित् झाडें मोडतील; पण द्रवरूप असलेला, हजारों मैल पसरलेला हा समुद्र एकदम तटकन् उडून तीस-पस्तीस मैल मागें जाऊन कसा पडेल ही शंका उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. खुद्द पुराणें लिहिणाराला राम हा समुद्रास बाण कसा मारील, बरें त्यानें मारला तरी समुद्र मागें कसा हटेल ही शंका यावी हें साहजिक दिसतें; पण लिहिण्यांत पहावें तों त्यांतलें कांहीं नाहीं. असें कां व्हावें ? मानव्याच्या मनाचें जें विकसन चाललें आहे त्यांत सत्याचें वर्णन करण्याची ही तऱ्हा अनुक्रम-प्राप्तच आहे कीं काय ? त्या त्या काळच्या माणसांना दोष देत बसणें व त्यांनीं उगाच कांहीं तरी भाकड कथा लिहिल्या असें म्हणण्याची बुद्धि होणें हें स्वाभाविक असेल, पण तेवढ्यानें त्याचा निकाल मात्र लागत नाहीं; असो.

## हें तरी खरें कशावरून ?—

आतां मूळ इतिहासकथेवर आलेलीं जीं पटलें तीं काढण्यासाठीं वरच्यासारखी कांहीं खटपट करणें हें जरी जरूर व प्रशस्तही

आहे तरी हीं काढून टाकल्यानंतर जो कथाभाग उरतो तो तरी श्रद्धेय असा इतिहास कशावरून अशी शंका कोणास घेतां येण्यासारखी आहे. पण ही शंका, इतिहास या संज्ञेनें शुद्धरूप ठरलेल्या प्रत्यक्ष इतिहासाच्या संबंधानेंसुद्धां घेतां येण्यासारखी आहे.

राम व कृष्ण या अवतारांच्या कथा म्हणजे शुद्ध ‘ इतिहास ’ आहे असें जें त्यांचें वर्णन आपल्या वाङ्मयांत आहे तें खोटें कशासाठीं मानावयाचें हेंच ध्यानांत येत नाहीं. केवळ तें जुनें आहे म्हणून ? मग फार प्राचीन काळची लिहून ठेवलेली अशी कोणतीही गोष्ट खोटीच समजावयाची असें होईल. चीन देशांतील चंद्रवंशीय राजे, इराणांतील म्हणजे आर्याणांतील परशुवंशीय व आर्यवंशीय राजकुलें हीं तरी खरीं कां ? त्यांच्या हकीकती लिहिलेल्या आहेत त्यावरूनचना ? युरोपांतील ख्रिस्तपूर्वकालीन राजवंशांपैकीं ज्यांच्या हकीकती आपणच खऱ्या म्हणून वाचतो त्या खऱ्या असल्या पाहिजेत या समजानेंच ना ? पुढें लोकांना खरें वाटावें, व तोंडी राहिल्यानें कदाचित् नष्ट होण्याचा संभव, म्हणून तर माणसांनीं या हकीकती लिहून ठेवल्या—पण आक्षेपकाला लिहून ठेवल्या यांत विशेष कांहींच वाटत नाहीं असें दिसतें. कांहीं खोट्या गोष्टीही लिहूनच ठेवलेल्या असतात हें खरें असल्यामुळें प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीही लिहून ठेवलेल्या स्वरूपांत सांपडल्या म्हणून अविश्वास्य मानाव्या हें चमत्कारिक आहे. पुष्कळ लुच्चे लोक संभावितांचें सोंग घेतात. कांहीं दिवसांनीं त्यांची लुच्चेगिरी उघडकीस येते व त्यांचा संभावीतपणा लटकाच होता असें प्रत्ययास येतें. आतां या मुद्द्यावर प्रत्यक्ष संभावित माणसांसंबंधानें सुद्धां आपण लुच्चेगिरीची शंका घेऊं लागलों, तर संभावितांना मोठी अडचणच उत्पन्न झाली म्हणावयाची. लुच्चे

हे संभावितासारखे दिसले तरी संभावित हे संभावितासारखेच दिसावयाचे. हे लुच्चे लोक आपल्या रूपाचा बहाणा करतात या रागावर संभावितांनीं संभावितांसारखें दिसावयाचें नाहीं कीं काय ? ते जसे आहेत तसेंच त्यांनीं दिसलें पाहिजे. तीच गोष्ट या ठिकाणीं लागू आहे. खोट्या गोष्टी लिहिल्या जातात म्हणून खऱ्या गोष्टींनीं लेखनरूपांत प्रविष्ट होणें चूक आहे कीं काय ? टिकून राहवयास त्यांनीं तेंच रूप घेतलें पाहिजे. आक्षेपकांनीं या हकीकती खोट्या आहेत एवढें म्हणून चालावयाचें नाहीं. इतकेंच नव्हे तर "खोट्या हकीकती सुद्धां लिहिलेल्याच असतात" या मुद्द्याच्या मान्यानें सुद्धां त्यांचें असत्यत्व त्यालाच सिद्ध करतां येणार नाहीं. कारण त्याच्या मतानें ज्या गोष्टी खऱ्या आहेत त्यांपैकीं कांहीं तरी लेखरूपानें आहेत म्हणूनच त्या खऱ्या आहेत असें तो समजत असला पाहिजे. म्हणून आक्षेपकाचा हा मुद्दा अगदींच सोडून दिला पाहिजे.

लिहिलेल्या असण्याच्या जोडीला त्या विश्वास्य ठरावयास आणखी कांहीं प्रमाणें आहेत कीं काय हेंही पाहिलें पाहिजे. हीं प्रमाणें असलीं तरच लिहिलेली गोष्ट खरी हा पक्ष मात्र तत्त्वशुद्ध नाहीं व म्हणून मान्यही नाहीं. पण जर विश्वास्यता कायम करण्यास आणखी कांहीं प्रमाणें सांपडलीं तर तीं हवीतच. पूर्वींच्या वाङ्मयांत इतिहाससंज्ञा ज्यांना मिळाली त्या कथांतील सूक्ष्म रूपें व जडरूपें जर कांहीं शिल्लक राहिलीं असलीं तर तीं त्या त्या इतिहासाच्या खरेपणाचींच द्योतकें होत. रामाची अयोध्या नगरी ही शतकानुशतक रामाची अयोध्या म्हणूनच नांदत आली आहे. धर्माच्या इंद्रप्रस्थ राजधानीच्या खुणा अजूनही पहावयास मिळतात. कुरुक्षेत्राचें रणांगण अजून तसेंच

पसरलेलें आहे. श्रीकृष्णाची द्वारका नगरी, मथुरा, गोकुळ, वृंदावन हीं सर्व स्थलें म्हणजे अत्यंत विश्वास्य अशा ऐतिहासिक खुणा आहेत. या स्थूल खुणा जशा, तशाच सूक्ष्म खुणाही शिल्लक आहेत. श्रीकृष्णाची भगवद्गीता ही अनुष्टुभ् छंदानें जरी नसली तरी तत्त्वबोधाच्या तात्पर्यरूपानें रणांगणावरचीच सूक्ष्म खूण अजून शिल्लक आहे; पण हा मुद्दा जास्त पडताळावयास हवा असें वाटत नाहीं. हें जें रामकृष्णादिकांच्या संबंधानें म्हटलें तेंच प्रस्तुत-चरित्रांत परशुरामाच्या संबंधानें पत्करावयास हवें. पण या दोघां-सही सामान्य अशा आणखीही गोष्टी आहेत. शेंकडों राजघराणीं ज्याप्रमाणें आपल्या कुलपरंपरा प्रत्यक्ष रामाशीं किंवा कृष्णाशीं नेऊन भिडवितात, त्याप्रमाणेंच आपआपल्या जाति कशा उत्पन्न झाल्या याची उपपत्ति सांगतांना परशुरामाच्या क्षत्रियसंहाराचा उल्लेख कित्येक जाति करतात. त्याप्रमाणेंच ज्या ज्या भूपृष्ठावर परशुरामाचे पराक्रम झाले त्यांच्याशीं परशुरामाच्या कृत्यांची स्मृति आज कित्येक हजार वर्षे खिळून गेलेली आपणांस माहीत आहे. भडोचपासून तों तहत कन्याकुमारीपर्यंत सबंध पश्चिम किनाऱ्यावर भिन्न भिन्न जातींच्या उत्पत्तिकथांशीं ज्याप्रमाणें, त्याप्रमाणेंच अनेक स्थलविशेषांशीं त्यांची स्मृति निबद्ध झालेली आहे. महेंद्र पर्वत, वैतरणी नदी, शूर्पारक नगरी, भार्गव ब्राह्मणांचें ठिकाण जें भडोच, महीनदीच्या कांठचा महेंद्र पर्वत, सहस्रार्जुनाशीं ज्यावर युद्ध झालें तो नर्मदेचा तीर, क्षत्रियांच्या रक्तानें भरलेले ते उत्तरेकडील डोह हे सर्व पूर्वीं होऊन गेलेल्या एका भयंकर चरित्राचे अवशेषच होत. आपल्याला हे जे सूक्ष्मरूप व जडरूप अवशेष सांपडतात ते केवळ कल्पित कथांतील नायकनायिकांच्या चरित्रांना उरवितां येणें सर्वथा अशक्य आहे. बाणाच्या कादंबरींतील नायकनायिका अत्यंत रम्य

आहेत यांत शकाच नाहीं. पण त्यांना हें सौभाग्य आणि महत्त्व कधींही लाभलेलें नाहीं. कारण मुळांत त्यांत कांहींच खरें नव्हतें.

वरील विवेचनावरून ध्यानांत येईल कीं, इतिहास कोणता व पुराण कोणतें याची निवड करणें पुष्कळदां कठिण असलें तरी सर्वथा अशक्य मात्र नाहीं. इतकेंच कीं, ही निवड करण्याचीं साधनें शोधिलीं पाहिजेत. अशा साधनांपैकीं 'संकेत बोध' हें एक साधन आहे. त्याच्या बळावर परशुरामाच्या चिरंजीवपणाचा अर्थ ठरविण्याचा यत्न केला आहे. परशुराम हा मर्त्य ठरल्यानंतर आतां पुढील विवेचनांतील युक्तता जास्त पटेल असा भरवंसा आहे.

---

## प्रकरण तिसरें

# परशुरामाचा काल

**वसाहत–काल—**

सह्याद्रि पर्वताच्या उत्तर टोंकापासून आरंभ करून तो तहत कन्याकुमारीपर्यंत समुद्राला लागून जो प्रदेशाचा पट्टा पसरला आहे, त्या पट्ट्याभर परशुरामाचा महिमा, आज कित्येक शतकें, सारखा गाइला जात आहे. त्यानें सह्याद्रीच्या पश्चिमेस नवीन भूमि उत्पन्न केली अथवा जी होती ती वसाहत–योग्य बनविली, ही हकीकत महाभारतांत दिलेली आहे व महाभारत सध्यांच्या स्वरूपांत निदान बावीसशें वर्षें अस्तित्वांत आहे. तेव्हां निदान बावीस शतकें तरी परशुरामाचा महिमा कोंकणांत खासच चालू आहे. आतां महाभारतांत ज्यानें कोणी ही हकीकत लिहिली त्यानें ती किती वर्षांची जुनी म्हणून लिहिली हें कळावयास लेखकानें बुद्धिपुरस्सरपणें असें कोणतेंच साधन ठेवलें नाहीं. पण त्यानें जरी तसें ठेवलें नसलें, तरी इतर हकीकतीवरून कांहीं अनुमानें बसवितां येण्यासारखीं आहेत. ज्या वेळीं परशुरामानें हा प्रचंड उद्योग केला त्या वेळेस त्याचें अवतारकार्य संपलेलें होतें; मधूनमधून क्षत्रियसंहाराचा आवेग त्याला येत असे. तरी एकंदरीनें पाहतां त्याचा जीवितहेतु पूर्ण झाला होता यांत कांहींच शंका नाहीं. एवढा थोरला क्षत्रियवध करून त्यानें आपलेंच राज्य स्थापण्याचें कधींच मनांत आणलें

नाहीं, तर ती सर्व भूमि त्यानें ब्राह्मणांस दान म्हणून दिली. ज्या कश्यप नांवाच्या ब्राह्मणास ती दिली त्यानेंच त्याला पेचांत आणिलें व आतां ही भूमि माझी आहे, तुला या ठिकाणीं राहण्याचा कांहींएक हक्क नाहीं, असें त्यास बजावलें. याचा सरळ अर्थ असा दिसतो कीं, क्षत्रियसंहाराची कल्पना अतःपर समाजाला बिलकूल मान्य राहिली नव्हती; आणि म्हणूनच ती घेऊन उठलेल्या माणसाला या भूमींत स्थान उरलें नव्हतें. अर्थात् ज्या ठिकाणीं पूर्वीं कोणी राहिलें नव्हतें अथवा जेथें कोणी कधीं संचारही केला नव्हता, तेथेंच त्यानें रहावयाचें ठरविलें, किंवा कदाचित् तिकडे जाण्यावांचून त्याला गत्यंतरही उरलें नसावें. परंतु हा प्रदेश याच्या आधीं कोणास माहीत नव्हता किंवा याच्या आधीं कोणाची वस्ती नव्हती असें मानणें साहसाचेंच होईल. नर्मदेच्या खालच्या प्रदेशांत आर्यांनीं वस्ती करण्याच्या आधीं पुष्कळ लहान लहान जाति या दक्षिणापथांत रहात होत्या. इतकेंच कीं, मागून येऊं लागलेल्या लोकांइतक्या चांगल्या सुसंस्कृत अशा त्या नसतील. हीच गोष्ट प्रस्तुतच्या वर्ण्य-प्रदेशाच्या संबंधानें खरी आहे. परशुरामानें नवी भूमि उत्पन्न केली याचा अर्थ शब्दशः घेतांच यावयाचा नाहीं. कारण एखाद्या माणसाला-ही समुद्राच्या आंत असलेली भूमि कधींही वर उचलितां येण्यासारखी नाहीं. बरें आधुनिक पद्धतीची कांहीं Reclamation ची कल्पना येथें लावण्यास पहावें तर तेंही जमत नाहीं. कारण एक तर उद्धरलेली जमीन हजारों कोस लांबीची आहे व दुसरें असें कीं, उद्धरणाच्या कामांतील मानवी प्रयत्नांच्या खुणा कोठेंही दिसत नाहींत. अर्थात् नवीन भूमि बनविली याचा अर्थ शब्दशः घेतां कामा नये. या शब्दाचा अर्थ इतकाच बसतो कीं, भूमि होतीच; तेथें परशुरामानें वसाहतीचा पायंडा पाडला इतकेंच. पण हा विचार-

तंतु येथेंच संपत नाहीं. त्यानें वसाहतीचा पायंडा पाडला याचा अर्थ त्यानें केलेल्या वसाहतीच्या आधीं तेथें कोणीही मानवी प्राणी रहात नसत असा मानतां येण्यासारखा नाहीं. वर म्हटलेंच आहे कीं, अत्यंत जुनाट काळांत सुद्धां सर्व दक्षिणापथभर माणसांची वस्ती होतीच. म्हणून परशुरामाच्या वसाहतीचा अर्थ इतकाच धरावयास हवा कीं, त्याला जे लोक हवे होते व प्रिय होते त्यांच्या वसाहती त्यानें तेथें करविल्या. हें कार्य त्यानें कोणत्या काळीं केलें याचें उत्तर हें कीं, आपलें क्षत्रियवधाचें काम संपल्याबरोबर व त्या कल्पनेचा कायमचा संन्यास केल्याबरोबर त्यानें हें केलेलें असलें पाहिजे.

**नर्मदेच्या खालीं क्षत्रियवध नाहीं—**

परशुरामाच्या हत्याकांडांत त्याचा संचार दक्षिणदेशांत झाला होता असें दिसत नाहीं. त्याचा मुख्य पराक्रम नर्मदेच्या कांठीं झाला; व कदाचित् अधिक उत्तरेकडील व पूर्वेकडील प्रदेशांत इतर पराक्रम झाले. यावरून दिसून येते कीं, दक्षिणदेशांत आर्य-संस्कृतीचा त्या वेळीं प्रसार झालेला नव्हता. इकडेही जर मोठमोठी क्षत्रिय घराणीं असतीं तर परशुरामाचा संचार इकडेही झाला असता. अर्थात् इतक्या प्राचीनकाळीं परशुराम झाला असला पाहिजे, कीं जेव्हां नर्मदेच्या खालीं क्षत्रिय-राज्यसंस्था नव्हती. हा पुरावा परशुरामाच्या अतिप्राचीनत्वाचा दर्शक नव्हे; पण निदान प्राचीनत्वाचा म्हणजे कृष्णावताराच्या काळाच्या पुष्कळच आधीं तो झाला असल्याचा खास आहे.

**समुद्राची जबानी—**

कित्येक पंडितांच्या मतें, व आधुनिक कालांत झालेलें जें उत्खनन त्यांतून निघालेल्या अनेक वस्तूंचे व खुणांचे त्यांनीं जे निर-

निराळे अर्थ बसविले आहेत त्यांवरून, परशुराम हा परशु भूमींतून म्हणजे इराणाकडून आलेला असावा. हा तर्क उत्तरोत्तर स्थिर होत जाईल असा संभव दिसतो. या तर्काला पुष्टि देणारा एक उल्लेख भारतांतील कथेंत सांपडतो. कार्तवीर्य, कीं ज्याचा पुढें परशुरामानें वध केला, तो आपल्या पराक्रमामुळें फारच चढून गेला होता. (आश्वमेधिक पर्व अ० २९ महाभारत) आपल्याशीं युद्ध करावयास कोणीही समर्थ नाहीं अशी अहंता त्याला प्राप्त झाली होती. आणि म्हणून माजलेल्या एडक्यानें जशा भिंतीशींच टकरा घ्यावा, त्याप्रमाणें तो समुद्राच्या अंगावरच बाण सोडूं लागला असें वर्णन केलें आहे. समुद्राचें व त्याचें या प्रकरणांत बोलणें चालू असतां समुद्रानें त्यांस सांगितलें कीं, तुझा गर्वहरण करावयास जमदग्नीचा मुलगा परशुराम हा येईल. या कथेंतील हे उद्गार समुद्राच्या तोंडीं आहेत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. समुद्रानें सांगितलें कीं, परशुराम अमूक अमूक करील. याचा अर्थ समुद्रावरूनच परशुराम आला अशी तर्कयोग्य कल्पना करावयास कांहींच हरकत नाहीं. ही केली म्हणजे वर उल्लेखिलेलें पंडितांचें मत स्थिर होण्यास आणखी थोडी मदत होते आणि आद्यपरशुरामाचा काल हा या पंडितांच्या अदमासाप्रमाणें तरी चार हजार वर्षें सहज ठरतो.

## उरफाटा प्रवास—

आतां कालदृष्ट्या उरफाटा प्रवास करतां करतां परशुरामाचा काल ठरविणें हेंही सोईचें होईल. कृष्णावतारांतील कित्येक कथांत परशुरामाचा उल्लेख येतो; अर्थात् कृष्णावतारीं परशुराम हा आपलें अवतारकृत्य संपवून महेंद्र पर्वतावर कायमची वस्ती करीत असलेला

असाच आहे. या वेळीं त्यानें सह्याद्रीच्या पश्चिमेकडील समुद्र मागें हटवून शूर्पारक नगरही वसविलेलेंच आहे. त्याच्या स्वतःच्या अवतारकृत्यांतील सर्व प्रसंग त्याच्या पुष्कळच आधीं होऊन गेलेले असून त्या वेळीं तो एखाद्या वानप्रस्थासारखा आपली कालक्रमणा करीत असावा असें दिसतें. कोणाला कांहीं सल्लामसलत द्यावी, कोणाचें कांहीं बरें झाल्यास करावें, एकादे वेळीं पूर्वचरित्रांत आचारलेलें ब्रीद आठवून क्षात्रतेजाची चमक पुन्हा दाखवावी, इतकेंच काय तें त्याच्या या कालांतील चारित्राचें सार दिसतें. याच्या मागें जातां रामावतारींही त्याची व आपली गांठ पडतेच. या वेळींही त्याचें अवतारकार्य संपलेलें असेंच आहे. सर्व रामकथेंत परशुरामाचा उल्लेख एकच आहे. व त्या एका उल्लेखावरूनही कृष्णावतारांत त्याच्या ठिकाणीं दिसून येणारी जी वानप्रस्थवृत्ति तीच दिसून येते. याच्या मागें आपण गेलों म्हणजे त्याचें स्वतःचें अवतारकार्य प्रत्यक्ष दिसूं लागतें. म्हणजे क्षत्रियसंहाराची सर्व कथा रामावताराच्या पूर्वीं कित्येक शतकें होऊन गेलेली असली पाहिजे. रामायण व महाभारत हे दोन ग्रंथ केव्हां लिहिले गेले याविषयीं जरी पंडितांत मतभेद असला व रामायण हें महाभारताच्या नंतर लिहिलें गेलें असें जरी कोणाचें मत असलें, तरी प्रत्यक्ष रामाची कथा ही कृष्णाच्या व कौरवपांडवांच्या कथेच्या आधीं घडली याबद्दल कोणाचाच वाद नाहीं. या रामाच्याही पूर्वीं कित्येक शतकें परशुरामाचें अवतारकार्य समाप्त झालें होतें. परशुराम, राम व कृष्ण हे तिघेही आपआपल्या वेळीं नसले तरी पुढें अवतार मानले गेले. यावरून ते परस्परांपासून फार दूरदूरच्या कालीं होऊन गेले असावे असें मानण्यास कांहींच करकत नाहीं. श. पू. सुमारें ३॥ हजार वर्षें श्रीकृष्णाचा अवतार झाला, हें मत ग्राह्य धरलें तर निदान

एक हजार वर्षे याच्यामागें रामचंद्राचा काल जातो. आणि मागल्या मागल्या अवतारांतील अंतर उत्तरोत्तर कमी होत जातें हें म्हणणें युक्तीस धरून आहे असें दिसत असल्यामुळें रामाच्याही मागें ५०० वर्षे परशुरामाचा काल धरावयास कांहींच हरकत नाहीं. प्रत्यक्ष भृगु ऋषींनीं ऋग्वेदांत एक ऋचा लिहिलेली आहे, व भृगु ऋषींचा परशुराम हा पणतू हें लक्षांत घेतां दाशरथि रामाच्या-मागें कांहीं शतकें गेल्यावरच परशुरामाचा काळ आपणांस लागेल हें स्पष्ट आहे. आतां ऋग्वेदांतील प्रार्थना लिहिणारा भृगु हा परशु-रामाच्या पणज्याहून कोणी निराळा भृगु असला तर मात्र हा एवढा एक मुद्दा आपल्या अनुमानसमुदायांतून गळेल. तसें झालें तरी वरील अनुमानपरंपरा मात्र अबाधितच राहते. तीवरून असें दिसतें कीं, परशुरामचरित्राचा काळ निदानपक्षी सात हजार वर्षांच्या आसपास असावा.

## ऋग्वेदांतील प्रमाण—

परशुरामाचें प्राचीनत्व सिद्ध करावयास आणखी एका मुद्द्याचा विचार करावयास हवा. ऋग्वेदांतील कित्येक सूक्तें भृगु, जमदग्नि व परशुराम यांनीं रचलेलीं आहेत. चार पिढ्यांचे लोक एकाच ग्रंथांतील मजकुराचे लेखक म्हणून आढळून येतात. याला पुष्क-ळच अर्थ आहे. तो अर्थ हा कीं, हा ग्रंथ एकाच वेळीं झालेला नाहीं. निरनिराळ्या ऋषींनीं सूक्तें केलेलीं होतीं व निरनिराळे मुनि अजूनही सूक्तें करीतच होते. पुढें केव्हां तरी या सर्व प्रार्थना सूक्त मंडळ अशा रूपानें ग्रंथ रूपांत अवतीर्ण झाल्या व तो पहिला वेद झाला. या वेदाला ब्राह्मणक्षात्रियादि समाजाची मान्यता मिळाली. या ग्रंथांत अंतर्भूत झालेल्या प्रार्थना

ग्रंथाचें निबंधन होण्याच्या आधीं पुष्कळच वर्षे सिद्ध होऊन राहिलेल्या असल्या पाहिजेत व तसेंच ज्यांनीं ह्या प्रार्थना लिहिल्या त्यांचीं नांवें या ग्रंथास धर्मग्रंथ म्हणून मानणाऱ्या क्षत्रियांना त्या वेळीं अप्रिय राहिलेलीं नसलीं पाहिजेत. हीं दोनहीं अनुमानें सुयुक्तच होतील असें वाटतें. जर का परशुरामाच्या कुलाविषयीं क्षत्रियांच्या मनांत रागद्वेषाचीच भावना शिल्लक राहिली असती तर त्यांनीं भृगु इत्यादींच्या प्रार्थना ज्यांत अंतर्भूत झालेल्या आहेत त्या ग्रंथांचें धर्मग्रंथ म्हणून कधींही स्वीकरण केलें नसतें. अर्थात् यावरून असें अनुमान निघतें कीं, ऋग्वेदाच्या निबंधन-काळाच्या पुष्कळच पूर्वीं भृगु कुलांतील लोक होऊन गेले असले पाहिजेत. ऋग्वेदाचा काल हा सात हजार वर्षांच्या अलकिडचा नाहीं असें जर आहे तर परशुरामाचा काल हा कांहीं शतकें त्याच्यापूर्वीं जातो हें आपोआपच सिद्ध होतें.

**परशु–प्रमाण—**

परशुराम हा ऐतिहासिक पुरुष श्रीरामचंद्राच्याही कित्येक शतकें आधीं होऊन गेला असला पाहिजे. हें ठरवावयास त्याच्या खांद्यावरची कुऱ्हाड उत्तम उपयोगीं पडण्यासारखी आहे. परशुरामाचें युद्धाचें मुख्य आयुध परशु हें होतें. रामायणांत व महाभारतांत जीं शस्त्रास्त्रांचीं अनेक नांवें आलेलीं आहेत, त्यांचे गुणधर्म पाहातां त्यांच्या मानानें परशु हें आयुध फारच कमी प्रतीचें आहे असें दिसून येतें. मानवी जीवितांत जशी इतर सर्व अंगांनीं तशीच युद्धसामग्रीच्या दृष्टीनेंही उत्तरोत्तर प्रगति होत आलेली आहे. रामाचा धनुष्यबाण आणि परशुरामाची कुऱ्हाड या दोन आयुधांतील अंतर कालमापनानें सांगतां आलें तर तें योग्यच होईल. पण

तसें करतां येणें अशक्य आहे. परंतु वर्षें किंवा शतकें हीं जरी निश्चित सांगतां आलीं नाहींत, तरी योद्ध्याचें शस्त्रागार कुऱ्हाडीपासून उत्क्रांत होतां होतां धनुर्बाणापर्यंत येऊन ठेपावयास त्यास पुष्कळच कालावधि लागलेला असला पाहिजे हें उघड आहे. व म्हणून परशुराम हा कित्येक शतकें तरी दाशरथी रामाच्या आधीं होऊन गेला असावा असें अनुमान करतां येतें. यांत आणखीही एक विचार आहे. दाशरथी राम हा परशुरामाहून निराळा म्हणून दाखवावयाचा असला तर त्याला धनुर्धारी राम असें म्हणतां येतें. हे दोघेही आपापल्या काळाचे सर्वोत्तम प्रतिनिधि होते. आणि म्हणून त्यांच्या हातीं असलेलीं आयुधें त्या त्या काळीं जीं कोणतीं सर्वोत्तम म्हणून आयुधें होतीं तींच असलीं पाहिजेत. म्हणून धनुष्यबाण आणि परशु हीं त्या त्या काळाची सर्वोत्तम आयुधें धरून त्यावरून वरील अनुमान केलेलें आहे. रामचंद्राचें धनुष्य आणि व्याधाचा तिरकमठा यांत फारच मोठी तफावत आहे हेंही लक्षांत बाळगलें पाहिजे.

**सामाजिक प्रमाण—**

पण कृष्ण व दाशराथि राम यांचे काळ कोणतेही मानले तरी रामाच्यापूर्वीं किती शतकें परशुराम झाला असावा हें ठरविण्यास आणखी एक बलवत्तर प्रमाण आहे. हें प्रमाण सामाजिक स्वरूपाचें आहे. कृष्णचरित्रांत व रामचरित्रांतही आर्य लोकांच्या चातुर्वण्याचा चांगला मिलाफ झालेला दिसतो. आपला हा समाज चातुर्वर्ण आहे, आपण सर्व या समाजाचे अवयव आहों, हें आर्यावर्त आपल्या जीवितार्चें कायमचें अधिष्ठान होय ही कल्पना समाजांत पूर्ण सिद्ध झालेली दिसते. ही समाजाची बंधनें, आर्थिक नियमनें व

राजकीय अनुशासनें हीं आपणां सर्वांस बंधनकारक आहेत, आपण सर्वजण परस्परावलंबी आहोंत, समाजधारणासाठीं व परस्परांच्या पोषणासाठीं आपण सलोख्यानें वागून आपल्या सामुदायिक जीविताचे आपण एक लोक बनवितों, अशा प्रकारची जाणीव तत्कालीन समाजास होती असें स्पष्ट दिसतें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे एका मोठ्या समाजाचे अवयव असून त्यांच्यांत सलोखा नांदत आहे, त्यांनीं परस्परांची जरूरी व महत्त्वही जाणून एकच सामाजिक जीवनरस समाजांत खेळतां ठेवला आहे असें स्पष्ट दिसतें. कृष्णावतारांत भांडणें व मारामाऱ्या पुष्कळच आहेत; पण त्या भिन्न भिन्न राजांमध्यें झालेल्या आहेत; चातुर्वर्ण्यापैकीं वर्णच एक-मेकांशीं भांडले आहेत असें दिसत नाहीं. म्हणजे हे आर्य लोक आपलें जमातीचें रूप सोडून आपल्या सामुदायिक जीविताच्या बळावर एक बलिष्ठ समाज बनवून बसले होते. पण, परशुराम-चरित्रांत जी एकच व अत्यंत महत्त्वाची बाब वर्णिली आहे ती दोन वर्णांत झालेल्या भांडणाची होय. ब्राह्मण व क्षत्रिय यांत ब्राह्मण-क्षत्रिय या नात्यानेंच झालेलें युद्ध यांत वर्णिलें आहे. आपण ब्राह्मण व क्षत्रिय मिळून वैश्य-शूद्रांसह एक समाज बनविला आहे व आपलीं हिताहितें इतकीं गुंतलीं आहेत कीं, परस्परांचा उत्कर्ष रचण्यांत आपलें हित आहे अशी कल्पना तर उद्भवलेली नव्हती; इतकेंच नव्हे तर आपण परस्परांचे वैरी आहोंत हीच भावना दृढतर दिसते. कदाचित् या दोघांनाही एकसामाजिकत्व कांहींसें प्रतीत झालेलेंही असेल. परंतु आपापलें Tribal ( जमातीचें ) रूप त्यांच्या मनांत बलवत्तर होतें. अवघें परशुरामचरित्र यावरच रचलेलें आहे. आतां प्रस्तुत प्रश्न असा आहे कीं, रामावताराच्या किती मागें परशुराम-अवतार धरावयाचा ? तर त्यास उत्तर हें कीं, आपलें जमातीचें रूप

विसरून, झालेल्या हत्येच्या आठवणी पूर्ण विसरावयाची तयारी होऊन, उभयतांचा मिळून अविभाज्य असा समाज बनण्यास जेवढा काळ लागतो तेवढा काळ परशुराम-अवतार व रामावतार यांच्यामध्यें गेला असला पाहिजे. जमातीचें रूप विसरणें, हाडवैराची स्मृति केवळ स्मृतिरूप उरणें, व परस्परांशीं सांस्कृतिक दृष्ट्या एकजीव होणें याला कित्येक शतकें जावयास हवींत हें उघड आहे. म्हणून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, रामावताराच्या पूर्वीं कित्येक शतकें परशुराम-अवतार होऊन गेला. या सामाजिक रूपांतराच्याच मुद्द्यांकडे लक्ष देऊन वरील परिच्छेदांत म्हटलें आहे कीं, कृष्णावताराच्या मागें एक हजार वर्षें रामावतार धरावा.

## राजवाड्यांचें अनुमान—

या कालनिर्णयाच्या कामीं आणखीही एका गोष्टीचा उल्लेख करावयास हवा. शके १८३६ सालीं भारत-इतिहास-संशोधक मंडळ, पुणें, याच्या द्वितीय-संमेलन-वृत्तांत कै. राजवाडे यांनीं चित्पावन ब्राह्मणांवर एक निबंध लिहिला आहे. चित्पावन ब्राह्मणांचें प्राचीनत्व किती आहे हें ठरवितांना त्यांना परशुरामाचा काल ठरविणें प्राप्त झालें आहे. त्या विवेचनांत राजवाडे म्हणतात कीं, “ चित्पावनांचे १४ मूळ पुरुष ३०८८ वर्षांमागें कोंकणांत वसाहत करिते झाले.” ही त्यांची वस्ती प्रत्यक्ष परशुरामानेंच करविलेली आहे म्हणून परशुराम हाही ३०८८ वर्षांमागें विद्यमान होता असें धरावयास हरकत नाहीं, असें त्यांचें अनुमान दिसतें. पण कै. राजवाडे यांच्या विवेचनांतून चित्पावन ब्राह्मणांच्या वस्तीचा काळही निघत नाहीं व

परशुरामाचा काळही निश्चित होत नाहीं. मलबारांत परशुरामशक चालतो. तो परशुरामशक कलिवर्ष १९२७ त सुरू झाला. म्हणजे आज त्याला २०८८ (+ २३) वर्षें लोटलीं. एवढ्यावरून चित्पावनांचे १४ मूळ पुरुष ३०८८ (+ २३) वर्षांमागें कोंकणांत वसाहत करते झाले हें कसें सिद्ध होतें ? परशुरामशक चालू झाल्यास आज ३०८८ (+२३) इतकीं वर्षें झालीं असें कसें म्हणतां येईल ? ज्या सालीं परशुरामशक चालू झाला, त्याच सालीं कोंकणांत चित्पावन ब्राह्मण आले असें मानावयास जर कांहीं पुरावा असला तर राजवाडे यांचें अनुमान बरोबर आहे; एरवीं नाहीं. कलिवर्ष १९२७ त परशुरामशक चालू झाला एवढ्यावरून निश्चित अशी एकच गोष्ट सिद्ध होते, ती ही कीं, परशुरामशक कलिवर्ष १९२७ त सुरू झाला; व पराकाष्ठा कदाचित् असें सिद्ध होईल कीं, नंबुद्री ब्राह्मणांची वसाहत मलबारांत त्या काळीं झाली. कदाचित् म्हणण्याचें कारण हें कीं, नंबुद्री ब्राह्मणांनीं वसाहत केल्याबरोबर परशुरामशकही चालू केला असेल असेंही निश्चयानें म्हणवत नाहीं. पण तो तेव्हां सुरू झाला असावा हें म्हणणें युक्तीस धरून आहे हें मात्र खरें. तथापि हें सर्व परशुरामशकाचें लिहिणें कै. राजवाडे यांनीं चित्पावनांच्या वसाहतीचा काल सिद्ध करण्यासाठीं लिहिलें आहे. वरील विवेचनावरून पाहतां चित्पावनांच्या वसाहतीचा काळ परशुरामशकविषयक लिहिण्यानें मुळींच सिद्ध होत नाहीं. ती वसाहत याच्या आधीं झाली असेल, बरोबर झाली असेल, किंवा मागाहूनही झाली असेल. म्हणण्याचा मतलब असा कीं, मलबारांत परशुरामशक स्थापन होऊन ३०८८ (+२३) वर्षें लोटलीं असलीं तरी चित्पावनांच्या वस्तीला इतकींच वर्षें झालीं असतील हें म्हणणें टिकण्यासारखें नाहीं. पण चित्पावनांच्या वस्तीचा काळ ठरवितांना राजवाडे

यांनीं परशुरामाचा कालही या विधानांत ठरविला आहे, व आपल्या प्रस्तुतच्या कामाला त्याचाच फार उपयोग आहे. चित्पावनांची वस्ती प्रत्यक्ष परशुरामानें स्वहस्तें केली व ती वस्ती त्यानें २०८८ ( + २३ ) वर्षांपूर्वीं केली; या दोन विधानांतून प्रत्यक्ष परशुराम हा २०८८ ( + २३ ) वर्षांपूर्वीं विद्यमान होता असें अनुमान निघतें. परशुरामाचा काळ ठरविण्याच्या कामीं या त्यांच्या अनुमानाचा कांहीं उपयोग होतो काय हें पाहूं जातां तो होत नाहीं असें ध्यानांत येतें. २०८८ ( + २३ ) वर्षें तरी येतात कशीं ? तर परशुरामशकाचा काल निश्चित आहे म्हणून. पण यांत गृहीत गोष्ट अशी आहे कीं, परशुरामशक स्थापन होण्याच्या वेळीं खुद्द परशुराम विद्यमान होता. तसें ठाम असलें तर २०८८ ( + २३ ) वर्षांपूर्वीं परशुराम होता हें सिद्ध होईल. पण त्याचा शक चालू होण्याच्या वेळेस तो स्वतः विद्यमान होता असें म्हणावयास आधार पाहिजे, किंवा निदान परशुरामानें स्वतः नंबुद्रींची वसाहत केली व ह्याच वेळीं आपला शकही त्यांस घालून दिला असें म्हणावयास तरी जागा पाहिजे आहे. पण तसें कांहीं साहित्य असल्याचें राजवाडे यांनीं आपल्या लेखांत लिहिलेलें नाहीं. म्हणून २०८८ ( + २३ ) वर्षांपूर्वीं परशुराम विद्यमान होता हें राजवाड्यांचें सूचित अनुमान ग्राह्य होत नाहीं.

### चित्पावन-स्थापनेचा काळ—

हा मुद्दा संपल्यानंतर कालनिर्णयांत दुसऱ्याही एका बाबीचा उल्लेख करावयास हवा. राजवाडे यांनीं " परशुराम याला वैकल्पिक असलेलें " पर्शुराम " हें रूप ध्यानांत घेऊन त्यावर चालविलेली कल्पना फार मनोरंजक आहे. चित्पावन ब्राह्मणांची उपपत्ति

इत्यादीसंबंधीं लिहीत असतांना, परशुरामाविषयीं लिहिणें त्यांना प्राप्तच होतें. चित्पावन हे इराण, ईजिप्त, पॅलिस्ताइन येथून कोठून तरी आले, ही पंडितवृंदांत चालू असलेली कथा त्यांच्या मनाशीं घोळतच होती व 'परशु' याला 'पर्शु' असा विकल्पही वाङ्मयांत आहेच. त्या दोहोंची सांगड घालून 'पर्शू'चा संबंध त्यांनीं पर्शिया देशाशीं लाविला. ते म्हणतात—

"ह्या पुरुषाचें नांव दोन तऱ्हांनीं लिहिलेलें आढळतें. परशुराम व पर्शुराम. ह्याला भार्गवराम असेंही पुराणें म्हणतात. परशु म्हणजे फरश अथवा कुऱ्हाड ज्याचें हत्यार आहे तो परशुराम. परशुभक्तराम असा अर्थ परशुराम ह्या शब्दाचा करतात. पण, पर्शुराम ह्या शब्दाचा अर्थ काय ? पर्शु म्हणजे काय ? तर मला असें वाटतें कीं, पर्शु हें पुरातनकालीन एका आयुधजीविसंघाचें वाचक अभिधान आहे. 'पर्श्वादियौधेयादिभ्योऽणञौ' ( ५-२-११७ ) ह्या सूत्रांत परशूचा उल्लेख पाणिनीनें केला आहे. असुर लोकांच्या इतिहासांतही पर्सुअ ह्या नांवानें पर्शूचा उल्लेख आढळतो. हे पर्शु अर्वाचीन पारसीकांचे पूर्वज होत. तेव्हां परशुराम म्हणजे ह्या पर्शूच्या जनपदांतलि व लोकांतील जो राम तो होय, असें विधान करण्याकडे प्रवृत्ति होते. पर्शुरामाचें नांव भार्गव आहे. भृगूच्या कुलांत उत्पन्न जो झाला तो भार्गव. हे भृगु म्हणजे Phrytians ऊर्फ Brigans नांवाचे आशियामायनरमधील पुरातन लोक— ज्यांचा संबंध पुरातन ग्रीसमधील Thracian लोकांशीं होता असें म्हणतात—असावे. पर्शुराम पर्शुही होता, त्याअर्थी पर्शु व भृगु म्हणजे प्राचीन पारसीकांचे पूर्वज व ग्रीसमधील प्राचीन थ्रेशियन लोकांचे पूर्वज अन्योन्यसंबंधी असावे, असें म्हणावें लागतें. पर्शूमधील हा जो पर्शुराम त्यानें शालिवाहन शकाच्या पूर्वीं १२५२ वर्षांच्या

सुमारास चौदा चित्पावनांची स्थापना नाग-लोकांत ऊर्फ पाताळांत, ऊर्फ कोंकणांत, ऊर्फ अपारांतांत केली. पर्शुराम ज्या अर्थी पर्शु लोकांतील होता, त्या अर्थी त्यानें आपल्या जनपदांतील चौदा ब्राह्मण कोंकणांत आणून स्थापले असतील. कदाचित्, भारतवर्षांतील इतर प्रांतांतून त्याला प्रिय असे ब्राह्मण त्यानें आणिले असतील. दंतकथा म्हणते कीं, हे चौदा ब्राह्मण समुद्रांतून किनाऱ्याला अगदीं दमले भागलेले लागले. ह्या दंतकथेवर जर विश्वास ठेविला, तर पश्चिमेकडून पर्शूंच्या देशांतून, हे चौदा ब्राह्मण आले असण्याचा संभव उत्पन्न होतो. पुरातनकाळीं पर्शु, भृगु, वगैरे पश्चिमेकडील लोकांत चातुर्वर्ण्य होतें. त्या चातुर्वर्ण्यांतील चौदा ब्राह्मण पर्शूंच्या जनपदांतील पराक्रमी पर्शुरामानें कोंकणांत आणिले असावे. चित्पावन ब्राह्मण पश्चिमेकडील परदेशांतून आले असलेच तर ते पर्शूंच्या किंवा भृगूंच्या जनपदांतून आले असावे."

## पर्शुरामाची वंशवेल—

आपला प्रस्तुत मुद्दा चित्पावन कोठून आले हा नसून त्यांचा देव जो परशुराम तो कोणच्या युगमानांत होऊन गेला हें पाहणें हा आहे. अतिभारतांतील प्रदेशांत किंवा भारतांत जे शोध लागत आहेत त्यांवरून राजवाडे म्हणतात त्या पर्शुरामाचा काल ठरला तर, व त्याच पर्शरामानें चित्पावनांना कोंकणांत आणिलें असेंही ठरलें तर, खुद्द परशुराम व चित्पावन यांच्या कथांना ऐतिहासिक रूप प्राप्त होईल; पण हें ठरण्याचा कांहीं संभव आहे काय ? राजवाडे यांनीं हा निबंध लिहिल्यानंतर पुढें वॅडेल यांनीं आपलें पुराणवस्तुसंशोधनावरील पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यांनीं

पर्शुरामाची एक वंशवेल दिली आहे. वास्तविक ती सुमेरिअन राजांची म्हणून आहे. पण तिच्यांतील नांवें व प्रत्येक नांवांतील अक्षरें यांचें आपल्या परशुरामाच्या वंशवेलींतील नांवांशीं इतकें विलक्षण साम्य आहे कीं, फारसा विचार न करतां हें सादृश्य विचारांतून सोडतां येईल असें वाटत नाहीं. शब्दसादृश्यावरून पुष्कळ भ्रान्त कल्पना उत्पन्न होतात हें खरें, पण तसें घडतें म्हणून शब्दसादृश्याला ऐतिह्य वाङ्मयांत स्थान न देणें हें चूकच आहे. शब्दशास्त्री व इतिहाससंशोधक यांच्यांत जर वरील सादृश्या-विषयीं कांहीं गंभीर विचार करावयास हवा असें ठरलें तर, राजवाडे यांनीं चित्पावन हे बाहेरून आले ही दंतकथा व परशुरामाचा पर्शुराम हा विकल्प, यांवरून काढलेलें अनुमान फार प्रबल होतें असेंही ठरेल. ऐतिहासिक रीत्या या पारसीकांच्या पर्शुरामाचा काळ निश्चित झाला, तर आपल्या परशुरामाच्या कालाविषयीं निर्णय करण्यास उत्तमच साधन सांपडेल. पण शब्द-शास्त्रवेत्त्यांत व इतिहासपंडितांत वॅडेल यांच्या पुस्तकांतील विधाना-विषयीं एकवाक्यता होईल–किंवा निदान लवकर होईल–असें वाटत नाहीं. तसेंच राजवाडे यांचें परशुराम-कालविषयक अनु-मानही ग्राह्य वाटत नाहीं. कारण चित्पावनांची स्थापना जर त्यानें " श. पू. १२५२ च्या सुमारास " केली असली तर परशुराम हा आपलें अवतारक्रमांतलें कालविषयक स्थान सोडून अगदींच अलीकडे येऊन बसतो.

**अवतार-अनुक्रमांत परशुरामाची जागा—**

चित्पावन ब्राह्मण झाले काय किंवा मलबारपासून तों भडोच-पर्यंत जी एक समुद्राची पट्टी आहे तिच्यांत वसाहत केलेले कोणतेही

लोक झाले काय त्यांच्या वसाहतकालावरून परशुरामाचा काल ठरवितां येणें अगदीं अशक्य आहे असें वाटतें. ज्याला हे लोक आपला देव मानीत होते, तो एकच परशुराम होय हें खरें होतें व म्हणून वसाहत करतांना आपल्या देवाच्या कोणी कांहीं, कोणी कांहीं, अशा खुणा सर्वांनीं जवळ बाळगिल्या किंवा प्रत्यक्ष स्थापिल्या एवढेंच फार झालें तर म्हणतां येईल. संकेत-बोध प्रकरणांत परशुराम हा तीनही अवतारांना कसा पुरून उरला आहे याचें विवेचन आलेलें-च आहे. जन्मास आलेली एखादी व्यक्ति युगानुयुग जिवंत राहते हें खरें वाटत नाहीं; व म्हणून चिरंजीव ह्या शब्दाचा काय अर्थ बसवावयाचा याचेंही विवेचन तेथें केलें आहे. 'अश्वत्थामा बलिर्व्यासो' इत्यादि श्लोकांच्या शेवटीं या सातजणांना चिरंजीव हें नांव श्लोक रचणारानें दिलेलें आहे; पण त्या ठिकाणीं चिरंजीव या शब्दाचा अर्थ जगाच्या अंतापर्यंत जिवंत राहणारे असा जो धरतात तसा नसून "प्रत्येक ठिकाणीं आढळणारे, निरनिराळ्या युगांत सुद्धां भेट-णारे, ज्यांचे शेवट कसे झाले हें कोठेंच सांगितलेलें नाहीं असे" असा धरावयास हवा असें जें मागें म्हटलें आहे त्याचें स्मरण पुन्हा या ठिकाणीं करणें जरूर आहे. ही गोष्ट खरोखरच नीट उक-लतां येत नाहीं, कीं एकच परशुराम रामाच्याआधीं कित्येक शतकें विद्यमान असून पुन्हा कृष्णावतारींही भेटतोच हें काय आहे! यावर अशी एक कल्पना बसवितां येण्यासारखी असते; व ती चांगली सुयुक्तही आहे. वसिष्ठ हा रघुकुलाच्या अनेक पिढ्यांतील राजांचा उपाध्याय म्हणून पुन्हा पुन्हा भेटतो. यावरून अनुमान हें कीं, त्या उपाध्याय-कुलाचें आडनांव वसिष्ठ हें असावें. तसेंच कोणी व्यासा-संबंधानेंही अनुमान करतात. इतस्ततः पसरलेल्या प्रार्थना, कथा इत्यादि एकत्र आणून त्यांना सुसंघटित अशा ग्रंथांचें गौरव प्राप्त

करून देण्याचें काम ज्या ज्या लोकांनीं केलें ते ते सर्व व्यासच होत. पण हे वसिष्ठ किंवा हे व्यास कित्येक शतकांच्या अंतरानें झाले असतील व मेले असतील असें जरी आहे तरी वसिष्ठ म्हटला म्हणजे एक आणि व्यास म्हटला म्हणजे एक ही कल्पना रूढ होऊन गेली. तसेंच परशुराम या नांवानें माहीत होणारी जरी पुरुष-परंपरा असली तरी पुढें परशुराम म्हणजे एकच असा समज रूढ झाला असावा. पण याला एक अडचण आहे. ही अडचण वसिष्ठ-व्यास इत्यादिकांच्या बाबतींत उभी राहत नाहीं. परशुरामाच्या बाबतींत मात्र ती उभी राहते. निरनिराळ्या युगमानांत सुद्धां ज्या ज्या ठिकाणीं परशुरामाचा उल्लेख आला आहे त्या त्या ठिकाणीं तो परशु-राम, जमदग्नि व रेणुका यांचा मुलगा व भार्गव अशा विशेषणांनीं अंकित झालेलाच भेटतो. म्हणून तर राजवाडे यांनीं आपल्या लेखांत परशुराम हा "मातृपितृसंबंधानें एकच व्यक्ति होती" असें म्हटलें आहे. पण ही अडचण उभी राहिली तरी तिनें 'परशुराम नांवाची पुरुष-परंपरा मानावी' या विधानांतलि युक्तता लुप्त होत नाहीं. या अडचणीचा परिहार कसा करावयाचा येवढेंच काय तें शिल्लक उरतें. आतां ही परशुराम-परंपरा मानिली तरी तिच्यांतील आद्य परशुराम जो तो केव्हां झाला हा प्रश्न आहे. कृष्णावतारीं भेटणारा परशुराम हा जर अवतारी परशुराम म्हणून एकदां कायम केला तर कृष्णावताराचा जो काल तो त्याचा धरावयास हवा. हा काल परशुरामाचा असें जर कायम केलें तर मग दाशरथी रामाशीं युद्ध खेळलेला भार्गव कोण? आणि त्याच्याही मागें पांचशें वर्षें क्षत्रियांचा संहार करणारा जो भार्गवराम तो कोण? हे सगळे राम कोठून आले? अशा अडचणींत आपण सांपडतों. म्हणून याच्याऐवजीं उरफाटा

अनुक्रम जर आपण कायम केला तर कांहीं एक विशेष संगति लागते. अवतारांच्या अनुक्रमांत परशुराम जेथें व ज्या कालीं आहे तेथेंच व त्याच कालांत त्यास ठेवावें. ही त्याची जागा एकदां कायम केल्यानंतर, मग राम व कृष्ण यांच्या अवतारांत भेटणारे परशुराम कोण असा प्रश्न खुशाल विचारावा व त्याचें उत्तर " परशुराम चिरंजीव आहे म्हणजे तो पुन्हा कसा येतो हें आम्हांस कळत नाहीं " असें द्यावें; किंवा म्हणावें कीं, " भृगुकुल हें थेट कृष्णावतारापर्यंत व पुढेंही संततिरूपानें किंवा शिष्यपरंपरेनें कायम राहिलेलें होतें व इतर सर्व समाजानें जरी क्षत्रियवधाची कल्पना सोडून दिलेली होती, तरी मधून मधून उत्पन्न होणाऱ्या व परशुराम हें नांव धारण करणाऱ्या त्यांतील पुरुषांना ही क्षत्रियवधाची हुक्की पुन्हा पुन्हा येई. हे जे कोणी पुढले पुढले परशुराम ते आपल्याला रामावतारांत व कृष्णावतारांत भेटतात." हा विचार कायम करण्याचें कारण असें कीं, कृष्णावतारांत परशुराम भेटतो म्हणून कृष्णावताराचा जो काळ तो परशुरामाचा काळ असें म्हणण्याची आपत्ति आपल्यावर येते, ती चुकावी. आपणांस तर हें माहीत आहे कीं, दाशरथी राम हा कृष्णाच्या आधीं, भार्गवराम हा दाशरथी रामाच्या आधीं होऊन गेला; म्हणून या तिघांत कालदृष्ट्या सर्वांत आधींचें जें परशुरामाचें स्थान तें त्याजकडे कायम करून मगच पुढील बाबींचा विचार करावयास हवा. परशुरामाचा काळ ठरविणें हें जें आपलें प्रस्तुतचें काम तें सिद्ध होण्यासाठीं या चर्चेची जरूर होती. आतां कृष्ण व राम यांचे काल कोणते हें मागें पाहिलेंच आहे. पैकीं रामाच्या मागें निदान पांच शतकें परशुरामाचा काल असावा हेंही इतर अनुमानांवरून व विशेषत: चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या मूळ स्वरूपाच्या अवलोकनावरून मागें ठरविलेंच आहे. आतां

राम व कृष्ण यांच्या दरम्यान एक हजार वर्षें धरावींत काय हा एक प्रश्न आहे. पण अवतार-कल्पना लक्षांत घेतां आणि राम व कृष्ण यांच्या कालांतलि समाजाचीं रूपें लक्षांत घेतां व विशेषत: रामकालांतील व कृष्णकालांतील आर्यांच्या वसाहतीचे संकोच-विस्तार लक्षांत घेतां, तो इतका धरावयास हरकत नाहीं. म्हणून परशुरामाचा काल सुमारें साडेसहा-सात हजार वर्षें इतका धराबयास कांहींच हरकत नाहीं. अवतारांच्या अनुक्रमांत कांहीं अदलाबदल करणें हें अगदींच चूक आहे. त्या त्या पंडितांच्या मतें कृष्ण आणि दाशरथी राम यांचे जे काल असतलि त्या त्या कालाच्या अलीकडे त्या त्या पंडितांस अवतारी परशुराम या पुरुषास ओढतांच यावयाचें नाहीं. जर त्यांनीं तसें केलें, तर रामायण व भारतीय कथा या सर्वांचा एकच गोंधळ उडून जाईल. कृष्णावतार केव्हां झाला याविषयीं निरनिराळीं मतें आहेत; व त्यांस अनुसरून मागल्या मागल्या अवतारांचे काळ मागचे मागचे येतलि. मी स्वत: भारताचार्य श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं दिलेला कृष्णावताराचा काळ प्रमाण मानतों व तो जर शकपूर्व सुमारें साडेतीन हजार वर्षें आहे तर रामावतार त्याच्यामागें हजार पांचशें वर्षें व परशुराम-अवतार त्याच्यामागें पांचशें वर्षें आहे असें अनुमान करतों. म्हणून सर्व पंडितांच्या मतांचा आदर करूनसुद्धां असें म्हणावेंसें वाटतें कीं, परशुराम हा सुमारें साडेसहा-सात हजार वर्षांपूर्वी झाला असावा.

**वसाहती मूळ परशुरामानें केल्या नाहींत—**

आतां हें कालविषयक अनुमान बरोबर आहे असें मानिलें म्हणजे रामचरित्र व कृष्णचरित्र यांतील परशुराम कोणते हा प्रश्न ओघानेंच

येतो व ते या भृगुकालांतीलच पुढले पुढले परशुराम नांवाचे पुरुष असावेत असें मानण्याशिवाय गत्यंतरच उरत नाहीं. याही परशुरामांच्या आईबापांचीं नांवें रेणुका व जमदग्नि नेमकीं कशीं आलीं हें सांगतां येत नाहीं; कदाचित् आणखी एखादा वाङ्मयसंकेत असेल व तो आपल्या ध्यानांत अजून येत नसेल. या अवतारांविषयींच बोलत असतांना आणखी एका गोष्टीचा उल्लेख व्हावयास हवा. कारण परशुरामाच्या कालनिर्णयाच्या बाबतींत त्याचाही संबंध येतो. नंबुद्री ब्राह्मण किंवा चित्पावन ब्राह्मण हे परशुरामास जरी आपलें दैवत मानत असले तरी त्यांच्या वसाहती प्रत्यक्ष परशुरामानें केल्या असें म्हणणें बरोबर नाहीं. श्री. चिंतामणराव वैद्य हे महाभारताच्या उपसंहारांत म्हणतात, " या ठिकाणीं एक महत्त्वाची गोष्ट सांगण्यासारखी आहे कीं, परशुरामाचें क्षेत्र व परशुरामाकरितां समुद्रानें दिलेली जागा हल्लीं शूर्पारक ही न मानतां दक्षिणेस कोंकणांत चिपळूण येथें व चिपळूणच्या भोंवतालीं मानली जाते........पण महाभारतांत शूर्पारक भूमीला परशुरामक्षेत्र मानिलें आहे. याशिवाय अपरान्त देशाची गणना भारतखंडाच्या देशांत केलेली आहे, आणि कोंकण हें नांव दक्षिणेकडील देशांच्या यादींत दिलेलें आहे. यावरून असें अनुमान निघतें कीं, महाभारतकाळीं कोंकणामध्यें आर्यांची वस्ती झालेली नव्हती. उत्तरेकडून शूर्पारक देशांतून दक्षिणेकडे कोंकणांत आर्यांची वस्ती गेली त्या वेळीं आर्यांनीं परशुरामाचें शूर्पारक तेथून हलवून दक्षिण कोंकणांत नेलें. यामुळें हल्लीं शूर्पारक येथें परशुरामाचें क्षेत्र राहिलें नाहीं. हल्लींचें सोपारा हें क्षेत्र असून तें वसईजवळ आहे. म्हणजे वसईकडून चिपळुणाकडे इ. स. पूर्वी ३०० च्या नंतर ब्राह्मणांची वस्ती गेली." श्री. वैद्य यांच्या मताप्रमाणें आर्यांची वस्ती कोंकणांतच जर सनपूर्व ३०० नंतर गेली तर त्याच्याही खालीं

हिंदुस्थानाच्या अगदीं तळवटांत म्हणजे मलबार इत्यादिकांत आर्यांची वस्ती पुष्कळच पुढें झाली असली पाहिजे असें दिसतें. पण या मलबारांतील ब्राह्मणांच्या वस्तीचा कालनिर्णय हा एक स्वतंत्र वादाचा मुद्दा म्हणून सोडून दिला तरी, "सनपूर्व ३०० नंतर आर्यांनीं आपली वस्ती दक्षिण कोंकणांत नेली" या त्यांच्या विधानाबरोबर "ही वस्ती परशुरामानेंच स्वतः करविली" हें पौराणिक विधान वाचलें म्हणजे परशुराम हा आपल्या अगदींच नजीक आल्यासारखें वाटतें ! म्हणून वर म्हटलें आहे कीं, परशु-रामाला दैवत मानणाऱ्या त्या त्या ब्राह्मणांनीं आपापल्या वसाहती परशुरामाच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं नव्हे, तर आपणच केल्या व करतांना आपल्या परशुराम-दैवताचे शक चालू केले किंवा त्याची दैवत म्हणून स्थापना केली असें मानावयास हवे. असो. वरील सर्व विवेचनावरून आद्य परशुराम हा सुमारें सात हजार वर्षें इतक्या प्राचीन काळीं झाला असें दिसून येईल.

---

## प्रकरण चवथें

# परशुरामाचें अवतारकृत्य
# व
# त्याच्या पीठिकेचें रूपांतर

**भ्रमंती—**

'परशुरामानें क्षत्रियवध केला' व आतांच पाहिल्याप्रमाणें 'परशुराम हा सुमारें सात हजार वर्षांपूर्वी होऊन गेला' हीं दोन विधानें एकत्र केलीं म्हणजे क्षत्रिय-वधाचें काम परशुरामानें कां केलें असावें याची अंधुक कल्पना मनापुढें येऊं लागते. मानवी समाजाचें इतिहासपूर्व काळांतलि स्फुट रूप जों जों जास्त ध्यानांत भरेल तों तों त्या वेळच्या त्याच्या मनाच्या चलनवलनाविषयींची आपली चिकित्साही स्पष्ट होत जाईल. विस्तीर्ण व सुव्यवस्थित समाज, कीं जसे आपण सध्यां पृथ्वीवर पहातों, तसे इतक्या भूत-काळीं नव्हतेच असें म्हणावयास हरकत नाहीं. माणसें लहान लहान गट करून तुटकतुटकपणानें राहत असत. या स्फुट रूपा-मुळें कांहीं एक प्रकारचा कोंझेपणा व भीतिग्रस्तपणामुळें कांहीं एक प्रकारची संघटना हीं अशा गटांना प्राप्त झालेलीं असत. निर्वाहाच्या साधनांची अशाश्वती असल्यामुळें स्थलांतर हें ओघानेंच येई. आणि हे गट किंवा या जमाती मोठमोठाल्या

स्थलांतरें करीत. निर्वाह कोणत्या साधनांनीं करावा याचा प्राथमिक शोधही नीटसा लागलेला नसल्यामुळें मानवी जीविताला स्थिरपणा आलेला नव्हता. अर्थात् सहज हाताला लागणारीं साधनें शोधीत फिरणें हेंच जीवितांतील मुख्य काम असल्यामुळें या जमातींच्या हालचाली जोरानें चालत व मनगटाचें सामर्थ्य जिच्या अंगीं जास्त ती इतर जमातींना शह देई. असा प्रकार किती काळपर्यंत चालला होता याचें यथातथ्य विवेचन करणें कठीण आहे. पण या हालचालींची साधारण कल्पना आपल्याला इतिहासपूर्व काळांतील कांहीं अनिश्चित नोंदींवरूनही थोडीबहुत येते. सुमेरिअन लोक, सिथिअन लोक, द्रविड लोक, सेमेटिक जमाती, चिनी जमाती, आर्य लोक, मेदवंशीय, पार्थियन वंशीय, ज्यू लोक, फिनीशियन लोक, डोरिअन, मंगोलिअन, सिरिअन, गॉल लोक असे अनेक प्रकारचे मानववंश अथवा वंशखंड पृथ्वीवर इतस्ततः फिरत होते आणि सध्यां जे लोक एकाद्या देशाला आपला देश म्हणतात व त्या देशासंबंधींचा अभिमान बाळगतात त्या देशांत पूर्वी ते एकदां आगंतुकच होते. भूमींतून थोड्या श्रमाश्रमानें व थोड्या कसबानें अन्न निघतें हा प्राथमिक शोध लावावयास माणसांनीं फारच वेळ खाल्ला. शोध लागेपर्यंत अन्नाच्या शोधार्थ भ्रमंती केली. तो लागल्यावर जास्त व निश्चितपणें अन्न देणारी भूमि कोणाच्या स्वाधीन राहावयाची याचा निकाल करून घेण्याचें काम सुरू झालें व म्हणूनही ही भ्रमंती चालूच राहिली. पुढें हेंही ठरल्यामुळें, त्या त्या गटाच्या पिंड-प्रकृतीला जर एकादें हवामान मानवेनासें झालें तर पुन्हा स्थलांतर करणें आवश्यक बनून राही. अशा प्रकारें आपापल्या जागा स्थिर करावयास या जमातींना आपल्या

जीविताची कित्येक शतकें खर्ची घालावीं लागलीं यांत कांहींच संशय नाहीं. अशा या कलहयुगांत समाज नव्हते, जमाती होत्या; वसती नव्हती, तळ किंवा मुक्काम होते; शेजाऱ्यांशीं स्नेहाकर्षण नव्हतें, अविश्वास होता; भूमिलोभ नव्हता; उपरेपणा होता; पृथ्वी सस्यवती म्हणजे धान्य देणारी झालेली नव्हती, माणसांची नजर सहजप्राप्य खाद्यांवर होती; स्त्री सहधर्मचारिणी नव्हती, भ्रमंतींतील अनुगामिनी होती; स्त्री-पुरुषभाव संभावित झालेले नव्हते; मत्सराची गुरगुर आणि प्रेमाचें लाव्हसटपण शिल्लकच होतें; आपली जमात म्हणजेच काय तें सर्वस्व ही कल्पना जारी होती; सनातन न्यायावर आधारलेली समाजरचना नव्हती; क्षुधा व भोग या दोनच वासनांनीं मनें भरून गेलेलीं होतीं; कला, सौंदर्य व हुन्नर यांची तोंडओळखही झालेली नव्हती; मात्र बैठ्या अल्पसंख्य गटांना जरी कुग्रामपणा प्राप्त झालेला असे तरी स्थलांतरें करणारांच्या जीवितांना प्रवाहीपणा आलेला होता. क्षुधा व भोग हें जीविताला अंकित करून टाकणारे प्रबल विकार, पुढें कित्येक शतकांनीं उत्पन्न झालेल्या उदात्त व सौम्य विचारांस पारखेच असल्यामुळें दुर्धर होते व त्यांच्या उपशमांत होणाऱ्या अन्यायांना अन्याय हें रूपही कित्येक ठिकाणीं आलेलें नसे. असें समजावयाचें नाहीं कीं आतांच सांगितलेले प्रकार व जमातींची मनःप्रकृति ही सर्व पृथ्वीभर एका वेळीं, एकाच प्रकारची असेल. हें स्थूल असें युगमान-लक्षण आहे. याच्या निरनिराळ्या अवस्थांत व स्तबकांत निरनिराळे वंशखंड एकाच वेळीं असूं शकतील. इतक्या जुन्या काळीं ज्या स्थलांतरांच्या प्रचंड उलाढाली झाल्या त्यांपैकीं प्रत्येकीच्या वेळीं अमुक एक जमात कोणत्या वासनेनें

ग्रस्त होती हें ठरविणें सोपें नाहीं. पण त्यांच्या कृत्यांवरून त्यांच्या मनोव्यापारांचें अनुमान बांधणें फारसें कठिण नाहीं.

**वर्णकल्पना—**

अशा प्रकारच्या मोठमोठाल्या जमाती कॅस्पियन समुद्राच्या आसपासच्या मुलखांतून, कदाचित् आलताई पर्वताच्या पलीकडून किंवा मध्यआशियाच्या विस्तीर्ण पठारावरून पश्चिमेकडे व दक्षिणेकडे भराभर पसरत असत, अशी माहिती आपल्याला भूगोलवेत्ते आजवर सांगत आलेलेच आहेत. सूर्याच्या तेजाचे जे निरनिराळे संस्कार त्या त्या भूपृष्ठावर होतात त्यास अनुसरून या जमाती बाहेर पडत असत हेंही आपणांस माहीत झालेलें आहे. याच्या जोडीला शोधकांचा आणखी एक शोध आपण ध्यानांत ठेवावयास हवा. तो शोध हा कीं, ज्या प्रकारची चातुर्वर्ण्य कल्पना पुढें हिंदुस्तानांत सिद्ध झाली त्या प्रकारची कल्पना कॅस्पियन समुद्राच्या दक्षिणेकडील विस्तीर्ण भूपृष्ठावर होती. चातुर्वर्ण्य कल्पना होती हें अक्षरशः खरें नसलें तरी वर्णकल्पना होती हें खरें असलें पाहिजे; कारण वर सांगितलेले वंशखंड हे निरनिराळ्या वर्णांचे असून जागतिक भ्रमन्तींत सांपडलेले असल्यामुळें या भूपृष्ठांत ते शेजारधर्मांत आलेले असणें व म्हणून त्यांच्यांत परस्पर सान्निध्यामुळें वर्णकल्पना जागृत व व्यक्त झालेली असणें हें अगदीं स्वाभाविक होतें. आपल्याला चातुर्वर्ण्य म्हटल्याबरोबर जातिविषयक बोध झाला तरी कांहीं एक आर्थिक कल्पनेचाही म्हणजे त्या त्या वर्णाच्या सामाजिक कर्तव्याचाही बोध होतो. तसा बोध वरील ठिकाणच्या वर्णकल्पनेमुळें होई असें संशोधकांचेंही ठाशीव म्हणणें नाहीं. इतकेंच कीं, तेथें निरनिराळे वर्ण होते, एवढें त्यांना

सांगावयाचें असतें. याच जमातींपैकीं ब्राह्मण व क्षत्रिय हीं नांवें धारण करणाऱ्या पण वर्णभेदाची जाणीव असलेल्या दोन जमाती या भ्रमंतींत इकडे आलेल्या असतील. प्रस्तुत विषयांत वैश्यांचा विचार कर्तव्य नाहीं. म्हणून त्यांचा उल्लेख केलेला नाहीं. पण ती जमातही अशीच आलेली असावी. त्यांची परस्परांना कदाचित् आधींही माहीत असेल पण ती वर सांगितलेल्या प्रकारची असेल. उभयतांनीं मिळून एक समाज बनविलेला होता असें मात्र नव्हे.

## परशुरामकृत्याची बीजभूमि—

वास्तविक पहातां वर सांगितलेल्या माहितींत नवें असें कांहींच नाहीं. प्रारंभींची माहिती तर कोठेंही सांपडते व वरील परिच्छेदांतील माहिती साधारणपणें बऱ्या प्रकारचें वाचन झालेल्या वाचकालाही असते. पण ती येथें उद्धृत करण्याचें प्रयोजन ती माहिती सांगणें हें नसून परशुरामाच्या अवतारकृत्याला तिच्यांतून पार्श्वभूमि कशी उत्पन्न होते हें पहाणें हें होय. परशुराम हा सात हजार वर्षांपूर्वी झाला, इतक्या जुन्या काळीं मनुष्ययोनि जमातरूपानें असूयाग्रस्त व भ्रमणशील अशी असे, व अशा प्रकारच्या जमाती या भ्रमणांत सप्तसिंधूंच्या देशांत आल्या या माहितीच्या सामुदायिक विचारांतून परशुराम कथेला युक्त अशी पार्श्वभूमि अथवा खरें म्हटलें म्हणजे बीजभूमि उत्पन्न होते. एकाच प्रकारचे लोक सप्तसिंधूंच्या प्रदेशांत आले व मग त्यांनीं आपली वांटणी कर्तव्यांच्या मुद्द्यावर केली व त्या लोकविभागणीला वर्ण-व्यवस्था म्हणूं लागले अशी भूमिका ज्यांनीं कायमची पत्करलेली आहे त्यांना परशुरामकथेची ही उत्तरोत्तर स्पष्ट होत जाणारी बीजभूमि

मान्य होण्यासारखी नाहीं. मानववंशाच्या किंवा वंशखंडांच्या भ्रमंतीची वरील ऐतिहासिक उपपत्ति ज्यांना मान्य आहे, अतिभारतीय भूपृष्ठावर अशा जमाती रहात असत व तेथेंही वर्ण-कल्पना असे इत्यादि ऐतिहासिक प्रमेयें जे मान्य करतात त्यांना हें बीजभूमित्व मान्य करावयास अडचण पडणार नाहीं. ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांत लग्नें होत असत असें दहापांच उदाहरणां-वरून दिसून येतांच या दोनही जमाती एकच होत्या असें दाखविण्याचा यत्न सुरू होतो. हा यत्न करणारांचा हेतु देशहितमूळ असतो यांत कसलीही शंका नाहीं. पण तें विधान अनैतिहासिक आहे. कारण उदाहरणांची संख्या अत्यंत क्षुद्र असून शिवाय त्या त्या विवाहाचा उल्लेख करतांना "अमुक ब्राह्मणानें अमुक क्षत्रियाची मुलगी केली, किंवा अमुक क्षत्रियानें अमुक ब्राह्मणाची मुलगी केली" असें म्हटलेलें असतें. याचा अर्थ जमाती निरनिराळ्या होत्या असा मात्र आपोआप होतो. अशीं लग्नें अधूनमधून होत असतीलही व समाजाची त्याला हरकतही नसेल पण प्रस्तुतच्या मुद्यासंबंधानें लिहितांना एवढें स्पष्टच ठरतें कीं, 'ब्राह्मण क्षत्रियांचा विवाह झाला' असें म्हटलें म्हणजे हे दोन स्वतंत्र लोक होते इतकें त्यांतून निष्पन्न होतेंच. असे हे दोन वर्णांचे लोक एकाच प्रदेशांत राहूं लागल्यानंतर व त्यांच्या वसाहतींना कायमचें रूप येऊं लागल्यावर त्यांचें भटकेपण कमी होत गेलें असलें पाहिजे हें उघड आहे. पण सप्तसिंधूंनीं त्यांना खावयास पुरेसें दिल्यामुळें जरी हा एक प्रकारचा फरक त्यांच्या जीवनांत पडला तरी जमातरूप लोकांच्या मनांतील दुसरें एक वैगुण्य इतक्या जलदीनें त्यांच्यांतून गेलें असेल असें नाहीं. तें वैगुण्य म्हणजे अपहरणबुद्धि हें होय.

अपहरणबुद्धि—

सध्यां सुद्धां जे लोक अजून जमातरूपानें नांदतात त्यांच्यांत हें वैगुण्य उत्कट असतें. दुसऱ्याचीं माणसें हस्तगत करून तीं आपल्या समाजांत व जीवितांत दामटून टाकणें व तीं कायमचीं आपलींशीं करणें ही प्रवृत्ति जमातींच्या अंगीं निःसंशय असते. अशा जमातींना सरकार शिक्षाही करतें. त्यांच्या सामाजिक जीवनाचें परीक्षण केलें तर असें दिसून येईल कीं स्थिर समाजाला जे दंडक व ज्या न्यायपद्धति लागू असतात ते दंडक व त्या न्यायपद्धति या लोकांना लागू करणें बरोबर नाहीं. आपण दुसऱ्याचीं माणसें बेलाशक उचलतों व शेवटीं आपलींशीं करतों यांत आपल्या हातून कांहीं विशेष चुकतें अशी सुद्धां त्यांना कल्पना नसते. पण ज्यांच्यांतून हें अपहरण म्हणजे किड्नॅपिंग होतें त्यांना संताप येणें अगदीं स्वाभाविक असते व एकंदर मनुष्ययोनीचा मगदूर सामाजिक रीत्या इतका वाढलेला आहे कीं, असें अपकृत्य जर कोणी लोकांनीं केलें तर त्याचें विकसन कोठपर्यंत आलें आहे हें पाहून तदनुरोधानेंच न्याय करण्याच्या भोळेपणास आपण प्रवृत्त होत नाहीं; तर सरसकट समाज या अपहरणबुद्धीच्या पुष्कळच पुढें गेलेला आहे, व संस्कृत झाला आहे हें ओळखून अपहारकांना आपण शिक्षा करतों व करवितों. पण माणसांचें सामाजिक मनच जर जमातरूपाच्या पुढें फारसें सरकलेलें नसलें तर अशा कृत्यांचा अगोचरपणा अधिकच ठळक होत असला पाहिजे व ज्यांचें नुकसान होत असेल ते सूडालाही प्रवृत्त होत असले पाहिजेत. ब्राह्मण-क्षत्रियांचें जमातरूप वर वर्णिलें आहे, त्याहीपेक्षां कल्पनेनें जास्त चांगलें ध्यानांत येण्यासारखें आहे. तें

जर पटलें तर त्यांतल्यात्यांत जे प्रबळ असतील, अधिकसंख्य असतील, व कमी संस्कृत असतील ते आपली अपहरणबुद्धि स्वेतरांवर चालवीत असतील हेंही पटण्यासारखें आहे. ब्राह्मणक्षत्रियांच्या अदावतीचा आरंभ या परिस्थितिविशेषांतून झाला असावा असें वाटतें. यांत विषाद वाटण्यासारखें कांहीं नाहीं. आज आपल्या समाजाचीं, चालीरीतींचीं, व आहारविहाराचीं जीं सोज्वळ व संभावित रूपें आहेत तींच हजारों वर्षांपूर्वींपासून आहेत असें मानणें अगदीं चूक आहे. आपण सर्वजण पूर्वीं एकदां रानटी होतों हा समाजविकसनांतील सिद्धान्त मान्य करावयास कांहींच हरकत पडू नये आणि सात हजार वर्षांपूर्वीं जी कांहीं आपली वाढ झालेली होती तिच्यावरून जर त्या कालमानास उचित असें एकादें अनुमान निघालें तर त्यांत बुजण्यासारखें कांहींच नाहीं.

## धेनुहरण हें अपुरें कारण—

परशुरामानें केलेल्या क्षत्रियवधाचें जें कारण पुराणग्रंथांत दिलेलें आहे तें येवढ्या उत्पातपरंपरेला अपुरें आहे असें वाटतें. कार्तवीर्यानें केवळ गाय चोरावी किंवा गायीचें वांसरू चोरावें आणि यावरून दोन वर्णांचें प्राणान्तक युद्ध उद्भवावें हें चमत्कारिक दिसतें. असंभाव्यता किती निरनिराळ्या तऱ्हांनीं दृग्गोचर होतें तें पहा. कार्तवीर्य परम समर्थ राजा; त्याला चोऱ्या न करतां, वाटेल तशा गायी संपादन करतां येण्यासारख्या नव्हत्या असें कसें मानावें? बरें, जी गाय राजालाही असाध्य ती भृगूसारख्या एकाद्या तापश्याला कशी लाभलेली असणार? ज्या साधनांनीं ती भृगूला मिळाली होती त्याच साधनांनीं ती समर्थ राजाला मिळण्यासारखी नव्हती असें कसें म्हणावें? कार्त-

वीर्यानें एकट्यानें अशी आगळिक केली तर परशुरामानें सर्वच क्षत्रियांवर कुऱ्हाड उगारावी हेंही संगतिहीन वाटतें. कार्तवीर्याचीं मुलें बापाचा सूड उगविण्यासाठीं आलीं व परशुरामानें त्यांचाही नाश केला, येथपर्यंत ठीक आहे. पण सर्वच क्षत्रियांवर राग कां ? केवळ गायीची बाब क्षुल्लक दिसते. शिवाय परशुरामाच्या व क्षत्रियांच्या भांडणांत एक प्रकारचा आकस दिसतो. आणि म्हणून नुसत्या गायीच्या चोरींतून तें भांडण उद्भवलेलें नसावें असें वाटतें. केवळ गायीच्या चोरीचीच बाब असती तर भृगूनेंच स्वतः आपल्या वृत्तीस अनुसरून तिकडे कानाडोळा केला असता व आपल्या क्षमाशीलत्वानेंच तें प्रकरण जिरविलें असतें. वसिष्ठाची गाय चोरल्याचीही कथा आहेच. वसिष्ठ म्हणजे केवळ शांतिब्रह्म पण त्याचीही शांति ढळेल अशीच आगळिक कार्तवीर्यानें केली असावी. म्हणून असें अनुमान होतें कीं, या तापस्यांच्या आश्रमांतून ज्या वस्तु क्षत्रियांनीं उचलल्या त्या केवळ गाई नसून मुख्यतः स्त्रिया होत्या.

## अवतारकृत्याचा बोज—

परशुरामाच्या कृत्याला अवतारकृत्याचा बोज उत्पन्न झाला ही बाब फारच सूचक आहे. हिंदु लोकांचे अवतार व त्यांचीं कृत्यें यांना प्रत्यक्ष परमेश्वर व त्याची लीला असें लोकांनीं वाटल्यास मानावें, पण भरतभूमींत मानव्याची जी उत्क्रांति झाली तिच्यांतील अत्यंत भव्य युगमानें त्या त्या अवतारांवरून व त्यांच्या कृत्यांवरून दिसून येतात असेंच चिकित्सकांना वाटेल. आपल्या कृत्यामुळें एकादा महापुरुष युगंधर होतो असें दिसलें म्हणजेच त्या पुरुषाला अवतारपद प्राप्त होतें. ज्यांनीं कोणी पूर्वीच्या काळीं

हें 'पद' अर्पिण्याचे न्याय ठरविले असतील ते अत्यंत रसिक व त्याहूनही अधिक म्हणजे, अत्यंत विवेचक बुद्धीचे असले पाहिजेत. युगंधरपणा हा त्या युगांतील एकाद्या केवळ आचाट कृत्यामुळें प्राप्त होत नव्हता; तर तें कृत्य त्या त्या युगमानांतील सर्वव्यापी विचाराचें निर्णयदर्शक असें असावयास हवें असाही त्या बुद्धिमंतांचा भाव होता असें दिसतें. एक स्वतंत्र कालखंड त्या विचाराच्या, ऊर्मींच्या, किंवा असूया-व्यापाराच्या व्यापांत सामावलेला दिसतो व या भावनाविचारादींचें स्फुरण ज्याच्यांत उत्कटत्वानें झालें तो महापुरुष अथवा अवतारी पुरुष ठरतो. अवतारांचें सूक्ष्म अवलोकन केलें तर या विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे. अवतारमालिकेंत परशुरामाची गणना झालेली आहे हें अत्यंत सूचक आहें असें जें वर म्हटलें आहे त्याचा अर्थ हाच कीं परशुरामानें केवळ एकादें अघटित आचरलें म्हणून त्यास अवतार बनविलें असें नाहीं तर त्याच्या कृत्यांत कांहीं एका विचारश्रेणीला गांठ बसली किंवा त्याचें कृत्य निर्णयदर्शक दिसलें म्हणून त्यास अवतार बनविलें. एकाद्यानें केवळ गाय चोरावी व भारतवर्षांत म्हणजे निदान नर्मदेच्या उत्तरेस सर्व मुलूखभर रणकंदन माजावें हें कार्यकारण-भावाला जुळून दिसत नाहीं. कारणाला कार्य पेलत नाहीं. म्हणून कार्याच्या विशालत्वाला युक्त असें एकादें व्यापक कारण असावयास हवें. तें गाय चोरल्यानें सिद्ध होत नाहीं. स्त्रिया चोरल्यानें मात्र होतें.

**वैदिक आधार—**

ही सामाजिक युक्तिपरंपरा दिसते त्याहून अधिक बलिष्ठ व म्हणून स्वीकार्य आहे. या युक्तिपरंपेरला खुद्द वैदिक आधार आहे. क्षत्रिय हे आपलें जमातरूप ध्यानांत ठेवून ब्राह्मणजमातीशीं वागत

होते हें त्या आधारावरून उत्तम सिद्ध होतें. ब्राह्मणांचा सर्व तऱ्हेचा छळ त्यांच्या हातून झालेला होता हें अथर्ववेदाच्या पांचव्या कांडांतील चवथ्या अध्यायाच्या १७, १८, १९ या सूक्तांवरून फार चांगलें ध्यानांत भरतें. १७ व्या सूक्तांत स्त्रीहरणासंबंधाचा, म्हणजे स्त्रीहरण केल्यामुळें त्याचें काय विपरीत परिणाम झाले याचा, स्वच्छ उल्लेख केला आहे व १८, १९ या सूक्तांत धेनु-हरणामुळें व इतरही प्रकारांनीं ब्राह्मणजमातीचा छळ केल्यानें काय परिणाम झाले हें सांगितलें आहे. या सूक्तांतील वर्णन इतिहासरूप आहे; वाटतें तसें केवळ शापरूप किंवा इशारतरूप नाहीं हें ध्यानांत घ्यावयास हवें. पण तीं सूक्तें देण्याच्या आधीं परशुरामकथेसंबंधानें लिहिणाऱ्या एका गृहस्थाच्या लिखाणाचें अवलोकन केलं पाहिजे. पंडित शामशास्त्री यांनीं जातिसंस्थेवर एक निबंध लिहिला आहे. त्यांत क्षत्रिय कुळाच्या उत्पत्तीविषयीं, विशेषतः मलबारांतील क्षत्रियांविषयीं कांहीं उपपत्ति त्यांनीं बसविली आहे. तिचा विचार करतांना त्यांनीं या परशुराम-प्रकरणाविषयीं पुष्कळच लिहिलें आहे. त्यांच्या मतें राजांनीं ब्राह्मणांच्या गायी चोराव्या व एवढी प्रचंड अदावत त्यावर माजावी हें चमत्कारिक दिसतें. म्हणून या चोराचोरीच्या प्रकरणांतून वैदिक वाङ्मयांत जे गोवाचक शब्द आलेले आहेत ते सदरहू पंडित रूढार्थानें पतकरीत नाहींत. ब्रह्मगवी, पृश्नी, वशा, पृथ्वी, गो, कामधेनु इत्यादि शब्दांचे जे गोवाचक अर्थ सायणादि टीका-कारांनीं दिलेले आहेत ते न पत्करतां त्यांचे स्त्रीवाचक अर्थ घ्यावे असें त्यांचें म्हणणें आहे. ब्राह्मणांना कांहीं एक विशेष प्रकारचा स्त्रीविषयक हक्क होता; पण तो बजावूं देण्याच्या आड क्षत्रिय येऊं लागले व म्हणून हें रणकंदन झालें अशी त्यांची उपपत्ति आहे.

अथर्ववेदांतील आठरा व एकोणीस या सूक्तांतील गाय या अर्थाचे सर्व शब्द स्त्रीवाचक घ्यावे असें त्यांचें मत आहे; व तें आपल्याला दुसऱ्या एका ठिकाणावरून सुचलें आहे असें त्यांनीं सांगितलें आहे. अथर्ववेदाच्या पांचव्या कांडांतील चवथ्या सूक्ताच्या तेहतिसाव्या ओळींत 'वसा' म्हणून जो गायवाचक शब्द आला आहे त्याचा अर्थ स्त्री असाच करावा लागतो; कारण वसा ही राजन्याची म्हणजे क्षत्रियाची आई असें वर्णन तेथें केलें आहे. हा त्यांचा मुख्य आधार आहे. गाय ही माणसाची आई असणार कशी ! तेव्हां वसा शब्दाचा अर्थ स्त्री असा घ्यावा म्हणजे ती ऋचाही लागते व तोच अर्थ १८, १९ या सूक्तांतील गोवाचक शब्दांना लावला, म्हणजे त्यांना जी उपपत्ति बसवावयाची आहे तीही बसते; व शिवाय ब्राह्मण-क्षत्रियांची मारामारी हक्कासाठीं होई हें स्पष्ट होतें. आतां आठरा व एकोणीस यांतील गोवाचक शब्दांचे अर्थ स्त्रीवाचक घ्यावयास त्यांच्या मतें एकच आधार म्हणजे वरील 'वसा' शब्द होय. पण या एका शब्दावरून ही दोनही सूक्तें गायवाचक अर्थांतून मोकळीं करून स्त्रीवाचक अर्थांत घालतां येतील असें वाटत नाहीं; कारण स्त्रीवाचक अर्थ घेतला तर अलंकार वाढवावा लागतो, व आपल्या अर्थाला तो कितीही जुळवून घ्यावयाचें म्हटलें तरी जुळत नाहीं. या दोनही सूक्तांत ब्राह्मणाची गाय अपहरून नेण्यानें क्षत्रियाचें काय नुकसान होतें हें सविस्तर सांगितलें आहे. स्त्रीवाचक अर्थ या विस्तारास लागू पडत नाहींत. " गाय अभक्ष्य आहे; जो ती खाऊन टाकीन म्हणतो; वैतहव्यांनीं गाईमुळें आपला नाश करून घेतला; ब्राह्मणाची गाय मारण्यानें राष्ट्रतेज नष्ट होतें; मारणें क्रूर आहे कारण कीं, तिचें दूध काढतात, ती आठ पायाची होते व राष्ट्रनाश करते; ब्राह्मणाची गाय

खाल्ल्यावर कोणी जागृत रहात नाहीं," असें जें स्पष्ट म्हटलें आहे, तें स्त्रीवाचक अर्थाकडे वळवून घेतां येत नाहीं. शिवाय स्त्रीवाचक अर्थ केल्यानें या सूक्तांत ब्राह्मण-क्षत्रियांच्या नात्याचा जो एक सुदीर्घ व सुविस्तृत देखावा दिसतो तो निष्कारण संकोच पावतो. क्षत्रिय हे ब्राह्मणांच्या गाई हरण करून नेत असतीलच, कारण या दोन सूक्तांत, असें केल्यामुळें क्षत्रियांचें काय अनहित झालें हें स्पष्ट कथन केलें आहे, पण शिवाय स्त्रियाही नेत असतील. म्हणून वर विधान केलें आहे कीं केवळ धेनुहरणामुळेंच एवढी अदावत माजलेली नसली पाहिजे. १७ व्या सूक्तापासून १९ व्याच्या शेवटपर्यंत क्षत्रिय हे ब्राह्मणांची कोणकोणती छळणूक करीत असत व तिचे दुष्परिणाम काय झाले याचें वर्णन आहे. १७ व्यांत स्त्रीहरणाचा, व १८, १९ त गाय हरण्याचा व एकंदरीनें ब्राह्मणास छळण्याचा, असे परिणाम सांगितले आहेत. शामशास्त्री यांना असें वाटत आहे कीं, गाई पळविण्याचे इतके घोर परिणाम होणार नाहींत व म्हणून गायीचा अर्थ स्त्री करावयास हवा. गायी पळविण्याचे परिणाम असे होणार नाहींत ही कल्पना बरोबर आहे पण तेवढ्यासाठीं या दोन सूक्तांतील गाय शब्दांचा अर्थ स्त्री करावयास हवा असें मात्र मुळींच नाहीं. हीं दोन सूक्तें जरी नसतीं तरीही क्षत्रियांची स्त्रीविषयक आगाळिक ध्यानांत आली असती. कारण १७ वें सूक्त केवळ स्त्रीविषयक आगाळिकीसंबंधानेंच आहे. १७ वें सूक्त जर नसतें तर, येवढ्या मोठ्या प्रादेशिक व युगमानमापक उत्पाताला यथार्थ कारण हवें म्हणून, वसा शब्दाच्या आश्रयावर हीं दोनही सूत्रें स्त्रिवाचक घेऊन एक सामाजिक कारण कल्पितां आलें असतें. पण तशी कांहींच आवश्यकता नाहीं. सतरावें सूक्त स्वतंत्रपणेंच

हें भव्य सामाजिक कारण पुरविण्यास पुरेसें आहे. शामशास्त्री यांच्या मतें ब्राह्मणाच्या स्त्रीविषयक हक्कामुळें हें भांडण उद्भवलें; पण तसें नाहीं. हें भांडण जमातरूपाचें होतें. खरी गोष्ट अशी आहे कीं, क्षत्रिय हे ब्राह्मण जमातीला सर्व प्रकारांनीं फारच सतावून सोडीत असत; ते त्यांच्या गायी पळवीत, त्यांच्या मुलाबाळांना त्रास देत व त्यांच्या स्त्रियाही हरण करून नेत. ही कल्पना मुळावरून चांगली ध्यानांत येते. म्हणून मूळ सूक्तं येथें भाषांतरासह दिलीं आहेत.

**अथर्ववेद : पांचवें कांड : चौथा अध्याय : सतरावें सूक्त.**

तेऽवदन् प्रथमा ब्रम्हकिल्बिषेकूपारः सलिलो मातरिश्वा ।
वीडुहरास्तप उग्रं मयोभूरापो देवीः प्रथमजा ऋतस्य ॥ १ ॥

अपार समुद्र, मातरिश्वा ( वायु ), जळजळित किरणांचा ( सूर्य ? ), उग्र तप, मायाळू भू, अप्सरा व सत्यांतून जन्मलेला ब्रह्मा हे ब्राह्मणाला झालेल्या अन्यायाविरुद्ध प्रथम ओरडले.

सोमो राजा प्रथमो ब्रह्मजायां पुनः प्रायच्छदहृणीयमानः ।
अन्वर्तिता वरुणो मित्र आसीदग्निर्होता हस्तगृह्या निनाय ॥ २ ॥

कसलीही लाज न धरतां सोमराजानें ब्राह्मणाची स्त्री प्रथम परत केली; त्याच्या मागोमाग वरुण, मित्र हे गेले. हाताला धरून, होता जो अग्नी, त्यानें तिला पुढें नेलें.

हस्तेनैव ग्राह्यऽआधिरस्या ब्रह्मजायेति चेदवोचत् ।
न दूताय प्रहेया तस्थ एषा तथा राष्ट्रं गुपितं क्षत्रियस्य ॥ ३ ॥

जिला 'ब्राह्मणाची स्त्री' असें नांव मिळालें तिला हाताला धरूनच नेलें पाहिजे, कारण ती म्हणजे एक ठेवा आहे. दूता-

बरोबर पाठविण्यासारखी ती नाहीं. असें झालें म्हणजे क्षत्रियांचें राज्य सुरक्षित रहातें.

यामाहुस्तारकैषा विकेशोति दुच्छुनां ग्राममवपद्यमानाम् ।
सा ब्रह्मजाया वि दुनोति राष्ट्रं यत्र प्रापादि शश उल्कुषीमान्॥४॥

जिचें वर्णन " केस पिंजारलेली ( क्षत्रियानें ओढल्यामुळें ) ही तारका आहे. " असें होतें ती (क्षत्रियाच्या) गांवावर येऊन पडली तर तेथें-उल्का व शशी हीं आल्यानें जसें राष्ट्र दुःखव्याप्त होतें– ती ब्राह्मणस्त्री दुःख देते.

ब्रह्मचारी चरति वेविषद् विषः स देवानां भवत्येकमङ्गम् ।
तेन जायामन्वविन्दद् बृहस्पतिः सोमेन नीतां जुह्वं न देवाः ॥५॥

ब्रह्मचारी सेवा करीत संचार करतो. तो देवांचा एक अवयव बनतो, यज्ञांतली पळी जशी तसें सोमानें जिला नेलें तिला बृहस्पतीनें या ब्रह्मचाऱ्याच्या द्वारां परत मिळविलें.

देवा वा एतस्यामवदन्त पूर्वे सप्तऋषयस्तपसा ये निषेदुः ।
भीमा जाया ब्राह्मणस्यापनीता दुर्धां दधाति परमे व्योऽमन् ॥६॥

प्राचीन काळचे देव, तप करित बसलेले सप्तर्षि तिच्याविषयीं बोललेच होते (कीं) अपहरण करून नेलेली ब्राह्मण स्त्री मोठीच भयंकर होय. उंच आकाशांतही ( तेथपर्यंत ) ती दुःख उत्पन्न करते.

ये गर्भा अवपद्यन्ते जगद् यच्चापलुप्यते ।
वीरा ये तृह्यन्ते मिथो ब्रह्मजाया हिनस्ति तान् ॥ ७ ॥

जे गर्भ गळतात, ज्या जीवांचा नाश होतो, जे वीर एकमेकांना मारतात–त्या सर्वांना ( वास्तविक ? ) ब्राह्मण स्त्री मारते.

उत यत् पतयो दश स्त्रियाः पूर्वे अब्राह्मणाः ।
ब्रह्मा चेद्धस्तमग्रहीत् स एव पतिरेकधा ॥ ८ ॥

जर आधीं दहा अब्राह्मण पति स्त्रीला असले, पण जर ब्राह्मणानें तिचा हात धरला (तिचें पाणिग्रहण केलें) तर तो एकच तिचा पति होय.

ब्राह्मण एव पतिर्न राजन्यो न वैश्यः ।
तत् सूर्यः प्रब्रुवन्नेति पञ्चभ्यो मानवेभ्यः ॥ ९ ॥

ब्राह्मणच तिचा पति होय, क्षत्रिय नाहीं, वैश्य नाहीं. मानवाच्या पांच कुळांना हें सांगत सूर्य तळपत जातो.

पुनर्वै देवा अददुः पुनर्मनुष्या ऽ अददुः ।
राजानः सत्य गृह्णाना ब्रह्मजायां पुनर्ददुः ॥ १० ॥

देवांनीं ती परत केली; माणसांनींही परत केली; सत्य जाणणाऱ्या राजांनींही ब्राह्मणस्त्री परत केली.

पुनर्दाय ब्रह्मजाया कृत्वा देवैर्निकिल्बिषम् ।
ऊर्जं पृथिव्या भक्त्वोरुगायमुपासते ॥ ११ ॥

ब्राह्मणस्त्री परत केल्यावर, देवांच्याशीं भांडण संपविल्यावर, पृथ्वीचें ऊर्जित भोगून ते आकाश व्यापून आहेत.

नास्य जाया शतवाही कल्याणी तल्पमा शये ।
यस्मिन् राष्ट्रे निरुध्यते ब्रह्मजायाचित्त्या ॥ १२ ॥

ज्याच्या राष्ट्रांत अज्ञानानें—चित्त स्थिर नसल्यानें—ब्राह्मणस्त्रीचें अपहरण होतें त्याच्या बिछान्यावर शतपुत्र सुंदर स्त्री असावयाची नाहीं.

न विकर्णः पृथुशिरास्तस्मिन् वेश्मनि जायते ॥
यस्मिन् राष्ट्रे..............................॥ १३ ॥

ज्याच्या राष्ट्रांत अज्ञानानें–चित्त स्थिर नसल्यानें–ब्राह्मणस्त्रीचें अपहरण होतें त्याच्या घरीं रुंद कानाचा व विशाल मस्तकाचा 'बैल' जन्मास येत नाहीं.

नास्य क्षत्ता निष्कग्रीवः सूनानामेत्यग्रतः ।
यस्मिन्..................................॥ १४ ॥

ज्याच्या राष्ट्रांत....हरण होतें त्याच्या मुदपाकखान्यांत गळ्यांत माळा घातलेला बल्लव दिसावयाचा नाहीं.

नास्य श्वेतः कृष्णकर्णो धुरि युक्तो महीयते ।
यस्मिन्.............................. ॥ १५ ॥

ज्याच्या राष्ट्रांत....हरण होतें त्याच्या रथाला शुभ्र वर्णाचा व काळ्या कानाचा घोडा जुंपलेला दिसायचा नाहीं.

नास्य क्षेत्रे पुष्करिणी नाण्डीकं जायते बिसम् ।
यस्मिन्..................................॥ १६ ॥

ज्याच्या राष्ट्रांत....हरण होतें त्याच्या उद्यानांत पुष्करिणी नसावयाची व गोंडेदार कमळ फुलावयाचें नाहीं.

नास्मै पृश्निं वि दुहन्ति येऽस्या दोहमुपासते ।
यस्मिन्..............................॥ १७ ॥

ज्याच्या राष्ट्रांत—हरण होतें त्याच्यासाठीं, धारा काढणारे ठिपक्या ठिपक्याच्या गाईचें दूध काढत नाहींत.

नास्य धेनुः कल्याणी नानड्वान्त्सहते धुरम् ।
विजानियत्र ब्राह्मणो रात्रिं वसति पापया ॥ १८ ॥

जेथें ब्राह्मणाला स्त्रीवांचून ( विरहांत ), ( एकही ) रात्र कष्टानें घालवावी घालते, तेथें सुंदर दुभती गाय नसावयाची व बैल–नांगराची–धुरा मानेवर घेत नाहीं.

## १८ वें सूक्त

नैतां ते देवा अददुस्तुभ्यं नृपते अत्तवे।
मा ब्राह्मणस्य राजन्य गां जिघत्सो अनाद्याम् ॥ १ ॥

हे राजा, देवांनीं खाण्यासाठीं ही दिलेली नाहीं; राजा ब्राह्मणाची गाय खाण्यास योग्य नाहीं, ती खावयास पाहूं नको.

अक्षद्रुग्धो राजन्यः पाप आत्मपराजितः।
स ब्राह्मणस्य गामद्यादद्य जीवानि मा श्वः ॥ २ ॥

खेळण्याच्या फाशांनीं ( मुळें ? ) ज्याचा द्रोह झाला आहे, जो पापी आहे, जो आपलाच नाश करतो, जो "आज तर जगतो ( भोगतो ), उद्यांचें काय ?" असें म्हणतो त्या क्षत्रियानें ब्राह्मणाची गाय खावी.

आविष्टिताघविषा पृदाकूरिव चर्मणा।
सा ब्राह्मणस्य राजन्य तृष्टैषा गौरनाद्या ॥ ३ ॥

कातड्यानें वेष्टिलेल्या दुष्टविष सापाप्रमाणेंच, क्षत्रिया, ब्राह्मणाची ही गाय खरमरीत व अभक्ष्य आहे.

निर्वै क्षत्रं नयति हन्ति वर्चोऽग्निरिवारब्धो वि दुनोति सर्वम्।
यो ब्राह्मणं मन्यते अन्नमेव स विषस्य पिबति तैमातस्य ॥ ४ ॥

खरोखर ती त्याचें तेज हरते, वैभव मारते, अग्नीप्रमाणें सर्व कांहीं जाळून टाकते; जो ब्राह्मणाला खाऊन टाकीन म्हणतो तो तैमात विषच पितो.

य एनं हन्ति मृदुं मन्यमानो देवपीयुर्धनकामो न चित्तात् ।
सं तस्येन्द्रो हृदयेऽग्निमिन्ध उभे एनं द्विष्टो नभसी चरन्तम् ॥ ५ ॥

जो कोणी देवांना न मानणारा, चित्त स्थिर नसलेला, व लोभी असा ब्राह्मणाला मऊ समजून त्याला मारतो त्याच्या हृदयांत इन्द्र आग पेटवितो तो जाऊंयेऊं लागला म्हणजे दोन्ही लोक त्याचा द्वेष करतात.

न ब्राह्मणो हिंसितव्योऽग्निः प्रियतनोरिव ।
सोमो ह्यऽस्य दायाद इन्द्रो अस्याभिशस्तिपाः ॥ ६ ॥

ज्याला आपला देह हवा आहे त्यानें जशी अग्नीची तशी ब्राह्मणाची हिंसा करू नये; कारण सोम त्याचा दायाद आहे व इन्द्र त्याचा रक्षिता आहे.

शतापाष्ठां निगिरति तां न शक्नोति निःखिदन् ।
अन्नं यो ब्रह्मणां मल्वः स्वाद्वद्मीति मन्यते ॥ ७ ॥

गोड लागतें म्हणून मी खातों असें म्हणून ब्राह्मणाचें अन्न जो खातो तो शेंकडों कांटेरी गिळतो, तीं त्याच्यानें बाहेर काढवत नाहींत.

जिह्वा ज्या भवति कुल्मलं वाङ्नाडीका दन्तास्तपसाभिदिग्धाः ।
तेभिर्ब्रह्मा विध्यति देवपीयून् हृद्बलैर्धनुभिर्देवजूतैः ॥ ८ ॥

त्याची जीभ धनुष्यदोरी बनते, त्याची वाणी कुल्मल बनते, त्याचे दांत तपस्येनें सारविलेले बाण बनतात; यांच्या योगें ब्राह्मण हा देवांचा अपमान करणारांना विद्ध करतो; हृदयांतील बळ हेंच त्याचें धनुष्य असतें व देवांनींच ( बाणांना ) वेग दिलेला असतो.

तीक्ष्णेषवो ब्राह्मणा हेतिमन्तो यामस्यन्ति शरव्यां न सा मृषा ।
अनुहाय तपसा मन्युना चोत दूरादव भिन्दन्त्येनम् ॥ ९ ॥

ब्राह्मणांचे बाण तीक्ष्ण असतात, त्यांजपाशीं अस्त्रेंही असतात. जे शरपुंज ते फेकतात ते वांया जात नाहींत. रागानें व त्वेषानें मागें लागून ते दूरूनच त्याला दुभंगून पाडतात.

ये सहस्रमराजन्नासन् दशशता उत ।
ते ब्राह्मणस्य गां जग्ध्वा वैतहव्या पराभवन् ॥ १० ॥

जे हजारोंच्या हजारो होते व राज्य करीत होते ते वैतहव्य ब्राह्मणाची गाय खाल्ल्यामुळें आत्मनाश करते झाले.

गौरेव तान् हन्यमाना वैतहव्याँ अवातिरत् ।
ये केसरप्राबन्धायाश्चरमाजामपेचिरन् ॥ ११ ॥

केसरप्रबंधा स्त्रीचा खाल्लेला बोकड ज्यांचा शेवटचाच ठरला त्या वैतहव्यांना गाईनें, आपण मरूनच, खालीं पाडिलें, मारिलें.

एकशतं ता जनता या भूमिर्व्यऽधूनुत ।
प्रजां हिंसित्वा ब्राह्मणीमसंभव्यं पराभवन् ॥ १२ ॥

ते एकशें एक लोक कीं ज्यांना पृथ्वीनें लोळविलें त्यांनीं ब्राह्मणाच्या प्रजेची हिंसा करून स्वतःचाच सर्व नाश करून घेतला.

देवपीयुश्चरति मर्त्येषु गरगीर्णो भवत्यस्थिभूयान् ।
यो ब्राह्मणं देवबन्धुं हिनास्ति न स पितृयाणमप्योति लोकम् ॥१३॥

देवांचा बन्धु जो ब्राह्मण त्याची जो हिंसा करतो तो देवांचा अवमानिता ( म्हणून ) माणसांत वावरतो, विष पोटांत जाऊन ( केवळ ) सापळा उरल्या ( सारखा ) तो होतो, जेथें पितर गेले आहेत त्या लोकीं त्याला जातां येत नाहीं.

अग्निर्वै नः पदवायः सोमो दायद उच्यते ।
हन्ताभिशस्तेन्द्रस्तथा तद् वेधसो विदुः ॥ १४ ॥

अग्नि हा आमचा मार्गदर्शक आहे, सोम हा वारस आहे, इन्द्र हा ( आम्हांला लागणारे ) शाप मारतो, वेधसांना हें माहीत आहे.

इषुरिव दिग्धा नृपते पृदाकूरिव गोपते ।
सा ब्राह्मणस्येषुर्घोरा तया विध्यति पीयतः ॥ १५ ॥

हे राजा विषानें माखलेल्या बाणासारखा, हे गायी बाळगणाऱ्या, सर्पाप्रमाणें असणारा ब्राह्मणाचा बाण फार भयंकर असतो, तो अपमान करणाराचा नाश करतो.

## १९ वें सूक्त

अतिमात्रमवर्धन्त नोदिव दिवमस्पृशन् ।
भृगुं हिंसित्वा सृञ्जया वैतहव्याः पराभवन् ॥ १ ॥

भृगूची हिंसा करून सृञ्जय व वैतहव्य यांनीं आत्मनाश करून घेतला; ते अतिशय वाढले ( माजले ), जणूं आकाशाला शिवले नाहींत इतकेंच, ( स्वर्ग दोन बोटें उरला होता ! )

ये बृहत्सामानमाङ्गिरसमार्पयन् ब्राह्मणं जनाः ।
पेत्वस्तेषामुभयादमविस्तोकान्यावयत् ॥ २ ॥

आंगीरसाचा मुलगा जो बृहत्सामान ( नामा ) ब्राह्मण त्याला ज्यांनीं बळी दिलें त्यांचीं पोरेंबाळें, दांतांच्या दोन रांगाच्या बोकडानें खाऊन टाकलीं.

ये ब्राह्मणं प्रत्यष्ठीवन् ये वास्मिञ्छुल्कमीषिरे ।
अस्नस्ते मध्ये कुल्यायाः केशान् खादन्त आसते ॥ ३ ॥

जे ब्राह्मणाच्या अंगावर थुंकले किंवा जे त्याच्यावर नाक शिंकरल ते रक्ताच्या नदींत बसतात व ( आपलेच ) केश खातात.

ब्रह्मगवी पच्यमाना यावत् साभि विजङ्गहे ।
तेजो राष्ट्रस्य निर्हन्ति न वीरो जायते वृषा ॥ ४ ॥

ब्राह्मणाची गाय, मारून शिजविल्यामुळें, जेथपर्यंत साधेल तेथपर्यंत राष्ट्राचें तेज नष्ट करते; ( त्या राष्ट्रांत ) बलिष्ठ वीर उपजावयाचा नाहीं.

क्रूरमस्या आशसनं तृष्टं पिशितमस्यते ।
क्षीरं यदस्या पीयते तद् वै पितृषु किल्बिषम् ॥ ५ ॥

तिला कापणें क्रूरपणाचें आहे; तिचें मांस ( खाणें ) तिखट आहे; कारण कीं तिचें दूध पितात. म्हणून हा पितरांचा अपराध आहे.

उग्रो राजा मन्यमानो ब्राह्मणं यो जिघत्सति ।
परा तत् सिच्यते राष्ट्रं ब्राह्मणो यत्र जीयते ॥ ६ ॥

जो राजा स्वतःस पराक्रमी समजून ब्राह्मणाला खाईन म्हणतो त्याचें राष्ट्र, ब्राह्मणाची हानि झाल्यानें सांडून वायां जातें.

अष्टापदी चतुरक्षी चतुःश्रोत्रा चतुर्हनुः ।
द्व्यास्या द्विजिह्वा भूत्वा सा राष्ट्रमव धूनुते ब्रह्मज्यस्य ॥ ७ ॥

आठ पायांची, चार डोळ्यांची, चार कानांची, चार जबड्यांची, दोन तोंडांची, दोन जिभांची होऊन, ती ब्राह्मणाला त्रास देणाराचें राष्ट्र हलवून सोडते.

तद् वै राष्ट्रमा स्रवति नावं भिन्नामिवोदकम् ।
ब्रह्माणं यत्र हिंसन्ति तद् राष्ट्रं हन्ति दुच्छुना ॥ ८ ॥

फुटक्या नावेंत जसें पाणी शिरतें तसें तें राष्ट्र गळून जाऊं लागतें. जेथें ब्राह्मणाची हिंसा होते त्या राष्ट्रावर दुर्दैव कोसळतें.

तं वृक्षा अप सेधन्ति छायां नो मोपगा इति ।
यो ब्राह्मणस्य सद्धनमभि नारद मन्यते ॥ ९ ॥

हे नारदा, जो ब्राह्मणाचें जें खरें धन त्याचा अपहार करतो त्याला झाडें ( सुद्धां ) दूर ढकलतात, 'आमच्या सावलींत येऊं नको' म्हणतात.

विषमेतद् देवकृतं राजा वरुणोऽब्रवीत् ।
न ब्राह्मणस्य गां जग्ध्वा राष्ट्रे जागार कश्चन ॥ १० ॥

राजा, वरुण म्हणाला(च आहे कीं,) देवांनीं हें ( ब्राह्मणहिंसा ) विषच बनविलें आहे. ब्राह्मणाची गाय खाल्यावर, राष्ट्रांत कोणीही जागा रहात नाहीं.

नवैव ता नवतयो या भूमिर्व्यधूनुत ।
प्रजां हिंसित्वा ब्राह्मणीमसंभव्यं पराभवन् ॥ ११ ॥

ज्या नऊ नव्वदांना भूमीनें आपल्यावरून झिंजाडून टाकलें त्यांनीं, ब्राह्मणप्रजांची हिंसा केलेली असल्यामुळें, आपलाच कायमचा नाश करून घेतला.

यां मृतायानुबध्नन्ति कूद्यंऽपदयोपनीम् ।
तद् वै ब्रह्मज्य ते देवा उपस्तरणमब्रुवन् ॥ १२ ॥

माग राहूं नये म्हणून जी कुडी—काटेरें—मृताच्या मागें बांधतात तीच कुडी, जो ब्राह्मणाला छळतो त्याला, बिछाना म्हणून देव सांगतात.

अश्रूणि कृपमाणस्य यानि जीतस्य वावृतुः ।
तं वै ब्रह्मज्य ते देवा अपां भागमधारयन् ॥ १३ ॥

छळ झाल्यामुळें जे त्याचे अश्रु खालीं वहावले तेंच पाणी, हे ब्राह्मणछळका, देवांनीं तुला नेमिलें आहे.

येन मृतं स्नपयन्ति श्मश्रूणि येनोन्दते।
तं वै ब्रह्मज्य ते देवा अपां भागमधारयन् ॥ १४ ॥

ज्या पाण्यानें मृतास स्नान घालतात, ज्यानें हजामतीचे केस भिजवितात तेंच पाणी, हे ब्राह्मणछळका, देवांनीं तुला नेमिलें आहे.

न वर्ष मैत्रावरुणं ब्रह्मज्यमभिवर्षति।
नास्मै समितिः कल्पते न मित्रं नयते वशम् ॥ १५ ॥

ब्राह्मणछळकावर मित्रावरुणाचा पाऊस पडत नाहीं, त्याला चारचौघे (सभा) जुमानीत नाहींत, कोणी मित्र जवळ करीत नाहीं.

## सूक्तें केव्हां रचलीं—

हीं सूक्तें वाचल्यानंतर प्रथम हा विचार मनांत येतो कीं, ब्राह्मणक्षत्रियांच्या लढ्यानंतर हीं सूक्तें रचलेलीं आहेत व त्यांत ब्राह्मणांच्या छळाचे दुष्परिणाम सांगितले आहेत. पुढील काळांत उत्पन्न झालेल्यांना आणि समकालीनांना यापासून काय बोध व्हावयाचा तो झाला असेल. पण ज्या ग्रंथांना धर्मग्रंथ म्हणून हिंदु अथवा आर्यधर्मीय लोकांनीं मानिलें त्यांत, पुष्कळ आधीं होऊन गेलेल्या एका लढ्याचे दुष्परिणाम सांगितले आहेत इतकें खरें. एका ऋचेंत तर भृगूला झालेल्या त्रासाचा स्पष्ट उल्लेख आहे; आणि दुसरींत सहस्रार्जुनाच्या हजार हातांचा अस्पष्ट उल्लेख आहे. म्हणजे हीं सूक्तें सामान्य अर्थाचीं किंवा ब्राह्मणांचा धाक बसविण्याच्या हेतूनें त्यांनींच लिहिलीं अशा स्वरूपाचीं नसून पूर्वीं

५५८८ रा. क्र. ..........

प. १०१ ८०

काय झालें याचा इतिहास म्हणून सांगितली आहेत. ही शापवाणी नसून हें इतिहास-कथन आहे. त्या इतिहासाचें म्हणजे कलहाचें मूळ कारण काय असावें, याचें विवेचन या प्रकरणाच्या प्रारंभीं केलेलें आहे. तें हें कीं, या लोकांचीं रूपें जमातीचीं होतीं आणि म्हणून स्त्री व एकंदर जीवित या बाबतींत ब्राह्मणाची आगळीक होत होती. क्षत्रियांनीं राजेपण चालूंही केलेलें असेल पण अजून तें त्यांच्या गटापुरतेंच कदाचित् असेल. राजाई उत्पन्न होऊनही तिचें रूप लवचिक, तात्पुरतें, होऊं घातलेलें अशा थाटाचें, असें असल्यामुळें राजाचीं संभावित कर्तव्यें अजून सिद्ध झालेलींच नसतील. तसेंच सर्वांचा मिळून समाज ही कल्पना उदित झालेली नसल्यानें स्वतःची जमात-जाणीव अजून शिल्लकच असेल. अशा या अपक्व, नुकतेंच आळावयास लागलेल्या स्थितींत क्षत्रियांची वृत्ति पूर्वीच्या रूपानें पुन्हा पुन्हा प्रकट होत राहिली असल्यास नवल नाहीं. अशा स्थितींत त्यांच्या हातून काय कृत्यें झालीं याचें अनुमान वरील सूक्तांवरून चांगलें करतां येतें.

## भारतांत उल्लेख कां नाहीं—

परशुरामानें झगडा सुरू केला तो केवळ गाईच्या चोरीवरून केला असें मुळींच नव्हे. महाभारतांत व इतर पुराणांत तो गाई-वरूनच झाला असें म्हटलें आहे. पण तें चांगलें चिकित्सूनच घ्यावयास हवें. वर म्हटलेंच आहे कीं, गाईचें अपहरण राजे लोक करतात हें विलक्षणच दिसतें. त्यांतलें विलक्षणपण घालवावयास हें एक उत्तम साधन आहे, कीं ते संभावित व मान्य अर्थानें राजे होते असें न मानणें ! राजे लोक केवळ भिक्षुकांच्या गाई चोरतात

हा विचार राजा नांवाशीं संलग्न करतां येतो काय ? तसेंच अशा राजावर भिक्षुकांचा वनवासी मुलगा भारतीय म्हणजे उत्तर हिंदुस्थानभर झालेलें युद्ध करतो हें तरी शक्य दिसतें काय ? याचा अर्थच असा आहे कीं, आपण एकमेक समाजाचे अवयव आहों असा व राजेपणाचा सर्वसंमत असा भाव उदित होण्याच्या आधीं ही सर्व मारामारी झालेली होती. क्षत्रियांनीं गायीच पळविल्या किंवा मारून खाल्ल्या असें नव्हे; स्त्रियाही पळविल्या. मग महाभारतांत व पुराणांत गाईचाच उल्लेख कां ? स्त्रियांचा कां नाहीं ? याचें उत्तर सुचणें कठिण नाहीं. अगोदर वरच्यासारखीं वैदिक सूक्तेंच परशुरामाच्या कृत्यानंतर कित्येक शतकांनीं झालीं असतील व मग महाभारतांतील हकीकतीचें ग्रथन पुढें कित्येक शतकांनीं झालेलें आहे. पण हें ग्रथन होण्याच्या काळीं सुसंबद्ध, सुस्थिर, अन्तर्मिलाफानें मनोमिळणीचा असा हिंदु किंवा आर्यधर्मीय लोकांचा समाज बनलेला होता. त्या वेळीं स्त्रीहरणाचें प्रक्षोभक कारण सांगण्याचा अप्रयोजकपणा करूं नये असें रचना करणारास वाटलें असावें असें वाटतें. जुनी हृत्तापकारक गोष्ट घोटण्यांत कांहींच फायदा नव्हता. कथा शिल्लक ठेवल्या पण प्रक्षोभक कारण मात्र वजा केलें. एरवीं आतांच उल्लेखिलेलें १७ वें सूक्त रचनाकारास दिसलें नव्हतें असें कसें म्हणावें ?

### इतिहास व इशारत—

स्त्रीहरणाचें अपकृत्य होत होतें हें १७ व्या सूक्तावरून ठळक दिसून येतें. क्षत्रियांचें राज्य कशानें सुरक्षित रहातें म्हणजे काय केल्यानें असुरक्षित बनतें हें त्यांत सांगितलें आहे. "ब्राह्मण-स्त्री राज्य दग्ध करून टाकते, अपहरून नेली असतां ब्राह्मण-स्त्री भयंकर

बनते, ती सर्वत्र दुःख उत्पन्न करते, ती अनेक आपत्तींना जन्म देते, सत्य जाणणारे राजे तिला परत करतात, परत केल्यावर ऊर्जित होते; गाफिलपणानें हरण केलें, तर करणाराचें घर सुखी रहावयाचें नाहीं; त्याचे गोठे, त्याचीं पाकगृहें, त्याची बाग, त्याचा रथ त्याचे गोवळवाडे, त्याची शेती या सर्वांचा नाश व्हावयाचा." हें सगळें काय आहे? त्याची स्त्री, कीं जिचें पाणिग्रहण त्यानें केलें आहे ती पूर्वी कोणाचीही असो ती त्याचीच मानावी असा दंडक घालून दिला; व अपहरण केल्यानें काय अनन्वित प्रकार होतात हें स्वच्छ सांगितलें आहे. १७ व्या सूक्तांत याप्रमाणें स्त्रीहरणाचें प्रकरण संपवून १८ व १९ यांत धेनुहरणाचें प्रकरण सांगितलें आहे. ब्राह्मणाची गाय अभक्ष्य आहे, ती सर्व कांहीं जाळून टाकते, वैतहव्याचा नाश तिच्यामुळें झाला, ती मारणाराच्या राष्ट्रांत बलिष्ठ राजे होत नाहींत, ती दसपट बनून नाश करते इत्यादि वचनांत गोहरणाचा इतिहास व त्याचे परिणाम सांगितले आहेत. त्याच्या जोडीला ब्राह्मणांच्या छळासंबंधानेंही सांगितलें आहे व त्यांत भृगूचें नांव स्पष्ट घेतलें आहे. ब्राह्मणाला मऊ म्हणजे मेणचट समजून जो मारतो त्याच्या चित्ताची होळी होते, जिवंत रहावयाचें असेल तर ब्राह्मणाची हिंसा करूं नये, ती करणारा झिजून मरतो, जे ब्राह्मणांवर थुंकले त्यांना रक्तांत बसावें लागलें, ब्राह्मणांच्या छळकांना त्यांच्या अश्रूचें पाणी ठेवलें आहे, त्यांना कोणी विचारणार नाहीं, ब्राह्मणांची हिंसा करणारे आत्मनाश करतात इत्यादि वचनांत **इतिहास व इशारत** हीं दोनही सांपडतात.

हें पाहिल्यानंतर स्वाभाविकच असा निर्णय मनाशीं येतो कीं, एकाद्या समाजाची इतकी छळणूक, समाज म्हणून, दुसरा एक समाज करीत असला तर, ते दोन्ही समाज अगदीं पृथक् असले

पाहिजेत व दुसरें म्हणजे, छळाचीं रूपें ध्यानांत घेतां, त्यांचीं जमातरूपें तेव्हां कायम असावीं.

## पोषक अनुमान—

या प्रतिपादनाचा अर्थ असा झाला कीं, ज्याला हिंदूंचा म्हणजे आर्यधर्मीय लोकांचा समाज म्हणून म्हणावयाचें त्यांच्या रचनाकालाच्या आधींच्या युगमानांत आपण आतां जाऊन पोंचलों. या युगमानांत परशुरामानें क्षत्रियवधाचें काम केलें. ब्राह्मणक्षत्रियांच्या भांडणासंबंधींचा वर दिलेला वेदांतील पुरावा याहून विपुल असता तर बरें झालें असतें. पण जो कांहीं आहे त्यावरून वर दिलेलें अनुमान यथायोग्य निघतें असें वाटतें. ऋग्वेदांतही बृहस्पतीची पत्नी परत केल्याबद्दलची एक ऋचा आहे. अर्थात् ऋग्वेदानंतर जे वेद तयार झाले त्यांच्या रचनापद्धतीप्रमाणें हीच ऋचा पुन्हा अथर्वांत येणें साहजिकच आहे. म्हणजे ऋग्वेदांतील बृहस्पतीच्या कथेवरून प्रस्तुत पुराव्यांत कांहीं निराळी भर पडत नाहीं. ब्राह्मणक्षत्रियांनीं ज्या वेदग्रंथांना धर्मग्रंथ म्हणून मानले त्यांच्या रचनाकाळाच्या पुष्कळच आधीं परशुरामाचें हें क्षत्रियांशीं भांडण झालें येवढें स्पष्ट होतें. येथेंच दुसरा एक मुद्दा लक्षांत घ्यावयास हवा. एकट्या परशुरामानें हजारों क्षत्रियांशीं युद्धें केलीं, यांत गृहीत गोष्ट अशी आहे कीं, परशुराम हा आपल्या बाजूनें एकटाच लढला आणि क्षत्रियांच्या बाजूनें मात्र लक्षावधि लोक लढत होते. परशुरामाची कांहीं क्षत्रिय वीरांशीं द्वंद्व-युद्धें झालीं असतील हें खरें आहे; पण जे लक्षावधि क्षत्रिय त्यानें मारिले असें वर्णन आहे त्यांपैकीं प्रत्येकांशीं कांहीं त्यानें द्वंद्व युद्ध केलें नसावें. वर्णनांवरून पाहतां त्यानें मोठमोठाल्या फौजा उध्वस्त केल्या. पण या प्रसंगींही आपल्या बाजूनें तो एकटाच लढला

होता. या ठिकाणीं अशी शंका येते कीं, हजारों बलिष्ठ वीरांशीं एकट्यानेंच लढावें आणि त्या सर्वांस ठार करावें हें संभवतें तरी कसें ? पूर्वीच्या शस्त्रास्त्र-विद्येंत, एकानें अनेकांचा वध करावा अशा कांहीं योजना व क्लृप्त्या असतील हें गृहीत धरून चाललें तरी एक संबंध, अत्यंत प्रबळ असा वर्गच्या वर्ग, व तोही उत्तर-भारतांतील अनेक ठिकाणीं, एकाच माणसानें जिंकलेला असावा हें खरें वाटत नाहीं. म्हणून यांतून दोन कल्पना उद्भवतात. पहिली अशी कीं, "परशुरामानें क्षत्रियवध केला" याचा अर्थ असा कीं, मुख्य मुख्य क्षत्रियवीरांशीं त्यानें द्वंद्वयुद्धें केलीं व त्यांस नाहींसें केलें व हें होतांच त्या त्या वीरांचे सर्व अनुयायी वारापाणी होऊन परागंदा झाले. किंवा दुसरी कल्पना अशी कीं, जर परशुराम मोठ-मोठाल्या सैन्यांशीं लढला असला तर तो एकटा लढला नसला पाहिजे. वर उल्लेखिलेलें जें जमातीचें भांडण तें त्यानें केलेलें असावें व त्या कामांत त्याला त्याच्या जमातींतील लोकांची मदत असावी. एरवीं एका माणसानें उठावें व लक्षावधि लोक एक-ट्याच्याच सामर्थ्यावर एकवीस वेळां धुळीस मिळवावे हें खरें वाटत नाहीं. परशुरामाचें क्षत्रियांशीं भांडण हा एक जमातींचा लढा ( Tribal War ) होता असें जें वर म्हटलेलें आहे त्याला पोषक म्हणून वरील अनुमान दिलेलें आहे.

## हिंदुसमाज केव्हां सुरू झाला—

परशुरामानें केवढा झगडा केला याचें वर्णन आरंभींच्या चरित्रांत दिलेलेंच आहे. हें युद्ध अथवा ही युद्धमालिका एवढी भयंकर व प्रांतोप्रांतीं झाली कीं, पृथ्वीचा थरकांप झाला असें सूचित केलेलें वेदांतील वर्णन यथायोग्यच म्हटलें पाहिजे. एकवीस वेळां

क्षत्रिय-संहार झाला, यावरूनही या युद्धमालिकेचें मालिकापण व तिचें कालदृष्ट्या विशालत्व हीं आपोआपच सिद्ध होतात. ही युद्धमालिका संपल्यावर सूडबुद्धि, खुनस इत्यादि मनुष्यमात्रास सहज अशा ज्या वृत्ति त्या किती काळपर्यंत धुसमत राहिल्या व किती काळपर्यंत मधून मधून भडकल्या हें सांगतां येणें कठीण आहे. महाभारतांत म्हटलें आहे कीं, कार्तवीर्याचा प्रसंग आटोपल्यानंतर हजार वर्षांनीं पुढें परशुरामास इतर क्षत्रियांनीं चिडविलें व मग हीं युद्धें झालीं. ही काळसंख्या जरी अक्षरशः पत्करली नाहीं तरी या हत्याकांडांत पुष्कळच काळ लोटला होता इतकें ती-वरून सूचित होतेंच. म्हणजे कांहीं शतकें तरी हा वैराग्नि धुम-सत राहिला होता. या वैरवृत्तीचा उपशम होऊन परस्परांचा मनोमिलाफ समाजरूपानें ज्या काळांत सिद्ध झाला त्या काळा-पासून हिंदूंच्या **वर्णमूल समाजरचनेस** सुरुवात झाली असें म्हणावयास हवें. त्या काळांत या समाजाच्या बांधणीची पाया-भरणी झाली. हा उपशम कोणत्या कारणानें झाला याचेंही अनुमान करतां येतें. या दोनही लोकांनीं हिंदुस्थान देशांत कायमची वस्ती केलेली होती व त्यांचा शेजारधर्म केवळ अटळ बनलेला होता. शेजारधर्म ठरल्यानंतर आर्थिक नातीं उत्पन्न होतात; आणि आतां तिसऱ्याला तरी येऊं देऊं नका असा सामु-दायिक हितरक्षणाचा मार्ग मनांत येऊं लागतो. ज्या बाबतींत जमत नाहीं असें दिसतें त्या वजा घालण्याकडे जास्त जास्त कल पडत जातो व ज्या मुद्द्यांवर जमतें त्यांचीच संख्या कशी वाढेल हें पाहण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. आमच्यापुरतें आम्ही पाहूं, तुमच्यापुरतें तुम्ही पहा ही तुसडपणाची भाषा लोप पावते व आमच्यापाशीं जें नाहीं व आम्हांस करतां येत नाहीं तें तुमच्या-

पाशीं आहे व तुम्हांस करतां येतें म्हणून तें तुम्ही आम्हांस द्या व जें तुमच्यापाशीं नाहीं व तुम्हांस करतां येत नाहीं तें आमच्यापाशीं आहे व आम्हांस करतां येतें तें आम्ही तुम्हांस देतों, अशी परस्परांच्या सोयीची व्यवहारबुद्धि उदय पावते. हेंच सर्व या जमातबुद्धि टाकीत चाललेल्या लोकांच्या बाबतींत सुरू झालें. आणखीही एक विचार त्यांच्या एकीकरणास उपयोगी पडला असावा; व त्यामुळेंच ही वैराच्या उपशमाची विचारसरणी जलदीनें चालू झाली असेल. हे दोघेही मूळचे बाहेरून आलेले, व जरी परस्परांशीं झगडत असत तरी अत्रस्थ लोकांपासून आपलें निराळेपण राखून ठेवण्याच्या कामीं सारखेच दक्ष असे असत. हा उभयतांना सामान्य असा जो अत्यन्त प्रबळ विचार त्यामुळें वैर विसरणें, मिलाफ करून टाकणें, व अस्त्रस्थांशीं बाकून रहाणें ही विचार-परंपरा प्रस्थापित होऊन, आपल्या सर्व ग्रंथांत वर्णन केलेला व जो अजूनही बहुतांशीं मूळस्वरूपाचा पुरेसा निदर्शक आहे तो समाज जन्मास आला. येथें त्याचे मूळचे अणुरेणु आहेत म्हणून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, **ब्राह्मणक्षत्रियांच्या मनोमिलाफानें हिंदुसमाज सुरू झाला.**

परशुराम उसळून उठला म्हणून काय झालें? तर ब्राह्मण जमात जिवंत राहिली व हिंदुसमाज कशानें सुरू झाला तर ब्राह्मण व क्षत्रिय हे दोघे परशुरामास विसरले म्हणून. असें हिंदुसमाजाच्या आरंभकाळचें हें मनोविजयावर रचलेलें वैभव आहे.

पण असें जरी झालें असलें तरी परशुरामाच्या कृत्याचें प्राचंड्य लक्षांत घेतां व मनुष्याचें वासनाबल अनुमानितां, परशुरामाची पीठिका प्रस्थापित होणें अपरिहार्य होतें. जेथें कोठें अपहरणाचा

अपराध घडेल तेथें जाऊन शस्त्र उगारावयाचें हीच ती पीठिका होय. या पीठिकेंतील लोकांचें हें काम बहुत काळपर्यंत चालू असलें पाहिजे यांत संशय नाहीं. जों जों ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य यांचें संघटन अधिक अधिक बळकट होत चाललें तों तों या पीठिकेची इतकीशी आवश्यकता उरली नाहीं यांत कांहींच संदेह नाहीं. या ठिकाणीं परशुरामचरित्रांतील एका अश्रद्धेय बाबीचा खुलासा करणें ओघानेंच प्राप्त होतें.

## परशुराम मर्त्य होता—

दुसऱ्या प्रकरणांत परशुरामाचा काल सातहजार वर्षांपूर्वींचा असावा असें अनेक अनुमानांनीं ठरविण्याचा यत्न केलेला आहे. दाशरथी रामचंद्राच्या पूर्वीं कांहीं शतकें तो होऊन गेला, असेंच मानलें पाहिजे असें त्या अनुमानावरून दिसून येतें. याच्या जोडीला पहिल्या प्रकरणांत परशुराम हा चिरंजीव नव्हता म्हणजे अमर नव्हता असें जें सांगितलेलें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे रामचंद्राच्या पूर्वीं कांहीं शतकेंच परशुराम हा जन्मास येऊन आपली जीवित-यात्रा संपवून निजधामास गेला होता असेंही कळून चुकतें. पण एकदां हा पक्ष मानल्यानंतर पुढील अडचणी कशा निभावून न्यावयाच्या हा फार महत्त्वाचा प्रश्न उरतो; व या निभावणुकीची कांहीं योजना जरी पूर्वींच्या दोन प्रकरणांत मधून मधून आलेली आहे तरी या ठिकाणीं तिचा सविस्तर प्रपंच करणें युक्त आहे. अडचण अशी आहे कीं, जर परशुधारी राम हा इतक्यापूर्वीं होऊन गेला तर पुढें रामावतारांत व कृष्णावतारांत इतकेंच काय पण त्याच्याही पुढील कथांतून, किंबहुना ज्या कथा प्रत्यक्ष ऐतिहासिक कालांत मोडतात त्या कथांतही हा परशुराम आपणांस सर्वत्र भेटतो

याचा अर्थ काय ? या अडचणीचा परिहार व्हावयास हवा. आरंभीं दिलेल्या परशुरामाच्या पौराणिक कथेवरून ही अडचण वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. जे वाचक केवळ श्रद्धाळु असतील त्यांना या अडचणीची बाधा कधींच व्हावयाची नाहीं. कारण ‘अश्वत्थामा बलिर्व्यासो—’ इत्यादि श्लोकाच्या आश्रयानें ते ही अडचण सहज तरून जातील. पण जे चिकित्सक आहेत त्यांना स्वाभाविकच वाटेल कीं, हा परशुराम इतकीं हजार वर्षे जगला तरी कसा ? ‘अश्वत्थामा बलिर्व्यासो’ या श्लोकाच्या द्वारा जो वाङ्मय संकेत उकलून दाखविलेला आहे त्यावरून पाहतां तो श्लोक रचणाराला बरोबर हीच अडचण वाटली होती असें स्पष्ट दिसून येतें. पण आपल्याला येणारी अडचण व्यक्त करण्यासाठीं त्यानें जो श्लोक लिहिला तोच भाविकांना अडचणींतून तरून जाण्यास उपयोगीं पडला. चिरंजीव शब्द घालून त्यानें असें सुचविलें कीं, “हा पुराण-पुरुष सर्वकाळीं आणि सर्व स्थळीं दिसत आहे व हें कोडें उलगडण्यासारखें नाहीं”. पण जो चिरंजीव शब्द हा अर्थ व्यक्त करण्यासाठीं त्यानें घातला तो अगदीं बालबोध अर्थानें घेऊन परशुराम हा खरोखरीच चिरंजीव आहे आणि म्हणून तो सर्व अवतारांतून भेटत राहावा यांत कांहींच आश्चर्य नाहीं असें भाविकांनीं मानिलें. तथापि परशुराम हा मृत्यु नसणें या अर्थानें अमर म्हणजे चिरंजीव नाहीं हें महाभारतांतीलच एका कथेवरून दाखवितां येतें. द्रोणपर्व ७० यांत परशुरामाची कथा दिलेली आहे. ही कथा सांगतांना नारद म्हणतात, “संजया, महातपस्वी, खरा शूर व वीर पुरुषही ज्याला वंदन करतात त्या अत्यंत कीर्तिमान् व युद्धाविषयीं अतृप्त असलेल्या जामदग्न्य परशुरामालाही मृत्यु यावयाचा आहे.” आतां नारदानें

हें संजयाला सांगितलें आहे; आणि संजय हा पांडवकालीनच होता हें खरें; व परशुरामालाही मृत्यु यावयाचा आहे, म्हणजे त्या कालीं आलेला नव्हता, हेंही मानून चाललों तरी त्याला मृत्यु यावयाचा आहे हें नारदाचें वचन, भाविकांच्या मनांतील परशु-रामाचें चिरंजीवत्व उध्वस्त करावयास पुरेसें आहे. खुद्द नारदा-च्याच मतानें जर परशुराम चिरंजीव नाहीं तर केवळ कथेचें लाघव पतकरून त्यास खरोखरीच चिरंजीव मानणें हें युक्तीस धरून होत नाहीं व म्हणूनच युक्तीस धरून काय होतें हें पहिल्या प्रकरणांत संकेत-कल्पनेच्या विवरणानें दर्शविलें आहे.

**अमरत्वाचें विवेचन—**

या विवरणाप्रमाणें परशुराम हा मर्त्य ठरल्यानंतर आतां पुढच्या पुढच्या कालीं भेटणाऱ्या परशुरामांची व्यवस्था कशी लावाव-याची याचें जें अल्पमात्र दिग्दर्शन मागें केलें आहे त्याचेंच **सामा-जिक** रूप विस्ताररूपानें येथें सांगावयास हवें. व्यास हा परस्परा-पासून दूर असलेल्या कालांत भेटतो. वसिष्ठ हें नांवही असेंच सर्व कालीं भेटतें. यावरून व्यास किंवा वसिष्ठ हे अमर होते असें अनुमान काढावयाच्या ऐवजीं मूळ व्यासांनीं केलेलें वाङ्मयकार्य पुढें जे कोणी करीत राहिले त्यांना व्यास हेंच नांव प्राप्त झालें असावें, आणि रघुकुलांत उपाध्यायपण पत्करेल्या मूळ वसिष्ठाच्या घराण्याला किंवा उपाध्याय-परंपरेला वसिष्ठ हेंच नांव प्राप्त झालें असावें हें म्हणणें योग्य दिसतें. सध्यां सुद्धां निरनिराळ्या काल-खंडांत तींच आडनांवें भेटलीं तर थोडा घोटाळा उत्पन्न होतोच. पण तेवढ्यावरून त्या आडनांवाचा एकच माणूस चिरंजीव होऊन राहिला आहे असा समज आपण करून घेत नाहीं. राजे लोकांची

नांवें तींच तींच आलीं तर फारच घोटाळा होण्याचा संभव असतो. म्हणून त्यांना थोरला शिवाजी, सवाई माधवराव, दुसरा बाजीराव सातवा हेन्री अशीं नांवें मुद्दामच देतात. पण अशीं कांहीं सोय प्राचीन कालीं झाली असती तर आपला गोंधळ झाला नसता आणि भाविकपणाचा भ्रमही उत्पन्न होता ना. वरील दोन पौराणिक पुरुषांची जशी कांहीं एक पीठिका होती तशीच परशुरामाचीही होती. ती म्हणजे क्षत्रियांशीं वैरभाव ही होय. मूळ परशुरामानें आपल्या समजुतीप्रमाणें क्षत्रियांचा निःपात केल्यानंतर अर्थात् आपली जीवितयात्रा संपली असेंच त्यानें मानलें. पण त्यानें उत्पन्न केलेली ही पीठिका त्याच्या मृत्यूबरोबरच संपली असेल असें म्हणवत नाहीं. परशुरामानें अगदीं क्षुल्लक असें कृत्य केलेलें नव्हतें. त्या कृत्याचीं दंशकारी हेतु-कारणें, त्याचा अचाटपणा आणि विस्तार, आणि त्याचे प्रादेशिक परिणाम हीं सर्व लक्षांत घेता, ज्या कृत्यांनीं पीठिका उत्पन्न व्हाव्या अशाच कृत्यांपैकीं हें क्षत्रियवधाचें कृत्य त्याच्या हातून झालें होतें असें म्हणावयास हवे. या कृत्यांत जर हेतुपुरस्सरता होती, त्यांत जर एवढा अघटितपणा होता आणि त्याचे परिणाम जर उत्तरभारतभर जाणवले होते तर तीच कल्पना मनांत ठसवून घेऊन ती अमलांत आणण्याची आकांक्षा व वासना पुढें त्याच्या परिवारांतील माणसांना वाटत राहिलेली असली पाहिजे असें समजावयास कांहींच हरकत नाहीं. परशुरामाला स्वतःला वंश नव्हता हें प्रसिद्धच आहे. परंतु पीठिकासातत्याला मूळ पुरुष वंशधरच असावा लागतो असें मुळींच नाहीं. त्याच्या सहेतुक कल्पनेची आणि प्रचंड कृत्याची छाप ज्यांच्या मनावर बसते ते त्याचे वंशजच बनतात. या न्यायानें पाहतां परशुरामाचें हें कृत्य ज्या ज्या कोणास पिढ्यान् पिढ्या योग्य वाटत राहिलें ते ते सर्व परशुराम

या नांवानेंच प्रसिद्ध असावे. परशुरामानें अद्भुत आचरलें हें खरें पण ज्या गोष्टीची त्याला एवढी चीड आलेली होती आणि म्हणून त्यानें हें कृत्य केलें त्या गोष्टीचा पूर्ण निचरा त्याच्या या सर्व कर्त्र-लींनींही अगदीं साफ झाला होता असें म्हणतां यावयाचें नाहीं. निःक्षत्रिय करणें म्हणजे काय याचा अर्थ मागें सांगितलेलाच आहे. त्याला एकवीस वेळां घनघोर संग्राम करावे लागले याचाच अर्थ असा कीं त्यानें हातीं घेतलेलें काम केवळ अनावर असावें. सबंध भारतभर पसरलेलें क्षत्रियकुल निपटून नाहींसें करणें हें सर्वथा अशक्य होतें. तसेंच जर, परशुरामाला ज्या गोष्टीची चीड आलेली होती ती गोष्ट म्हणजे ब्राह्मण स्त्रीहरणाची इच्छा, ती जर कोठें कोठें कां होईना पण धुमसत राहिली असली तर परशुरामानें उत्पन्न केलेल्या पीठिकेंत अनेक पिढ्यांपर्यंत या विषयावर सारखी पाळत ठेवणारे अनेक पुरुष उत्पन्न झालेले असणें अगदीं शक्य आहे व हें जे पुढचे पुढचे त्याच पीठिकेंतील पुरुष ते आपल्याला निर-निराळ्या कालखंडांत भेटत राहतात व त्यांनाच परशुराम ही अभिधा मिळत गेली असावी हेंच खरें.

**मनोमिलाफ—**

एकाच भूमींत एकत्र राहून रूपें मात्र जमातीचीं रहावीं असें झालें तर भांडणांना ऊत येईल यांत कांहींच शंका नाहीं आणि इतक्या पूर्वीच्या कालीं भांडणाच्या कारणांत स्त्रीहरण हें एक प्रबल कारण असावें यांतही कांहींच शंका नाहीं. स्त्री आणि भाकरी यां-साठींचीं भांडणें सनातन आहेत. सध्यांचें युगमान लक्षांत घेतांना सुद्धां त्यांच्या कारणांचें व्यापार जरी सूक्ष्म, लपून-छपून आणि निरनिराळ्या नांवांखालीं चालले असले तरी तीं भांडणें चालू

आहेतच हें रसिकांच्या सहज ध्यानांत येईल. परशुरामानें केलेल्या प्रचंड हत्येचा जोस उतरल्यानंतर असें दिसून आलें असावें कीं, दोनही जमातींच्या पुढील पिढ्यांना या अपकृत्यांचें व प्रत्यपकारांचें अनुचितपण स्पष्ट झालें असावें व दोघेही शुद्धीवर येऊन, ज्या अर्थी आपण एकत्रच रहात आहों व रहाणार आहों त्या अर्थी या वासना व त्यांचे घोर परिणाम हीं परस्परांनीं टाकिलीं पाहिजेत, अशा प्रकारचा समाज-वर्धनास अत्यंत इष्ट व संभावित विचार दोनही जमातींत रूढ झाला असावा. जगताच्या इतिहासांतील राष्ट्राराष्ट्रांच्या भांडणांतसुद्धां अशा प्रकारचे कायमचे मनोमिलाफ झालेले दिसून येतात. पण राष्ट्र या पदवीला ते ते देश पोंहोचण्याच्या आधीं तेथें समाजाला जमातींची म्हणजे ट्रायबल रूपें होतीं व त्यांच्यांत शतकानुशतकें अशा प्रकारचीं वैरें माजून मनांतील वासनांना कायमचे रेच मिळाले म्हणजे त्यांचे मिलाफ झाल्याचीं उदाहरणें मात्र सर्वत्र आढळतात. इंग्रज व स्कॉच या दोन लोकांच्या मनोमिलाफाचें उदाहरण अत्यंत बोधप्रद आहे. भांडणाचीं अगदीं साधीं व प्राथमिक स्वरूपाचीं कारणें एकदां निचरा पावलीं व परस्परांना अगतिकत्वाची भावना उत्पन्न झाली म्हणजे त्यांच्या मनःप्रवृत्तींतील सुबुद्धपणा वर उसळून येतो. आणि त्याचा व्यापार एकदां चालू झाला म्हणजे सामाजिक दृढीकरण संभवतें. ब्राह्मण क्षत्रियांची अशीच अवस्था झालेली होती. वर म्हटलेंच आहे, कीं एवढ्या मोठ्या अघटित कृत्यांतून नवी पीठिका उत्पन्न होणें हें अपरिहार्य होतें. आणि म्हणून परशुरामानें ज्यांची अब्रू कायम राखिली आणि ज्यांचा स्वाभिमान प्रकट केला त्यांना त्याच्याबद्दलचा अभिमान उत्पन्न होणें, त्याचें नांव त्यांच्या नांवाशीं

कायमचें निगडित होणें हें ज्याप्रमाणें अगदीं साहजिक, त्याप्रमाणेंच परशुरामाला ज्या कारणानें एवढा चेव आला तीं कारणें पुन्हा कोठें अवतरतात कीं काय यावर पाळत ठेवण्यासाठीं कांहीं व्यवस्था उत्पन्न होणें तितकेंच अपरिहार्य होतें. पण कालगतीनें या लोकांचे जमातीचें रूप जाऊन व्यापार, कलाकौशल्य, विद्या इत्यादींनीं युक्त असा परस्परांच्या मनोमिलाफावर रचलेला समाज जों जों जास्त संघटित होऊं लागला आणि त्याचीं मधुरफळें दोघां-नाही जास्त जास्त सेवितां येऊं लागलीं तों तों पूर्वींचीं अपकृत्येंही केवळ क्वचित् होऊं लागलीं असतील आणि म्हणून हीं कृत्यें करणारांना शासन करण्यासाठीं जे कोणी परशुराम-पीठिकावाले पाळतीवर रहात असतील त्यांना अवहेलण्याची व त्यांचा उपहास करण्याची बुद्धि समाजांत जास्त रूढ होत गेली असली पाहिजे. रामावतारांतील व कृष्णावतारांतील परशुरामविषयक हकीकतींत तेव्हांच्या माणसांनीं परशुरामासंबंधानें आदर व्यक्त केलेला दिसतो. पण गोष्ट मुख्य मुद्द्याला आली म्हणजे त्याचा उपहास मात्र झालेला दिसतो व ही गोष्ट मात्र फारच सूचक आहे.

## परशुरामाची अवहेलना—

राम व परशुराम या दोघांचें युद्ध होण्याचा प्रसंग आला त्या वेळीं रामानें परशुरामाला नमन केलें व त्याच्या प्रतापाचें स्तवन केलें असें म्हटलें आहे. पण लागलीच पुढें परशुरामाचा पराभव होऊन त्याचें तेजोहरण झालें असेंही सांगित-लेलें आहे. आतांपर्यंत परशुरामाच्या हकीकतीचा जो अर्थ आपण बसविला आहे त्याप्रमाणें पाहतां हें नमन व हें स्तवन त्या मूळ परशुरामाच्या संबंधांत झालें, व जें तेजोहरण झालें तें मात्र दाश-

रथी रामाला समकालीन असा जो त्या जुन्या पीठिकेंतील परशु-राम नांवानें मोडणारा पुरुष होता त्याचें झालें, असें मानलें पाहिजे. दाशरथी रामाच्या कालापर्यंत ब्राह्मण-क्षत्रियांचीं भांडणें पार बुजून गेलीं होतीं आणि म्हणून ज्याचें स्तवन करण्याला मनांत कसलाही दंश वाटूं नये, उलट कालगतीनें प्रवृत्तीला ऐतिहासिक गांभीर्य उत्पन्न झाल्यामुळें वर्तनांत संभावितपणा मात्र दिसावा म्हणून त्या जुन्या परशुरामाचें रामचंद्रानें स्तवन केलें आहे. पण जुनें होऊन गेलें, आतां तें निःशेष झालें आहे, ज्या वसिष्ठ-विश्वामित्रांचीं भयंकर भांडणें सप्त सिंधूंच्या प्रदेशांत पूर्वीं झालीं होतीं त्यांच्यापैकीं एकाच्या घराण्यांत आपण शस्त्रविद्या संपादिली आहे आणि दुसऱ्याच्या घराण्यांतील पुरुष आपले उपाध्याय आहेत, आणि अशा रीतीनें आपल्याला मान्यता देऊन या ब्राह्मण-क्षत्रियांच्या प्रतिनिधीभूत कुलांनीं म्हणजे वसिष्ठ व विश्वामित्र यांनीं आपलीं पूर्वींचीं वैरें पूर्णपणें लयास नेलीं आहेत, हें ज्ञान रामचंद्राला झालेलें असल्यामुळें, पूर्वींचाच खुनस मनांत धरून परशुराम-पीठिकेंतील जो पुरुष त्याच्याशीं दोन हात करावयास आला, त्याला मनांत खुळा समजून त्याचा या बाल क्षत्रियानें हातोहात पराभव केला !

## क्षत्रियवैराचे दुष्परिणाम--

अशा प्रकारें रामाच्या हस्तें पराभव झाला तरी परशु-रामाचें पीठिका-घराणें बुडवावें असें कोणासच वाटलें नव्हतें. परंपरेंत चालत आलेला क्षत्रियाबद्दलचा आकस या पीठिकेंत उत्पन्न होणाऱ्या लोकांच्या अंगीं सारखा वागत राहिला होता. हा आकस मधून मधून व्यक्त होई व त्याचा त्रास सबंध समाजाला होत असे. आणि म्हणून ज्या कश्यपाला,

क्षत्रियांपासून जिंकून घेतलेली सर्व पृथ्वी मूळ परशुरामानें दान केली होती, त्याच्या कुळांतील लोकांनीं या परशुराम-पीठिकेंतील लोकांस निक्षून सांगितलें कीं, हा प्रदेश सोडून तुम्हीं आतां दुसरीकडे जावें. काश्यपांनीं त्यास असें सांगावें हें अगदीं योग्य होतें. कारण मूळ परशुरामाच्या क्षत्रियवधानंतर समाजाची जी दुर्धर हानि झाली होती तिच्यांतून समाजाला मुक्त करण्याच्या कामीं या काश्यपांनीं पराकाष्ठा केलेली होती. समाजांतील क्षत्रिय नाहींसे झाल्यामुळें कांहीं धरबंध राहीना आणि म्हणून पृथ्वी रसातळास चालली असें भारतांत वर्णन केलें आहे. पृथ्वी बुडत असतां कश्यपानें तिला आपल्या मांड्यांत दाबून धरिलें व म्हणून तिला उर्वी हें नांव मिळालें असें म्हटलें आहे. पृथ्वीचें रसातळास जाणें याचा अर्थ स्पष्ट आहे; तो हा कीं, जी कांहीं थोडीबहुत समाजाची स्थिरस्थावर झालेली होती, व जिला क्षत्रियांच्या आधाराचा उपयोग झालेला होता, ती सगळी त्यांच्या वधामुळें विसकटून चालली होती. या आपत्तींतून डोकें वर काढण्यासाठीं कश्यपानें धडपड चालविली होती. या त्याच्या प्रयत्नाचें वर्णनही फारच मनोरंजक आहे. हैहय-कुल, पौरवकुल, शिबीचें कुल, प्रतर्दनाचें कुल, दधिवाहनाचे पुत्रपौत्र, बृहद्रथ याचा कुलतंतु, मरुताचे पुत्र हे सर्व ठिकठिकाणीं गुप्तरूपानें वेषांतर करून व अन्य व्यवसाय पतकरून राहिलेले होते. त्यांना परत आणून काश्यपांनीं क्षत्रियपदावर प्रस्थापित केलें अशी हकीकत आहे. आतां या त्यांच्या प्रयत्नांत जेव्हां परशुराम-पीठिकेंतील लोकांनीं व्यत्यय आणावयास सुरुवात केली तेव्हां " आतां तुम्हीं येथून निघून जा " असें त्यांनीं त्यास सांगितलें. परशुरामानेंही आपलें आतां कोणाशीं बनत नाहीं हें ओळखून संन्यास-वृत्ति धारण करून पश्चिम समुद्राकडे प्रयाण केलें. जेव्हां केव्हां समकालीन राजघरा-

ण्यांत कांहीं सल्लामसलत द्यावयाची असेल, कोणाला आश्रय द्याव-याचा असेल, कोणाची समजूत घालावयाची असेल त्या वेळीं समाजांत यावें, नाहीं तर आर्यसंस्कृतीचा दक्षिण भारताच्या टोंका-पर्यंत प्रसार करीत खालीं खालीं जावें, एवढाच उद्योग या परशु-रामपरंपरेंतील लोकांनीं पुढें चालू ठेविला. ब्राह्मणांवर कांहीं संकट आलें तर आम्ही धाऊन येऊं असें तो म्हणाला होता. पण चातुर्व-र्ण्यांकित समाज इतका दृढ होऊन गेला होता कीं, एका वर्णानें दुसऱ्याचा छळ करावा हें उरलेंच नव्हतें. आणि म्हणून परशुराम-परंपरेंतील पुढील लोकांना ब्राह्मणाच्या रक्षणास्तव पुन्हा केव्हांही धावून यावें लागलें नाहीं.

## आर्यधर्मप्रसाराचें काम—

आर्यसंस्कृतिचा प्रसार करण्याचें काम या परशुराम-पीठिकें-तील पुरुषांनीं पुढें चालविलें, कारण त्यांच्या मूळच्या परंपरेची आवश्यकता आतां राहिलेली नव्हती हें वर सांगितलेलेंच आहे. अंबेच्या निमित्तानें भीष्म व परशुराम यांचा जो संवाद झाला त्यांत परशुरामानें आपल्या बुद्धीचे जे कांहीं आग्रह म्हणून सांगितलेले आहेत त्यांत ब्राह्मणांचें संरक्षण हाही एक सांगितलेला आहे. पण इतिहास-पुराणांतील कथांवरून पहातां हें स्पष्ट दिसून येतें कीं,परशुराम हा ज्या ब्राह्मणांचा पक्षपाती, त्या ब्राह्मणांना यापुढें हाताशीं धरून त्यानें पश्चिमसमुद्राच्या कांठचा सबंध भूप्र-देश वसाहतयोग्य मात्र केला; व तेथें मागून क्षत्रियांनीं यावें व आपलें आधिभौतिक वर्चस्व प्रस्थापित करावें, वैश्यांनीं येऊन धनोत्पादन करावें अशा प्रकारची आर्यधर्माच्या प्रसाराची अमोलिक कामगिरी या पीठिकेंतील पुरुषांनीं त्यांजकडून करून घेतली हें जातिसंस्थेच्या इति-

ह्रासानें सिद्ध होतें. अगदीं दक्षिणेकडील ब्राह्मणांच्या कुळांत आपण कृष्णेच्या कांठावरून खालीं आलों अशा प्रकारच्या कथा चालू असतात; कृष्णाकांठचे ब्राह्मण आपण गोदेच्या कांठावरून खालीं आलों असें सांगतात; आणि गोदावरीच्या कांठचे ब्राह्मण आपण पूर्वीं नर्मदेच्या वर होतों व तेथून खालीं गोदावरीवर आलों असें सांगतात. ब्राह्मणांचें हें वरून खालीं खालीं सरकत जाणें हिंदु समाजाच्या व धर्माच्या प्रसरणशीलतेचें अगदीं आरंभीचें उत्तम द्योतक होय. पण त्यांच्या घरीं चालू असलेल्या वरील सर्व कथांत जी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे ती ही कीं, आपल्याला परशुरामानें खालीं आणलें असें या प्रत्येक नदीकांठचे ब्राह्मण मानत आले आहेत. याचा अर्थ असा कीं, ब्राह्मणांनीं खालीं खालीं उतरून आर्यधर्माच्या प्रसरणाचें काम अखंड चालविलेलें होतें. या ब्राह्मणांना खालीं खालीं नेणारा त्यांच्या मनानें जरी परशुरामच असला तरी तो म्हणजे तो आद्य परशुराम नव्हे याचें विवेचन आतांपर्यंत पुष्कळच केलेलें आहे. क्षत्रिय-कुलांताची वासना साफ नष्ट होऊन, आर्यधर्माचे प्रसारक जे ब्राह्मण त्यांच्या साह्यानें आर्यसंस्कृति पसरवीत राहणें एवढें एकच काम करीत बसण्याचें व्रत या पीठिकेंतील ज्या माणसांनीं पत्करिलेलें होतें त्यांपैकीं विशेष कर्तबगार असें कोणी परशुराम या ब्राह्मणांचे साहाय्यक असले पाहिजेत. भृगुतीर्था (भडोच) पासून तों तहत् कन्याकुमारीपर्यंत अनेक प्रकारचे ब्राह्मण या सखल भूप्रदेशांत आज कित्येक शतक वर्षेपर्यंत वसाहत करून राहिलेले आहेत व यांतील बहुतेकांचें नांव परशुरामाच्या कथेशीं निबद्ध आहे. इतकेंच काय पण बहुतेकांनीं त्यालाच आपला मूळ पुरुष मानिलें आहे, त्यांनीं त्याचीं देवालयें बांधलीं आहेत व राजवाडे यांनीं सांगितल्या-

प्रमाणें मलबारांत त्यांच्या नांवाचा शकही चालू केला आहे. पण याचा अर्थ या सर्वांना त्या मूळ परशुरामानें येथें आणून बसविलें असा नसून पुढील परशुरामांनीं त्यांना तेथें नेऊन वसविलें असा आहे.

## पीठिकांतर—

परशुरामाचें चरित्र ज्या एका कृत्यासंबंधानें प्रसिद्ध आहे तें आपल्याला सध्यां कितीही विस्मयकारक वाटलें तरी एवढें ध्यानांत हवें कीं, मानवी मन म्हणजे एक मोठा चित्रविचित्र वस्तुसंग्रह आहे, त्यांत हजारों प्रकारचीं चित्रें संग्रहित झालेलीं आहेत, तीं आपल्याला पसंत अथवा प्रिय असोत वा नसोत; पण तीं ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. त्यांतही करून या चित्रांशीं जर का इतिहास संलग्न असला तर तीं मुळींच विसरतां येत नाहींत. मात्र इतिहासाचें रूप कालदृष्टचा व आपल्या उत्क्रांति-क्रमाच्या दृष्टीनें यथादर्शन करविणारेंच असलें पाहिजे. नाहीं तर भलतेंच अभिमान बळावयाचे व तदनुरूप प्रतिक्रियाही संभवावयाच्या. आपलें सध्यांचें सुसंघटित समाजरूप जीवित प्राचीन काळच्या अनेक मानव-पुंजांच्या सन्निकर्षानें उत्पन्न झालेलें आहे. अशा सन्निकर्ष-प्रसंगांतील एक लोकोत्तर पुरुष म्हणजे परशुराम होय. भावी काळांत जी आपल्या बहुविध गुणांनीं मानवी समाजाला भूषणभूत ठरली त्या एका जमातीचा स्वाभिमान टिकवून धरणारा महापुरुष म्हणून परशुरामाचें नांव सामाजिक इतिहासांत चिरंजीव राहील यांत कांहींच नवल नाहीं. तो जर झाला नसता तर तेव्हांच्या असंस्कृत काळांत ही म्हणजे ब्राह्मणांची जमात नष्टच झाली असती किंवा स्वाभिमानशून्य असें जिणें जगत कशी तरी लडथडत राहिली असती. पण ज्या गुणाचा विकास या जमातीनें विशेषसा केलेला नव्हता

तोच गुण प्रकर्षाला नेऊन त्यानें एका प्रबळ वंशाचें किंवा वंश-खंडाचें अस्तित्व संभाळून धरलें व तें आदरणीय बनविलें ही मनुष्य-जातीच्या प्रगतीच्या वाटेवरील फार संस्मरणीय गोष्ट होय. शिवाय जितक्या अवधीपर्यंत अपमानास्पद गोष्टी घडत राहिल्या तितक्या अवधीपर्यंत ही स्वाभिमानहानीवरील पाळत ठेवण्याची पीठिका टिकवून धरणें ही बाबही बोधप्रद आहे. आपल्या कार्यांत हें सातत्य व ही चिकाटी हवीच हवी. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, सामुदायिक जीवनाची कळा विकसत जाऊन अर्धरानटी व उग्र असे विकार व अशा वासना समाज नियमित झाल्यानंतर या पीठिकेंतील पुरुषांनीं आपल्या कुळव्रताला **स्पष्ट निराळें वळण** दिलें ही होय. झिजून गेलेल्या पीठिका हट्टानें चालू ठेवण्यांत कसलाच कार्यभाग साधत नाहीं हें ओळखून त्याप्रमाणें व्रतांतर करणें हें फार समयज्ञतेचें व थोरपणाचें लक्षण आहे. आर्यधर्मीय लोकांच्या सामुदायिक जीवितक्रमांत ब्राह्मणांकडे जें संस्कृतिरक्षणाचें काम आलेलें होतें तें आपलेंसें मानून या परशुरामपंथीय मंडळींनीं तें विलक्षण हव्यासानें तडीस नेलें हें इतिहासावरून अनुमानितां येतें व भूगोलावरून निश्चित करतां येतें. अशा प्रकारचें हें व्रतांतर श्रीकृष्णाच्या युगमानांतच झालेलें होतें. व पुढील इतिहासावरून दिसून येतें कीं, हें बदलेलें व्रत कोणत्या ना कोणत्या रूपानें दक्षिण देशांत खुद्द इतिहासकाळांतही चालू होतें.

## वैरें विसरणें—

परशुरामाच्या इतिहासांतून जर कांहीं निष्पन्न होत असेल तर तें हें कीं, समाजवर्धनांत वैरें विसरणें हें अत्यवश्य असतें. परशुरामाच्या कथेंतूनच काय, पण हिंदुसमाजाच्या रचनाविधींत असे

कित्येक प्रकार दाखवितां येतील कीं, ज्यावरून हेंच निष्पन्न होतें. क्षत्रिय-संहार हें अघोरी कृत्य एका अघोरी वासनेंतून उद्भवलेलें होतें. पण कालांतरानें वासना व सूड हीं क्षीण होत गेलीं. परशुरामपंथीयांनीं हें ओळखलें कीं, शहाणपणाचा उदय झाला आहे, कां कीं क्षत्रियांनींही ओळखलें होतें कीं, आपला पूर्वींचा रानटी अवखळपणा जाऊन आपल्याला कांहीं एक सामाजिक पुढारीपण व सामाजिक गौरव व गांभीर्य प्राप्त झालेलें आहे. या दृष्टीनें पहातां स्त्रीविषयक आगळिक करणाऱ्या हजारों प्रबळ क्षत्रियांना कृतांतासारखा झालेला परशुराम हा, स्त्रीचें अपहरण करणाराला देहान्तशासन करावें लागतें व एकपत्नी व्रत हें समाजधर्माचें सारसर्वस्व आहे हें आपल्या भावी जिवितांत सिद्ध करणाऱ्या बाल रामचंद्राकडून पराभूत व्हावा हें अत्यंत युक्त दिसतें ! अशा प्रकारचे आर्यधर्माचे आधारस्तंभ, संस्कृतीचें उपासक, आणि उदारचरितांसाठीं सर्वस्व त्याग करणारे क्षत्रिय हे हिंदु समाजाच्या अग्रभागीं सरसावून आल्यानंतर परशुरामाच्या कृत्याची आवृत्ति करण्याची आवश्यकताच उरली नाहीं. आणि म्हणून परशुरामपीठिका रामचंद्राच्या कालापासून साफ बदलली. क्षत्रियांशीं वितुष्ट तर लांबच राहिलें पण दुजाभाव सुद्धां त्यांनीं ठेविला नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांच्यांशीं केवळ खेळीमेळीचें वर्तन ठेविलें. क्षत्रियांनींही निस्पृह अशा तापसांचा जो मान ठेवावयाचा तो ठेविला. श्रीकृष्ण व बलराम हे मथुरेहून पलायन करून दक्षिणेकडे आले असतां गोमंतक पर्वताचा आश्रय करून रहाण्याचा सल्ला त्यांना याच लोकांनीं दिला. अंबेनें आपली करुणकहाणी कथन केल्याबरोबर चित्त विरघळून भीष्मासही शासन करण्याचा उपक्रम याच लोकांनीं केला. कौरवपांडवांच्या युद्धपूर्व रदबदल्या म्हणजे शिष्टाया चाल-

लेल्या होत्या तेव्हांही कौरवांना सामोपचाराचा उपदेश यांनींच केला. यापुढें आर्यसंस्कृति दक्षिणापथभर पसरवून देण्याचें महत्तर काम यांनींच केलें. हें करतांना आवश्यक झालेल्या ब्राह्मणवसाहती स्थापण्याचें काम अगदीं सागरसीमेपर्यंत नेऊन भिडविण्याचा दीर्घोद्योगही या पंथीयांनींच केला. अशा प्रकारें कांहींशा संस्कृति-पूर्व कालांत उदय पावलेल्या एका जाज्वल्य भावनेचें रूपांतर हळू-हळू सौम्य, सार्वत्रिक हिताचें आणि प्रगमनशील असें झालें.

## प्रकरण पांचवें

# उरलेले मुद्दे

### महेन्द्रपर्वत म्हणजे कोणता पर्वत—

परशुरामाच्या हकीकतींत "इतकें बोलून भार्गवराम महेंद्र पर्वतावर चालता झाला" हें वाक्य अनेकदां येतें. अर्थात् हा महेंद्र पर्वत कोठें आहे हें प्राचीन भारतवर्षाच्या नकाशांत पाहिलें तर तो कलिंग प्रांतांत मही नदीच्या कांठीं आहे असें दिसून येतें. काश्यपांनीं निर्भर्त्सना केल्यानंतर आणि जवळ जवळ आतां येथून निघून जा असें सांगितल्यानंतर तो सह्याद्रीच्या खालीं येऊन राहिला. पण हें होण्याच्या पूर्वी तो या कलिंग प्रांतांतील महेंद्र पर्वतावर रहात होता हें स्पष्ट आहे. महेंद्र पर्वत याच ठिकाणीं होता हें भारतांतील दुसऱ्या एका कथेवरून दिसून येतें. पांच पांडव यात्रेस निघाले असतां ते गंगेच्या कांठानें पूर्वेकडे जातां जातां, सध्यां आपल्याला गंगानदीचीं जीं शेकडों मुखें दिसतात त्या मुखांच्या प्रदेशांत ते प्राप्त झाले. त्यांनीं शंभर नद्यांत स्नानें केलीं असें वर्णन आहे. गंगा नदी दक्षिणाभिमुख होतांना पात्रांतलि पाणी अपरंपार होऊन तें शेकडों प्रवाहांनीं समुद्रांत जाऊन मिळालेलें आहे हें नकाशावरून स्वच्छ दिसून येतें. हे शेंकडों प्रवाह म्हणजेच त्या शंभर नद्या होत कीं,

ज्यांत धर्मादिकांनीं स्नानें केलीं. हा स्नानविधि आटोपल्यानंतर ते दक्षिणाभिमुख झाले व मही नदीच्या कांठीं येऊन महेंद्र पर्वतावर भार्गवरामाच्या दर्शनास गेले असें म्हटलें आहे. अर्थात् भार्गवरामाचें कायमचें निवासस्थान बनलेला जो महेंद्र पर्वत तो या ठिकाणीं आहे हें उघड झालें. आतां वर लिहिल्याप्रमाणें कश्यपाच्या निर्भर्त्सनेमुळें परशुराम सह्याद्रींतून खालीं उतरल्यानंतर त्यानें आपली वसती महेंद्र पर्वतावर केली असेंच वर्णन हरिवंशांतहि दिलेलें आहे. हा कोंकणांतील महेंद्र पर्वत कोणता अशी जिज्ञासा होणें स्वाभाविक आहे. सध्यां ज्याला परशुरामाचा डोंगर म्हणतात तोच महेंद्र पर्वत होय असें कोंकणांतील दंतकथांवरून माजी गव्हर्नर क्रॉफर्ड यांनीं लिहिलेल्या कोंकणच्या हकीकतीवरून दिसून येतें. आतां सध्यांचा परशुरामाचा डोंगर किंवा त्याच्यासारखाच अधिक दक्षिणेकडचा दुसरा एकादा डोंगर म्हणजेच हा कोंकणांतला महेंद्र पर्वत असावा असें म्हणावयास आणखी एक जागा आहे. हरिवंशांत जरासंधानें मथुरेवर स्वारी करून कृष्ण व बलराम यांचा पराभव करून त्यांना पळवून लावल्याचें वर्णन आहे. निराश्रित झालेले हे उभयतां बंधु खालीं उतरत उतरत चालले होते. पाठीवर जरासंध चालून येतच होता. ते खालीं जात असतां त्यांची व परशुरामाची करवीर नगरीच्या आसपास गांठ पडली. हरिवंशांत म्हटलें आहे कीं, ही गांठ पडली त्या वेळीं परशुराम हा होमार्थ दूध काढावयाच्या आपल्या कामधेनूला घेऊन महेंद्र पर्वताकडे चालला होता. आतां हा महेंद्र पर्वत म्हणजे भरतखंडाच्या त्या टोंकाला असलेला मही नदीकांठच्या महेंद्र पर्वत खासच नव्हे. कारण होमाचें दूध काढावयास आपली धेनु घेऊन परशुराम चालला होता या सर्व शब्दांवरून मनांत अशी कल्पना येते कीं,

त्याचा आश्रम असलेला महेंद्र पर्वत जवळच कोठें तरी असला पाहिजे व म्हणून तो म्हणजे सध्यांचा परशुरामाचा डोंगरही असूं शकेल. आतां या डोंगराला महेंद्र पर्वत हें नांव कसें व केव्हां मिळालें हा प्रश्नही अतिशय मनोरंजक आहे. परशुराम कोंकणांत आल्यानंतर हा समुद्रालगतचा सर्व भूमिप्रदेश वसाहतयोग्य बनविणें, हें त्यांचें कामच होऊन बसलेलें होतें. वसाहत करतांना जुन्या गोड, मनोरंजक, आणि मनांत रुजून राहिलेल्या अशा आठवणी वसाहत करणारा आपल्या जुन्या भूमींतून घेऊन येतो, व ज्या ठिकाणीं आपण वसाहत करीत असूं त्या ठिकाणींही त्या स्मृति शिल्लक रहाव्या म्हणून आपल्या जुन्या भूमींतील स्थलविशेषांचीं नांवें या वसाहत-भूमींतील स्थलविशेषांस तो देतो, असें विवेचन मागें एके ठिकाणीं आलेलेंच आहे. तें लक्षांत घेतलें म्हणजे कोंकणांत महेंद्र पर्वत कोठून आला असावा हें कोडें आपोआपच उकलतें. या महेंद्र पर्वताकडे आपली गाय घेऊन परशुराम चालला होता हें उघड दिसतें. अर्थात् इतरत्र सांगितल्याप्रमाणें हा परशुराम म्हणजे आद्य परशुराम नव्हे तर त्याच्या परंपरेंत उत्पन्न झालेला व त्याच नांवानें ओळखला जाणारा त्या कालमानांतील पुरुष होता हें आतां सांगावयास नको.

## वर्णच्युति परशुरामामुळें नव्हे—

निरनिराळ्या जातींचे इतिहास वाचले असतांना असें आढळून येतें कीं, त्यांतील कित्येक परशुरामाच्या क्षत्रियवधरूप उत्पाताशीं आपला संबंध जोडतात. त्यांचें मुख्य म्हणणें असें असतें कीं, आपण मूळांत क्षत्रियच होतों परंतु परशुरामाच्या धाकानें क्षत्रियाचें नांव टाकून देऊन आपण अन्य व्यवसाय पत्करला व त्यामुळें

आपल्याला वैश्यपण किंवा शूद्रपण प्राप्त झालें. न्हावी, भाटिये, आग्री, भिस्ती, दर्जी, गोळ, गोंधळी, निळारी, खारक किंवा खरक, शिंपी, वंझे इत्यादि जातींच्या हकीकतींत आतांच उल्लेखिलेल्या-सारखा कांहीं प्रकार दृष्टीस पडतो. या जातींपैकीं ज्यांचें म्हणणें असें असेल कीं, आपण मूळ क्षत्रिय होतों ते परंपराप्राप्त ऐतिहासिक सत्यच कदाचित् सांगत असतील. हिंदु समाजांत परंपरा टिकवण्याच्या कामांत जो कांहीं एक विलक्षण चिकटपणा आहे त्याचा सामाजिक अभ्यासांत कांहीं थोडासा मान ठेवावाच लागतो. "जुन्याला धरून राहणारे" "हजारों वर्षे तेंच तेंच बोलत राहणारे" "जुनें तेंच सोनें मानणारे" अशा प्रकारची हिंदु समाजाचीं निंदाव्यंजक वर्णनें आपण पुष्कळदां वाचतों कारण त्यांच्या उद्धाराच्या कामीं हा त्यांचा दुर्गुण अतिशय आड येतो. पण त्यांची निर्भर्त्सना करतांना एक गोष्ट मात्र न कळतच सिद्ध होत चाललेली असते; ती ही कीं, हे लोक जुन्या परंपरा खरोखरच अबाधितपणें शाबूत ठेवतात. म्हणून असें वाटतें कीं, ज्या जाती क्षत्रियत्वावर आपला हक्क सांगत असतील त्या सध्यां अवनत स्थितींत असल्या तरी त्यांचा तो हक्क खरा असण्याचा पूर्ण संभव आहे. पण, त्यांची जी चूक आहे ती त्यांच्या दुसऱ्या विधानांत झालेली आहे. परशुरामाच्या उत्पातामुळें आपल्या वृत्तींत म्हणजे धनोत्पादनाच्या मार्गांत फरक पडला व म्हणून आपण खालच्या वर्णाचे झालों हें त्यांचें मत बरोबर नाहीं. एक एक वर्ण लोकसंख्येनें अत्यंत समृद्ध झाल्यानंतर त्यांतील सर्व लोकांना धनोत्पादनाचा शास्त्रविहित मार्गच चोखाळतां आला असता हें खरें नाहीं. लढण्याचें काम किती क्षत्रिय करतील आणि त्यांनीं करण्याचें मनांत आणलें असतें तरी त्या सर्वांना तें साधलेंच

असतें असें कसें म्हणावें? तसेंच प्रवृत्तीप्रमाणें पहातांही त्या वर्णांत उत्पन्न झालेल्या प्रत्येक माणसाला शूरत्वाचें स्फुरण होत असावें व आपण दुसरें कांहीं एक न करतां केवळ तलवारीचाच खेळ खेळत रहावें असें कसें वाटलें असेल? कलाकौशल्य इत्यादिकांत जों जों वैविध्य उत्पन्न होत चाललें, समाजाच्या वांछा जों जों भिन्न भिन्न आणि विपुल होत चालल्या, स्वास्थ्य लाभल्यानंतर मनुष्याच्या स्वभावाला सहज अशी जी हुन्नराची कल्पकता तिचा व्यापार जों जों होऊं लागला तों तों सर्व लोक एका तलवारीच्याच चाकरीनें चालत राहिले असतील हें खरें वाटत नाहीं. शास्त्रविहित नियमांच्या कैचींत मनुष्यस्वभावाची सहजप्रवृत्ति, कल्पकता इत्यादि शतकानुशतक कोंडून राहिली असतील हें खरें वाटत नाहीं. अर्थात् त्यांनीं निरनिराळे व्यवसाय सुरू केले असतील व त्यांतून पोटाला मिळतें असें सिद्ध झाल्यावर त्यांच्यापुढील पिढ्या तेच धंदे करीत राहिल्या असतील. मात्र आपण क्षत्रिय आहों ही कथा तेवढी घराण्यांत एकीकडे चालूच असावयाची व क्षत्रियत्वाला विसदृश असे धनोत्पादनाचे धंदे पतकरले असल्यामुळें दुसऱ्यांनीं त्यांना शूद्र म्हणावयाचें; असे किती तरी प्रकार या जातींच्यासंबंधानें झालेले आहेत. म्हणजे क्षत्रियत्व जें गेलें तें परशुरामाच्या उत्पातामुळें नव्हे तर यांचें आर्थिक जीवन मूळच्या ज्या संकोचित सांचांत बसविलेलें होतें त्यांत तें मावेना म्हणून होय. ज्या जातींनीं धनोत्पादनाचे मार्ग बदलले पण क्षत्रियत्वाचीं बाकीचीं लक्षणें, इतिहास, परंपरा हीं कायम ठेवलीं व घराण्यांत कर्मलोप होऊं दिला नाहीं त्यांच्यावर हा वर्णांतराचा प्रसंग मुळींच आला नाहीं. याचें ठळक उदाहरण म्हणजे कायस्थ हे होत. त्यांनीं हातीं लेखणी धरली व तीवरच ते आपला चरि-

तार्थ चालवूं लागले ही गोष्ट खरी असली तरी वर उल्लेखिलेली दक्षता त्यांनीं ठेवली असल्यामुळें ते क्षत्रिय या नांवानेंच ओळखिले जातात. अर्थात् त्यांनीं सुद्धां आपल्या वृत्तींत जो बदल केला तो अति प्राचीन कालीं झालेल्या परशुरामाच्या जाचामुळें नव्हे, तर वर्णकर्माविषयींच्या नियमनांत ते ते लोक मावेनात व म्हणून तीं नियमनें उल्लंघिल्यामुळें ते क्षत्रिय व्यवसायांतून बाहेर पडले.

## आणखी एक चुकीचें मत—

दुसरा एक सामाजिक विचार या ठिकाणीं थोड्या विस्तारानें सांगावयास हवा. " ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण काय ते शिल्लक आहेत. विशेषत: क्षत्रिय तर नाहींतच " या परंपरेनें चालत आलेल्या विधानाचा आरंभ परशुरामानें केलेल्या क्षत्रियवधाच्या कथेंतून होतो असें कोणी कोणी लोक म्हणतात; पण तें खरें नाहीं. कश्यप मुनींनीं किंवा त्यांच्या परंपरेंत उत्पन्न होणाऱ्या पुढल्या पुढल्या काश्यपांनीं क्षत्रियकुलें पुन्हा कशीं प्रस्थापित केलीं व समाजाला स्थैर्य प्राप्त करून देऊन त्याचा गाडा कसा सुरळीत चालू करून दिला याचा अल्प उल्लेख वर आलाच आहे. व त्याचें सविस्तर रूप पहावयाचें असल्यास महाभारताच्या शांतिपर्वांत दिलेलें आहे तें वाचून पहावें. अर्थात् क्षत्रियांचें जर एवढें पुनरुत्थान झालेलें होतें तर क्षत्रियकुलांताची कथा परशुरामाच्या नांवाशीं या पुनरुत्थानाच्या नंतर कोणासही जोडतां यावयाची नाहीं. हा क्षत्रियकुलांताचा प्रवाद जो उत्पन्न झाला तो बुद्धोत्तर कालीं झाला असावा. कारण बुद्धानें वर्णविषयक बंड केलेलें होतें व क्षत्रिय आणि वैश्य यांनीं त्यांच्या

हांकेला ओ देऊन त्यांचा मतपंथ स्वीकारला होता यांत कांहींच शंका नाहीं आणि म्हणूनच हे दोनही वर्ण कलियुगांत नाहींत हा प्रवाद चालू झाला असावा. परंतु तें कसेंही असलें तरी हा प्रवाद परशुरामाच्या कृत्यांतून उद्भवत नाहीं एवढी गोष्ट येथें मुख्यत: सांगावयाची आहे व तिचा पुरावा म्हणजे कश्यपानें आणि काश्यपांनीं क्षत्रियांचें पुनरुत्थान केलें व भरतखंड पुन्हा क्षत्रियांनीं गजबजून गेलें असें जें भारतावरून दिसून येतें तो होय.

**काश्यपगोत्राचा खुलासा—**

आणखीही एका लहानशा मुद्द्याचा विचार करणें प्राप्त आहे. कांहीं कांहीं युरोपियन लेखकांनीं असें म्हटलें आहे कीं, ज्या अब्राह्मण जातींना किंवा कुलांना सुद्धां आपलें गोत्र माहीत नसेल त्या जाती व तीं कुलें एकदम काश्यप गोत्र घेतात तें कां हें समजत नाहीं. पण वरील परिच्छेदांत दिलेली व परशुराम कथेंत सविस्तर सांगितलेली जी कश्यपमुनीची कथा तीवरून या शंकेचा उलगडा होतो. वाताहत झालेले आणि पिढ्यानुपिढ्या कोणाच्या तरी आश्रयास जाऊन राहिलेले असे जे क्षत्रियकुलोत्पन्न पुरुष होते त्यांना आपापल्या स्थानावर आणून बसविण्याचें जें महत्कृत्य तें काश्यपांनीं केलेलें होतें आणि या क्षत्रियांच्या पुन:स्थापनेमुळें समाजाची घडी चांगली बसून समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालू झाले होते. अर्थात् हे उपकार ज्यांच्या प्रयत्नामुळें झाले त्यांच्याच गोत्राचे आम्ही असें या सर्व लोकांनीं व थोरांचें अनुकरण करून बाकीच्या लहानांनींही म्हणूं लागावें हें अगदीं साहजिक दिसतें.

## प्रकरण सहावें

# पंचमानव-विचार

**स्वतंत्र मानवपण—**

येथपर्यंत परशुरामाच्या चरित्राचा अर्थ कसा बसतो याचें विवेचन केलें. परशुराम हा ब्राह्मणकुळाचा मूळ म्हणजे मुख्य पुरुष यांत कांहींच संदेह नाहीं. ही कल्पना एकदां मनांत स्थिर झाली बाकीचे वर्ण कोण, कोठील, त्यांची इतरांशीं नातीं कोणचीं, व त्या वर्णांचे मूळ अथवा मुख्य पुरुष कोण हें पहाण्याची बुद्धि उत्पन्न होते. "सूर्य अमुक एक न्याय पंचमानवांना सांगत तळपत जातो." असें मागें दिलेल्या एका सूक्तांत म्हटलेलें आहे. हे पंचमानव म्हणजे कोण हें पहावयास हवें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अवर्ण– पंचम—पंचमवर्ण—अंत्यज—अतिशूद्र इत्यादि नांवांनीं वर्णिलेले लोक हेच ते पंचमानव होत. फार पुरातन कालापासून या पंचमानवपणाची जाणीव समाजाला आहे. हिंदु समाजाच्या वर्णमूल बांधणीस ब्राह्मण क्षत्रियांच्या मनोमिलाफानें आरंभ झाला असें मागें दाखविलेंच आहे. वैश्यही याच तत्त्वावर अन्तर्भूत झाले. तदनंतर मात्र पराक्रम व धनसंचार या दोन तत्त्वांची भर पडून शूद्र व अवर्ण हेही समाजबांधणींत गोविले गेले. पण आपापलें स्वतंत्र मानवपण मात्र सर्वांच्याच ध्यानांत राहिलें.

**बलवत्तर प्रघात—**

या विचाराची दिशा दुसऱ्या एक बलवत्तर प्रघातामुळें अथवा सामाजिक अनुशासनामुळें कायम होते. हिंदु लोक जातिजातींत विवाह करीत नाहींत हें खरें; पण या त्यांच्या प्रघाताला शास्त्राचें समर्थन नाहीं. शास्त्र हें विवाहाच्या कामीं वर्ण जाणतें, जाति जाणत नाहीं. कांहीं जाती विवाहास अयोग्य धरल्या असतील; पण त्या संकर-जाती होत. शास्त्रानें इतकेंच सांगितलें आहे कीं, सवर्ण विवाहच संभावित विवाह होय. शास्त्रानें हे वर्ण चार सांगितले आहेत व पांचव्या वर्णाचा उल्लेख संदिग्ध व अर्धवट मान्य अशा पद्धतीनें झाला आहे. चातुर्वर्ण्य असें म्हटलें म्हणजे वर्ण चार हें आपोआपच दिसून येतें. पण येथें पांच प्रकारचे लोक आहेत हें "पञ्चभ्यो मानवेभ्यः" या वैदिक शब्दसंहतीवरून स्पष्ट होतें. पांच प्रकारच्या लोकांची जाणीव समाजाला अगदीं प्राचीन काळापासून होती. इतिहासांत, भूगोलांत, आचारविचारांत, आर्थिक न्यायांत, व्यवहार-जीवितांत, व वाङ्मयांत या जाणिवेची छाप सर्वत्र दिसून येते. वर्ण मुळींच नव्हते, चातुर्वर्ण्यकल्पना कधींही अस्तित्वांत नव्हती, अशा प्रकारचे उद्गार निघालेले आपण ऐकतों. हे काढणारांची सुधारणाबुद्धि स्तुत्य आहे पण इतिहासबुद्धि अशुद्ध आहे. चातुर्वर्ण्य नव्हतें असें म्हणणारांत दोन पंथ आहेत. लग्नव्यवहाराच्या दृष्टीनें ते नव्हते असें म्हणणारे कोणी आहेत व अर्थव्यवहाराच्या दृष्टीनें ते नव्हते असें म्हणणारे आणखी कोणी आहेत. या दोघांच्या विधानांचें परीक्षण करण्याचें हें स्थळ नव्हे, पण इतकें म्हटलेंच पाहिजे कीं, अपवाद-भूत गोष्टींना नियमरूप देऊन मूळ नियमरूप वस्तु नव्हतीच असें म्हणण्याकडे या लोकांचा कल असतो. सुधारणेची बुद्धि आपण

कितीही स्वतंत्र बाळगली तरी त्यांत कांहीं दोष नाहीं; पण मूळ ऐतिहासिक वस्तूंची ओळख मात्र यथारूपच असावयास हवी. " आर्थिक वाटणीचें व वर्णानुरूप कर्तव्याचें चालत आलेलें तत्त्व हिंदु समाजानें साफ टाकून दिलें पाहिजे आणि सृष्टीनें दिलेल्या मनबुद्धींच्या बीजभूत सामर्थ्याच्या विकसनास व विकसित झालेल्या सामर्थ्याच्या वापरास सर्वांस सारखी संधी दिली पाहिजे " हें सूत्र आम्ही आजवर सारखें सांगत आलों आहों आणि म्हणून सुधारणाविषयक बुद्धि ही स्तुत्य आहे असें आम्हांसही वाटणें साहजिक आहे. पण याचा अर्थ चातुर्वर्ण्य पूर्वीं नव्हतें असें अनैतिहासिक तत्त्व आम्हीं प्रतिपादिलें पाहिजे असें मुळींच नाहीं. या चातुर्वर्ण्याचे अथवा पांच प्रकारच्या लोकांचे आदिपुरुष, अथवा मूळ म्हणजे मुख्य पुरुष कोण हा विचार, वर म्हटल्याप्रमाणें, परशुरामचरित्रावरून मनांत येतो. ब्राह्मणकुळाचा मूळ परशुराम हें प्राचीन वाङ्मयाच्या वाचनानें मनांत चांगलें ठसतें. मग अर्थातच असें वाटूं लागतें कीं, या ज्या वर्णरूप किंवा लोकरूप जमाती किंवा लोकसमूह हिंदुधर्माच्या कक्षेंत सामावलेल्या आहेत यांचें मूळ किंवा मुख्य पुरुष कोण ? ब्राह्मण जसें परशुराम याच्या नांवाभोंवतीं गोळा झालेले इतिहासावरून दिसून येतें तसें इतर वर्णांचे किंवा लोकसमूहाचे असले प्रमुख पुरुष कोण ? यांचे आधार कोण ? यांचे प्रतिनिधीरूप पुरुष कोण ? ते आधाररूप पुरुष मात्र नष्ट झाले पण त्यांचे अनुयायी हिंदुत्वांत समाविष्ट झाले असें झालें आहे काय ? हिंदुत्वाचें अधिष्ठान होऊन बसण्याला त्या त्या पुरुषानें कांहीं केलें काय ? हिंदु समाजाच्या बांधणींत त्यांचीं स्थानें कोठेंशीं आहेत ? हीं स्थानें त्यांना कशीं व कोणी प्राप्त करून दिलीं ? असे प्रश्न मनांत उद्भवतात;

व या निरनिराळ्या पुरुषांना व लोकांना मिळालेली मान्यता अखिल हिंदु समाजाच्या मनःशरिरांत खेळत ठेवण्यास समाज रचणारांनीं कोणची किमया केली हें पहाणें अत्यंत अगत्याचें व मनोरंजकही वाटूं लागतें.

## जातींची वर्णमूलता—

याच 'पंचमानव'—भूमिकेपाशीं आणखी एका निराळ्या वाटेनें आपण येऊन पोंचतों. हिंदुलोकांच्या जातिसंस्थेचा इतिहास फारच बोधप्रद आहे. हा अफाट हिंदुसमाज चार सहस्र ठिकाणीं फाटलेला आहे. याच्या पोटांत चार सहस्र जाती आहेत. जात म्हणजे बेटीबंद लोकसमूह. असे सात आठ कारणांनीं पडलेले बेटीबंद समाज निदान चार सहस्र आहेत. यांनाच पोटजाती म्हणतात. या सर्व समाजांच्या म्हणजे पोटजातींच्या इतिहासरूप व वर्णनरूप हकीकती उपलब्ध आहेत. त्या वाचल्या म्हणजे वर्णकल्पना अथवा पंचकुलकल्पना किती भक्कम रूढ होती याचें यथातथ्य ज्ञान होतें. पोटजाती म्हटलें म्हणजे अनेक पोटजाती एका मूळ जातींतून निघाल्या हा बोध आपोआप होतो. या मूळ जाती म्हणजेच वर्ण होत. एकट्या मुंबई इलाख्यांतील पोटजाती कोणत्या याची बारीक मोजदाद करून पाहिली तर त्या जवळ जवळ १४५० भरतात. या सर्व जातींना आपापलें कुळगोत सांगतां येतें. इतिहासाची, व शास्त्राची विचक्षणा इतिहासकार किंवा शास्त्रवेत्ता उत्तम करील पण त्याच्या हातीं येणारा पुरावा अथवा साहित्य इतक्याशा कांटेकोरपणाचें नसतें. या पुराव्याची किंवा साहित्याची स्वीकार्यता हरून घ्यावयाची म्हटलें तर; किंवा निदान ती संदिग्धरूप बनवून ठेवावयाची म्हटलें तर शक्य असतें, कारण तिला अश्र-

ढ्यता चिकटवितां येते. पुष्कळ गोष्टी मूळांत सांगीव, परंपराप्राप्त अशाच असतात; पण त्या लेखनप्रविष्ट झाल्या म्हणजे त्यांना विश्वास्यता येते. तोंडचे शब्द लिखिताला जन्म देतात व लिखितें कांहीं गोष्टी तोंडांत खिळून टाकतात. या सहस्रावधि जातींना आपापलीं जातकुळें परंपरेनें माहीत झालेलीं आहेत व म्हणून त्यांच्यांतील माहितगारांनीं दिलेल्या हकीकती लेखनप्रविष्ट झालेल्या आहेत. जातिसंस्थेच्या अभ्यासाला अत्यन्त विपुल व विश्वास्य वाङ्मय म्हणजे हेंच आहे. त्याच्या परिशीलनानें स्वच्छ दिसूं लागतें कीं जर त्यांनींच सांगितलेल्या रस्त्यानें त्यांना मागें रेटीत नेलें तर या जातींची संख्या कमी होत होत सुमारें पंच-विसापर्यंत जाते. यांतही कांहीं जाती याच्यामागें सरकतच नाहींत कारण त्यांना त्यांच्या मागचें कुळगोत माहीत नसतें; कांहीं जाती मूळपुरुष म्हणून एका प्राचीन पुरुषाचें नांव सांगतात, कोणी नारदाचें, कोणी लवाचें, कोणी मारुतीचें. पण असें असलें तरी या सर्वांचें वर्गीकरण करतां येतें; व तें असें दर्शवितें कीं, या बावीस जातीहि चार-सहा प्रचंड लोकसमूहांत अथवा मानवकुळांत रिचवितां येतात, व त्यांचीं नांवें ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादीच आहेत. या विचारप्रणालीचा सविस्तर विचार 'समाजविचार व्याख्यानमालेंत' कांहीं वर्षांमागें तोंडींच केलेला आहे व 'हिंदुसमाजाचें भवितव्य' या नांवाचा जो ग्रंथ होऊं घातला आहे त्यांत सविस्तरपणें होईल. येथें येवढें सांगावयास हरकत नाहीं कीं, हिंदुसमाजाला ही जाणीव अगदीं खोलापर्यंत आहे कीं, आपण चातुर्वर्ण्यांकित आहों. कोणाला आपल्या सामाजिक पायरीचा अभिमान वाटत असेल किंवा कोणास तीबद्दल खंती

वाटत असेल; पण ही जाणीव मात्र सर्वांना आहे व हें जातिसंस्थेच्या अभ्यासावरून दिसून येतें.

### क्षत्रियांचा मूळपुरुष--

आतां यांपैकीं ब्राह्मणांच्याविषयींचा विचार मागें झालेला आहे व त्यांचा आदिपुरुष परशुराम हेंही पाहिलें आहे. यापुढील वर्ण जो क्षत्रिय त्याचा मूळपुरुष सिद्ध करणें अगदींच सोपें आहे. परशुरामाशीं समकालीन असे मोठमोठाले क्षत्रिय होतेच. पण क्षत्रिय समाजाचें मूळपुरुषत्व त्यांना अर्पण करणें अशक्य आहे. तेव्हां क्षत्रियांची जमात होती व तिनें राजाई निर्माणही केलेली असेल; पण तिला प्रतिष्ठा, संभावितपणा, किंवा तेजस्विता प्राप्त करून देणारा कोणी पुरुष श्रीरामचंद्रापर्यंत झाला नाहीं. आणि म्हणून क्षत्रियांचें प्रतिनिधीपण रामचंद्राकडे जातें. रामायण, महाभारत व पुराणें यांच्या आधारानें असें असंदिग्धपणें दाखवितां येतें कीं, क्षत्रियांचा मुख्य पुरुष म्हणजे राम हाच होय. या रामचंद्रानें वर्णसंस्था मानिली होती. पण अजून आर्य-अनार्य किंवा बहिस्थ व अत्रस्थ हा वाद चालूंच होता. म्हणून अत्रस्थांनीं आपणांवर आघात केले तर आपण त्यांस कसें कडकडीत शासन करतों हें रामानें स्पष्ट दाखवून दिलें. भूपृष्ठावरील इतर प्रदेशांतही संस्कृत लोकांच्या वसाहतींवर तत्रस्थ असंस्कृतांनीं आणिलेलीं स्त्रीविषयक संकटें सर्वपरिचित आहेत. रामावरही तसलेंच संकट आलें होतें. पण संघटना व शौर्य यांच्या बळावर त्यानें सिद्ध करून दाखविलें कीं, स्त्रीविषयक आगळीक करणारांचीं राज्येंही आम्ही धुळीस मिळवितों व शेवटीं त्यांचा निःपात करतों. परशुरामाचें रक्त ज्या कारणास्तव उचंबळलें होतें त्याच कारणा-

स्तव रामाचेंही उचंबळलें होतें. अंतर इतकेंच कीं, एक भांडण बहिस्थाबहिस्थांतील होते; व दुसरें, या बहिस्थांचा समाज बनल्यानंतर त्यांच्यांत व अत्रस्थ असंस्कृतांत जुंपलेलें होतें.

श्रीकृष्णही क्षत्रिय होय. रामानें अनार्यांवर विजय मिळविला व कृष्णानें, प्रस्थापित झालेल्या चतुर्वर्ण समाजांत कार्याकार्यव्यवस्थिति ठरविण्याचें लोकोत्तर काम आपल्या आचारानें व उपदेशानें केलें. आतां श्रीकृष्ण हा वैश्यांचा मूळपुरुष असें म्हणण्याकडे प्रवृत्ति होते. पण श्रीकृष्णाचा लहानपणचा सगळा संबंध जरी गवळी समाजाशीं होता तरी तेवढ्यावरून त्याचें वैश्यत्व सिद्ध होत नाहीं. कोणी कोणी अहिरसमाजांत विशेष उत्कटत्वानें रूढ असलेल्या श्रीकृष्ण-पूजेवरून त्याचा जन्म अहिर जमातींत झाला होता असें प्रतिपादितात. पण अहिर अथवा अभीर लोक हे पूर्वीं म्हणजे श्रीकृष्णाच्या वेळीं हिंदुसमाजाचे अवयव बनलेले नव्हते हें कृष्णकथेवरूनच सिद्ध होतें. श्रीकृष्णाच्या मृत्यूनंतर त्याची सर्व मुलेंमाणसें किंवा सर्व यादव स्त्रिया द्वारकेंतून हलवून सरस्वतीच्या कांठानें वर नेऊन हस्तिनापुरास न्याव्या या हेतूनें अर्जुन त्यांना घेऊन जात असतांना या अभीर लोकांच्या टोळ्यांनीं त्याच्यावर हला केला, त्यांचा पराभव केला व यादव स्त्रिया हरण करून नेल्या असें कृष्णाच्या चरित्रांतच सांगितलेलें आहे. अर्थात् हे कोणी तरी अर्धरानटी पुंड टोळ्या करून त्या वेळीं रहात असतील व त्यांचा व कृष्णाचा कसलाही संबंध नव्हता इतकें या कथेवरून सिद्ध होतें. वैश्य-समाजांत श्रीकृष्णपूजेचा प्रघात व त्याची लोकप्रियता जास्त आहे, यावरूनही श्रीकृष्णाचें वैश्यपण सिद्ध होत नाहीं. ब्राह्मणांनीं जशी राम व कृष्ण या क्षत्रियांची पूजा पत्करली तशी वैश्यांनीं कृष्णाची पत्करली असेल इतकेंच. स्वतंत्र-

पणें वैश्यपुरस्कार करणारा असा आदिपुरुष कोणी दाखवितां येत नाहीं. पण असें असलें तरी वैश्य म्हणून एक स्वतंत्र मानव होते यांत संदेह नाहीं. कारण ब्राह्मणक्षत्रियांच्या स्वतंत्रपणाचें तसें त्याही स्वतंत्रपणाचें प्रमाण वैदिक वाङ्मयांतही आहे. हे तिघेही लोक बाहेरून आले व त्यांनीं प्रथम समाजबांधणीला सुरुवात केली. हे तीन वर्ण एकत्र राहूं लागले व त्यांनीं आपलीं सामर्थ्यें एक करून घटना तयार केली. तथापि स्वतःचें पृथक्‌पण ठेवण्याचा अट्टाहास त्यांनीं धरला यांतही कांहीं शंका नाहीं. हा हट्ट त्यांनीं कां धरला याची उपपत्ति 'दुराग्रह' 'मागासलेपणा' इत्यादि भाबड्या कारणांशिवाय इतर कांहीं कारणांनीं सिद्ध करतां आली असती तर बरें झालें असतें. तें कसेंही असो. हे त्रिवर्ण आरंभापासून पृथग्जीवित लोक होते. पण शेजारधर्मानें राहूं लागल्यानंतर त्रिवर्ण लोकांना सामुदायिक जीवनाची कल्पना जलदीनें साध्य झाली.

**संकरो नरकायैव—**

परस्परांच्या बहिस्थपणाची व एतद्देशियांच्यापेक्षां श्रेष्ठतर सामर्थ्याची जाणीव हीच त्रैवर्णिकांच्या सामुदायिक सामाजिक जीवनाची आरंभक झाली यांत कांहींच संशय नाहीं. हे लोक जरी जीवितानें एक झाले तरी रक्ततः कां दूर राहिले याचें कारण खरोखरच ध्यानांत येत नाहीं. केवळ निराळे आहोंत म्हणून निराळेंच राहूं अशी कल्पना होती कीं हे लोकसमूह वर्णानेंच म्हणजे रंगानेंही निराळे होते ? पुष्कळ लोक, कीं ज्यांना हिंदुत्वाच्या दृढीकरणासाठीं सर्व वर्ण एक व्हावे असें अत्यन्त सद्बुद्धीनें वाटतें, ते आपल्याला श्रेयस्कर वाटणाऱ्या मार्गाला उपोद्बलक अशीं कांहीं

कांहीं उदाहरणें देतात व प्रतिपादतात, कीं पूर्वी मिश्रविवाहाची चाल होती; पण मागें म्हटलेंच आहे यावरून दुसरें एक अनुमान फलित होतें कीं तेव्हांही वर्ण होते. ते जर नसते तर अमक्या क्षत्रियाचा तमक्या ब्राह्मणीशीं विवाह झाला असें वर्णनामोच्चार वर्णन कधींच संभवलें नसतें. आपलें प्रस्तुत 'विवाहविचार' हें नाहीं. हे लोक निराळे होते व त्यांनीं हिंदुसमाज बनविला हें सांगावयाचें आहे. तेवढ्यापुरता विवाहाचा उल्लेख केला आहे. या लोकांनीं एक व्हावें कीं नाहीं या विचारांत सांप्रत्य असलें तरी प्रस्तुत लिहिणें परशुरामकथानुरोधानें इतिहासाचें उकलन करण्यासाठीं व हिंदुसमाजाच्या उत्तरोत्तर वाढीचें अवलोकन करण्यासाठीं असल्यामुळें विषयाच्या त्या बाजूकडे वळतां येत नाहीं. 'संकर हा नरकाप्रत नेतो' हा न्याय त्या सर्वांनीं म्हणजे त्रिवर्गांनीं मान्य केला, हें निःसंशय खरें आहे. ब्राह्मणांनीं सांगितलें आणि बाकीच्यांनीं ऐकलें हें बोलणें क्षत्रिय-वैश्यांच्या बुद्धिसामर्थ्याला उपमर्दकारक आहे. ऐहिक जीवितांतील सर्व व्यवहार सूक्ष्मपणानें पहाणारे हे वर्ण केवळ मानडोलवे होते असें म्हणणें सामाजिक इतिहासाच्या निर्लेप अभ्यासबुद्धीला असंमतच वाटेल.

### पतकरलेला न्याय—

क्षत्रिय वैश्यांनीं हा न्याय पतकरला असें म्हणण्यापेक्षां हा न्याय त्रिवर्णांच्या संमतीनें सिद्ध झाला असें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे. हा सिद्ध करतांना त्यांना कोणचे अनुभव आठवत होते आणि कोणचीं भयें त्यांना माहीत झालेलीं होतीं हें जर त्यांनीं लिहून ठेवलें असतें तर हिंदु समाजाच्या बांधणीचें आजपर्यंतचें महत्त्व विशेष प्रकारें ध्यानांत आलें असतें आणि त्याच्या

भवितव्याची दिशाही ठरविणें सोपें गेलें असतें. "नरकायैव" या शब्दानें अगदीं कडकडीत निग्रह दिसून येतो. परंतु कोणच्या अनुभव-श्रेणीवर हा नियम सिद्ध झाला हें ध्यानांत यावयास कांहीं साधन उरत नाहीं. पण प्रस्तुत आपल्याला त्यांच्याशींही फारसें कांहीं करावयाचें नाहीं. एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. अशा प्रकारचे लग्नाचे न्याय ज्या ठिकाणीं चर्चेस निघतात त्या ठिकाणीं असें दिसून येईल कीं, जास्त उन्नत लोक– ते खरे तसे असोत किंवा स्वतःस तसें केवळ मानत असोत– आणि कमी उन्नत लोक, यांच्यांत एक सूक्ष्म स्पर्धा चालू असते. उन्नतांना वाटतें कीं असे विवाह होऊं नयेत आणि तदितरांना वाटतें कीं असें व्हावयास कांहीं हरकत असूं नये. कारण उन्नतांना वाटतें कीं अशा विवाहानें आपण कांहीं गमावून बसूं आणि कमी उन्नतांना वाटतें कीं आपला कांहीं लाभच होईल. युरोपियन लोक व आफ्रिकेंतील किंवा आशियांतील काळे लोक यांचीं लग्नें व्हावीं किंवा न व्हावीं यासंबंधाची भवति न भवति चालू असली म्हणजे या मिश्रणाला युरोपियन्स प्रतिकूल असावयाचे, व आफ्रिकेंतील आणि आशियांतील काळे अनुकूल असावयाचे हा नेहमींचा न्याय आहे; आणि हा वर सांगितलेल्या लाभहानीवरच बसवलेला आहे. तसेंच जर असा एकादा प्रसंग घेतला, कीं ज्यांत हे दोनही पक्ष जर चांगले संस्कृत असले व तरीही दोनही पक्षांना हें मिश्रण नको असें वाटत असलें तर दोघांनाही आपापलें कांहीं नुकसान होणार आहे असें वाटत असलें पाहिजे हें उघड आहे. ज्या वेळीं त्रैवर्णिकांनीं वरील असवर्ण विवाहाची कल्पना त्याज्य मानली त्या वेळीं यांपैकीं प्रत्येक वर्णाला मिश्रणानें आपलें कांहीं नुकसान होण्याचा संभव आहे—कीं जें त्यांना तेव्हांपर्यंत मिळालेल्या अनुभवानें सिद्ध झालें होतें–असें म्हणा-

वयास हरकत नाहीं. असवर्ण विवाह हा ब्राह्मणांच्या मनाला जितका अप्रिय तितकाच क्षत्रियांच्या व वैश्याच्यांही मनाला होता. ब्राह्मणांनीं त्यांना तो तसा वाटावयास लाविला होता हें म्हणणें, वर एकदां म्हटल्याप्रमाणें, इतिहासाच्या निर्लेप चर्चेत टिकूं शकत नाहीं. कारण आपल्याला हें माहीत आहे कीं, क्षत्रिय-वैश्यांतही मोठमोठाले तत्त्व-वेत्ते, स्मृतिकार व नव्या पीठिका प्रस्थापित करणारे श्रेष्ठ पुरुष होऊन गेले आहेत. प्रत्यक्ष मनु हा क्षत्रिय होता हें विसरतां कामा नये. विश्वामित्रासारखे मोठमोठाले क्षत्रिय कीं ज्यांचें वैभव गोत्र रूपानें अजूनही शिल्लक आहे ते चार कपटी ब्राह्मणांनीं सांगितलेलें मुकाट्यानें पतकरून बसले असतील हें खरें नाहीं. शिवाय असें आहे कीं, त्यांना जर हा न्याय पसंत नसता, पण केवळ ब्राह्मणांना मात्र पसंत असता, तर त्यांनीं ब्राह्मणाला निराळें राखून आपली दोघांची एकात्मकता करण्यास कधींच मागें घेतलें नसतें. परंतु असें घडून आलेलें नाहीं, हें आपण पहातोंच. पण या विषयाच्या पोटांत गुंतलेले जे बारीक सारीक राग-लोभ आहेत त्यांच्याकडे आपलें लक्ष लावण्यापेक्षां सुद्धां परस्पर-संमतानें हा न्याय एकदांचा कायम करून समाजाच्या आणि राष्ट्राच्या बांधणीला या त्रिवर्गांनीं हौसेनें सुरुवात केली ही गोष्ट खरोखर लोकोत्तर होय.

**लोकसत्तेची खरी योजना—**

समंजसपणा आणि सहिष्णुता यांचें एवढें प्रगल्भ उदाहरण दुसरीकडे कोठें सांपडेल असें वाटत नाहीं. ही सामुदायिक जीवनाची कल्पना या त्रिवर्गांनीं एकदां उचलल्यानंतर या हिंदुस्थान देशाचें त्यांनीं केवळ नंदनवन करून टाकिलें.

पण या सामुदायिक आस्थेवाईकपणाच्या मनःस्थितीस येण्यास ब्राह्मणांना परशुरामाचा इतिहास व त्यांतील वैरभाव हीं केवळ निर्विष करून ध्यानांत ठेवावीं लागलीं असतील; आणि क्षत्रियांना देशाचे पुरस्कर्ते म्हणून प्राप्त झालेल्या आपल्या वैभवाच्या तोलदारीमुळें परशुरामाचें निर्घृण कृत्य केवळ कौतुकाचें म्हणून सहज विसरतां आलें असेल. ब्राह्मणांनीं क्षत्रियांतील जे अवतारी पुरुष, त्यांचीच भक्ति पत्करली आणि त्यांचा महिमा एवढ्या उंच घोषानें गाऊन ठेविला कीं, अजूनही त्या गायनांतील स्वारस्य नष्ट झालेलें नाहीं. क्षत्रिय-वैश्यांनीं ब्राह्मणांचें विद्येंतील व परमार्थांतील पुढारीपण मान्य केलें आणि स्वतःचीं घरें व एकंदर देश धनधान्यांनीं समृद्ध करून टाकला. याचें नांव खरा मनोमिलाफ. डिमॉक्रसीची ही खरी कल्पना होय. आपापले गुणदोष ओळखून, आवडी नावडी ध्यानांत घेऊन परस्परांच्या जीवितांतील नात्यांची अशी परस्परमान्य जुळणी करून घेणें हें इतक्या दूरच्या काळांतील लोकांनीं सिद्ध करून दाखविलें होतें, ही गोष्ट आधुनिक पद्धतीची लोकसत्ता स्थापितांना सर्वांनीं ध्यानांत ठेवावयास हवी.

### लोकसत्ता म्हणजे शासनाभाव—

'लोकसत्ता' शब्दानें राजसत्तेचा व्यवच्छेद होतो व लोकांच्या हातांतील शासनसंस्था असा बोध होतो. प्रस्तुत ठिकाणीं लोकसत्ता शब्दाचा उपयोग शासनसंस्थेचा एक प्रकार या अर्थानें केलेला नाहीं. आतां शासन म्हणजे नुसतें देशांतील सुचरितांसाठीं रक्षक पुरविणें असा अर्थ आपण पत्करीत नाहीं. तर देशांतील जे कोणचे व्यवहार असतील ते सुरळीत चालण्यासाठीं त्यांना

शासनपद्धति घालून देणें, नियमावलि तयार करणें, त्या व्यवहारांवर वचक ठेवणें, व शेवटीं हीं निर्बंधनें मोडणारास शासन करणें हें सर्व आपण समजतों व देशांतील शासनसंस्था जरी लोकसत्ता असली तरी ती हें सर्व करते. लोकांच्या व्यवहारांत अगदीं खोलपर्यंत या शासनसंस्था म्हणजे हीं सरकारें शिरतात. पण ही खरी लोकसत्ता नव्हे. आपापले व्यवहार आपापसांत देवघेवीच्या व मनोनुनयाच्या रूपानें ठरवितां येणें व सामुदायिक हिताकडे दृष्टि ठेवून ते सुखासमाधानानें चालवितां येणें याचें नांव लोकसत्ता हें होय. या प्रकारांत लोक आपले आपणच धनी होतात व परस्परव्यवहारांचें नातें ठरवितात. यांत कांहीं बिघाड झाल्यास आपापसांतच शासन करतात. इतकेंच नव्हे, तर याहून विशाल अर्थानें प्रस्तुतचा लोकसत्ता शब्द घातला आहे. एकादा राजा किंवा जेता किंवा अडदांड झोडप्या आपल्या पराक्रमगुंफेंत जे कोणी सांपडतील त्यांना एकत्र राबवितो, त्यांना एकत्र दामटतो व त्या सर्वांचा एक समाज झाला आहे असें मानतो. पण त्याची शक्ति क्षीण झाली आहे हें दिसूं लागतांच ते जबरदस्तीनें एक झालेले लोक आपलीं डोकीं पुन्हा वर काढतात व सिद्ध करतात कीं कोणाच्या तरी धाकानें आपण एकत्र रहात होतों, आपले व्यवहार आपण स्वखुषीनें करीत नव्हतों, तर वरून कोणी तरी दडपत असल्यामुळें तें करणें आपल्याला भागच होतें. तसेंच लोकसत्तेचें सुद्धां होईल. लोकसत्ता असेल पण ती राजकीय लोकसत्ता असेल. सामाजिक लोकसत्ता मात्र तेथें नसेल. राजा नाहीं म्हणजे राजसत्ता नाहीं व लोकमत सत्ताधारी होतें म्हणून लोकसत्ता आहे येवढ्याच अर्थानें ती लोकसत्ता ठरते पण तिचें स्वरूप केवळ राजकीय रहातें. खरी सामाजिक लोकसत्ता ती होय कीं जींत लोक स्वखुषीनें एकमेकांच्या

सान्निध्यांत येतात, वैरभाव विसरतात, ज्या बाबतींतील आग्रह उभयतांनाही सुटत नाहींत ते मान्य करतात, परस्परांच्या प्रवृत्ति व सामर्थ्यें हीं विचारांत घेऊन तीं सामुदायिक जीवनाला कल्याणकर कशीं बनवितां येतील याची विवंचना करून तीं तशीं करून घेतात. त्यांना कोणी तिऱ्हाइतानें हें करावयास भाग पाडलेलें नसतें. त्यांचें त्यांसच कळलेलें असतें कीं, असें करावें व तें मानवी स्वभावाकडे लक्ष देऊन त्यांनीं घडवून आणिलेलें असतें. ही खरी लोकसत्ता होय. त्यांनीं इतका समंजसपणा पतकरलेला असतो कीं बाहेरील शासनाची त्यांना आवश्यकताच भासत नाहीं. शासन त्यांचें त्यांनीं पत्करलेलें असतें. ही एक जणूं कांहीं शासनाभावावर रचलेली anarchism च्या जातीची समाजरचना होय. त्रिवर्णांनीं ही रचना निःसंशय केलेली होती. त्यांनीं राजा ठेविला होता पण तो निरनिराळ्या लोकांना समुदायरूपानें एकत्र आणण्यासाठीं व वागविण्यासाठीं ठेविलेला नव्हता; तर मुख्यतः परचक्र निवारण्यासाठीं व लोकांनीं आपापसांत प्रस्थापित केलेले न्याय कोणी मोडील तर त्यास दंड करण्यासाठीं ठेवलेला अधिकारी म्हणून होता. म्हणजे आधुनिक परिभाषेप्रमाणें जरी तेव्हां राजसत्ता होती तरी ती, लोकांनीं पतकरलेली जी सामाजिक लोकसत्ता तिच्या रक्षणासाठीं होती इतकेंच. या अर्थानेंच वर म्हटलें आहे कीं त्रिवर्णांनीं खरी लोकसत्ता निर्माण केली. या लोकसत्तेची वाढ त्रिवर्णांनीं यापुढें अत्रस्थांत कशी केली; पण हीच त्रिवर्ण लोकसत्ता शेवटीं अत्रस्थांवर आपला शक कसा चालवूं लागली याचें विवेचन पुढें महादेवाविषयीं लिहितांना येईलच; असो.

## त्रिवर्ण मिलाफाची किमया—

ही जुळणी बसवितांना, एक रक्तसंबंध सोडून, जितक्या जास्त बाबींत एकात्मता साधतां आली तितकी साधण्याचा उद्योग या लोकांनीं केला व तो यशस्वी करून दाखविला. या उद्योगांतील प्रमुख कलमें म्हणजे परस्परांचीं तत्त्वज्ञानें, इतिहास, पारमार्थिक हिताहितें, परस्परांतील श्रेष्ठ पुरुषांबद्दलची गौरवबुद्धि, धर्मग्रंथा-विषयींची समानता, सांपत्तिक वाटणीवरील श्रद्धा व तिची न्याय्यता स्वीकारण्याची तत्परता इत्यादि होत. ही जुळणी बरोबर होती कीं चूक होती व बंधुभावानें ही टिकवून धरण्याची तत्परता त्यांनीं राखिली होती ती युक्त कीं अयुक्त हा प्रश्न चिकित्सकांनीं वाटल्यास चिकित्सावा. पण तेव्हांच्या लोकांना त्याची उपयुक्तता निःसंशय पटली होती. आणि हिंदुसमाजाच्या बांधणीचा विचार आपण करीत असल्यामुळें प्रस्तुत प्रसंगीं तेवढ्याच विचाराचें महत्त्व आहे. ज्यांनीं आपली राक्तिक एकी पतकरली नाहीं त्यांनींही राष्ट्र व समाज बनविला. राष्ट्र व समाज बनवितांनाही राक्तिक एकीचा प्रयोग आवश्यक मानिला नाहीं. हें सांगतांना त्यांचा गौरव करावयाचा नाहीं किंवा त्यांच्या कृत्यास पसंतीही दाखवावयाची नाहीं. तर जेथें परस्परांचें खरोखरच जमत नाहीं तेथें परस्परांच्या भावनांची गय करून समाजसंवर्धनासाठीं तदितर बंधनांवर व न्यायांवर भर देऊन राष्ट्रनिर्मिति करणें हें काम त्रिवर्णांनीं जास्त सोपें मानलें व तें प्रत्यक्ष करून दाखविलें हें सांगावयाचें आहे. असो, पण हिंदुसमाज तीन कुळी नसून पंचकुल आहे व या पांच 'मानवांचे' पांच मुख्य मूळपुरुष अजूनही दाखवितां येण्यासारखे आहेत हें आपण पहात आहों. तसेंच हीं पांच कुळें

कोणच्या किमयेनें एकत्र आलीं याचें दिग्दर्शन आपण करीत आहों. या पंचकुळांपैकीं पहिल्या तीन कुळांचा विचार येथपर्यंत झाला. पण शूद्र व अतिशूद्र किंवा पंचम किंवा रानट यांचा विचार अजून व्हावयाचा आहे.

## पाताळांतील बळी—

बळी व महादेव या थोर व्यक्तींच्या नांवाभोंवतीं जमा होणारे दोन वर्ग शूद्र आणि अतिशूद्र या नांवानीं पुढें हिंदु समाजांत अन्तर्भूत झाले. बळीच्या अनुयायांची संस्कृति जमीन कसण्या-पलीकडे फारशी गेलेली नव्हती. या बळीचा व नवागत बहिस्थांचा झगडा जोरानें झाला आणि शेवटीं तेथून पूर्वेकडील सीमान्तापर्यंत त्याला या जेत्यांनीं रगडीत नेलें हाच बोध ' त्रिपादभूमी 'च्या कथेवरून होतो. शास्त्रवेत्ते असें सांमतात कीं फार पूर्वीं दक्षिण हिंदुस्तानापासून पूर्वेकडे सलग भूमि होती. या भूमीच्या सीमांतापर्यंत म्हणजे पाताळापर्यंत जेत्यांनीं बळीला दडपीत नेलें हा या कथेचा भावार्थ दिसतो. समुद्राची पहाणी करणारांनीं ठिकठिकाणीं पाण्याचा ठाव घेऊन फिलिपाइन बेटांतून ईशानीकडे झुकत जाणारी अशी एक रेषा निश्चित केली आहे. हिला Line of Walace असें नांव आहे. हिच्या पश्चिमेकडच्या बाजूचा म्हणजे चीन, जावा, बोर्निओ इकडच्या अंगचा समुद्र बराच उथळ असून, तिच्या पूर्वेकडचा म्हणजे ऑस्ट्रेलियाच्या बाजूचा समुद्र फारच खोल आहे. विशेष हें कीं या रेषेपासून पूर्वेकडे पाऊल टाकलें कीं समुद्र एकदम, म्हणजे उतरत उतरत नव्हे तर एकदम, अथांग खोल होतो. त्याच्या मानानें हिच्या पश्चिमेकडचा समुद्र इतका उथळ आहे कीं, खालची

भुई जरा कुशीवर वळली तर तेथें भूपृष्ठ समुद्राच्यावर दिसूं लागेल. या रेषेच्या शोधामुळें पूर्वी म्हणजे फारच प्राचीन काळीं कीं, जेव्हां आर्यांचाही उपसर्ग हिंदुस्थानास लागलेला नव्हता, तेव्हां दक्षिण हिंदुस्थानच्या पूर्वेकडे सलग भूमि होती या शास्त्रीय अनुमानास बळकटी येते. या भूमीचें शेवटचें टोंक म्हणचे सध्यांचें बळी बेट हें होय. या बलिप्रदेशाच्या पूर्वेस प्रचंड महासागर सुरू झाल्यामुळें याला पाताळ ही संज्ञा मिळणें अगदीं स्वाभाविक होतें. या पाताळ-रूप प्रदेशापर्यंत बळीला दडपीत नेलेलें होतें. हें अद्भुत कृत्य परशु-रामाच्याही पूर्वी किती वर्षें झालेलें होतें हें सांगतां येणें कठीण आहे. त्या प्रदेशापर्यंच्या सर्व भूपृष्ठावर पुढें आर्यधर्माचा प्रसार झाला आणि त्याचेच अवशेषभूत असे जे जावा, सुमात्रा इत्याहि द्वीपसमूह त्यांच्यावर तर या धर्मप्रसाराच्या खुणा अजूनही शिल्लक आहेतच. वामनाचें कृत्य आणि आर्यधर्माचा हा तेथील प्रसार हीं एका काळचीं असें येथें सांगावयाचें नाहीं. आर्यधर्माच्या प्रसाराच्या कित्येक शतकें पूर्वी ही अवनत दशा बळीला आली असावी.

## बळीराणा !—

वामनाचें हें बलिदंडनाचें कृत्य प्राचीनतम कालांतील एक मोठें अचाट कृत्य होय. वामनाला जरी अवतारपद प्राप्त झालें असलें तरी तें, मागील इतिहास अवताराच्या रूपानें व त्या त्या पुरुषावतंसाच्या कथेच्या रूपानें शिल्लक ठेवावयाचें, ही जी पुढील लेखकांनीं प्रथा घातली तिचें फळ होय. खुद्द वामन हा कोण होता व विशेषतः तो बटु कां असावा यासंबंधींच्या कल्पना मनांत आल्या तरी त्यांचा ऐतिहासिक गुण प्रस्थापित होण्याच्या

योग्यतेच्या त्या नाहींत. कदाचित् असें असणें संभाव्य आहे कीं, ज्या वामनानें बळीस पादाक्रांत केलें तो अशाच लोकांपैकीं असावा कीं जे बलिवंशीयांच्या मानानें आखूड बांध्याचे असावे; पण शस्त्रास्त्रविद्येच्या कामीं त्यांची तयारी फार मोठी असल्यामुळें त्यांनीं दोन तीन झापांतच बळीस हैराण केलें असावें. राम हा सुद्धां रावणाच्या मानानें शरीरानें लहानच होता, तथापि शस्त्रास्त्र-विद्येच्या बळावर त्यानें रावणाचा निःपात केला; असो. वामन कोणीकडून आला, त्या वेळीं भावी भरतखंडाची स्थिति कशा प्रकारची होती, याची कांहीं ऐतिहासिक कल्पना बसविणें दुरापास्त आहे. बळीच्या या एका कथेवरून येवढाच इतिहास मनश्चक्षूंपुढें उभा रहातो. वामनाचें हें अचाट कृत्य आर्यधर्माच्या ऐतिहासिक पुराणांत दाखल झालें; व बळीच्या सर्व प्रजा भरतखंडाचा कब्जा ज्यांनीं आपल्याकडे घेतला त्यांच्या वर्चस्वांत दाखल झाल्या. मराठी भाषेंत शेत-कऱ्याला बळी राणा म्हणून म्हणतात या गोष्टीला फार उत्तम अर्थ आहे. फारा दिवसांच्या आठवणी हिंदु समाज कशा जिवंत ठेवतो व म्हणून त्या बघत बघत मागें जाणें निदान मनोरंजक तरी आहे असें जें मागें एके ठिकाणीं म्हटलें आहे त्याचें प्रत्यंतर येथें येण्यासारखें आहे. बळीराण्याची आठवण परंपराप्राप्त आहे व ती शेतकी करणारांच्या हाडींमांसीं खिळलेली आहे. अशाच प्रकारची एक जुनी पण कायमची टिकून राहिलेली ओळख याच प्रकरणीं मोठी बोधप्रद आहे. पुढें दिलेल्या श्लोकांत 'सुकाळीच्या' अशी शिवी आहे; ही शिवी मनुस्मृतीइतकी तरी जुनी आहे. ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादिकांच्या पूर्वजांचा उच्चार करतांना शूद्रांच्या पितरांचें नांव सुकाली आहे असें म्हटलेलें आहे. सोमपा

नाम विप्राणां क्षत्रियाणां हविर्भुजः । वैश्यानामाज्यपा नाम शूद्राणां तु सुकालिनः ॥ सोमपास्तु कवेः पुत्रा हविष्मंतोऽगिरःसुताः पुलस्त्य स्याज्यपाः पुत्रा वसिष्ठस्य सुकालिनः ॥ या मनुस्मृतींतील दोन श्लोकांपैकीं पहिल्याच्या शेवटीं शूद्राच्या पूर्वजाचें नांव सुकाली आहे असें म्हटलेलें आहे. शूद्राच्या पितराचें नांव सुकाली, आणि शूद्र हे क्षुल्लक धरलेले; म्हणून ज्याला क्षुल्लक करावयाचें असेल त्याचा पूर्वज सुकाळी हा होता असें म्हणावयाचें व त्यास 'सुकाळीच्या' असें संबोधावयाचें अशी अडाणी लोकांत रीत आहे. वास्तविक ही शिवी मूळांत वरिष्ठांच्या तोंडीं असली पाहिजे.पण तेथून पसरत पसरत खालीं जाऊन आतां तर ती केवळ तेथेंच राहिली आहे व म्हणून खालचे लोक एकमेकाला सुकाळीच्या अशी शिवी देतात. जुनी आठवण कशी रहाते याचा नमुना म्हणून हा सांगितला. पण प्रस्तुत स्थलीं तो सांगण्याचें कारण असें कीं, अगदीं निकृष्ट स्थितींत राहिलेले जे बळीचे अनुयायी म्हणजे सुकाळीचे किंवा बली-पुत्र ते नवीन विजेत्यांच्या वर्चस्वाखालीं सांपडले व ते तसे आजकाळपर्यंत तहत राहिलेले आहेत हें सांगावयाचें आहे. अर्थात् बळी व सुकालि यांचा संबंध सांगतां येत नाहीं. या प्रकरणीं थर्स्टन यानें ऑस्ट्रेलियांतील कांहीं जमाती व दक्षिण हिंदुस्थानांतील कांहीं जमाती यांच्या अंगचें कांहीं विशेष कसे अगदीं सारखे आहेत, तसेंच त्यांचीं हत्यारेंपात्यारेंही कशीं अगदीं जुळतात, यासंबंधाचें केलेलें विवेचन अत्यंत सूचक आहे. याहीपेक्षां विशेष म्हणजे ऑस्ट्रेलिया व दक्षिण हिंदुस्थान यांतील वनस्पति व प्राणिवर्ग यांच्यांत मात्र कसलेंच साधर्म्य नसावें आणि कांहीं कांहीं जमातींच्या गुणधर्मांत मात्र तें असावें ही गोष्ट मानवी समाजांच्या इतिहासपूर्वकालीन ज्या प्रचंड हालचाली झाल्या

त्यांची कल्पना आपल्याला आणून देते व वामनानें थेट समुद्र-कांठापर्यंत पिटाळीत नेलेल्या लोकांची विपद्ग्रस्त अशी ही आधुनिक प्रजा तर नसेल ना अशी शंका या सादृश्यानें आपल्या मनांत उत्पन्न होते. तें कसेंही असो, पण केवळ जमीन कसणें या कामांत जे लोक येथें सातत्यानें व अनादिकालापासून राबत आलेले आहेत व ज्यांना शूद्र या नांवानें स्थूल मानानें संबोधितात ती निदान दक्षिण हिंदुस्थानांतील सर्व प्रजा बलीच्या अनुयायांची होय. या लोकांचा अंतर्भाव हिंदूंची समाजरचना करणारांनीं चौथा वर्ण म्हणून केली. हिंदू समाजाच्या पंच मानवांपैकीं शूद्र हे चवथे मानव होत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे परस्परांकडून जित झालेले लोक नव्हते. पण शूद्र हे जित मानव होत. त्यांचा मूळ किंवा मुख्य पुरुष बळी हा खरा; पण या झगड्यांत तो व त्याचें घराणें उध्वस्त होऊन त्याच्या प्रजा जेत्यांच्या हवालीं झाल्या. या जित प्रजा स्वतंत्र ' मानव ' म्हणून हिंदू समाजांत अन्तर्भूत झाल्या. ह्यानंतर अतिशूद्रांविषयीं पहावयास हवें.

### लिंगपूजा—

एक गोष्ट निश्चित आहे कीं, आतांपर्यंत समाजबाह्य असलेल्या लोकांच्या मूळ जातिकथा तपासून पहातां त्यांचा संबंध महादेवाशीं फार पोंहोचतो. अस्पृष्ट लोकांच्या कथांवरूनच हें दिसून येतें असें नव्हे तर भिल्ल व कोळी यांच्यांतसुद्धां महादेवाची देवताविषयक कल्पना त्यांच्या अस्तित्वाइतकीच जुनी आहे. महादेवाची पूजा म्हणजे लिंगपूजा होय. आणि लिंगपूजा ही अत्यंत प्राचीनतम कालीं केव्हां ना केव्हां तरी सर्व पृथ्वीभर चालू होती यांत कांहींच शंका नाहीं. युरोप खंडांतील प्रत्येक देशांत व

आशियांतीलहि सर्व देशांत ही पूजा केव्हां ना केव्हां चालू होती. जशीं जशीं माणसांचीं मनें हळूहळू उत्क्रांत होऊं लागलीं तशी तशी या पूजेंतील केवळ लिंगविषयक कल्पना मागें पडूं लागली. लिंगाची पूजा तरी, तें नवीन जीविताचें, नवीन फलाचें, जनक म्हणूनच होत होती. शेतावर पिकें उत्पन्न करणाऱ्या देवतांची पूजा ज्या कारणास्तव उत्पन्न झाली त्याच कारणास्तव पण त्याच्या फार पूर्वी लिंगपूजा सुरू झाली. एकाची पूजा धान्याचें पीक आलें म्हणून आणि दुसऱ्याची पूजा माणसाचें पीक आलें म्हणून.

**मानवी मनाचें एकपण—**

लिंगपूजेच्या वर्णनानें मनांत जी किळस उत्पन्न होते ती साहजिक असली तरी मानव्याच्या इतिहासाचें अवलोकन करतांना ती आपल्या मनांतून अगदीं गळून गेली पाहिजे. माणसाचें सध्यांचें अत्यंत प्रगल्भ रूप त्याला आरंभापासूनच प्राप्त झालें आहे असें मानणें अर्थातच अनैतिहासिक आहे. असें जर आहे तर त्याच्या आरंभीच्या इतिहासांतील अप्रगल्भपणाची एखादी खूण केवळ रूपांतरानें शिल्लक राहिली असली तर तिच्या अभ्यासाच्या कामीं आपण आपलें मन निर्लेपच ठेवावयास हवें. शिवाय ही लिंगपूजा केवळ हिंदुस्थानांतच होती असें नाहीं. अवघ्या पृथ्वीवरील मनुष्यप्राण्याचें मन, तें मूलत: एकरूप असल्यामुळें, त्या त्याच प्रणालींतून पुढें सरकलेलें आहे. राग, लोभ, मद, मत्सर, ईर्षा, असूया, कपट, प्रांजलपणा इत्यादि भावना पृथ्वीवरील सर्व माणसांच्या मनांत सारख्याच असल्यामुळें त्यांच्या मनाची जी एकरूपता आपल्याला दिसून येते तीच त्यांच्या मनांच्या विकसन-व्यापारावरूनही प्रत्ययास येते. कोठें एखादा व्यापार आधीं झाला

असेल, कोठें उशिरां झाला असेल; पण मानवी मनाचे उन्नतिपथावरील भ्रमण सारखेंच असतें. या सारखेपणास अनुसरून त्या मनाची अगदीं प्राथमिक चलनवलनें काय होतीं हें पाहिलें तर त्यांतहि सारखेपणा दिसून येतो. हिंदू समाजाचे अत्यंत प्राचीन पूर्वज, कीं जे स्वतः "हिंदू समाजाचे पूर्वज" या पदवीला पात्र नाहींत, ते लिंगपूजक होते, एवढी ऐतिहासिक माहिती कळली म्हणून आपल्याला ओशाळगत वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. सर्व पृथ्वीवर ही पूजा पूर्वकालीं चालू होती, हें पुढें दिलेल्या परिच्छेदावरून दिसून येईल. सर्वांचेच पूर्वज या चाकोरींतून मागें एकदां गेलेले आहेत हें दिसून आलें म्हणजे माणसाच्या मनाच्या प्रगतीकडे आपलें जास्त लक्ष जातें व सर्व मानवसमाजांना मनाची कांहीं एक सामान्य भूमिका आहे हेंही ध्यानांत भरतें.

## लिंगपूजेचा भूतकालीन प्रसार—

नॉर्वे देशांत लिंगाच्या आकाराचे दगड अजून सांपडतात. अत्यंत प्राचीन काळचे (Viking Age मधील) हे दगड आहेत, म्हणून त्यांचा मुद्दाम संग्रह करून त्यांचें ऐतिहासिक प्रयोजनही तेथें ग्रथित केलेलें आहे. इंग्लंडमधील जुन्या रोमन किल्ल्यांतील दगडांवर कोरलेल्या लिंगाकृती अजूनही सांपडतात. बेल्जम व फ्रान्स या देशांत नग्न संतांची पूजा मध्ययुगांतही चालू असे. Lyons चा पहिला बिशप सन्त खान्तू याची अशाच तऱ्हेची पूजा होत असे. आपल्याला अपत्य व्हावें व आपलें पौरुष-हीनत्व जावें यासाठीं गरजू लोक अशा तऱ्हेची पूजा करीत. सन १५८५ सालीं प्रॉटेस्टंट लोकांनीं एम्ब्रम् शहर घेतलें तेव्हां तेथें त्यांना लिंगें सांपडल्याचा उल्लेख आहे. ट्यूटन देशांत पुपसाला येथें

एक फार मोठें लिंग होतें. याच्या पूजेनें शांति व आनन्द लाभतो असें लोकांचें मत होतें व मुख्यत: लग्नाच्या वेळीं या लिंगाची पूजा करीत असत. इटली देशांत ट्रॅनी या गांवीं अगदीं मध्ययुगा-पर्यंतही दिगंबराची मिरवणूक काढण्याची चाल असे. मग पुढें लिंगमंत्र म्हणणारास शिक्षा ठरली. प्रोवेन्स येथें संत फाऊतिल याच्या नांवानें मेणाचीं केलेलीं स्त्रीपुरुष-लिंगें वहात व तीं छतांस टांगत असत. खुद्द रोम शहरीं तुतुनस याची लिंगरूपानें पूजा करीत व लायवर याची भगरूपानें पूजा करीत. सिरेक्यूज येथें व फ्रान्स देशांतही अगदीं अलीकडेपर्यंत स्त्री-लिंगाचा छाप मारले-ल्या वड्या लग्नांत मिरवीत नेण्याची चाल असे. ग्रीस देशांत लिंग हें पवित्र मानीत व लग्नसमारंभांत त्याचें दर्शन मुद्दाम करवीत. स्पार्टा शहरीं कणकीचे स्तनाकार उंडे रुखवताला नेत असत. सायप्रस व इजिप्त या प्रदेशांत जुन्या थडग्यांत लिंग किंवा त्याच्या आकाराचीं पदकें खूप सांपडतात. कांगो देशांत स्त्रीपुरुषसंयोगाचीं चित्रें सर्वत्र असत व अजूनही छपराला लिंगांच्या आकृति टांगलेल्या असतात. नीग्रो देशांत एक मोठा प्रचंड लिंगधारी बैठा देव पूजि-तात व देवळावरही लिंगें कोरतात. गोवा आणि पॉंडेचरी इकडे शिवलिंगास कौमार्य प्रत्यक्ष अर्पिण्याची चाल होती. तेथें पूर्वीं गळ्यां-तल्या पुतळीवर लिंगाची खूण असे. पाद्री लोकांनीं ही चाल मोड-ण्याचा पुष्कळ यत्न केला पण ती मोडेना म्हणून तिच्या शेजारीं आपली क्रूसाची खूण करून त्यांनीं काम भागविलें. जावा बेटांत कांहीं जातींत असा समज आहे कीं तोफेवर बसल्यानें प्रजा होते. सुमात्रा बेटांत मृताच्या नांवानें लिंगाकार दगड बसवितात. जपानांत शिन्तो हा देव या लिंगपूजेपैकींच आहे. मंदिरोत्सवाच्या प्रसंगीं लिंगाच्या रूपानें याची मिरवणूक निघत असे. डॉर्सी येथें घराच्या

खांबांवर मोठमोठालीं लिंगचित्रें काढलेलीं असतात. सेलेबीस येथें स्तनयोनिचित्रें कोरलेलीं असत. सायलेन येथील हर्मीसची पूजा म्हणजे एका स्थंडिलावर उभारलेल्या पुल्लिंगाची अर्चना होती. इसानिया येथें इ. स. १७८० पर्यंत मेणाचीं लिंगें करीत असत. लंगाडोपीच्या देवळांत भगांकित लिंगांनीं स्त्रीपुरुषसंयोग दाखविलेला असतो. बाबरचेट समूहांत उपूलेरोच्या झेंड्याची मिरवणूक काढतात व या झेंड्यावर प्रचंड पुल्लिंगधारी माणूस काढलेला असतो. सेलेबीसमध्यें ज्या 'कारोंगलारू'ची पूजा करतात तो सोन्याचा असून भगांकित लिंगाकार असतो. कानगो देशांत पार्थिव स्त्रीलिंगें करून त्याला कोंबडा बळी देतात. नीग्रो लोकांत सडकेच्या काठीं लिंगांच्या रांगा असत.

### लिंग व महादेव—

ही यादी पुरेशी लांब झालेली आहे. मनुष्य-योनीच्या आरंभीच्या कालांत आपलें मन कोणच्या एका उत्पादनाच्या विचारानें व्याप्त होतें हें यावरून स्पष्ट दिसतें. शस्त्रानें शत्रूवर विजय मिळवितां येतो म्हणून शस्त्राची पूजा केली. वीराच्या हाताखालीं पराक्रम करतां येऊन वैभव मिळवितां यावें म्हणून वीरपूजा केली. या विचारांच्या पुष्कळ मागें गेलों म्हणजे आपण लिंगानें वाढत गेलों म्हणून माणसांनीं लिंग पूज्य मानिलें हा विचार अगदीं ओघानें येतो. पण उन्नतपणाचें स्फुरण आर्य लोकांच्या बुद्धीला इतक्या जुन्या काळींही झालेलें होतें व म्हणून त्यांनीं असल्या शिस्नपूजकांची निर्भर्त्सना केलेली आहे. या गोष्टीचा आपणांस निःसंशय अभिमान वाटतो. पुढील ऋचा पहा.

न यातव इन्द्र जूजुवुर्नो न वंदना शविष्ठ वेद्याभिः ॥
स शर्धदर्यो विषुणस्य जन्तोर्मा शिश्नदेवा अपि गुर्ऋतं नः ॥

हे इन्द्रा, जादुगार ( किंवा राक्षस ) आमचा घात न करोत; हे बलिष्ठा, वंदन नांवाचे लोक आमच्या प्रजेची व आमची ताटातूट न करोत; तो मालक ( स्वामी ) विविध प्राण्यांच्यावर सत्ता चालविण्यास समर्थ होवो. **शिश्नपूजक** लोक आमच्या ऋतावर—कल्याणावर—घाला न घालोत.

ऋ. ७।२१।५

स वाजं यातापदुष्पदा यन्त्स्वर्षाता परिषदत्सनिष्यन् ॥
अनर्वा यच्छतदुरस्य वेदो घ्नञ्छिश्नदेवाँ अभिवर्पसाभूत ॥

युद्धार्थ आक्रमण करणारा हा इन्द्र सरळ तुटून पडतो व युद्ध करून शत्रूंचें धन लुटतो, युद्धांतून परावृत्त न होणारा हा इन्द्र शंभर दरवाजे असलेल्या नगरांतील **शिश्नपूजकांस** मार देत तीं नगरें फोडून धन लुटतो.

ऋ. १०।९९।३

ऋग्वेदांतील या ऋचा ज्या काळीं लिहिल्या त्याच्या आधींपासून या पूजेसंबंधाचा तिटकारा आर्यकुलीन समाजांत होताच. पण प्रसंग लिंगपूजक अशा बहुसंख्याकांशीं पडल्यामुळें या पूजेचें हळूहळू पवित्रीकरण चालू झालें व शेवटीं त्यांतील ओंगळपणा सर्व नाहींसा होऊन शिव किंवा महादेव हा आर्य लोकांचाही सर्वमान्य देव होऊन बसला. लिंगपूजा ही महादेवापासून अविभाज्य आहे हें म्हणणें महाभारतावरूनच युक्त ठरतें. अनुशासनपर्वात उपमन्यू म्हणतो “ सृष्टीची उत्पत्ति व संहार करणाऱ्या शंकराचें हें भगांकित लिंग प्रत्यक्ष दिसत आहे तें अवलोकन कर........हें शंकराचें भगलिंग म्हणजे स्त्रीपुरुषांचें संयुक्त लिंग आहे.” पद्म पुराणांतही भृगु ऋषींनीं महादेवाला शाप दिल्याचें वर्णन आहे. तो शाप म्हणजे

" तूं भगांकित लिंगरूपानें यापुढें ओळखला जाशील " अशा तऱ्हेचा आहे. या शापांतही भृगूंनीं या रूपाबद्दलची आपली तिरस्कारबुद्धि दर्शविलेली आहे.

## ख्रिस्तमतप्रचारकांची कुचंबणा—

ज्या लोकांना एकाद्या सुसंघटित समाजांत ओढावयाचें त्यांच्यावर कांहीं संस्कार केल्यावांचून हें संघटनेचें काम पुढें सरत नाहीं. केवळ संस्कार करून नव्हे तर त्यांच्या कल्पना शुद्ध करून घेऊन त्यांसह त्यांना आपणांत ओढावयाचें; असें केलें तरच हें काम पुढें सरकतें. आपली कल्पना नष्ट झाली आहे असें तर त्यांना वाटतां कामा नये पण त्याबरोबरच ती मूळची ओंगळ कल्पना केवळ संघटन साधावें म्हणून आपण जशीच्या तशी पतकरली आहे असें वरिष्ठांसही वाटतां कामा नये. अशी ही कांहीं देवघेवीची हालचाल सुरू झाली म्हणजे समाज एकत्र येतात. आर्यधर्मीय लोकांनीं आपल्या धर्मप्रसाराचें काम हिंदुस्थानभर केलें, इत्यादि जें विवेचन ' अस्पृष्टांचा प्रश्न ' या पुस्तकांत केलें आहे तें सर्वेच्या सर्व येथें लागू आहे. मूळ वस्तू तर घ्यावी पण ती रूपांतरित करून शुद्ध करून घ्यावी हा न्याय प्रसारकांना सर्वत्र साधतो असें नाहीं. पण आपल्या बाकीच्या उच्चतर परिवेषांत असंस्कृत लोक हीन कल्पनांसह आणून बसविले तर त्या परिवेषाचाही त्यांना फायदा होतो आणि आपल्या कल्पनांतील हिणकस भाग टाकावयास ते तयार होतात असा अनुभव सर्वांना येतो. हिंदू लोकांना ख्रिस्ती बनविण्याच्या कामीं मूर्तिपूजा व जातिभेद हे दोन मोठे जबरदस्त अडथळे मिशनरी लोकांच्या मार्गांत उभे होते. येशूचें पारमार्थिक तत्त्वज्ञान पतकरावयास लोक कबूल

होते व ते ख्रिस्तीहि बनत. पण त्यांची जाति-कल्पना व मूर्ति-पूजा या कांहीं केल्या सुटत नसत. मिशनरी असा हट्ट धरीत कीं ख्रिस्ती धर्मांत या दोन्हीही नाहींत आणि नसल्या पाहिजेत व म्हणून तुम्हांला आमच्या धर्मांत निखालसपणें कांहीं घेतां येत नाहीं. पण या अडचणी जर दुस्तर म्हणून ठरविल्या तर एत-द्देशीय लोक ख्रिस्ती व्हावयाचेच नाहींत हें कळून चुकल्यामुळें ख्रिस्ती धर्मप्रचारकांनीं आपलें धोरण अगदीं बदललें. जात व मूर्ति हीं राहिलीं तरीहि माणसाला ख्रिस्ती होतां येतें अशी मुग्ध परवानगी त्यांनीं दिली व मग त्यांचा धर्मप्रसार जोरानें होऊं लागला. कारण ख्रिस्ताचें भूतदयेचें तत्त्वज्ञान लोकांना हवेंच होतें. आतां या सर्व लोकांना ख्रिस्ती हेंच नांव आहे. पण ख्रिस्तधर्माला मुळींच मान्य नसलेल्या जातिकल्पना व मूर्तिपूजा या दोनही संस्था त्यांच्यांत टिकूनच आहेत. उच्च प्रकारच्या ख्रिस्त्याच्यानेंही असें म्हणवत नाहीं कीं, हें ख्रिस्ती नव्हत. पण हे आपल्यासारखे उच्च प्रतीचे ख्रिस्ती नव्हेत अशा प्रकारची साक्ष मात्र ते एक-मेकांत निःसंशय देत असतात. अशा प्रकारें एकीकडून प्रसारकार्याचा विजय पण दुसरीकडून सांस्कृतिक कल्पनांत चमत्कारिक भेसळ हें होत चाललेलें असतें. तंतोतंत असाच प्रकार आर्य लोकांच्या समाजबांधणीच्या वेळीं झालेला होता.

**परकल्पनांचें स्वीकरण—**

अत्रस्थ अनार्य प्रजेला ‘ समाजांत ’ गोंवून घेण्याच्या कामीं सुलभता उत्पन्न व्हावयास हवी होती व ती:आर्य कल्पना—प्रसार-कांनीं ज्या अनेक उपायांनीं सिद्ध केली त्यांपैकीं एक मोठा उपाय म्हणजे त्यांना प्रिय असलेल्या कल्पनारूप संस्था आपल्याशा

करणें ही होय. ग्रामसंस्था अथवा गांवगाडा ही संस्था आर्यपूर्व असून बळिराण्याच्या कमाईची होती व ती आर्य विजेत्यांनीं आपलीशी केली हें जें एक मत आहे तें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. तसेंच महादेव ही देवता आपलीशी करून टाकणें या इलाजाचेंही आहे. या एका इलाजानें हे दोन समाज एकत्र येण्यास फार मोठी सोय झाली.

## शिवाचा धिक्कार करून चाललें नसतें—

रुद्रकल्पना, शिवकल्पना, महादेवपूजा, व लिंगपूजा हे चार प्रकार केव्हां केव्हां उद्भवले, त्यांचें परस्परांशीं केव्हां व किती पृथक्पण होतें, तें खरोखर होतें कीं काय, त्यांच्या एकीकरणाची स्फूर्ति कोणास झाली व तिचें सामाजिक प्रयोजन काय होतें याविषयीं कांहीं सुनिश्चित कल्पना बांधणें हें फारच कठीण आहे. कारण प्राचीनतम भूतकाळांत केवळ विरळ व अस्पष्ट दिसत असल्यानें हे प्रकार नीट ध्यानांत येत नाहींत. पण येवढी गोष्ट खरी कीं, लिंग व महादेव हीं अविभाज्य आहेत व लिंगपूजा ही आर्यांनीं तिरस्कार्य मानिली होती. महाभारतांतील शिवपार्वतीच्या वर्णनावरून व पद्मपुराणांतील भृगुऋषीच्या शापवर्णनावरून ही अविभाज्यता उत्तम सिद्ध होते व मागें दिलेल्या ऋग्वेदांतील ऋचांवरून लिंगपूजेची आर्यांनीं मानिलेली तिरस्कार्यताही उत्तम सिद्ध होते. अर्थात् हीं प्रमेयें एकत्र घातलीं म्हणजे महादेवाचें अनार्यदेवतात्व आपोआपच फलित होतें. हें पत्करण्यास कचरण्याचें किंवा गांगरण्याचें कारण नाहीं. कारण सध्यांच्या संभावित, पवित्र व उदात्त अशा प्रत्येक कल्पनेचे, संस्थेचे, किंवा समाजाचे आरंभ निरपवाद व सोज्ज्वळच असतील असें मानणें व ते तसे असलेच

पाहिजेत असा नैतिक हट्ट धरणें हें इतिहासबुद्धीचें लक्षण नव्हे. अगदीं पूर्वींच्या काळीं सर्व कांहीं अपरिपक्क, तामसमिश्र, नैसर्गिक म्हणजे संस्काररहित, कोंझें, कुढें, व कुग्राम असेंच असे. मानवी मनाचा जों जों उदय झाला तों तों जीवितांतील या सर्व प्रकारांना उजळा येऊं लागला. त्या त्या प्रकाराची आवश्यकता व अनिवार्यता ध्यानांत घेऊन लोकांनीं तो जिवंत ठेवला, पोसला, उत्कर्षास नेला; पण हें करतांना त्याचें पूर्वकालीन ओंगळ रूप खरडून काढून त्याला सोज्ज्वळ बनविलें. आपली लग्नसंस्था काय आहे ? आपलें अन्न काय आहे ? आपलीं घरें काय आहेत ? आपलीं नगरें काय आहेत ? या सर्वांचे आरंभ पहावयास जा; म्हणजे आपलीं रूपें कदाचित् माकडाचीं दिसतील, आपलीं लग्नें म्हणजे पाशवी 'पीडकां'च्या लीला दिसतील, आपलें अन्न म्हणजे दुसऱ्याचीं आंतडीं दिसतील, आपलीं घरें म्हणजे भीतिग्रस्तांचीं बिळें दिसतील, आणि आपलीं नगरें म्हणजे झोपड्यांचे थवे दिसतील. पण असें आहे म्हणून आतां खंती मानण्याचें कांहींच कारण नाहीं व तें तसें नव्हतेंच असें अनैतिहासिक बोलण्याचेंही कारण नाहीं. तें तसें होतें; पण थापटून-थोपटून, उजळा देऊन, मूळ आवश्यक जें तें कायम ठेवून, इष्ट व उचित अशा पूरणानें प्रगल्भ करून, माणसानें त्या त्या हिणकस वस्तूची ओळखही पार बुजविली आहे व वरती तिला मनोरमताही आणली आहे. हा प्रकार जीविताच्या सर्व शाखांतून झालेला आहे. लिंगपूजेचा व महादेव-पूजेचाही हाच प्रकार झालेला आहे. जो हिणविण्यासाठीं बोलतो, किंवा वस्तूंच्या ओंगळ आरंभदर्शनानें सद्यःकालीन ओंगळपणाला स्वीकार्यता देऊं पाहतो किंवा ओंगळतेच्या चर्वणांतच सुख मानतो तो दुष्ट, इतिहासविन्मुख, किंवा केवळ हीनमनस्क असतो. पण हे सर्व प्रकार

सोडून देऊन शुद्ध इतिहासविचार, समाजवर्धन, मानवी मनाचे वर्धिष्णु व्यापार यांचें अवलोकन करणें हें युक्त आहे. तें करून पहातां शिवाच्या देवतात्वाचा विचार अत्यंत बोधप्रद व हिंदु समाज-बांधणीच्या दृष्टीनें केवळ अपरिहार्य नव्हे, तर अत्यावश्यकच आहे;आणि म्हणून त्याच्यावर येवढा जोर दिला आहे. आर्य लोकांनीं आपली 'रुद्र'कल्पना, तिच्यांतील भयानकतेवरून महादेवाशीं सांधूनच नव्हे तर रांधून टाकिली असावी अशी कल्पना होते. महादेवाचे भक्तगण, त्याचा परिवार, त्याच्या भयानक कृति, त्याचा तो तापट स्वभाव, त्याच्या युद्धनीतींतील दारुणपणा यांचा आर्यमनावर मोठाच वचक बसला असावा, यांत कांहींच नवल नाहीं. फार काय सांगावें ? युद्धनीतीचा व अस्त्रविद्येचा एक 'शांकरीय' पंथ असावा असेंही वाटतें; कारण कीं, भारतांतील कित्येक मोठमोठ्या योद्ध्यांनीं, अस्त्रविद्येचें अध्ययन झालें तरी शंकराची आराधना करून ती विद्या वश करून घेतल्याशिवाय आपलें युद्धज्ञान पुरें झालें नाहीं असेंच मानलें, असें दिसून येतें. अर्थात् महादेव हें मोठें प्रस्थ असलें पाहिजे व सर्व जनमनावर त्याची मोठीच पकड असली पाहिजे. अर्जुनाला पाशुपतास्त्र शंकरानें दिलेलें होतें. कर्णाला नारायणास्त्र त्यानें दिलेलें होतें. द्रोण ह्या आपल्या विद्येंत शंकराच्या हाताखालींच तयार झाला होता. पण महादेवाच्या शस्त्रांचा बोज वीरमंडळावर केवढा होता याची खरी खूण म्हणजे खुद्द परशुरामाचा परशु, कीं ज्याच्या साह्यानें त्यानें अवतारकृत्य केलें तोही, त्यास शंकराकडून-च प्राप्त झालेला होता ही होय. याहूनही आणखी एक निर्णा-यक खूण आहे. दाशरथी रामचंद्राच्या पराक्रमाला जी सुरुवात झाली ती शिवाच्या धनुष्याचा त्यानें भंग केला तेव्हांपासून झाली.

रामचंद्र हा त्याच वेळीं एकदम वीरमंडळांत श्रेष्ठ ठरला. पण या श्रेष्ठ ठरण्याची कसोटी कोणची होती ? तर शिवधनुष्याला बाण लावून दाखविणें ही होय. अर्थात् यावरून ही गोष्ट आपोआपच फलित होते कीं, शिवधनुष्य नुसतें उभें करून त्यास बाण लावणें ही गोष्टही मोठमोठ्या वीरांना अशक्य होती. म्हणजे शिवधनुष्य ही एक प्रचंड, न पेलतां येण्यासारखी वस्तू होती. अर्थात् या धनुष्याचा नित्य उपयोग करणारा शिव केवढा प्रतापी असला पाहिजे हें स्पष्टच आहे.

अशा देवतेला झुगारून देऊन, अत्रस्थ लोकांचें वशीकरण सुरू करणें हें आर्यांना कधींही साधलें नसतें. आणि म्हणून दुसऱ्यांस जिंकण्याचे, युद्धविरहित जे मार्ग आहेत त्यांचाच अवलंब आर्यांनीं केला व त्यांतील प्रमुख म्हणजे अत्रस्थांची जी सर्वपूजित देवता ती आपलीच म्हणून पतकरणें हा होय.

## आर्येतरांत संस्कृतिप्रसार—

पण आर्य समाज-कल्पनेचा लाभ इतर तऱ्हांनीं या शूद्रातिशूद्रांना घेववला तितका त्यांनीं घेतला. शेतीचा धंदा सोडला तर या अर्धरानटांना किंवा अल्पसंस्कृतांना चरितार्थ-साधनें हस्तगत करण्याची संधी आर्यरचित समाजांत निस्संशय जास्त सांपडली. नुसतें कांहीं किडुकमिडुक करणें, थोडीबहुत शेती करणें, व आपापल्या संकुचित भूप्रदेशांनीं मर्यादित झालेला आपला समाजखंड म्हणजेच जगत् असें मानून, जमल्यास गुण्यागोविंदानें रहाणें येवढेंच काय तें त्यांना करतां येत होतें. पण आर्यांच्या विस्तारकल्पना जीविताच्या सर्व अंगांनीं त्या त्या समाजखंडांत शिरूं लागल्यानंतर पहिल्या उध्वस्त होणें किंवा विस्काळित होणें हें चुकण्या-

सारखें नव्हतें. किंबहुना तसें झालें हें तोंवर अल्पपरिध असें जीवित अनुभविणाऱ्या या लोकांच्या सोयीचेंच झालें. कारण त्यांना चरितार्थाचीं साधनें पूर्वींच्यापेक्षां सुलभ, जास्त विविध, व अधिक संभावितपणाचीं अशीं प्राप्त होऊं लागलीं. हें घडून येणें स्वाभाविक होतें. आर्य संस्कृति बलिष्ठ, प्रसरणशील, आकांक्षी व कल्पक होती. राज्यें स्थापणें, समाज बनविणें, कलाकौशल्य वाढविणें, अन्तस्थ व बहिस्थ व्यापार चालू करणें, जमिनीची मशागत करणें, गोवृद्धि करणें या कल्पना घेऊन उठलेले हे लोक होते. त्यांचें संख्याबळ कदाचित् प्रथम कमीही असेल. पण नव्या कल्पना काढणारांचें संख्याबल कमी असलें तरी त्यांच्या कल्पनांची कूस मोठी असते व त्यांचा व्यापार यशस्वी होण्यास या थोड्या लोकांना इतर अनेकांना आपणाकडे ओढावें लागतें. असें झालें म्हणजेच या ओढल्या जाणाऱ्या लोकांच्या जीविताला नवें वळण लागतें. कां कीं त्याचा गाठाळलेलेंपणा जातो व धनप्राप्तीमुळें त्याला कांहीं एक प्रतिष्ठा व तजेला येतो. सध्यां सुद्धां आपल्याला हें सगळीकडे दिसून येतें.

**सध्यांचें उदाहरण—**

युरोपियन लोकांचा एकादा लहानसाच पुंज असतो. तो एकादा उद्योग आरंभितो. स्वतांच्या बळावर तो यशस्वी करणें त्याला साधण्यासारखें नसतें. मग त्या उद्योगांतील बीज-मंत्र तेवढा आपल्या हातीं ठेवून आपल्याहून कमी संस्कृतांना त्या उद्योगाच्या शाखोपशाखांत तो गोवून घेतो. याचें काम होतें व त्या कमी संस्कृतांची संस्कृति उच्चतर होते. आपल्याकडेहि हें दिसून येतें. एक मोठा पूल नाहीं तर बंधारा बांधावयाचें काम चालू असावें.

तेथें मुख्य एंजिनियर्स व त्यांच्या लगतचे अधिकारी यांनाच त्या सबंध कामाची कल्पना असते. त्यांनींच तें काढलेलें असतें व त्याची बौद्धिक जबाबदारीहि त्यांजवरच असते. पण तें सर्वच्या सर्व काम त्यांना करतां येण्यासारखें नसतें. म्हणून त्याच्या शाखोपशाखांत, कीं ज्यांत मूळ भव्य कल्पनेचे लहान लहान अवयव मात्र असतील त्यांत, ओवतींभोंवतींच्या कसबी लोकांना, मजुरांना, माल पुरविणारांना, ते वरिष्ठ लोक गोवून घेतात. वास्तविक पाहतां हे कनिष्ठ संघ जरी त्यांतल्या त्यांत कमी प्रतीच्या कामांतच राबत असले तरी त्या मूळच्या भव्य योजनेचा त्यांच्या मनोभूमीवर विलक्षण संस्कार होतो व या कामामुळें धनोत्पादनही बऱ्या प्रकारचें झाल्यानें त्यांच्या जीविताला कांहीं नवा तजेला व हुरूप येतो. मग ते आपापलीं कुग्रामें टाकून अशाच प्रकारच्या कामांच्या शोधांत स्थळांतरें करतात व अनुभवी म्हणून प्रतिष्ठाहि भोगितात. काळांतरानें अशीं मोठीं कामें ते स्वतःच करूं लागतात. याचा अर्थ असा कीं, त्यांच्या जीविताचा कोंझेपणा, कुग्रामपणा, संकुचितपणा अगदीं जातो व त्यांना उच्चतर संस्कृतीचा लाभ होतो. वास्तविक पहातां यांत कोणी कोणावर उपकार केलेला नसतो. वरिष्ठांना यांची जरूरी असते व यांना अधिक उन्नत व्हावयाचें असतें व म्हणून हें सगळें होतें; तरी शेवटीं एक शिलक राहतेंच कीं, त्या वरिष्ठांनीं कांहीं नवें सुरू केलें त्यामुळें कनिष्ठांचें व त्यांचें नातें जुळून कनिष्ठांना उन्नति प्राप्त झाली. आर्यांनीं जे उद्योग आरंभिले असें वर म्हटलें आहे, त्यांचा परिणाम अगदीं असाच झाला.

**एक उदाहरण—**

एक साधें उदाहरण घ्यावें. क्षत्रियांनीं युद्ध करावें हा आर्यांचा

नियम सिद्ध झाला. पण चतुरंगसेना उभी करावयाची म्हणजे किती प्रकारचें कसब व किती प्रकारचे श्रम खर्ची पडावयास हवेत हें सहज दिसून येईल. एक स्वार म्हणजे अश्वी घ्यावयाचा म्हटला तर घोडयाची पैदास करणें, ते धरून आणणें, ते खाजविणें, त्यांना गतिविशेष शिकविणें, त्यांचे केस काढणें, खोगीर तयार करणें, त्याला कातडें तयार करणें, नालबंदी करणें, नाल करणें, स्वाराची तलवार करणें, तिला पाणी देणें, रिकीबी तयार करणें, त्याचें शिरस्त्राण तयार करणें, त्याची ढाल बनविणें, त्याला चोळणे शिवून देणें, अशी एक ना दोन शेकडों कामें घोडेस्वाराच्या कल्पनें-तून निघतात. पण हीं कांहीं तो घोडेस्वार करीत नाहीं. म्हणून चतुरंगसेनेची कल्पना जरी आर्यांनीं बसविली असली तरी तिची सिद्धता होण्यास हजार तऱ्हेचे उद्योग हवे होते व ते सर्व वर निर्दिष्ट केलेल्या लोकांत फैलावत गेले; व कांहीं एक प्रकारची शाश्वति जीविताला लाभल्यामुळें हे सर्व लोक, आपापल्या गटांनीं निराळे राहिले तरी एका समाजाचे घटक म्हणूनच वर्तूं लागले. त्यांना दोन तऱ्हांचीं लागतीं उत्पन्न झालीं. त्यांच्या देवताविषयक कल्पना आर्यप्रसारकांनीं झाडून पाखडून, नाहीं तर अजिबात जशाच्या तशा आपल्याशा मानल्या, त्यामुळें आत्मभाव उत्पन्न झाला व शिवाय त्यांनीं सुरू केलेल्या प्रचंड संस्कृतिवर्धनाच्या कामांत यांना चरितार्थ-साधनासाठीं रिघाव झाल्यामुळें हा दुसरा आत्मभाव उत्पन्न झाला. चारदोन जातींना हें लिहिणें लागूं आहे असें समजूं नये, तर येथें असलेल्या सुख्या, कुग्राम, संकुचितभू, अल्पस्थानबद्ध, अशा शेंकडों समाजांना, समाजखंडांना व खांडोळ्यांना लागूं आहे. हे सर्वच्या सर्व महादेवाचे उपासक व लिंगपूजक होते असें निपटून सांगतां येणें कठीण आहे. पण

येवढें विधान खरोखरीच करतां येईल कीं ज्या शेंकडों प्रकारच्या व ठिकाणच्या लोकांना आर्य समाजरचनेच्या कक्षेंत अन्तर्भूत व्हावें लागलें त्यांच्यांत महादेवाचें दैवतपण सर्वथा मान्य होतें. अर्थात् अशा देवतेचा स्वीकार आर्य प्रचारकांनीं केल्यामुळें हें समाजरचनेचें काम झपाट्यानें झालें.

## स्वीकरणांतील संथपणा—

आतां हा देवतास्वीकार जरी झाला तरी तो कांहीं एकाच वेळीं, पुरेपूर, व बिनविरोध झाला असेल असें म्हणतां येत नाहीं. आकांक्षी, प्रसरणशील, भावी कालाचें रूप ज्यांना चांगलें न्याहाळतां आलें आहे, व ज्यांना कांहीं औदार्याची जिवंत भूक आहे असे लोकच हे उद्योग आरंभितात व त्यांतील इंगित ध्यानीं आल्यानंतर सर्व समाज आपला मोहोरा तदुन्मुख करतो. पण असें झालें तरी नव्या जीवनाशीं जुळतें न घेणारे असे लोक असतातच. त्यांचेंही थोडें खरें असतें. यामुळें झगडा चालू राहून काम होत होत होतें. महादेव ही देवता आपलीशी मानण्याच्या कामीं लोकांनीं फारच खळखळ केली असावी यांत कांहींच शंका नाहीं. अजूनही अशा कांहीं कांहीं बाबी शिल्लक आहेत कीं ज्यावरून वरील अनुमान बरोबर आहे असें सिद्ध होतें. महादेवाचा नैवेद्य सत्पात्र ब्राह्मणानें खाऊं नये अशी एक सूक्ष्म समजूत ब्राम्हणांत चालू असते; तसेंच उत्तम वैदिक कीं जो त्या विद्येंतील अधिकारी म्हणून समजतात तो महादेवाच्या एकादष्णीचे आमंत्रण घेत नाहीं; शिवाय महादेवाच्या पूजेच्या कामीं जंगम व कोळी यांची योजना झालेलीही कोठें कोठें दिसून येते; पण असलीं उदाहरणें देण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. आपल्या पौराणिक

वाङ्मयांत पाहील त्याला हा झगडा सर्वत्र दिसून येईल. शिव व विष्णु हे एकच आहेत, एकच आहेत, असें आग्रहानें सांगितलेलें आहे; हें जों जों जास्त दिसावें तों तों ते एक नाहींत असें लोक मानीत होते असें आपोआप सिद्ध होतें. नाहीं तर येवढ्या आग्रहानें सांगण्याचें कारण काय? एक महादेवच अत्रस्थांपासून घेतला असें नव्हे तर शेंकडों बारीकसारीक देवता, कीं ज्यांची संख्या शेकड्यांनींच मोजावी लागेल त्या वरिष्ठांनीं आपल्याशा केल्या; पण या देवतांना थोडें स्थानिक महत्त्व असल्यामुळें त्यांना वरिष्ठ समाजांत इतकेंसें प्राबल्य प्राप्त झालें नाहीं. पण महादेवाची बाब अशी होती कीं तो सर्व अत्रस्थांचा देव होता. अर्थात् अशा देवतेचें स्वीकरण समाजबांधणीच्या दृष्टीनें फारच अगत्याचें होतें व त्यांनीं तें शतकानुशतक कष्ट करून सिद्ध करून दाखविलें. हरिवंशांत पुढील मोठें मौजेचें स्तोत्र दिलें आहे; त्यावरून विष्णु व शिव यांच्या एकरूपप्रतिपादनाचा प्रसार कसा आग्रहानें व बुद्धिपुरस्सर होई हें ध्यानांत येईल.

॥ रुद्रश्च परमो विष्णुः विष्णुश्च परमः शिवः ॥
॥ एक एव द्विधाभूतो लोके चराति नित्यशः ॥
॥ न विना शंकरं विष्णुः न विना केशवं शिवः ॥
॥ तस्मात् एकत्वमायातौ रुद्रोपेन्द्रौ तु तौ पुरा ॥
॥ नमो रुद्राय कृष्णाय नमः संहतचारिणे ॥
॥ नमः षडर्धनेत्राय सद्विनेत्राय वै नमः ॥
॥ नमः पिंगलनेत्राय पद्मनेत्राय वै नमः ॥
॥ नमः कुमारगुरवे प्रद्युम्नगुरवे नमः ॥
॥ नमो धरणीधराय गंगाधराय वै नमः ॥
॥ नमो मयूरपिच्छाय नमः केयूरधारिणे ॥

॥ नमः कपोलमालाय वनमालाय वै नमः ॥
॥ नमस्त्रिशूलहस्ताय चक्रहस्ताय वै नमः ॥
॥ नमः कनकदण्डाय नमस्ते ब्रह्मदाण्डिने
॥ नमः चर्मनिवासाय नमस्ते पीतवाससे ॥
॥ नमोस्तु लक्ष्मीपतये उमायाः पतये नमः ॥
॥ नमः खट्वाङ्गधाराय नमो मुशलधारिणे ॥
॥ नमो भस्मांगरागाय नमः कृष्णाङ्गधारिणे ॥
॥ नमः स्मशानवासाय नमः सागरवासिने ॥
॥ नमो वृषभवाहाय नमो गरुडवाहिने ॥
॥ नमस्त्वनेकरूपाय बहुरूपाय वै नमः ॥
॥ नमः प्रलयकर्त्रेच नमः त्रैलोक्यधारिणे ॥
॥ नमोस्तु सौम्यरूपाय नमो भैरवरूपिणे ॥
॥ विरूपाक्षाय देवाय नमः सौम्येक्षणाय च ॥
॥ दक्षयज्ञविनाशाय बलेर्नियमनाय च ॥
॥ नमः पर्वतवासाय नमः सागरवासिने ॥
॥ नमः सुररिपुघ्नाय त्रिपुरघ्नाय वै नमः ॥
॥ नमोस्तु नरकघ्नाय नमः कामांगनाशिने ॥
॥ नमस्त्वन्धकनाशाय नमः कैटभनाशिने ॥
॥ नमः सहस्रहस्ताय नमोऽसंख्येय बाहवे ॥
॥ नमः सहस्रशीर्षाय बहुशीर्षाय वै नमः ॥
॥ दामोदराय देवाय मुञ्जमेखलिने नमः ॥
॥ नमस्ते भगवन् विष्णो नमस्ते भगवन् शिव ॥

—असें स्तवन—व्यास, नारद, भारद्वाज, गर्ग, विश्वामित्र, अगस्त्य, पुलस्त्य, धौम्य यांनीं केलें आहे.

आर्यांची शरणागति—

या स्तोत्रावरून दिसून येतें कीं शिव व विष्णु यांची एकच स्तुति स्तोत्रकाराला प्रतिपाद्य आहे. पण आर्य कल्पना-प्रसाराचें काम अन्य रीतींनेंही चालू होतें. विष्णुभक्ति ही वरून खालीं चालली होती व शिवाची भक्ति ही खालून वर उचललेली होती; अशा प्रकारें दोन प्रचंड प्रवाह निरनिराळ्या दिशांनीं वहात राहिले व एकीकडे आर्थिक संघटनेचा उपक्रम जोरानें फैलावत असतां दुसरीकडे हा देवतांच्या देवघेवीसाठीं उपक्रम तितक्याच जोरानें फैलावत होता. अशा प्रकारें सर्व समाजाला एकत्र गवसणी घालण्याचें काम उत्तम सिद्ध झालें. महादेवाचा महिमा लोकोत्तर होता; येवढा कीं त्याचा नाश करणें हें सोपें किंवा युक्त वाटेना; म्हणून शरण जाऊन अनार्यांना जिंकण्याचें कसब आर्यांनीं केलें व त्यानेंच अत्रस्थ समाजाशीं एकीचें नातें प्रस्थापित करण्याचा आर्यांचा यत्न सिद्धीस गेला असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा प्रकारें अतिशूद्र, रानट हे पांचवे 'मानव' हिंदू समाजांत प्राप्त झाले.

जबरीचें साधन—

अत्रस्थांशीं मारामारी करून त्यांच्यावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करणें हा एक इलाज होता व त्याचा उपयोग बहिस्थांनीं करून पाहिला होता. हिरण्यकशिपूचें घराणें फारच बलिष्ठ होतें. वास्तविक पहातां त्यांचें विष्णुभक्तांपाशीं वांकडें होतें या एका गोष्टीहून इतर कोणच्याही बाबतींत तें वाईट नसावें. तरी नरसिंहानें त्याच घरांतील आपल्याकडे वळलेल्या एका पुरुषाचा पक्ष घेऊन त्या घराण्याचा वध केला इतकेंच नव्हे

तर त्याच्या पक्षपाती प्रजांचा संहार केला. याच घराण्यांत बलि उत्पन्न झाला. आपल्या पूर्वजांवर झालेल्या नाहक अन्यायाची आठवण बळीला उत्तम होती. हा बळी अत्यन्त सच्चा, महानुभाव, व उदारधी होता. त्याचें व विष्णुभक्तांचें वैर धुमसतां धुमसतां शेवटीं विष्णुभक्त लोक जे देव व बळीचे अनुयायी जे दानव त्यांचा भयंकर झगडा सुरू झाला व कित्येक वर्षांच्या अवधीनंतर देवांचा पराभव झाला. शेवटीं कांहीं शतकांनीं वामनाचा जन्म होऊन त्यानें बळीच्या सरळ बुद्धीचा फायदा घेतला व जवळ जवळ कपटविद्येनें बळीला फसविलें व त्रिपाद्भूमि हस्तगत करून बळीला पाताळांत नेऊन घातलें. या दोनही प्रकरणांवरून दिसून येईल कीं नारसिंह-काळांत व वामन-काळांत मारामारीचाच इलाज आर्यांनीं केला होता. दाशरथी रामचंद्राच्या काळांत तर रावणानें बोलून चालून त्याची आगळीकच केलेली होती व म्हणून त्याच्यावर स्वारी करून त्याचा वध करणें हें रामाचें कर्तव्यच बनलें. या तीनही अवतारांत कोणच्या ना कोणच्या कारणास्तव आर्यांनीं विजेत्याचें काम केलें होतें; पण विजयाच्याही पुढचें काम म्हणजे दोनही समाजांची एकरूपता करावयाची तें करण्याच्या कामीं शरीरसामर्थ्याचा उपयोग झाला नसता. आर्यप्रचारकांनीं हें ओळखून प्रिय कल्पनारूप संस्थांची देवघेव हा लोकोत्तर इलाज शोधून काढला; आतांच सांगितल्याप्रमाणें वरून खालीं व खालून वर असे दोन संस्कृति-कल्पनांचे प्रवाह सुरू केले व आर्य जीवितांतील नवोदित शाखोपशाखांच्या व्यापारांत चरितार्थाची संभावित साधनें अन्त्रस्थांना उपलब्ध करून दिलीं. याप्रमाणें महादेवाच्या पूजकांची हिंदू समाजरूप शरिरांत मान्य अवयव म्हणून संभावना झाली.

**एकधर्मता एकी करते—**

देवताविषयक कल्पना एक असल्यानें आपलेपण उत्पन्न कसें होईल असेंही कोणास वाटावयास नको. इंग्रज लोक व अत्रस्थ ख्रिस्ती यांचे मनःसंबंध नीट पहावे म्हणजे या शंकेचें निरसन होईल. इतर कसलेंही आपलेपण या दोन समाजांत नाहीं. रंग, संस्कृति, ऐहिक हिताहितानें हीं निरनिराळीं आहेत; पण देवताविषयक म्हणजे धर्मविषयक एकता असल्यामुळें अत्रस्थ ख्रिस्त्यांच्या हिताला जपण्याचे केवढे तरी इलाज इंग्रज लोक करीत असतात. वास्तविक या धर्माच्याही बाबतींत उच्च-नीच भाव हे शिल्लक असतातच; पण उभयपक्षीं त्यांची जाणीव असूनही 'ख्रिस्ती' या नांवाचें पांघरूण परस्परांना एकमेकांकडे आकृष्ट करण्यास पुरेसें होतें. आर्यांनीं तर याहून चांगला इलाज केलेला होता. त्यांनीं समानदेवतात्व तर सिद्ध केलेंच पण आपल्या उन्मेषशाली समाजव्यापारांत धनोत्पादन व धनसंचार या कामांतही त्यांचा अन्तर्भाव करून घेतला. अर्थात् समानभूत्वामुळें त्यांत आणखी भर पडून एक-समाजपणाची कल्पना अधिकच दृढ झाली. या धनसंचार—कल्पनेंतील श्रेष्ठकनिष्ठपण हें ध्यानांत येण्यासारखें आहेच पण प्रस्तुतचें काम वर एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें या आर्यसंस्कृतिप्रचारकांच्या चलनवलनांतून आणि परस्परसापेक्ष व्यापारांतून हिंदू समाज कसा निघाला याचें अवलोकन करणें हें आहे. ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य यांनीं कांहीं मर्यादा पतकरून एक राष्ट्र निर्माण केलें हें खरें. त्यांनीं त्या मर्यादा पतकरावयास हव्या होत्या कीं नाहीं हा नवकालीन व म्हणून स्वतंत्र विचार आहे. त्या त्या परिस्थितींत कशाला जास्त महत्त्व द्यावें व कशाला कमी द्यावें

याची चिकित्सा ज्यांनीं त्यांनीं केलीच असेल. आपलें काम इतकेंच आहे कीं काय झालें हें पहावें. हाच न्याय शूद्र, अतिशूद्र, रानट इत्यादि ज्या लोकांना 'अत्रस्थ' असा जो सामुदायिक व निरागस शब्द योजिलेला आहे त्यांच्याही बाबतींत लागू आहे. त्यांनीं प्रस्थापित न्याय पतकरावयास हवे होते कीं नाहीं व आर्यांनीं ते प्रस्थापावयास हवे होते कीं नाहीं हें नव्या कल्पनेप्रमाणें विवाद्य असेल; पण तेव्हां तरी यथोचित, परिस्थितियोग्य, जीवितास दृढता आणणारे व धनसंचारास पूर्वीपेक्षां संभावितपणा प्राप्त करून देणारे म्हणूनच त्यांचा स्वीकार झाला यांत कांहींच संदेह नाहीं.

## अवतारी कृत्यांचा अर्थ—

वरील विवेचनांत अवतारी पुरुषांनीं काय घडवून आणलें याचा जो थोडासा ऊहापोह केलेला आहे त्याचा सारांश असा काढतां येण्यासारखा आहे. नरसिंह व वामन यांचीं कृत्यें दोन प्रबळ लोकखंडांच्या असूयाव्यापाराचीं स्पष्ट निदर्शक आहेत. दोन प्रबळ लोक एकत्र आले असतां श्रेष्ठ म्हणून कोणी रहावयाचें हें ठरवून घेण्याचा प्रचंड उपक्रम या पुरुषांनीं केला. त्यांचें प्रतिस्पर्धी जे लोक होते त्यांचें नायकत्व हिरण्यकशिपूच्या घराण्याकडे पिढ्यानुपिढ्या होतें, असें दिसतें. कारण बलि हा त्याच्याच घराण्यांत जन्मास आला होता. नरसिंहाच्या कृत्यानें जो प्रश्न निकालांत निघाला आहे अशी समजूत झाली होती तो प्रश्न पुन्हा डोकें उचलूं लागला होता. त्याचा कायमचा निकाल वामनानें लाविला. परशुराम हा अवतार खरा; समाजवाढीच्या दृष्टीनें पहातां त्याचें कृत्य नरसिंह-वामनांच्या पूर्वींच घडून यावयास हवें होतें; पण तें अनुक्रमाप्रमाणें पहातां वामनाच्यानंतर झालें असें सांगितलें आहे.

त्याचें कृत्य अंतःकलहाचें होतें. राम हा पुन्हा आर्य-अनार्य वादांतील महान् पराक्रमी वीर ठरला. तथापि त्याचें अवतारकृत्य तरी नरसिंह-वामन यांच्या कृत्याच्या जातीपैकींच होतें. श्रीकृष्ण हाही अवतारच; पण आर्यावर्त समाजव्याप्त होऊन भारतीय संस्कृतीचा व्याप सर्वत्र झाल्यानंतर अंतःकलहप्रसंगीं न्यायान्याय पहाण्याचें सत्कर्म त्यानें केलें व समाज चातुर्वर्ण्यांकित रहावयास हवा असें त्यानें सांगितलें. याच्यापुढील बुद्धावतारांत चातुर्वर्ण्यविध्वंसन हें काम मुख्यतः झालें. याप्रमाणें तीन अवतार आर्य-अनार्य अथवा देवदानव यांचीं नातीं ठरविण्यासाठीं झालें; एक ब्राह्मण-क्षत्रियांच्या चुरशीमुळें झाला; एक चातुर्वर्ण्य हवें असें सामाजिक तत्त्वज्ञान सांगण्यासाठीं झाला व एक—जर अवताराचा सर्व बोज त्याला दिला तर; कारण कीं, बुद्धाला हिंदू लोक देव मानीत नाहींत-चातुर्वर्ण्यविध्वंसनासाठीं झाला. यावरून दिसून येईल कीं, हिंदूंचीं पुराणें हीं ज्यांना देव म्हणून वर्णितात ते सर्व समाजबांधणीच्या कामांतील व अनेकविध समाजखंडांना एकत्र सांधण्याच्या कामांतील अत्यंत प्रबळ असे महापुरुष झाले. हा सर्व समाजाचा इतिहास आहे व पुराणग्रंथांतील काल्पितें, अद्भुतें, व जल्पितें हीं सोडून, शुद्ध मानवी मनाचा उत्क्रांतिपथावरील प्रवास या दृष्टीनें सर्व कथांचें अवलोकन केलें म्हणजे आरंभीं म्हटल्याप्रमाणें त्यांचें ऐतिहासिक रूप स्पष्ट होतें.

## परशुरामकथेचा तंतु—

हे सर्व अवतार आपल्या महापुरुषांत मोडत नाहींत. प्राचीन नरसिंह व वामन आणि आधुनिक बुद्ध यांना आपले स्वतःचे महापुरुष कोणी मानीत नाहीं. परशुरामाचें देवतात्व अजूनही शिल्लक आहे. राम

व कृष्ण हे तर हिंदु समाजाचे आधारस्तंभ आहेत. पण पराभूत झालेला बळी हा अवतार नसला तरी, एका मोठ्या समाजाचा पुरस्कर्ता व शास्ता होता; आणि महादेवही आणखी एका समाजखंडसमूहाचा पुरस्कर्ता होता. बळीचा उच्छेद झाला; पण महादेवाचें तसें झालें नाहीं. त्याला जेते लोक शरण गेले; समाजसंग्रहाचीं अधिक सूक्ष्म तत्त्वें त्यांच्या बुद्धीला प्रतीत झाल्यामुळें त्यांनीं या पुरस्कर्त्याला शरणचिठी देऊन त्याचे सर्वपूजक आपल्या सर्वाटोपी समाजांत अन्तर्भूत करून घेतले. म्हणून या पांच पुरुषांना पंचमानव हिंदूसमाजाचीं महाभूतें सुद्धां म्हणतां येईल. असो. याप्रमाणें वर्णमूळ हिंदूसमाजरचनेचा परशुरामाच्या कथेंतून उत्पन्न होणारा विचारतंतु महादेवाच्या कथेपर्यंत येऊन पोंहोचतो.

# प्रकरण सातवें

# उपसंहार

## मानव्याची शक्तिगर्भता—

मागील प्रतिपादनावरून ध्यानांत आलें असेल कीं, आपले जे अवतार आहेत ते सर्व समाजाच्या बांधणीच्या व वाढीच्या दृष्टीनें ओळखावयास हवेत. परमार्थ, देवभोळेपणा, अतींद्रियता इत्यादींचे जे अवलेप त्यांजवर चढले आहेत ते खरडून टाकून पाहिलें म्हणजे त्यांचीं शुद्ध मानवी रूपें दिसूं लागतात व त्यांचीं इतिहासरूप चारित्र्यें कळूं लागतात. नरसिंहाच्या आधींचें कांहीं सांगतां येत नाहीं; पण तेथून पुढें झालेले सर्व अवतार म्हणजे त्या त्या युगमानांतील पुरुषावतंस अथवा 'सुपरमेन' होते. त्यांच्यापैकीं प्रत्येकाची सत्ता ओंवतीभोंवतींच्या कित्येक शतकांवर पसरलेली असे. भिन्नभिन्न लोकसमूहांचा कलह व्हावा; तो निवत जावा; नवी सामुदायिक विचाराची कल्पना निघावी; ती बळ धरूं लागावी; व शेवटीं तिचा परम उत्कर्ष करून युगमानमापक असें निर्णायक कृत्य या पुरुषावतंसानें करावें असा क्रम चालत आलेला स्पष्ट दिसतो. हें सर्व इतिहासाचें रूप जसेंच्या तसें आजपर्यंत टिकून राहिलें असतें तर सामाजिक बळवर्धनास त्याचा उपयोग फार झाला असता. आपल्या मानवयोनींत जन्मास आलेल्यांच्या कर्तृत्वानें मनुष्यास धीर यावयास हवा, त्याचा उत्साह वाढावयास

हवा, कर्तृत्वाची त्याची त्याला धमक वाटावयास हवी. दुसरीकडून कोठून हें वारें येऊन पोंहोचतें असा भोळाभाव त्याच्या मनांत उदित होण्याच्याऐवजीं आपल्यासारख्या माणसांनीं हीं ऐतिहासिक अचाट कृत्यें केलीं या जाणिवेनें त्याला स्वाभिमानाचें स्फुरण यावें हें युक्त आहे. मानव्याच्या शक्तिगर्भतेवर त्याची जितकी श्रद्धा बसेल तितकी चांगली. आपल्या मन-बुद्धींच्या सामर्थ्यांची खाण मानवप्राणी जों जों खोल खणीत जात आहे तों तों नव्या नव्या सामर्थ्यांची प्राप्ति त्यास होत चालली आहे. या सामर्थ्य-प्राप्तीच्या आजवरच्या यत्न-परंपरेंत आत्तांच सांगितलेले पुरुषावतंस हे गणिले पाहिजेत व सध्यां भूतलावर मानवी प्रगतीसाठीं झगडणारे जे कोणी आहेत ते त्याच परंपरेंतील होत हें ध्यानांत यावयास हवें. पण या पुरुषावतंसांचीं मानवी रूपें लुप्त होऊन गेलीं आणि माणसांना आपल्या दुर्बलत्वाची जाणीव जास्त जास्तच होऊं लागली. त्यांचा व यांचा मानवी संबंध तुटला आणि म्हणून मनुष्याच्या आधीन असलेल्या कर्तृत्वावरचीही माणसांची श्रद्धा लुली पडली. म्हणून त्यांचें ऐतिहासिक रूप ओळखावयास हवें. हें ऐतिहासिक रूप आपण ध्यानांत ठेवावें म्हणून पूर्वजांनीं व्यवस्थाहि केलेली आहे.

## सणांची ऐतिहासिकता—

रामचंद्रानें रावण वधानंतर अयोध्यापुरींत ज्या दिवशीं प्रवेश केला त्या पाडव्याच्या दिवशीं आपण अजूनही गुढ्यातोरणें उभारतों. मात्र रामानें रावणाला कां मारलें हें लोकांनीं ध्यानांत ठेवलें असतें तर बरें झालें असतें. हिरण्यकशिपूच्या घराण्यावर मिळविलेल्या विजयास्तव नृसिंहजयंती रूढ केलेली आहे.

श्रीकृष्णानें कालिया नांवाच्या नागासुरावर केवळ बालवयांत मिळविलेल्या विजयाची खूण म्हणून नागपंचमी रूढ झालेली आहे. वास्तविक त्यानें नागाचा वध केलेला होता. पण बलीच्या प्रकरणांत ज्याप्रमाणें शत्रूचीही खूण ठेवण्याची व्यवस्था केली तशीच याही प्रकरणीं केली. वामनाचा पराक्रम ध्यानांत रहावा म्हणून वामनद्वादशी ठेविलेली आहे. विजयादशमीच्या दिवशीं पांडवांनीं शमीपूजन करून पुन्हा शस्त्रधारणा केली यासाठीं तो दिवस सीमोल्लंघनाचा आणि उत्सवाचा म्हणून धरण्याची वहिवाट आहे. देशोदेशीच्या कुमारिका बंदिखान्यांत ठेवणाऱ्या नरकासुराचा वध करून त्या कुमारिकांची मुक्तता श्रीकृष्णानें केली. त्याच्या या भव्य पराक्रमाची स्तुति म्हणून नरकचतुर्दशीचा सण ठेविलेला आहे. आणि बळीच्या बंदिखान्यांतून मुक्त झालेल्या लक्ष्मीचें पूजन प्रसन्न चित्तानें करावयाचा क्रम लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं ठेविला आहे. बलिप्रातिपदेला बलीचा उच्छेद झाला पण त्याचीहि स्मृति औदार्यानें ठेवण्याची व्यवस्था या सणानें केली आहे. यावरून दिसून येईल कीं, ज्याला आपण धार्मिक धार्मिक असें म्हणतों त्या गोष्टींत केवळ सामाजिक इतिहास सांठवून ठेवलेला आहे. असो.

## शास्त्रपूत स्वीकार—

या समाजाच्या वाढीसाठीं जें कांहीं निराळें करावें असें निरनिराळ्या युगमानांत वाटलें तें करावयास हिंदू समाजानें मागें घेतलेलें नाहीं हेंही मागील प्रतिपादनावरून कळून येईल. याचा अर्थ असा कीं, यापुढें समाजवर्धनासाठीं जें कांहीं निराळें करण्याचा प्रसंग प्राप्त होईल तें जर आधुनिक विचारांनीं शास्त्रपूत झालेलें असेल व तर्कप्राप्त

झालेलें असेल तर तें पतकरावयास हिंदु समाजाला कोणतीही हरकत वाटतां कामा नये. किंबहुना आमचा सामाजिक इतिहास आम्हांला या कामीं प्रोत्साहकच आहे. परशुरामाची क्षत्रियकुलांताची स्मृति क्षीण झाल्यापासून तों महादेवाच्या अनुयायांचा आपल्या समाजांत समावेश करून घेण्याच्या कालापर्यंत केवढी प्रसरणशील बुद्धि समाजानें बाळगली होती हें समाजानें पहावयास हवें व नवीन कालाला अनुसरून त्यापासून जितका बोध घेतां येण्यासारखा आहे तितका घ्यावयास हवा. पण अनार्यांना आपल्या समाजांत अंतर्भूत करतांना त्यांच्या ज्या समजुती, संस्था आपल्याशा केल्या त्यामुळेंच आर्यांचा तेजस्वीपणा नष्ट झाला असेंही सामाजिक इतिहासावरून ध्यानांत येतें. त्यांचा मनोनुनय करतां करतां त्यांच्यांतील तिमिराची झापड वरिष्ठांवर इतकी पडली कीं, त्याची स्वयंभू तेजास्विता केवळ गुदमरून गेली. एका महादेवाचें ठीक झालें. पण ती कल्पना एकदां रूढ झाल्यावर असंस्कृताचें काय वाटेल तें पतकरण्याचें काम संस्कृतांनीं सुरू केलें; आणि सहस्रावधि देवता, उपदेवता, निर्बळ समजुती आणि आचार-विचार यांनीं संस्कृतांच्या मनावरही पगडा बसविला. म्हणून व्हिटनेनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'हे अल्पसंख्य लोक असंस्कृतांच्या भाराखालीं मरगळीस आल्यासारखे दिसत आहेत.' या त्याच्या म्हणण्यांत पुष्कळच तथ्य आहे असें माझें मत आहे. अर्थात् यापुढें जे कोणचे फरक करावयाचे असतील त्यांत या चुका होऊं देतां कामा नये.

**भांडणाचीं मुळें तींच असणार—**

परशुरामाच्या काळीं व तेथून पुढेंही स्त्रिया व धन यांसाठीं स्थूळरूप किंवा सूक्ष्मरूप, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असे झगडे होत

राहिलेले आहेत; आणि प्रस्तुत कालांतही स्त्री व धन हीं भांडणाचीं मुळें आहेतच. इतकेंच कीं, युरोपांत या भांडणाचें रूप निराळें आहे व हिंदुस्थानांत अजून कित्येक वर्षेंपर्यंत तें निराळेंच राहील. युरोपीय समाजांत एकरूपता, एकवर्णता, व सजातीयता हीं प्राय: सर्वत्र असल्यामुळें तेथें उच्चनीच कल्पनांवरून स्त्रीबद्दलचा वाद सामाजिक रूप धारण करणार नाहीं. तेथेंही स्त्रीचा वाद आहे, पण तो स्त्री व पुरुष असा आहे. म्हणजे स्त्रीचे हक्क कोणचे व पुरुषाचे हक्क कोणचे, घरच्या संसारांत आणि सामाजिक संसारांत त्या दोघांचीं कर्तव्यक्षेत्रें कितपत पृथक् पृथक् आहेत, असा वाद तेथें आहे. आपल्या येथें आज असलेल्या जातिविषयक चळबिचळीवरून असें स्वच्छ म्हणतां येतें कीं, वरिष्ठ वर्णांतील स्त्रिया व कनिष्ठ वर्णांतील पुरुष या संबंधाचा वाद उत्तरोत्तर माजत राहील. वरिष्ठ वर्णांतील स्त्रिया आपणांस प्राप्त व्हाव्या अशी इच्छा व असा अभिलाष कनिष्ठ वर्णांतील पुरुषांना अधिकाधिक वाटत जाईल. शिक्षण हें सर्व बांधारे फोडतें व माणसांत हरतऱ्हेची समता प्रस्थापित करतें असा आग्रह कनिष्ठ पुरुष धरतील, व केवळ शिक्षणापलीकडेही अशा कित्येक गोष्टी परंपरेनें आम्हांस प्राप्त झाल्या आहेत कीं, ज्यांच्या जपणुकीसाठीं आम्हीं आमच्या स्त्रियांचें हें वर्णांतर होऊं देणार नाहीं, असें वरचे वरचे वर्ण म्हणत राहतील. जोंपर्यंत अशीं चारदोन वर्णांतरें होतील तोंपर्यंत तिकडे कोणी फारसें लक्ष देणार नाहीं व कांहीं लोक त्याचें उघड कौतुकही करतील. पण या वर्णांतराला संख्येच्या दृष्टीनें फार मोठें रूप येऊं लागलें तर वरचे वरचे वर्ण प्रथम खिन्न व नंतर रुष्ट होतील आणि हें बंद पाडण्यासाठीं इलाज करण्याच्या मागें लागतील. हें

म्हणून ठेवण्यांत भाकित वगैरे काहीं नाहीं. सामाजिक मनाच्या चलनवलनाचा हा बोध आहे इतकेंच. ज्या गोष्टी मनांत आणावयास किंवा करावयास ज्ञान व संस्कृति यांच्या उंच पदवीला अनुसरून प्रथम संकोच वाटतो त्याच गोष्टी, एकाद्या अप्रिय पद्धतीला विकट रूप प्राप्त होत आहे असें दिसूं लागलें म्हणजे माणसें उघडपणानें बोलूं लागतात व नव्या चळवळींचे आरंभ होतात. हा प्रकार वरच्या वरच्या वर्णांत चालूं होईल असें मानवी स्वभावाच्या ओळखीवरून निःसंशय म्हणतां येतें. युरोपांतील स्त्रीविषयक भांडण हें आहे कीं, स्त्रीत्वाची किंमत पुरुषसापेक्षतेनें नेमकी कोणची आहे हें ठरवावें. पण हिंदुस्थानांतील स्त्रीविषयक भांडण मात्र उच्चनीच भावावरून किंवा केवळ पृथक्पणावरून सुद्धां होत राहील. वर्णांतराचे फुटकळ प्रकार उपेक्षणीयच राहतील. पण जर कनिष्ठांकडून वरिष्ठांचे स्त्रीविषयक आक्रमण होत आहे असें दिसूं लागलें तर प्रथम जपणुकीची व नंतर प्रतिक्रियेची भावना निःसंशय उदित होईल. परशुरामचरित्राच्या उपसंहारांत या बाबीसंबंधानें इतकेंच लिहितां येण्यासारखें आहे; व जर हिंदु समाजाचें व राष्ट्राचें पाऊल जोरानें पुढें पडावयास हवें असेल तर वरच्या वरच्या लोकांत हें स्त्रीविषयक मानसिक अस्वास्थ्य जितकें कमी उत्पन्न करतां येईल तितकें चांगलें. एक गोष्ट थोड्या सूक्ष्मतेनें पहावयास हवी. वरच्या वरच्या वर्णांतील सुशिक्षितांपुढें स्त्रीविषयक वर्णांतराचा हव्यास नसल्यामुळें त्यांनीं युरोपांत चालूं असलेला स्त्रीत्वाचें मोल ठरविण्याचा प्रश्न हातीं घेतलेला आहे. म्हणजे असें कीं, स्त्रीविषयक आक्रमण करूं इच्छिणाऱ्या खालच्या खालच्या लोकांना जें घडून यावयास हवें तें घडून येण्यास वरिष्ठांच्या या युरोपीय पद्धतीच्या चळवळीचा आपोआपच फायदा मिळत

रहाणार आहे. पण हे सर्व प्रकार फुटकळ प्रमाणाच्या बाहेर जाऊं लागले कीं वरच्या वरच्या वर्णांची जपणुकीची उपजत बुद्धि खास जागी होईल व तिचा व्यापार यथानुकूल चालू होईल.

**समंजसपणा—**

हिंदु समाजानें या बाबतींत समंजसपणाचें धोरण ठेवावयास हवें. तें असें कीं, जर कोणी असवर्ण विवाह केले तर करणारे स्वतःच म्हणतात त्याप्रमाणें, त्यांनीं त्यांचा तो प्रश्न खाजगी समजावा व समाजाच्या ज्या संस्कृति-कोष्टकांत त्यांना बसतां येण्यासारखें असले तेथें त्यांस सुखानें बसूं द्यावें. इतकेंच काय पण अशा तऱ्हेचा असवर्ण विवाह हा अधर्म्य आहे असें मानणें हेंही अगदीं चूक आहे. धर्म्य गोष्टीचा संभावितपणा अशा विवाहाला प्राप्त करून दिला पाहिजे. दोन पृथक् वर्णांतील हिंदु माणसें लग्नसंबंधानें एकत्र आलीं असतां तीं अहिंदु बनावी हें आश्चर्य आहे! म्हणून हा प्रश्न धर्म्यता किंवा अधर्म्यता यांतून बाहेर काढून मानवी मनाचे जे याहूनही गूढस्थ असे सांस्कृतिक धर्म आहेत त्यांच्या व्यापारांवर अवलंबून ठेवावा. सामाजिक, वांशिक, सांस्कृतिक किंवा केवळ पृथक्पणाच्या जाणिवेनेंही उत्पन्न झालेले असे हे गूढस्थ धर्म असतात. हे जागृत करून न खिजविण्याची तरतूद समाजांत राहिली म्हणजे कसलेही सामाजिक कलह उत्पन्न होणार नाहींत. पण सर्व तऱ्हेच्या चळवळींत असें दिसून येतें कीं, वासना, भ्रान्तपणा आणि अतिशयोक्ति यांचा बाजार प्रथम भरतो व समंजसपणा, तत्त्वनिष्ठा आणि प्रमाणशीलपणा हीं मागाहून उदित होतात. तोच प्रकार याही बाबतींत कदाचित् होणार असेल.

**धन संचार ही खरी घोषणा—**

माझ्या मतें सध्यां हिंदुसमाजांत क्रांतीची खरी घोषणा ही धनसंचारासंबंधाची असावयास हवी. हिंदु समाजांतील सर्व माणसांना जर देशाभिमान वाटावयास हवा असला तर त्यांना असें सामाजिक आश्वासन मिळावयास हवें कीं, सृष्टीनें दिलेलीं जीं मनबुद्धींचीं सामर्थ्यबीजें प्रत्येकाच्या अंगीं असतील त्यांच्या विकसनास व विकसित झालेल्या या सामर्थ्यांच्या वापरास सर्वांस सारखी संधी आहे; कोणाही माणसाच्या म्हणजे ब्राह्मणापासून अतिशूद्रापर्यंत कोणाच्याही मार्गांत धर्म, समाजकारण, किंवा राजकारण हीं त्याच्या उत्कर्षाच्या कामीं आड येणार नाहींत असा औदार्याचा घोष सर्वांच्या कानीं जावयास हवा. आपल्या समाजांत आतांपर्यंत ज्यांना वर्णकल्पनेप्रमाणें खालीं ठेवलेलें आहे त्यांना ऐहिक उत्कर्षाची सर्व तऱ्हेची संधी मिळावी, ही घोषणा जों जों त्वरेनें बळ धरूं लागेल तों तों समाजांत देशाभिमानाची वृत्ति फैलावत जाईल. देशाभिमानाचें हें खरें अधिष्ठान होय. याच्या जोडीला असेंही पतकरावयास हवें कीं, ज्यांना ही उत्कर्षाचीं साधनें आजवर उपलब्ध झालेलीं होतीं त्यांच्या हातून तीं, ते केवळ श्रेष्ठ वर्णाचे, म्हणून हिसकलीं जाणार नाहींत. अशी दुहेरी हमी मिळाली म्हणजे समाजांतील बळ वाढूं लागेल. वरील सूत्रांत असें म्हटलें आहे कीं, मनबुद्धींतील बीजभूत सामर्थ्यांच्या विकसनास व विकसित झालेल्या सामर्थ्यांच्या वापरास संधी हवी. याचा अर्थ असा कीं कनिष्ठ वर्गाच्या लोकांना सामर्थ्यविकसनास व त्यांच्या विकसित झालेल्या सामर्थ्यांच्या वापरास संधी हवी व वरिष्ठ वर्गांतील लोकांच्या आधींच विकासित झालेल्या सामर्थ्यांच्या वापरास संधी हवी. हें तत्त्व समाजानें मान्य केलें

पाहिजे. यांतील कोणताही भाग जरी आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानांतून व आचारांतून सुटला तर देशाभिमान उत्पन्न होणं किंवा असलेल्याची हत्या न होणें हें दुरापास्त होय. वरील वर्णांना जे लाभ आधींच झालेले आहेत त्यांच्या बळावर हे वर्ण सारखी संधी दिल्यास नेहमींच पुढें रहातील अशी शंका उत्पन्न होणें स्वाभाविक असतें; म्हणून वरिष्ठांनीं आपली सचोटी सिद्ध करण्यासाठीं संधीचें माप होतां होईतों कनिष्ठांच्या अंगानें झुकतें ठेवावें हा खरा सामाजिक न्याय होय. पण वर सांगितलें आहे तें इतकेंच कीं, भावी जीविताच्या बांधणींत अमुक एकाला जन्माच्या मुद्द्यावरच संधी नाकारण्याची जुन्या काळची बुद्धि तत्त्व म्हणून शिरतां उपयोगाची नाहीं. हें झालें म्हणजे ऐहिक उत्कर्ष, म्हणजेच धनसंचार, सर्वत्र यथायोग्य होईल व सर्व हिंदु लोक देशाभिमानी होतील. या आर्थिक भूमिकेशीं वरील परिच्छेदांत वर्णन केलेलें आक्रमणाचें भांडण मिसळूं देऊं नये हें मात्र अवश्य होय. आर्थिक वर्णकल्पना नष्ट करणें हें सार्वत्रिक देशाभिमानाच्या संस्थापनेला अवश्य आहे. अशा तऱ्हेनें हें वर्णांतर झालें म्हणजे एकमेकांपासून कित्येक सहस्र वर्षें दूर राहिलेल्या सहस्रावधि सुट्या गटांची वास्तविक मूल्यें काय आहेत हें उत्तरोत्तर सिद्ध होत जाईल. आणि मग वांशिक वर्णकल्पनेचा प्रश्न सोडविण्याच्या मनःस्थितीस जो प्रांजलपणा असावयास हवा तो उत्पन्न होईल. असो.

## बुद्धाची चूक पुन्हा होऊं नये—

गौतम बुद्धानें वर्णकल्पनेचा उच्छेद करण्याचें मनावर घेतलें हें खरें; पण पहिलें मोडून पाडणें याच्या जोडीला समाजरक्षणाला दुसरें काय करावयास हवें याची कल्पना त्याला आली होती असें

वाटत नाहीं. उच्छेदाच्या प्रतिपादनाच्या मागोमाग घटनेचें प्रतिपादन अवश्य यावयास हवें. ब्राह्मणांचीं कर्तव्यें, क्षत्रियांचीं कर्तव्यें, अशा प्रकारची जी सामुदायिक जबाबदारीची कल्पना रूढ होती तिचा उच्छेद करतांना दुसरी कोणती तरी सामुदायिक जबाबदारीची कल्पना लोकांत प्रसृत करणें हें अवश्य असतें. हें आवश्यकपण इतर देशांपेक्षां हिंदुस्थान देशाला अधिकच लागू होतें. स्वदेशाच्या चतुःसीमा सुरक्षित राहून आंतल्या आंत लोकसमूहाचें भांडण होतें तर त्यानें स्वातंत्र्यनाश झाला असतां असें वाटत नाहीं. पण चतुःसीमा सुरक्षित नाहींत हें कित्येक शतकांच्या अनुभवानें सिद्ध झालेलें होतें आणि म्हणून उच्छेदाच्या मागोमाग घटना यावयास हवी होती. तसें झालें नाहीं असा बळकट वहीम येतो. क्षत्रियांनीं वर्णधर्म टाकून दिल्यानंतर समाजाच्या रक्षणासाठीं ब्राह्मणांनीं नवे क्षत्रिय करून घेतले, या चालू असलेल्या कथेला निःसंशय फार मोठा सामाजिक अर्थ आहे. हा त्यांचा प्रयोग ज्या प्रमाणानें यशस्वी व्हावयास हवा होता त्या प्रमाणानें तो होऊं शकला नाहीं. कारण बुद्धानें केलेला उच्छेद सार्वत्रिक आणि दीर्घायुषी ठरला. ही बुद्धाची चूक आतां पुन्हा केव्हांही होऊं देतां उपयोगाची नाहीं. वर जें संधिसमानतेचें तत्त्व प्रतिपादिलें आहे तें ही चूक होऊं नये यासाठीं प्रतिपादिलें आहे. वरिष्ठ वर्णाच्या वर्चस्वाचा उच्छेदच नुसता प्रतिपादिला तर मागली चूक पुन्हा केली असें होईल; पण संधिसमानता प्रतिपादिल्यानें समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत धनसंचाराला वाट पूर्णपणें मोकळी होईल व देशाभिमानाच्या सार्वत्रिक संस्थापनेचें विधायक कार्यही होईल. गुणसंवर्धनाला पूर्ण मोकळीक मिळाली आणि इहलोकीची सर्व सत्ता सुखें आणि वैभवें हीं आपल्या अंगच्या अधिकारानें येथें निःशंक

प्राप्त होतात असें सामाजिक आश्वासन सर्वांना मिळालें म्हणजे देशाभिमान उत्पन्न होऊन स्थिर झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. कर्तव्यविषयक वर्णकल्पना धनसंचाराला व सामर्थ्यविकसनाला प्रतिरोधी ठरते आणि म्हणून ती त्याज्य मानावयास हवी. सध्यांच्या काळीं जर एकाद्या चळवळीला खरीखुरी योग्यता असेल तर ती चळवळ म्हणजे हिंदु समाजांतील कनिष्ठ लोकांच्या सामर्थ्यविकसनास भरपूर अवसर देणें ही होय.

## सनातनी सुधारकपण—

क्रान्ति, व तीही सार्वत्रिक स्वरूपाची अशी, प्रतिपादणें एका स्वतंत्र युगमानाच्या आरंभीं आवश्यक आहेसें वाटूं लागतें हें खरें आहे. पण विचार करतां दिसून येईल कीं, या प्रतिपादनांतही मागला हिशेब सोडतां येत नाहीं. आपल्या जीविताची सर्वच्या सर्व सूत्रें एकदम कमजोर ठरतात किंवा सर्वस्वी निकामीं ठरतात असें मला वाटत नाहीं. आजवर होऊन गेलेल्या बुद्धिमान लोकांचें समुच्चित शहाणपण त्याज्य मानण्यासारखी परिस्थिति सध्यां प्राप्त झाली आहे असें प्रतिपादणें केवळ अत्युत्साहाचें निदर्शक आहे. तें विवेकशीलतेचें निदर्शक आहे असें खासच म्हणतां यावयाचें नाहीं. सहस्रावधि वर्षांवर पसरून राहिलेल्या मानवी जीवितांत, जाणून बुजून केलेल्या प्रयोगांनीं नसलीं तरी, येत गेलेल्या अनुभवश्रेणींनीं सिद्ध होत गेलेलीं, कांहीं कांहीं तत्त्वें वाटेनें गोळा करीत आपण येथवर येऊन पोहोंचलों आहों. अशा तत्त्वांच्या समूहालाच आपण संस्कृति हें नांव देत असतों. हें काय तें आपलें खरें धन होय. नवीन विचाराच्या स्वागताच्या गडबडींत या तत्त्वाची अवहेलना होते व त्याचा विसरही पडतो. तसेंच तीं नित्य परिपाठींत

मिसळून गेल्यामुळें त्यांचें मोलही ध्यानांत रहात नाहीं. उलटपक्षीं नवीन विचार अपरिचित असल्यामुळें व पुष्कळदां त्याच्या अंगाला उग्र तेलें विनाकारण चोपडलेलीं असल्यामुळें समाजाची वृत्ति सावधपणाच्याही पुढें जाऊन भयाकुल होतें आणि भांबावून जाऊन समाज जुन्या पडीक भिंतीच्या आश्रयाला जाऊन उभा रहातो. म्हणून संचित शहाणपणांतील मजबुदी व आगामी तत्त्वपुंजांतील उत्तेजकपणा हीं विवेकबुद्धीनें एकत्र आणणें प्राप्तच बनतें. अस्पृष्टांचा प्रश्न, विज्ञानबोधाचा प्रस्तावनाखंड, व हें परशुरामचरित्र या तीनही पुस्तकांत प्रतिपादनाची पद्धति अशी ठेविलेली दिसेल कीं नवीन पद्धतीस अनुसरून तर्क, इतिहास व शास्त्र यांच्या बळावर, अज्ञानग्रस्त समाजाच्या पायाखालची अशुद्ध भूमि निखळवून तेथील शुद्ध भूमि त्याच्या नजरेस आणावी व दुसऱ्या पक्षीं संचित तत्त्वसमूहाचें विधायक व धारकरूप सुस्पष्ट करून दाखवून अत्युत्साहग्रस्त सुधारकचमूच्या विवेकबुद्धीला खाद्य पुरवावें. या प्रतिपादन-पद्धतीला आकर्षकपणा कमी रहातो हें ओळखतां येतें; पण ही नाइलाजाची गोष्ट आहे. परशुरामचरित्राचें अवलोकन या पद्धतीनें केलेलें आहे, त्याचा स्वीकार वाङ्मयरसिकांनीं करावा अशी त्यांस विनंति आहे.

५५८५

REFBK-0005586